समतावादी

# मुक्त संवाद

एक समृद्ध वाचन यात्रा

पत्रिका

फेब्रुवारी २०२६ वर्ष तिसरे : अंक ६





INDIA'S BEST PERFORMING PORT

# जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण
# सर्वोत्तम कामगिरी करणारे कंटेनर पोर्ट, आता
# भारताचे सर्वात मोठे

**१० दशलक्ष + टीईयू**
क्षमता असलेले पहिले भारतीय पोर्ट

भारताच्या प्रगतीला ऊर्जा देणारी ३६ वर्षे

भारताच्या मोठ्या पोर्टपैकी ५४% कंटेनर वाहतूक हाताळणी

जगातील शीर्ष १०० कंटेनर पोर्टमध्ये २६ व्या क्रमांकावर

भारतातील पहिले १०० % लँडलॉर्ड पोर्ट

१५+ मीटर खोल ड्राफ्टसह पाच कंटेनर टर्मिनल्स

तंत्रज्ञान आणि पायाभूत सुविधांद्वारे ईझ ऑफ डुइंग बिझनेसवर केंद्रीभूत

निर्यातक्षम वाढीसाठी एका समर्पित सेझची अतिरिक्त सुविधा

शाश्वतता हा एक उपक्रम नाही तर मानक आहे

भारताच्या एकूण सीमाशुल्क महसुलाच्या २१ % योगदान

आम्हाला येथे फॉलो कराः /JNPORT /JNPort /JNPAPort /JNPA - Jawaharlal Nehru Port Authority

अधिक माहितीसाठी, जेएनपीए हेल्पलाइन क्रमांक १८००२२८२८२ वर कॉल करा. www.jnport.gov.in

प्रकाशक, संपादक
डॉ. विवेक कोरडे

कार्यकारी संपादक
शेखर देशमुख

सल्लागार संपादक मंडळ
सुलक्षणा महाजन, डॉ. शैलजा बरुरे, लोकेश शेवडे, राजेंद्र साठे सुजय शास्त्री, सायली परांजपे

संपादकीय साहाय्य
सुमेधा कुवळेकर

व्यवस्थापन सल्लागार
विकास नाईक

शीर्षनाम आरेखन
विजय नार्वेकर

मुखपृष्ठ छायाचित्र
ख्रिस्तपूर्व तिसऱ्या-दुसऱ्या शतकातली रोमनकालीन रत्नजडित अंगठी

अंकातील छायाचित्रे
इंटरनेटवरून साभार

अंक मांडणी, सजावट
वैभव केसरकर (८५५१८५०४६२)

व्यवस्थापक
चंद्रकांत माळगवे (९६१९८२३६७२)

विनामूल्य वितरणासाठी
'समतावादी मुक्त-संवाद पत्रिका' हे मासिक मालक विवेक दत्तात्रय कोरडे यांच्या करिता, प्रकाशक विवेक दत्तात्रय कोरडे यांनी जागृती प्रिंटर्स, त्रिमूर्ती ९१, घारपुरे पथ, गिरगाव, मुंबई ४००००४ येथे छापून रूम नं. ४६, पहिला मजला, आंबेडकर सदन, सखाराम बालाजी पवार मार्ग, करीरोड नाका, डिलाइल रोड, मुंबई ४०००१३ येथून प्रसिद्ध केले.
संपादक : विवेक दत्तात्रय कोरडे

'Samatawadi MuktSanvad Patrika' Monthly Publication owned by Vivek Dattatrey Korde Printed at Jagruti Printers,Trimurti 91, Gharpure Path, Giragaon Mumbai 400004 and Published at Room No. 46, First Floor, SakharamBalaji Pawar Marg, Currey Road Naka, Delisle Road, Mumbai 400013
Editor : Vivek Dattatrey Korde
E mail Id- smsp.mumbai@gmail.com
(अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी, प्रतिक्रियांशी अथवा विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# अंतरंग




✶ रुपयाचा ज्ञानवर्धक सफरनामा
– संपादकीय २

✶ प्रेमाचा दस्तावेज!
– श्रीरंजन आवटे ५

✶ अन्यथा, ठाकरे नि शिंदेंचा 'रामदास आठवले' होईल!
– राजेंद्र साठे ८

✶ काँग्रेस मुक्त की युक्त?
– डॉ. विवेक कोरडे १३

✶ कुठून येते ही बेफिकिरी?
– रवि आमले १७

✶ राजकीय अर्थशास्त्राची पद्धत आणि जगाची जडणघडण
– हितेश पोतदार २१

✶ ट्रंप यांनी व्हेनझुएलावर रुमाल टाकला!
– डॉ. मोहन द्रविड २७

✶ चीनची अद्वितीय क्रीडा संस्कृती
– गजानन जोशी ३३

✶ प्रेमाची मुळाक्षरे
– प्रा.श्रीनिवास हेमाडे ३९

✶ बौद्ध दर्शन : नास्तिकतेकडे पाहण्याचा एक दृष्टिकोन
– जगदीश काबरे ४३

✶ मेट्रोत मेट्रो...दिल्ली मेट्रो!
– आशय गुणे ४८

✶ दी लास्ट सपर : लिओनार्दोचे अद्वितीय चिंतन रंग
– डॉ. आनंद जोशी ५३

✶ राधा : लौकिक, अलौकिक नि पारलौकिक विश्वाची अनोखी सांगड
– डॉ. नेहा सावंत ५९

✶ सोसायटी के गले की हड्डी
– प्रसाद कुमठेकर ६६

✶ मूक आक्रोशाचे चित्रबिंब
– रेखा देशपांडे ७१

✶ रुत छा गयी रे...
– गणेश मनोहर कुलकर्णी ७५

✶ 'अयोध्या': विचारभ्रष्ट सामाजिक वास्तवाचे राजकीय चरित्र
– दा. गो. काळे ७९

✶ उत्तर
मूळ कथा : वनफूल; अनुवाद : सुमती जोशी ८५

✶ इन्स्टंट जीवनात आयुर्वेद कालबाह्य झाला आहे?
– डॉ. श्रीराम सावरीकर ८८

## ‘ऑडसी ऑफ दी रुपी’

# रुपयाचा ज्ञानवर्धक सफरनामा

**संपादकीय**



चित्तवेधक मांडणी



पार्श्वभूमी ग्रंथभिंतींची



शेर शाहकृत रुपया

**सांस्कृतिक राजकारणाद्वारे आपले स्थान बळकट करू पाहणारे राज्यकर्ते उत्सव–महोत्सवांतून सर्वंकष सत्तेचे तेवढे प्रदर्शन मांडताना दिसताहेत. म्हणूनच जिथे टेकफेस्टच्या माध्यमातून सृजनशील कल्पना–संकल्पनांचा मेळ अपेक्षित असतो, तिथे संरक्षण तज्ज्ञ देशाच्या शस्त्रसज्जतेचे दाखले देत फिरताना दिसतात, पुस्तकांच्या महामेळ्यांत तथाकथित संस्कृतिरक्षक संस्था–संघटनांच्या धर्मकेंद्री ‘राष्ट्रवादी’ कथनाच्या जागा विस्तारलेल्या दिसतात. दिल्लीच्या वर्ल्ड बुक फेअरमध्ये संकल्पनेच्या मिषाने युद्धभूमीवरची चलचित्रे आणि शस्त्रसज्ज सैनिक नजरेस पडतात. या पार्श्वभूमीवर मुंबईत सरमाया आर्ट्स फाउंडेशनच्या वतीने आंतरराष्ट्रीय ख्यातीप्राप्त बहुश्रुत संशोधक, नाणकशास्त्र तज्ज्ञ डॉ. शैलेंद्र भंडारे यांच्या सौंदर्यदृष्टीला अनुलक्षून रुपयाच्या स्वातंत्र्योत्तर अमृतमहोत्सवाच्या निमित्ताने भारतीय रुपयाचा देदीप्यमान सफरनामा उलगडणारे प्रदर्शन खऱ्या अर्थाने स्थळ–काळाचे औचित्य साधणारे मुख्य म्हणजे, ज्ञानाचा उन्नत अनुभव देणारे होते...**

कोणी याला ‘कल्चरल शिफ्ट’ म्हणते, कोणी सांस्कृतिक उत्थान पर्व. या उत्थान पर्वाची वैशिष्ट्ये वा दर्शनी लक्षणे काय तर, गिनीज बुकापासून लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्सर्वर नजरेपुढे ठेऊन भरवले जाणारे अति भव्य दिव्य सोहळे, त्या सोहळ्यात होणारी आतिषबाजी, लेसर दिव्यांची, ड्रोनची शोबाजी, ‘वॉर क्राय’ प्रकारातली तारस्वरांतली घोषणाबाजी. त्या घोषणाबाजीतून प्रतिध्वनित होत राहतो, सांस्कृतिक गर्व, अभिमान, अहंकार, न्यूनगंड आणि द्वेषसुद्धा. अति भव्यतेच्या सोसामुळे जागोजागी ओसंडून वाहणारी अरसिकता, काही प्रमाणात बीभत्सताही. यातले काही सोहळे लष्करी शिस्तीत पार पडणारे, पण म्हणूनही त्यात सृजनापासून अभिव्यक्तीपर्यंत मुक्ततेचा अभाव नजरेत भरण्याइतका ठळक.

थोडक्यात, राज्यकर्त्यांच्या विचार–वारशाला आडवे जाणारे जे जुने ते एकेक करत जमीनदोस्त होताना वा अडगळीत टाकले जात असताना देशाचा सध्याचा सार्वजनिक अवकाश संवेदनशील मनांना खुपणाऱ्या अरसिकतेचे, असुंदरतेने भरलेला दिसत आहे. अशाप्रसंगी अभ्यासकांच्या शोध–संशोधन वृत्तीचा, सौंदर्यदृष्टीचा, कलातत्त्वांचा सन्मान करणाऱ्या ज्या काही तुरळक जागा शिल्लक आहेत, त्यातलीच एक जागा, मुंबईतल्या फोर्ट भागात स्थित आहे. हा अवकाश व्यापला आहे, सरमाया आर्ट्स फाउंडेशन नावाच्या संस्थेने. संस्थेच्या उंच भिंती बहुमूल्य ग्रंथांनी व्यापलेल्या आहेत. याच ग्रंथभिंतींच्या साक्षीने ‘ऑडसी ऑफ दी रुपी’ हे भारतीय रुपयाचा प्राचीन ते ऐतिहासिक सफरनामा उलगडणारे प्रदर्शन भरले होते. निमित्त होते, स्वातंत्र्यानंतर भारतीय चलनाला पंचाहत्तर वर्षे पूर्ण झाल्याचे. १ नोव्हेंबर




*छायाचित्र सौजन्य :*
*सरमाया आर्ट्स फाउंडेशन*

*भारतीय रुपयाचा इतिहास हा केवळ चलनाचा नव्हे, तर संस्कृती-परंपरांच्या स्वीकाराचा, सहिष्णू नि उदारमतवादी संस्कृतीचा इतिहास होता, हा डॉ. शैलेंद्र भंडारे आणि पॉल अब्राहम यांच्या एकत्रित प्रयत्नांतून आकारास आलेल्या रुपयाच्या प्रदर्शनाचा सांगावा होता...*

२०२५ ते ३१ जानेवारी २०२६ असे तब्बल तीन महिने हे प्रदर्शन सर्वसामान्यांसाठी खुले होते. अगदी लाखो नाही, पण कुतूहलाने भारलेल्या काही हजार अबालवृद्धांनी प्रदर्शनाला भेट देत रुपयाची ऐतिहासिक महत्ता जाणून घेतली. या प्रदर्शनाचे कर्ते होते, ऑक्सफर्ड येथील ॲश्मोलियन म्युझियमचे संवर्धनकार, नाणक शास्त्र तज्ज्ञ डॉ. शैलेश भंडारे आणि प्रदर्शनाची रचना केली होती, पवित्रा राजाराम यांनी, तर या प्रदर्शनासाठी आत्मीयतेने पुढाकार घेतला होता, सरमायाचे संस्थापक पॉल अब्राहम यांनी.

**जतन-संवर्धनाचे सौंदर्य**

एरवीसुद्धा कोणताही अवकाश तिथल्या कर्त्याधर्त्यांनी अंगिकारलेल्या संस्कृती-परंपरांची, अभिव्यक्तीच्या पोताची, संदर्भ नि सौंदर्यदृष्टीची जाणीव करून देत असतो. ही तर बोलून चालून आर्ट्स फाउंडेशनची वास्तू. इथे विद्वत्ता आणि कलादृष्टीचा अनोखा संगम पाहताक्षणी नजरेत भरणारा. रुपयाचा प्रवास सांगणारे माहितीफलक, त्यासमोर इतिहासकाळापासूनची धातूंची नाणी आणि कागदी चलनातले रुपये निगुतीने मांडलेली काचघरे, ज्यांना हा सफरनामा ऐकायचा-पाहायचा आहे, त्यांच्यासाठी केलेली ऑडिओ-व्हिज्युअल तंत्राची सोय, प्रदर्शनाची एक भिंत चलनी रुपयाची आजवरची जवळजवळ पाच शतकी समयरेषा अधोरेखित करणारी. प्रदर्शनाची प्रकाशयोजना अंश आणि कोनाच्या संदर्भाने इतकी नीटनेटकी, की त्यात छोट्यात छोट्या नाण्यांपासून आकाराने मोठे नकाशा नि नोटेपर्यंतची प्रत्येक विषयवस्तू नेमकी प्रकाशमान झालेली. विषयवस्तूंवरचे लक्ष विचलित होणार नाही, अशा बेताने फलकांच्या पार्श्वभागावरची रंगसंगती नजरेला सुखावणारी. विषयात रममाण होण्यास उपयुक्त असणारी आवश्यक तेवढी निःशब्दताही दर्शकाच्या सोबतीला. महत्त्वाचे म्हणजे, विज्ञान-तंत्रज्ञान, कला-तत्त्वज्ञान, शोध-संशोधनातली पारंगतता यातली एकतानता इथे या प्रदर्शनात एकटवलेली दिसत होती.

आनंदाची बाब म्हणजे, प्रदर्शनाचे कर्तेधर्ते डॉ. शैलेश भंडारे हे 'मुक्त संवाद'चे हितचिंतक नि लेखक. त्यांची नाणक शास्त्रातली कामगिरी, त्यांना त्यांच्या वाटचालीत भेटलेले ज्ञानवंत यावर प्रकाशझोत टाकणारा लेख अलीकडेच म्हणजे, २०२५ च्या दिवाळी अंकातला 'ज्ञानवंतांचा गोतावळा' या विभागातर्गत प्रकाशित झालेला अनेकांना आठवत असणार. त्यात नमूद त्यांच्या अभ्यासवृत्तीचे लख्ख प्रतिबिंब या प्रदर्शनात उमटले दिसत होते.

**रुपयाची उत्कंठावर्धक गोष्ट**

प्रत्येकाकडे एक गोष्ट असते. मात्र, ती गोष्ट सांगण्याचा मार्ग, माध्यम आणि पद्धती निरनिराळी असते. गोष्ट रुपयाचीच, पण चित्रकाराने ती चित्रांच्या माध्यमातून सांगितलेली असते, कथाकथनकाराने कथेच्या माध्यमातून सांगितलेली असते, चित्रपटकर्त्याने चित्रपटाच्या माध्यमातून सांगितलेली असते, डॉ. शैलेश यांनी ती प्रदर्शनाच्या माध्यमातून सांगितली. त्याला अर्थातच आजवर त्यांनी केलेल्या नाणक शास्त्राच्या अभ्यासाची, संशोधनाची, जतन-संवर्धनाच्या अनुभवांची मुख्य म्हणजे, त्यांच्या ठायी असलेल्या सम्यक विचारांची नि सखोल चिंतनाची भरभक्कम जोड होती. डॉ. शैलेंद्र यांच्यासारखा संशोधकवृत्तीचा अभ्यासक जेव्हा विषयाला भिडतो, तेव्हा तो सामान्य संग्राहकाला न दिसलेल्या, जाणवलेल्या जगाचा व्यापक अर्थाने शोध घेतो. हा प्रवास पाहताना, अशाच प्रकारे रुपयाशी

जोडलेला इतिहास, भूगोल, त्या काळच्या शासनसत्तांचा भौगोलिक प्रभाव, त्या त्या काळचे समाजजीवन, विचारपद्धती, आचारपद्धती, चलन व्यवहारात होत गेलेले बदल, व्यापार उदिमाची दिशा, रुपयाच्या मांडणीत आणि रचनेत झळकणारी कलादृष्टी, आधुनिक तंत्र आणि तंत्रज्ञानात होत गेलेले बदल... असे सारे येथे आलेल्या दर्शकाला ज्ञात होत जाते.

वस्तुतः नाण्यांचा इतिहास खूप पुरातन. त्या त्या काळातल्या राज्यकर्त्यांनी आपली नाममुद्रा नाण्यांच्या रुपाने कोरून ठेवलेली, परंतु जगाच्या व्यवहारात महत्त्वाचे स्थान आणि प्रभाव असलेल्या रुपयाचा इतिहास हा अगदी अलीकडचा. म्हणजेच १६ व्या शतकापासूनचा. १५३८ मध्ये हुमायूनविरोधातल्या बंगालमधल्या लढाई दरम्यान अफगाणी शासक शेर शहाने स्थिर विनिमय दर असलेले द्विधातू चलन अस्तित्वात आणले नि अशा रीतीने चांदीच्या रुपयाचा जन्म झाला. पुढे मुघलांनी जिथे जिथे आपले राज्य होते वा स्थापले, त्या-त्या देशात, प्रांतात (काबूल ते तिरुचिरापल्ली आणि सिंध ते चितगाँग) या चलनाला मान्यता देऊन ते प्रचलित केले. पुढे जाऊन मुघलांनी जिथवर आपला व्यापार वाढवला तिथवर म्हणजेच अरेबिया, इस्ट आफ्रिका, इस्ट इंडिजपर्यंत रुपया हे चलन मान्यता पावले. शेर शहानंतर अकबर, जहांगीर, औरंगजेब, पोर्तुगीज शासक, इस्ट इंडिया कंपनी, डच इस्ट इंडिया कंपनी, फ्रेंच शासक, ब्रिटिश शासक असा काळाचा मोठा टप्पा ओलांडत १९५० मध्ये स्वातंत्र्यानंतर पहिले १ रुपयाचे नाणे भारत सरकारने जारी केले. त्यानंतरही आजवरच्या ७५ वर्षांच्या कालावधीत रुपयाच्या आयुष्यात अनेक महत्त्वाचे नि अविस्मरणीय टप्पे (ऐतिहासिक व्यक्ती घटनांच्या सन्मानार्थ/स्मरणार्थ खास नाणी, एक रुपयापासून एक हजार रुपयापर्यंतच्या चलनी नोटा इ.) येत गेले. या साऱ्याची अत्यंत रंजक नि ज्ञानवर्धक नोंद या प्रदर्शनाद्वारे पुढे आली. किंबहुना, इतर चलनांच्या तुलनेत रुपयाला असलेले मूल्य नि मान यातले चढउतार आणि रुपयाचे वर्तमान मूल्य (अवमूल्यनही) याची एक तुलनात्मक गोळाबेरीजच यातून बघणाऱ्यांना उमगली.

प्राचीन, पुरातन वा ऐतिहासिक नाणी न्याहाळणे, तशी ती न्याहाळताना इंग्रजी आणि मराठी अशा दोन भाषांमध्ये त्या त्या काळातल्या रुपया-नाण्यांशी जोडलेला नेमका इतिहास साध्या सोप्या भाषेत वाचणे-ऐकणे, त्यातही विशेषतः मुंबईतल्या नाणे पाडणाऱ्या टाकसाळीवरचा कमालीचा उत्कंठावर्धक माहितीपट पाहणे आदी चित्तवेधक अनुभव दर्शकांना देण्यासाठी प्रदर्शनकर्त्यांनी घेतलेली मेहनत त्यांच्या कार्याबद्दलचा आदर वाढवणारी होती. प्रदर्शनादरम्यान खुद्द डॉ. शैलेश आणि इतर साथीदारांनी आलेल्या दर्शकांशी साधलेला संवाद विषयाचे गांभीर्य पोहोचवण्यास नक्कीच सहाय्यभूत ठरला होता.

अलीकडच्या काळात 'हिस्टॉरिकल करेक्शन'च्या नावाखाली संस्कृती वा इतिहासाशी जोडलेला कोणताही कार्यक्रम आवाजी स्वरुपाने इतरांपर्यंत पोहोचवण्याचा प्रघात पडलेला आहे. पण रुपयाच्या स्वातंत्र्योत्तर अमृतमहोत्सवी वर्षासंबंधाने शासनसत्तेच्या स्तरावर किंवा शासनसत्तेशी सलगी असलेल्या कलावंत-संशोधकांच्याही स्तरावर अशी मांडणी झालेली दिसली नाही. याला एक कारण, प्रचलित राजकीय वर्चस्वाच्या परधर्मद्वेषी कथनाला छेद देणारा रुपयाचा मुघलकालीन इतिहास, हे असावे. पण, असा संकुचित विचार डॉ. शैलेंद्र भंडारेंसारखे वैश्विक दृष्टीचे अभ्यासक, संशोधक करत नसतात. म्हणूनच आपल्याला अडचणीचा जो इतिहास शासनसत्ता नाकारते किंवा दुर्लक्षिते तोच सर्वस्पर्शी, व्यापक स्वरुपाचा इतिहास अशा स्वरुपाच्या प्रदर्शनातून पुढे येतो. त्यातूनच बघणाऱ्याचे सर्वसमावेशकतेचे भान येते, दृष्टी विस्तारते. त्या अर्थाने रुपयाचा हा प्रदर्शनरुपी सफरनामा अनेक अर्थाने मोलाचा ठरतो. हे मोल तीन महिन्यांच्या कालावधीमध्ये काही मोजक्या मुंबईकरांनी आणि खास प्रदर्शन पाहण्यासाठी मुंबईबाहेरून आलेल्यांनी जाणले. सर्वसामान्यांमधली ही जाण अधिक विस्तारत जावी, त्यासाठी अशा स्वरुपाच्या व्यापक दृष्टी देणाऱ्या, मुख्य म्हणजे अभ्यासूवृत्तीची जोड असलेल्या आंतरविद्याशाखीय उपक्रमांचा 'मुक्त संवाद'ने नेहमीच पुरस्कार केला आहे. अशा प्रसंगी असे उपक्रम अधिकाधिक लोकांपर्यंत यापुढेही पोहोचत राहावे, ही अपेक्षा करणे, निदान आजच्या दुभंगलेल्या वातावरणात तरी अप्रस्तुत ठरू नये.

**कार्यकारी संपादक**


**(विशेष सूचना : गेली वर्षभर संपादकीय पानांनंतर प्रकाशित होत असलेल्या 'पुनर्शोध रामायणाचा' या राजा पटवर्धनलिखित लेखमालेने वाचकांची चांगलीच पकड घेतली आहे. असे असताना, काही अपरिहार्य कारणास्तव आम्ही या अंकात सदर मालिकेतला लेख प्रकाशित करू शकलो नाही, त्याबद्दल दिलगीर आहोत. मार्च २०२६ अंकात लेखमालेचा पुढील भाग प्रकाशित होईल, याची कृपया नोंद घ्यावी -संपादक)**

# प्रेमाचा दस्तावेज!



श्रीरंजन आवटे

मर्म संविधानाचे



प्रेम बिहारी नारायण रायजादा

नंदलाल बोस

**सं**विधानाची निर्मिती होत असताना सर्वसामान्य लोकांचा त्यामध्ये सहभाग होता. त्यांनी अनेक सूचना, प्रश्न संविधानसभेपर्यंत पोहोचवले होते. त्याची संविधानसभेने पोचही दिली होती. संविधानसभेचे कामकाज पूर्ण होत असतानाच संविधानाचे हस्तलिखित असावे, अशी कल्पना पुढे आली. त्यातही संविधानाचे हस्तलिखित असावे, अशी भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरु यांची इच्छा होती. त्यानुसार हे हस्तलिखित तयार करण्यात आले. त्याचीच ही प्रेमळ कहाणी...

संविधानाचे हस्तलिखित हा सचित्र दस्तावेज आहे. या हस्तलिखिताच्या मुखपृष्ठावरच उलटया त्रिकोणात 'भारताचे संविधान' हे शब्द आणि राजमुद्रा आहे. हे रेखाचित्र अजिंठाच्या लेण्यातील चित्रांवर आधारित आहे. या हस्तलिखिताच्या प्रत्येक भागात सुरेख चित्रं आहेत. ही चित्रं काढली आहेत, आधुनिक भारतीय चित्रकलेचे जनक ज्यांना मानले जाते, अशा नंदलाल बोस यांनी आणि 'शांतिनिकेतन'मधल्या त्यांच्या विद्यार्थ्यांनी. संविधानाचे प्रत्येक पान सजवलेले आहे. त्यावर कोरीव नक्षीकाम आहे. अगदी सीमारेषाही (बॉर्डर्स) नजाकतीने आखल्या आहेत. संविधानातल्या २२ भागांच्या सुरुवातीला चित्र आहे. ही चित्रं साधारण तीन बाबींविषयीची आहेत:

१. धर्म आणि संस्कृती २. इतिहासाचे टप्पे, राजे, महाराजे, प्रेरणादायी व्यक्ती ३. भारताचा स्वातंत्र्यलढा.

या चित्रांचा आणि संविधानातील भागांच्या आशयाचा थेट सहसंबंध नाही किंवा आशय प्रतिबिंबित करण्यासाठी ही चित्रं आहेत, असं नव्हे. सिंधू संस्कृतीचे प्रतीक असलेला बैलाचा शिक्का अगदी पहिल्या भागात आहे. सिंधू संस्कृतीच्या उगमापासून भारतीय इतिहासाची सुरुवात मानली जाते. त्यामुळे या बैलाच्या रेखाचित्राने भारताचे संघराज्य आणि प्रदेश या भागाची सुरुवात होते, तर लंकेच्या युद्धानंतर प्रभू राम, सीता, लक्ष्मण परतत असतानाचे चित्र संविधानाच्या दुसऱ्या भागाच्या सुरुवातीला आहे. तिसरा भाग आहे, मूलभूत हक्कांचा. चौथ्या भागाची अर्थात राज्यासाठीच्या मार्गदर्शक तत्त्वांची सुरुवात होते, कृष्णासोबत चर्चा करणाऱ्या अर्जुनाच्या चित्राने. अर्जुन संभ्रमित झाल्यानंतर कृष्ण त्याला योग्य मार्गदर्शन करतो, असे महाभारतामधील कथन आहे. राज्यसंस्थेने कसे निर्णय घ्यावेत, याविषयीची मार्गदर्शक तत्त्वे सांगणाऱ्या भागास हे चित्र असणे समर्पक ठरते. पाचव्या भागाच्या सुरुवातीला आहेत, पशुपक्ष्यांसोबत रमलेले गौतम बुद्ध आणि सहाव्या भागाच्या सुरुवातीला आहेत, वर्धमान महावीर. गौतम बुद्धांच्या विचाराने एकूणच भारतीय मानस प्रभावित झालेले आहे. तसेच एक देश म्हणून भारताने नेहमीच अहिंसेचे मूल्य महत्वाचे मानले आणि शांततेच्या मार्गावरुन चालण्याचा प्रयत्न केला आहे. तेरावा भाग महाबलीपुरममधील शिल्पांच्या चित्राने सुरू होतो. सोबतच पंधराव्या भागात गुरु गोविंद सिंग रेखाटले दिसतात. गुरु गोविंद सिंगांनी शीख धर्मातील मानवतेच्या कल्याणाची शिकवण सांगितली. अशा प्रकारे धर्म आणि संस्कृतीविषयक वैविध्य असलेली अशी अनेक चित्रं दिसतात.

**प्रेरक आशयचित्रे**

इतिहासातील काही पराक्रमी व्यक्तींची चित्रेही संविधानाच्या या हस्तलिखितात आहेत. यामध्ये हत्तीवर बसून बौद्ध धर्माचा प्रचार करणारा सम्राट अशोक दिसतो, तर पुढे परिवर्तनवादी मुघल सम्राट अकबराचे चित्र दिसते. गायक, नर्तकांच्या दरबारासह राजा विक्रमादित्याची छबी दिसते, तर संविधानाच्या पंधराव्या भागात छत्रपती शिवरायांची आपली भेट होते. या पराक्रमी व्यक्ती वेगवेगळ्या भागांशी, वेगवेगळ्या काळातल्या धर्मसंस्कृतींशी निगडित आहेत; पण त्यांचं भारतीय इतिहासात अनन्यसाधारण असं महत्त्व आहे. सम्राट अशोकाचा मनपरिवर्तनाचा प्रवास कोणालाही प्रेरित करेल असाच आहे. सम्राट अकबराने धर्मनिरपेक्ष सुशासनाचा वस्तुपाठच घालून दिलेला आहे. छत्रपती शिवरायांनी स्वराज्याचे एक प्रारूपच उभे केले.

स्वातंत्र्य आंदोलन हा संविधानाचा प्राण असल्यामुळे स्वाभाविकपणे त्या संदर्भातील चित्रे आहेत. म्हैसूरचे राजे टिपू सुलतान आणि झाशीची राणी लक्ष्मीबाई यांची सुरेख चित्रेही या हस्तलिखितात आहेत. स्वातंत्र्य आंदोलनाच्या सुरुवातीच्या टप्प्यावर या दोघांनी बजावलेली भूमिका अनेकांसाठी स्फूर्तिदायी ठरली. संविधानाच्या चौदाव्या भागाच्या सुरुवातीला पर्वताच्या पार्श्वभूमीवर तिरंग्याला सलाम करणारे नेताजी सुभाषचंद्र बोस आणि आझाद हिंद फौजेचे सैनिक दिसतात. तसेच महात्मा गांधींविषयीची दोन चित्रे संविधानात आहेत. एका चित्रात दांडी यात्रा दाखवली आहे. दुसरे चित्र विशेष बोलके आहे. ते आहे नौखालीमधले. येथे हिंदू-मुस्लिम दंगे मोठ्या प्रमाणावर झाले होते आणि गांधीजी निधड्या छातीने तिथे जाऊन दंगल शमवण्याचा प्रयत्न केला होता. त्यामुळेच गांधींना लॉर्ड माउंटबॅटनने 'वन मॅन आर्मी' असे म्हटले होते. त्या पार्श्वभूमीवर हे चित्र आहे, त्यात गांधी उभे आहेत आणि त्यांना हिंदू स्त्रिया आरतीचे ताट घेऊन ओवाळत आहेत तर कुफी टोपी घातलेले मुस्लिम शेतकरी त्यांचे स्वागत करत आहेत. असे हे सर्वार्थाने काव्यात्म चित्र आहे! याशिवाय तीन निसर्गचित्रे संविधानात आहेत, ती रवींद्रनाथ टागोरांना अर्पण केलेली आहेत.

**बोस आणि रायजादा : कलात्मक पैलू**

इतक्या व्यापक पटाचे भान असणारे नंदलाल बोस हे महान चित्रकार होतेच. त्यासोबतच ते स्वातंत्र्य आंदोलनात सक्रिय होते. महात्मा गांधींमुळे त्यांनी काँग्रेसच्या वार्षिक अधिवेशनांसाठीही चित्रे काढली होती. त्यांच्या चित्रशैलीवर अवनींद्रनाथ टागोरांचा

प्रभाव होता. चित्रकलेच्या, नक्षीकामाच्या आणि एकूणच या कलाकुसरीच्या कामात नंदलाल बोस यांच्यासमवेत ब्योहर राममनोहर सिन्हा, ए. पेरुमल, कृपालसिंग शेखावत यांच्यासारखे कलाकार होते, कोल्हापूरचे विनायक शिवराम मासोजी यांच्यासारखे श्रेष्ठ चित्रकारांची साथ होती तर जमुना सेन, निवेदिता बोस यांसारख्या महिला चित्रकारही बोस यांच्यासोबत होत्या.

ही सारी चित्रं सांगतात कहाणी, माणसाची. त्याच्या प्रवासाची. ती सभ्यतांचा आलेख मांडतात. संस्कृतीतला सलोखा सांगतात. प्रेमाला लिपीबद्ध करतात. स्वातंत्र्याचे गीत गातात. इंद्रधनुषी रंगात भारताचा कॅनव्हास रंगवतात. त्या कॅनव्हासवर उमटले आहे, भारतीय संस्कृतीचे नितांत सुंदर असे कोलाज. विंदा करंदीकरांच्या भाषेत हे कोलाज सांगतेः मानवाचे अंती एक गोत्र!

ही सारी चित्रं होतीच, हे देखणे कोलाज होतेच; पण मुख्य प्रश्न होता, तो संविधानाचे सुलेखन करण्याचा. आकर्षक सुलेखन करु शकेल, अशा व्यक्तीच्या शोधात होते नेहरु. त्यांना प्रेम बिहारी नारायण रायजादा या सुलेखनकाराची माहिती देण्यात आली. त्यानुसार रायजादा यांना संविधान लिहिण्याचे काम देण्यात आले. प्रेम बिहारींचे आजोबा हे सुलेखनात निष्णात होते. त्यांच्याकडूनच ही कला प्रेम बिहारी शिकले होते. दिल्लीतल्या सेंट स्टिफन्स महाविद्यालयात पदवी पूर्ण करुन रायजादा सुलेखन करु लागले होते. त्यांनी सहा महिने प्रचंड कष्ट घेऊन हाताने संविधान लिहिले. ३०३ क्रमांकाची निब वापरुन हे लेखन केले. सुमारे ४०० हून अधिक निबांचा उपयोग करुन रायजादा यांनी ही कलाकुसर केली. त्यांचे हे काम अतिशय नाजूक आणि कलात्मक असल्याने ज्या कागदावर लिहायचे, त्या कागदाची प्रतही दर्जेदार असणे आवश्यक होते. त्यामुळे पुण्यातील हँडमेड पेपर इन्स्टिट्यूट या संस्थेकडून कागद मागवण्यात आला. या संस्थेचे विशेष असे, की ही संस्था स्वातंत्र्य चळवळीत आणि विशेषतः स्वदेशी चळवळीत सक्रिय होती. गांधीजींशी तर या संस्थेचे अतिशय निकटचे संबंध होते. त्यामुळे या संस्थेकडून ९०-१०० जीएसएम प्रकारचा कागद मागवण्यात आला, त्या कागदाचा वापर करुन रायजादा यांनी इटालियन शैलीत सुलेखन केले. स्वातंत्र्य आंदोलनाशी नाळ असलेल्या संस्थेचा कागद असणे हे देखील किती प्रतिकात्मक!

**नजाकतदार प्रेममयी कलाकुसर**

संविधानाचे हे हस्तलिखित अगदी नजाकतीने केलेली कलाकुसर होती. ब्योहर राममनोहर सिन्हा यांनी या हस्तलिखिताची सुंदर सजावट केली होती, तर संविधानाच्या मुखपृष्ठाला सोनेरी वर्ख होता. आजही ही हस्तलिखिताची प्रत संसदेच्या ग्रंथालयात हेलियम भरलेल्या चौकटीत जतन केलेली आहे.

हे सुलेखन करण्याची कथा मोठी रंजक आहे. नेहरुंनी संविधान सुलेखनाचे काम रायजादा यांना सोपवतानाच या कामाचे आपण किती पैसे घ्याल, अशी विचारणा यांना केली होती. त्यावर प्रेम बिहारी यांनी दिलेले उत्तर थक्क करणारे होते. ते म्हणाले, की या सुलेखन कामाबद्दल मी एकही दमडी घेणार नाही फक्त माझी एक अट आहे, की मी माझे नाव प्रत्येक पानावर लिहीन. प्रेम बिहारी रायजादा यांना संविधान लिहीत असल्याचं ऐतिहासिक मोल माहीत होते. त्यामुळेच त्यांनी अशी अट घातली. नेहरुंनी ती आनंदाने मान्य केली. त्यामुळे संविधानाच्या प्रत्येक पानाच्या तळाशी लिहिलं आहे- प्रेम! त्यामुळे संविधानाच्या पानापानावर शब्दशः प्रेम अवतरले आहे!

रवीश कुमार यांच्या 'इश्क में शहर होना' या पुस्तकात अनेक लप्रेक आहेत. लप्रेक म्हणजे लघु प्रेम कथा. यातील एका 'लप्रेक'च्या बाजूला बाबासाहेबांच्या हातात संविधान आहे, असे चित्र आहे. त्याकडे हात करुन कथेतला प्रियकर प्रेयसीला म्हणतो, 'देखना यहीं किताब हमे हमेशा के लिए मिला देगी.' ही जादू या पुस्तकात आहे. संविधान प्रेमाची बाराखडी कायद्याच्या भाषेत सांगणारा ग्रंथ आहे. 'द्वेषाला नकार नि प्रेमाला होकार' असा एका वाक्यात भारतीय संविधानाचा तत्त्वज्ञानात्मक सारांश आहे. साने गुरुजींची जगाला प्रेम अर्पण करण्यासाठीची प्रार्थनाच तर संविधानात आहे. त्यामुळेच प्रियकर प्रेयसीपासून ते समाजातल्या शेवटच्या माणसापर्यंत सर्वांना संविधानामध्ये आशा दिसते, कारण ये 'मोहब्बत की दास्तां' है! संविधान हा असा 'प्रेमाचा दस्तावेज' आहे, हे उमजलं की मग नव्या गणराज्याची कविता जन्माला येऊ शकते!

**श्रीरंजन आवटे कवी, लेखक आहेत. ते सध्या बँकॉक येथील सुआन सुनंधा राजभाट विद्यापीठात सहाय्यक प्राध्यापकपदी (राज्यशास्त्र) कार्यरत आहेत. राही श्रु. ग. यांच्यासोबत त्यांनी लिहिलेले 'आपलं आयकार्ड' हे संविधानाधारित पुस्तक वाचकप्रिय ठरले आहे.**

**संपर्क** : poetshriranjan@gmail.com

# अन्यथा, ठाकरे नि शिंदेंचा 'रामदास आठवले' होईल!



राजेंद्र साठे

मुद्द्याची बात



शेअर बाजारामध्ये सायकॉलॉजिकल बॅरियर नावाचा मजेशीर प्रकार असतो. एखादा शेअर विशिष्ट आकड्याच्या वर गेला की तो प्रचंड वाढणार असं मानलं जातं. किंवा खालच्या पातळीवर एका विशिष्ट आकड्यापेक्षा एका अंकाने जरी खाली गेला की त्याच्यावरचा विश्वास डळमळीत होऊन त्या शेअरची जोरदार विक्री सुरू होते. वरची आणि खालची पातळी दर्शवणाऱ्या आकड्यांना अनेकदा ठोस शास्त्रीय आधार नसतो. पण त्यांच्या आधारे टेक्निकल ॲनालिसिस करून लोकांना भरपूर गुंगवलेही जाते आणि बाजारही दारुड्यासारखा झुलू शकतो. मुंबई महापालिकेतील विजयानंतर भाजपचा जल्लोष तसल्याच मानसिक अडसराचा चांगला नमुना आहे...

२०१७ च्या निवडणुकीत एकट्याने लढूनही ८२ जागा मिळाल्या, तेव्हाच वास्तविक पाहता मुंबई महापालिकेची सत्ता भाजपच्या टप्प्यात आली होती. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपची पकड आणखी मजबूत झाली. मुंबईत पालिकेच्या जागा आहेत २२७ आणि विधानसभेच्या एकूण जागा आहेत ३६. म्हणजे एका विधानसभा मतदारसंघात सरासरी सहा नगरसेवक पडतात. २०२४ च्या विधानसभेमध्ये भाजपला मुंबईत १५ जागा मिळाल्या होत्या. याचाच अर्थ, ९० नगरसेवक जिंकून आणण्याइतकी मते त्याला मिळाली होतीच. आता एक वर्षांनंतर भाजपला बरोबर तेवढ्याच जागा मिळाल्या आहेत. म्हणजे वर्षभरापूर्वीच्या यशाची पुनरावृत्ती झाली आहे. आता आकड्यांच्या हिशेबात सर्वात मोठा पक्ष ठरून भाजपची सत्ता अखेर एकदाची येणार आहे. यामध्ये २०१४ मध्ये काँग्रेस जाऊन भाजपची सत्ता येणार हे जितकं नक्की होतं, तितकाच मुंबईतला निकालही अपेक्षित होता हे लक्षात ठेवायला हवं.

**खुशीची गाजरे**

भाजपच्या या कथित बॅरियर तोडण्यामुळे गुजराती, जैन, मारवाडी आणि हिंदी भाषक लोक बरेच खूश आहेत. जणू मुंबई ही मराठी लोकांनी जबरदस्तीने ताब्यात ठेवली होती व ती आता स्वतंत्र झाली आहे, असा आनंद सोशल मीडियातून व्यक्त करण्यात येत आहे. २०१४ मध्ये भारताला खरे स्वातंत्र्य मिळाले, असे म्हणणाऱ्यांचे भाईबंदच हा आनंद व्यक्त करण्यात सर्वात पुढे आहेत, हे सांगायला नकोच.

गंमत अशी, की कोलकात्याची पालिका बंगाली लोकांच्या किंवा चेन्नईची तमीळ लोकांच्या ताब्यात आहे, म्हणून कधी कोणाला वाईट वाटत नाही. मुंबईतील मराठी माणसांचे वर्चस्व मात्र या ज्यांचा याच्याशी थेट संबंध नाही, अशा उत्तर हिंदुस्थानी लोकांनाही खटकत असते.

गेल्या वर्षी फडणवीस सरकारने पहिलीपासून हिंदीची सक्ती केल्यानंतर सुरू झालेल्या आंदोलनात मराठी न बोलणाऱ्या फेरीवाल्यांना मारहाणीचे काही प्रकार घडले. यावर एरवी सर्व प्रश्नांवर समतोल भूमिका घेणाऱ्या 'न्यूजलॉन्ड्री'सारख्या डिजिटल वाहिनीचाही तोल ढळला. मराठी प्रांतात हिंदी लोकांना सर्रास मारहाण सुरु आहे, असा सूर त्यांनी लावला. हिंदी सक्तीला विरोध म्हणजे देशाला विरोध असे समीकरण दैनिक हिंदुस्तान या हिंदुस्तान टाइम्स गटाच्या अग्रगण्य हिंदी दैनिकाच्या अग्रलेखात मांडण्यात आले. वास्तविक मारहाणीचे चार-पाच प्रकार तुरळक घडले होते. इतकी वर्षे हिंदी प्रांतातून आलेल्यांशी सर्व मराठी लोक कायम हिंदीतून बोलत आले आहेत, त्यामुळेच या हिंदी लोकांना इथे बस्तान बसवणे, चेन्नई किंवा बंगळुरूच्या तुलनेत सोपे गेले आहे, याकडे दिल्लीतील मीडियाने पूर्ण दुर्लक्ष केले होते. बाकी हिंदी चॅनेलवाल्यांचे तर विचारायचीच सोय नव्हती. तीच स्थिती यंदाच्या निवडणूक निकालानंतरही दिसली. भाजपने मराठी माणसाला सहा फूट खाली गाडले, मराठी ठाकरे सेनेकडून भाजपने मुंबई सोडवली अशी अनेक ट्विट्स हिंदी पट्ट्यातून करण्यात आली.

**मराठी अस्तित्वाचा अर्थ**

योगायोग पाहा, मुंबई पालिकेचे निकाल येत होते, तेव्हाच सोमनाथ मंदिरावरील हल्ल्याला एक हजार वर्षे पूर्ण झाल्याची आठवण केली जात होती. हिंदू अस्मितेवरचा हल्ला उलटवून लावून आज सोमनाथ मंदिर व परिसर कसा डौलाने उभा आहे, याची नरेंद्र मोदी आठवण करून देत होते. सोमनाथमध्ये हिंदू अस्मितेच्या रक्षणाची ठाम भूमिका मांडणारे व त्याला टाळ्या वाजवणारे लोकच मुंबईतील मराठी अस्मिता चिरडण्याची मागणी करीत होते. तिचा निवडणुकीत पराभव झाला म्हणून आनंद व्यक्त करीत होते.

या देशात मुंबई व कोलकाता ही दोनच खऱ्या अर्थाने महानगरे आहेत. ती दोन्ही ब्रिटिशांनी निर्माण केली आहेत. दिल्ली व चेन्नई ही वाढलेली खेडेगावे आहेत. मुंबई उभी करताना ब्रिटिशांनी स्थानिकांची संस्कृती चिरडण्याचा प्रयत्न केला नाही. उलट मराठीचा अभ्यास केला व तो करायला पैसेही दिले. संस्था उभारल्या. काळाच्या ओघात मुंबई हे संपूर्ण भारतातले (म्हणजे पाकिस्तानी व बांगलादेशी प्रांत धरून) एक वैशिष्ट्यपूर्ण शहर बनले. इथली कार्यसंस्कृती, वक्तशीरपणा, कायदा व सुव्यवस्था, खुलेपणा, सिनेमासारख्या कलेचा विकास, धंदेउद्योगांना मिळालेले स्वास्थ्य हे अद्वितीय ठरले. मुद्दा असा की, मराठी माणूस हा धंदेवाला नसेल, त्याला पैशांची समज नसेल. पण हे शहर उभे करण्यात, ते सुविहितपणे चालवण्यात व इथली आधुनिक संस्कृती घडवण्यात मराठी माणसांचे मोठे योगदान आहे. प्रामाणिकपणा, कायद्याचे पालन करणे, न्याय्य गोष्टींच्या बाजूने उभे राहणे, कामामध्ये चोख असणे, वक्तशीरपणा हे मराठी समाजाचे सरासरी गुण सांगता येतात. अनेकांनी ते मान्य केले आहेत. मुंबईमध्ये पैसे आल्याने




*रामदास आठवलेंचे उपयुक्ततामूल्य मर्यादित आहे, हे ओळखून सत्ताधारी भाजप त्यांचा वापर हक्काची मतपेढी मिळवून देणारा एंटरटेनर इतपतच करत आला आहे...*

तिचा विकास झाला हे अर्धसत्य आहे. मराठी समाजाच्या वैशिष्ट्यांमुळे तिला एक मजबूत आधार मिळाला व तिचा विकास झाला.

साधी गोष्ट आहे. मुंबईचं पोलिस दल जगातील उत्कृष्ट पोलिसांपैकी एक मानलं जात असे. बेस्ट ही बससेवा सर्व देशात उत्तम होती. महाराष्ट्राच्या आयएएस किंवा प्रशासकीय सेवेच्या केडरमध्ये येण्यासाठी सर्व तरुण धडपडत असत. कारण, येथे चांगले काम करायला मिळते व फार हस्तक्षेप नसतो असा लौकिक होता. या सर्व व्यवस्था कोण चालवत होते किंवा यांचे कारभारी कोण होते? ते अधिकारी असोत वा अगदी राजकारणी प्रामुख्याने मराठीच होते. त्यांना त्यांचे म्हणून काही श्रेय द्यायला हवे की नको?

दुसऱ्या बाजूने न्यायासाठी भांडणे करणे हाही मराठी लोकांचा विशेष आहे. मुंबईत उभ्या राहिलेल्या सर्व चळवळी, आंदोलने, कामगारांचे लढे यामध्ये मराठी माणूस अग्रगण्य राहिलेला आहे. भ्रष्टाचारविरोधाची, पर्यावरण रक्षणाची, बिल्डरांच्या विरोधातील किंवा बेस्ट वाचवा यासारखी सार्वजनिक प्रश्नांवरची आंदोलने करण्यात मराठी समाजच पुढे असतो. मुंबईतील मराठी लोकांची संख्या आता जेमतेम तीस टक्के आहे. हिंदी अधिक गुजराती, जैन वगैरेंची संख्या त्याहून अधिक आहे. मात्र मुंबई शहराबद्दलच्या आस्थेने किंवा सामाजिक जाणीव म्हणून हे समाज फारच क्वचितरित्या अशा आंदोलनांमध्ये आढळतात. याही समाजांमध्ये काही जागृत कार्यकर्ते आहेत व ते यामध्ये नक्कीच भाग घेतात. पण एक समाज म्हणून ज्या हिरीरीने मराठी समाज सामाजिक, राजकीय वा आर्थिक प्रश्नांवर चळवळी करण्याचा प्रयत्न करतो, तसा इतर समाजांतून होत नाही.

याचे कारण हेच आहे की, मराठी लोकांना मुंबई आपली वाटते आणि इतरांना ती वाटत नाही. परवा मुंबईतील निकालांनंतर अनेक इंग्रजी टीव्ही वाहिन्यांना निमित्त मिळाले. त्यांच्या चर्चेत 'मराठी माणूस' या शब्दाचा उपयोग ते शिवीसारखाच करताना दिसतात. एक बाई म्हणाल्या, मुंबई ही काय फक्त 'मराठी माणूस'ने निर्माण नाही केली. इथले उड्डाणपूल बांधणाऱ्या झारखंडच्या कामगाराचाही त्यात वाटा आहे. या बाई असे बोलत होत्या, जसे की हा कामगार म्हणजे त्यांचा चुलताच आहे. या बाई दिल्लीत बसणार, तिथे तिथल्या घरकामगारांना किंवा रस्त्यावरच्या मजुरांना बिहारी म्हणून हिणवणार. इथे येऊन मात्र झारखंडच्या कामगाराच्या बाजूने बोलणार.

**मराठीचे विरोधक कोण?**

मुंबईमध्ये गेली दोन शतके अनेक जातीधर्मपंथांचे लोक येऊन राहिले व त्यांनी मुंबईची संपत्ती वाढवली हे खरे आहे. पण मुंबई हे अन्य कोणत्याही शहरासारखे एक शहर झाले नाही. दिल्लीमध्ये सर्व गोष्टी राजकीय सत्तेभोवती फिरतात. तसे इथे झाले नाही. त्याला स्वतःचा चेहरा लाभला तो इथल्या चळवळ्या आणि सजग लोकांमुळे. या लोकांमध्ये मराठी समाज अग्रगण्य होता व आहे. यात हिंदी पट्ट्यातून आलेले फार अपवादाने दिसतात. त्याची इतर आर्थिक वा सांस्कृतिक कारणे असतील व त्यांचे विश्लेषण करता येईल. पण ही वस्तुस्थिती लपत नाही.

दरम्यान, या निवडणुकीत ठाकरे हरणार असे वातावरण तयार झाले होते. पण त्यांनीही तो मानसिक अडथळा ओलांडला. यातही गंमत अशी की, ठाकरे सेनेला विधानसभेला दहा जागा होत्या. म्हणजे त्याचे सुमारे ६० नगरसेवक निवडून यायला हवे होते. प्रत्यक्षात ते दहाने जास्त आहेत. याउलट शिंदे सेनेला ६ जागा होत्या. म्हणजे त्याचे ३६ तरी नगरसेवक जिंकायला हवे होते. पण त्यांची गाडी २९ वर अडखळली. त्यातही विशेष म्हणजे विधानसभेला ठाकरे सेना व काँग्रेस यांची आघाडी होती. यावेळी ती नव्हती. अर्थात तेव्हा मनसे सोबत नव्हती, ती आता होती हाही मोठा फरक होता. असो.

मराठी अस्मिता की हिंदुत्व असा पेच येईल, तेव्हा तेव्हा भाजप हिंदुत्वाच्या बाजूनेच उभी राहील हे यावेळी स्पष्टपणे समोर आले. महापौर मराठी होणार की नाही याबाबत भाजपवाल्यांना बरीच कसरत करावी लागली व शेवटी तो हिंदू मराठी असेल असा पर्याय काढावा लागला. भाजप व शिंदे सेनेच्या वरळीतील पहिल्या

संयुक्त सभेमध्ये प्रारंभीची घोषणा ही सियावर रामचंद्र की जय ही होती. अमित साटम नावाचा मुंबई शहराध्यक्ष ती देत होता. त्यानंतरही बऱ्याच हिंदी घोषणा दिल्या गेल्या.

या स्थितीत मराठी समाजानेच ही निवडणूक हाती घेतली व त्यांनी ठाकऱ्यांना मते दिली. ठाकऱ्यांबाबत अनेक आक्षेप, शंका, भीती आहेत. मराठी अस्मिता या नावाने त्यांनी जे राजकारण केले त्यातून काय साध्य झाले व ते त्याबाबत किती प्रामाणिक आहेत याबाबत अनेकांना प्रश्न आहेत. तरीही भाजपच्या विरोधात उभे राहिल्याने लोकांनी ठाकऱ्यांना मते दिली. गुजराती, जैन, मारवाडी, भैय्ये यांच्यासारखाच आणखी एक समाज इतकीच मराठी समाजाची हैसियत राहावी, असा भाजपचा प्रयत्न होता व राहील. त्याला अटकाव करण्यासाठी लोकांनी ठाकरे यांना मते दिली आहेत. महापालिका निकालानंतर ठाकरे बंधूंकडून संमिश्र संकेत मिळाले असले तरीही, त्यापासून बोध घेऊन ते योग्य मार्गावर राहतील, अशी आशा करायला हवी.

राज ठाकरे यांनी शेवटच्या सभेत अदानीच्या सर्वभक्षक विस्तारावर एक उत्तम आलेख सादर केला. हा अदानी केवळ मराठी लोकांच्या मुळावर आलेला नाही. त्याचा त्रास गुजराती धंदेवाले, मारवाडी किंवा सिंधी बिल्डर आणि टाटा, बिर्ला यांच्यासारखे उद्योगपती यांनाही होतो आहे. ते आज उघडपणे बोलू शकत नाहीत. आज मुंबईचा विमानतळ, वीज सेवा, बंदरे, रस्ते, धारावीसारखी मोठी वस्ती हे सर्व अदानीच्या ताब्यात गेले आहे. अदानीला सरकारी डेअरीच्या, मिठागरांच्या वा संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातल्या जमिनी दिल्या जात आहेत. हा सर्व समाजाचाच तोटा आहे. त्याविरुध्द राज यांनी आवाज उठवणे हे मराठी समाजाच्या आजवरच्या चळवळींना साजेसे झाले. मुंबईवर खरे प्रेम असेल व मालकी सांगायची असेल तर गुजराती व हिंदी समाजांनी या लढ्यात पुढे यायला हवे हे आव्हान इथून पुढे त्यांना दिले जायला हवे. तसे करण्यातूनच मराठीची लढाई अधिक व्यापक होऊ शकेल. अन्यथा, संख्येच्या हिशेबात ठाकरे किंवा मराठीवाले मागे पडत जातील. ठाकरे यांचा राज्यातला किंवा पालिकेतल्या सत्तेचा पूर्वतिहास हा फार कर्तबगारीचा नसल्याने त्यांची आणखी पंचाईत आहे हेही त्यांनी लक्षात ठेवावे लागेल.

**अवघड जागेची अडचण**

दरम्यान, कालच्या निवडणुकीत शिंदे गटाला जोरदार दणका मिळाला. विधानसभा निवडणुकीत लाडकी बहीणचा गाजावाजा करून शिंदेंनी धकवून नेले. पण हिंदुत्व विरुद्ध मराठी असा संघर्ष उभा राहिल्यावर ते उघडे पडले. शिंदे सेनेला नरेंद्र मोदींच्या गोठ्यात राहून तिकडचा चारा खायचा आहे. पण त्याचवेळी मराठीच्या गव्हाणीत तोंड घालून इकडेही हक्क सांगायचा आहे. निकालांनंतर त्यांनी वृत्तपत्रांना पानभर जाहिराती दिल्या. त्यात बाळासाहेबांच्या जोडीने नरेंद्र मोदींचे आभार मानलेले होते. शिवाय कहर म्हणजे मोदी, शाह यांच्या जोडीने जेपी नड्डा यांचाही फोटो छापलेला होता. भाजपसोबत यांचे संबंध किती लाचारीचे आहेत, हे दर्शवणारी ही जाहिरात होती. गंमत म्हणजे, भाजपने लाथाडल्यामुळे राज्यातील पुणे, संभाजीनगर, नाशिक अशा अनेक शहरांमध्ये शिंदे सेनेला स्वतंत्र लढावे लागले. तिथे भरपूर मार तिने खाल्ला.



*भाजपच्या हिंदुत्वात वाटा सांगितला आणि तिथेच ठाकरेंचे मराठी माणसासाठीचे राजकारण निष्प्रभ होत गेले...*

एकनाथ शिंदे हे कष्टाळू राजकारणी आहेत, हे खरे. पण त्यांच्याकडे स्वतःची काहीही विचारसरणी नाही. तशी गरजही त्यांना वाटत नाही. हीच गोष्ट भविष्यात त्यांना खड्ड्यात घालणार आहे. मुंबईमध्ये त्याचा प्रत्यय आला आहे. हिंदी सक्तीची करण्याच्या संदर्भात त्यांनी अतिशय संदिग्ध भूमिका घेतली. ते सध्या सत्तेच्या सोबत आहेत. त्यामुळे त्यांना भरपूर अधिकार व पैसे मिळतात. हे पैसे वाटून लोकांना उपकृत करायचे व मते मिळवायची, असा त्यांचा सर्वसाधारण फंडा आहे.

शिंदे दिवसातून दहा वेळा नरेंद्र मोदींचे नाव घेतात. नीतीशकुमार, चंद्राबाबू किंवा एनडीएतील अन्य कोणताही नेता असे करीत नसेल. इथे तर शिवसेनेसारख्या लढाऊ संघटनेच्या नावाने राजकारण करताना शिंदे यांचा हा लाळघोटेपणा अत्यंत हास्यास्पद वाटतो. आज सत्तेत आहेत म्हणून हे सर्व धकून जाते. पण इथून पुढच्या काळात भाजप त्यांचे पंख क्रमाक्रमाने

कापणार आहे हे, त्यांच्या लक्षात आलेले नाही वा त्याकडे ते दुर्लक्ष करीत आहेत.

**जीवदान आणि इशारा**

मुंबई पालिकेतील सत्तेसाठीच मुख्यतः भाजपने आजवर शिंदे यांना सांभाळून घेतले. आता ती सत्ता कह्यात आली आहे. इथून पुढे फडणवीस ठाकरे सेना किंवा काँग्रेसच्या नगरसेवकांना फोडून शिंदेंचे महत्त्व शून्यावर आणून ठेवू शकतात. राज्याच्या सत्तेत अजितदादांना बरोबर घेऊन त्यांनी हेच तर केले होते. हे करतानाच त्यांनी अजितदादांनाही संपवले आहेच. आता शिंदे यांचा नंबर आहे. अशा स्थितीत शिंदे यांना टिकून राहायचे असेल, तर एखादी ठोस विचारसरणी घेतल्याखेरीज पर्याय नाही.


काँग्रेसच्या सबगोलंकारी राज्यात एम. जी. रामचंद्रन, जयललिता (अण्णा द्रमुक), चंद्राबाबू नायडू (तेलुगू देसम), नवीन पटनाईक (बिजू जनता दल) यांच्यासारखे कोणतीच तीव्र विचारसरणी नसलेले लोक बराच काळ सत्ता भोगत राहिले. पण आजच्या काळात ममता बॅनर्जी वा स्टालिन यांच्यासारखी कडवी प्रादेशिक अस्मिता धारण केल्याखेरीज किंवा कम्युनिस्ट वा समाजवादासारखी विचारसरणी उचलून धरल्याखेरीज भाजपकेंद्रित राजकारणात टिकून राहणे अशक्य आहे. शिंदे सेनेला राज्यभरात पालिका निवडणुकांमध्ये जे यश मिळाले ती बाळासाहेबांच्या शिवसेनेची जुनी पुण्याई आहे. पण ती फार काळ टिकत नाही, हे ठाकरे यांना दिसले आहे. अन्यथा, राज आणि उद्धव यांनाच मते मिळाली असती. भाजपच्या दांडग्या राजकारणापुढे शिंदे सेना जेव्हा दुय्यम भूमिकेत जाईल, तेव्हा तिला यश मिळवणे कठीण होत जाईल. अशा स्थितीत शिंदे यांना पुन्हा मराठी अस्मितेच्या कडव्या राजकारणाकडे वळावे लागेल किंवा भाजपमध्ये विलीन व्हावे लागेल.

ठाकरे बंधूना यंदाच्या मुंबई निवडणुकांनी एक जीवदान दिले आहे आणि शिंदे यांना सज्जड इशारा. या दोघांनाही आपल्या राजकारणाची नव्याने मांडणी करावी लागणार आहे. ठाकऱ्यांकडे विचारधारा आहे. त्यांना ती अधिक तासून धारदार करावी लागणार आहे. तर शिंदे यांना विचारधारा हवी हे स्वतःला पटवावे लागणार आहे. तसे केले नाही तर मात्र या दोघांचीही अवस्था मराठी अस्मितेच्या राजकारणातले 'रामदास आठवले' अशी व्हायला वेळ लागणार नाही.

**राजेंद्र साठे हे लेखक ज्येष्ठ पत्रकार, संपादक तसेच मुक्त संवादच्या सल्लागार संपादक मंडळाचे सदस्य आहेत. 'सरदार वल्लभभाई पटेल : एक सडेतोड व्यक्तिमत्त्व' (मनोविकास) हे त्यांचे अलीकडचे प्रकाशित झालेले अनुवादित पुस्तक आहे.**
**संपर्क :** satherajendra@gmail.com
**मोबाइल : ७०४५१ ५४३५४**

**'पद्मगंधा प्रकाशना'चे नवीन दर्जेदार प्रकाशन**

ऑर्वेल हा त्या विशिष्ट काळाचे अपत्य होता...
ज्या काळात साम्राज्यवाद व सरंजामशाही होती, ज्या काळात हुकूमशाही होती,
ज्या काळात दोन महायुद्ध झाली, ज्या काळात विज्ञानाचे अनेक शोध लागले,
नवीन ज्ञाननिर्मिती होत होती... या सगळ्यात ऑर्वेल घडत होता.



**ऑर्वेलच्या अवतीभोवती**

डॉ. आनंद जोशी

**मूळ किंमत ₹ २३० । सवलतीत ₹ १८४**

www.padmagandha.com वेबसाईटवर ऑर्डर पाठवा.
पद्मगंधाच्या सर्व पुस्तकांवर २०% सूट मिळवा.


पद्मगंधा प्रकाशन
३६/११, धन्वंतरी सह. गृह. संस्था, पांडुरंग कॉलनी, एरंडवन, पुणे-४११०३८
फोन : (०२०) २५४४२४५५ | मो. : ७३५०८३९१७६ | E-mail : p.padmagandha@gmail.com

# काँग्रेस मुक्त की युक्त?



डॉ. विवेक कोरडे

विरोधी बाकावरून



**भा**रत हा धर्मभोळ्या लोकांचा देश आहे, हे पूर्वापार वास्तव विद्यमान पंतप्रधानांनी फारच गांभीर्याने घेतलेले दिसते आहे. आपण धर्मनिरपेक्ष राष्ट्राचे नव्हे, तर एका धर्मवादी राजकीय पक्षाचे पंतप्रधान आहोत, अशा समजुतीत त्यांचा आजवरचा सारा सार्वजनिक व्यवहार राहिला आहे. आम्ही संविधानाचे पाईक आहोत, म्हणायचे नि सर्वधर्मसमभावाचे मूल्य पायदळी तुडवत मंदिरात डमरू आणि ढोल वाजवायचे, भारत ही लोकशाहीची जननी म्हणायचे नि लोकशाहीचा प्राण असलेल्या विरोधी पक्षांना संपवायचे धोरण खुलेआम अवलंबायचे, असे परस्परविसंगत चित्र आता नित्याचेच बनले आहे. तथाकथित आर्थिक विकासाला अशा या परस्परविसंगत वर्तनाची जोड हेच खरे तर आजचे चिंताजनक वास्तव आहे...

**ज्यां**चा वर्तमान काळ स्पृहणीय नसतो आणि भूतकाळात ज्यांनी कोणतेही कर्तृत्व गाजवलेले नसते, त्यांना इतिहासात रमणे भाग असते. मग अशी मंडळी इतिहासाचे प्रत्येक पान जणू त्यांचेच आहे, त्यांच्यासाठीच आहे असे समजून इतिहासाचा वापर वा गैरवापर करत असतात. बऱ्याचदा आपण नेमके काय करतो आहोत, याचे भानही अशा मंडळींना नसते. या इतिहासाचे आम्हीच वारसदार हा टेंभा मिरवणे एवढेच या मंडळींचे कर्तृत्व असते.

असाच एक ऐतिहासिक कार्यक्रम नुकताच गुजरातच्या सोमनाथमध्ये पार पडला. सोमनाथ मंदिरावर झालेल्या गजनीच्या महंमदाच्या पहिल्या हल्ल्याला एक हजार वर्षे झाली, त्यानिमित्ताने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात चमकण्याची संधी सोडतील, तर ते विश्वगुरू कसले? त्यात हे विश्वगुरू पडले नॉन बायोलॉजिकल. म्हणून अशा कार्यक्रमात त्यांची उपस्थिती अनिवार्यच. त्यानिमित्ताने काढलेल्या यात्रेत विश्वगुरूंनी एखाद्या मदाऱ्यासारखा डमरू वाजवला. त्याने समाधान झाले नाही म्हणून ढोलही पिटला. सर्व नाटक म्हणा वा नाट्य अगदी ठरल्याप्रमाणे पार पडले. या नाटकाचे नाव स्वाभिमान पर्व असे होते. अंत्यस्थ हेतू परधर्मद्वेषाला खतपाणी घालणे हा होता. मुळात, एखाद्या मंदिरावर झालेल्या हल्ल्याला एक हजार वर्षे होऊनही मंदिर टिकून राहिले, म्हणून स्वाभिमान पर्व साजरे करणे, या सारखा मोठा राजकीय विनोद सापडणे कठीण आहे. कारण असे करून न्यूनगंडाचेच दर्शन घडले. त्या अर्थाने न्यूनगंड पर्वच साजरे झाले. अर्थात, 'मोदी है तो मुमकिन है.'

**गाफीलपणाचा चिंताजनक वारसा**

इतिहासातल्या घटनांपासून वर्तमानातले धडे शिकायचे असतात. त्या काळाला अनुसरून सोरटी सोमनाथ मंदिरावर साधन संपत्तीवर ताबा मिळवण्याच्या उद्देशाने अनेक हल्ले झाले. अकराव्या शतकापासून सुरू झालेले हल्ले त्यानंतर किमान पाच शतके सुरूच राहिले. सोमनाथासारखे पवित्र मंदिर पुन्हा पुन्हा लुटले जात राहिले. सोमनाथाचे मंदिर सीमेपासून ३०० मैल आत आहे. इतके अंतर कापून शत्रू चालून आला आणि लूट करून परत गेला. ही गोष्ट एक दोन वेळा समजू शकते. परंतु ही गोष्ट अनेकदा आणि सतत चार-पाच शतके घडत असेल, तर त्याचा अर्थ वेगळा होतो. सोमनाथ मंदिर वारंवार लुटले जाण्याचा सरळ अर्थ तत्कालीन राजांनी आणि समाजाने या आक्रमणांचा मुकाबला संघटितपणे केला नाही, असा होतो. त्याचबरोबर संरक्षण यंत्रणा गाफील असेल तर देशाचे सर्वोच्च मानबिंदू कधीही उद्ध्वस्त होऊ शकतात असा त्याचा अर्थ होतो.

सोमनाथ मंदिरावरील हल्ल्याला हजार वर्षे उलटून गेल्यानंतरही आपली संरक्षण यंत्रणा गाफील आहे. याच गाफीलपणातून देशाचा सर्वोच्च मानबिंदू असलेल्या संसदेवर आक्रमण होते. याच गाफीलपणातून मुंबई, पुलवामा, पठाणकोटसारखे हल्ले होतात. हा संदेश जनतेला देण्याऐवजी विश्वगुरूंनी मेकअप करून डमरू वाजवणे आणि ढोल बडवणे पसंत केले.

**इतिहासाशी प्रतारणा**

अर्थात ते त्यांच्या स्वभावधर्माला धरूनच झाले. त्या डमरूच्या प्रभावामुळे की काय महाराष्ट्रात झालेल्या महानगरपालिकांच्या निवडणुकीमध्ये भाजपाला जवळपास निम्म्या जागा प्राप्त झाल्या. आजवर महाराष्ट्रात डबल इंजिनचे सरकार होते, आता ते ट्रिपल इंजिनचे झाले आहे. या तीन इंजिनांची दिशा नागपूर, पुणे आणि ठाणे याकडे एकाच वेळी धावण्याची नसेल अशी अपेक्षा आपण ठेवूया. तसे झाल्यास 'विकास नको पण इंजिन आवर' असे म्हणायची पाळी आपल्यावर येईल.

डमरूवादनाने मिळालेल्या या प्रचंड विजयाचा उन्माद भाजपाला चढला नाही, तरच नवल करायचे. खरंतर या निवडणुकीमध्ये भाजपला मिळालेल्या विजयासाठी शासकीय यंत्रणांचा दुरुपयोग, अर्थनीतीचा अतोनात वापर, धार्मिक आणि भाषिक ध्रुवीकरण आणि निवडणूक आयोगाशी असलेली भाजपची युती या गोष्टी कामी आल्या आहेत. पण याकडे सोयीस्कर दुर्लक्ष करून भाजपच्या उन्मादी नेत्यांनी उन्मादी वक्तव्ये केली.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पावलावर पाऊल ठेवून आता विश्वगुरू वाटचाल करीत आहेत, असे म्हटले गेले. असे बेताल व बिनबुडाचे वक्तव्य भाजप नेतेच करू शकतात. ज्यांना शिवाजी महाराज खरोखर माहीत आहेत, त्यांना या वक्तव्याने संताप आल्याखेरीज राहणार नाही. ज्या काळात जगाला 'सेक्युलर' हा शब्दही माहीत नव्हता, त्या काळात छत्रपती शिवाजी महाराजांनी एक धर्मनिरपेक्ष राज्य निर्माण केले. त्यांच्या राज्यात हिंदू-मुस्लिम इत्यादी सर्व धर्मांना समान

न्यायाची हमी होती. म्हणूनच महाराजांच्या तोफखान्याचा प्रमुख दौलतखान असू शकतो. त्यांचे वकील काझी हैदर असतात आणि अंगरक्षकांमध्ये मदारी मेहतर या मुस्लिम युवकाचा समावेश असतो. महाराजांनी कधीही कोणतीही मशीद किंवा दर्गा पाडला नाही किंवा कुणी विशिष्ट धर्माचे आहे, म्हणून त्याचा छळही केला नाही. त्याचमुळे विश्वगुरू महाराजांच्या पावलावर पाऊल ठेवून जात आहेत, असे म्हणणे इतिहासाची प्रतारणा करणे होय. अर्थात इतिहासाची प्रतारणा ही भाजपाच्या अंगोपांगात पूर्णपणे मुरलेली गोष्ट आहे.

**सुपातले शिंदे, जात्यात...**

दुसऱ्या एका प्रवक्त्यांनी आता आम्ही आधी सर्व प्रादेशिक पक्ष समाप्त करू आणि मग 'काँग्रेसमुक्त' भारत करू अशी वल्गना केली. प्रादेशिक पक्षांना समाप्त करणे यात भाजप तरबेज आहेच. त्यामुळे याची नव्याने घोषणा करण्याची गरज नाही. भस्मासूर ज्याच्या डोक्यावर हात ठेवत त्याचे भस्म होत असे, म्हणतात. भाजप ज्या ज्या प्रादेशिक पक्षांबरोबर युती करतो, त्यांना हळूहळू कमजोर करून नष्ट करण्याची उमेद बाळगून असतो. असे प्रयोग भाजपाने अनेक राज्यात यशस्वीपणे केले आहेत. ज्या शिडीने वर चढायचे तिलाच लाथ मारायची ही भाजपची नीती आहे. या नीतीचा प्रसाद अनेकांनी चाखला आहे. बहुतेक आता हा प्रसाद चाखण्याची पाळी शिंदे यांच्या शिवसेनेची आहे.

मुंबई महापालिका निवडणुकीत निसटते का होईना, बहुमत महायुतीला मिळाले. तरीही शिंदेंजींनी आपल्या २९ नगरसेवकांना  हॉटेल अरेस्ट ठेवले होते. या निवडून आलेल्या नगरसेवकांना आम्ही प्रशिक्षण देण्यासाठी हॉटेलमध्ये ठेवले आहे असे शिवसेना शिंदे गटाचा प्रवक्ता म्हणतो. असेच प्रशिक्षण तीन वर्षांपूर्वी शिवसेनेतून फुटलेल्या आमदारांना मुंबई ते सुरत, सुरत ते गुवाहाटी, गुवाहाटी ते गोवा आणि गोवा टू मुंबई अशा हॉटेल यात्रेने दिले होते, हे अख्खा महाराष्ट्र जाणतो.

शिंदे गटाला नेमकी भीती कशाची वाटते, हे देखील समजून घ्यायला हवे. मूळ शिवसेनेविरोधात बंड करून मुंबईतले अनेक नगरसेवक शिंदे गटात सामील झाले. काँग्रेसचे काही नगरसेवक भाजपची पायरी चढले. यातील ९० टक्के नगरसेवकांना लोकांनी पराभूत करून घरी बसवले आहे. शिंदेंचे जे २९ नगरसेवक निवडून आलेत, त्यांनाही जनमनात असलेल्या संतापाची झळ जाणवलेली आहे. अशा परिस्थितीत हे



*भारत काँग्रेसमुक्त तर काही झाला नाही, भाजप काँग्रेसयुक्त मात्र नक्कीच होऊन गेला...*

नगरसेवक कधीही आपली भूमिका बदलू शकतात. भूमिका बदलण्याचा धडा त्यांना शिंदेजींनी शिकवला आहे.

शिंदेजी नेहमीच आम्ही बाळासाहेब ठाकरेंच्या शिकवणीतून पुढे चाललो आहोत, असे म्हणतात. मुंबईत भाजपचा महापौर झाला पाहिजे ही बाळासाहेबांची शिकवण होती, असे ते कधी म्हणतात याची वाट पाहू या.

खरंतर प्रादेशिक पक्ष समाप्त करण्याची आकांक्षा बाळगणे म्हणजे भारतीय संविधानाला विरोध करणे आहे. संविधानाने भारत हे एक संघराज्य घोषित केले आहे व या संघराज्यात प्रत्येक राज्याला त्याची भाषा, संस्कृती आणि अस्मिता जपण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे. प्रादेशिक पक्ष हे त्याच अस्मिता आणि आकांक्षांचे प्रतीक आहेत. ते नष्ट करणे म्हणजेच भारतीय संविधानाशी प्रतारणा करणे होय. अर्थात भाजपला संविधानाशी कोणतेही घेणेदेणे नाही. 'अब की बार चारसो पार' ही घोषणा संविधान बदलण्यासाठी देण्यात आली होती. अर्थात ज्या क्षणी भारताचे संघराज्य स्वरूप नष्ट होईल त्याक्षणी भारताच्या विघटनाला सुरुवात होईल. म्हणूनच अशा प्रकारची वक्तव्ये ही देशाच्या ऐक्याला घातक आहेत.

**आत्मघातकी वल्गना**

काँग्रेसमुक्त भारत ही भाजपची सर्वात आवडती घोषणा आहे. कारण भाजपची संस्कृती संघाच्या एकचालकानुवर्तित्व या संकल्पनेवर आधारलेली आहे. ही संकल्पना पूर्णपणे लोकशाही विरोधी आहे. प्रतिपक्षाकडे विरोधक म्हणून न पाहता भाजप शत्रू म्हणून पाहतो. अर्थात तो त्यांच्या संघ संस्कारांचा भाग आहे. परंतु अशा प्रकारची आकांक्षा बाळगणे हे देखील संविधानविरोधी आहे. भाजपला काँग्रेसमुक्त भारत हिंदुराष्ट्र निर्माण करण्यासाठी हवा आहे. हिंदुराष्ट्र निर्माणात काँग्रेस पक्ष हा एक प्रमुख अडसर आहे. कारण काँग्रेसची स्थापना सर्वधर्मीय व्यक्तींनी एकत्र येऊन केली आहे. काँग्रेसच्या सर्वसमावेशक स्वातंत्र्य आंदोलनामुळेच भारत राष्ट्र निर्माण झाले आणि त्याने सर्वांना समान नागरिकत्व देणारे संविधान निर्माण केले. हे संविधान आणि काँग्रेस पक्ष नष्ट केला की हिंदुराष्ट्राचा मार्ग निर्वेध होईल, असा भाजपचा समज आहे. आणि असा समज जोपासण्याचा त्यांचा हक्क आपल्याला नाकारता येणार नाही.

आचार्य विनोबा भावे यांच्या 'जीवनाचा उलगडा' या पुस्तकात ३५ वे प्रकरण परशुरामाचे आहे. विनोबाजी लिहितात, हा एक विलक्षण प्रयोगी सुमारे ५ हजार वर्षांपूर्वी होऊन गेला. कोकणस्थांचा हा मूळ पुरुष. आईकडून क्षत्रिय, बापाकडून ब्राह्मण. बापाच्या आज्ञेवरून परशुरामाने आईचे डोके उडवले. हे कितपत योग्य म्हणून कोणीही खुशाल विचारील. पण याच्या श्रद्धेला साशंकता माहीतच नव्हती. निष्ठेने प्रयोग करायचा आणि अनुभवाने शहाणे व्हायचे, असे याचे सूत्र असे.

परशुरामाने क्षत्रियांचा घोर प्रतिकार आरंभिला. सापडले तितके सारे क्षत्रिय त्यांनी सरसहा मारून टाकले. 'पृथ्वी नि:शस्त्रीय करायची' हे त्याने आपले बिरूद बनवले. यासाठी तो स्वतः आपल्याजवळ नेहमी कुऱ्हाड बाळगू लागला आणि कुऱ्हाडीने एका तरी क्षत्रियाचे मुंडके रोज उडविले पाहिजे अशी उपासना त्याने आपल्या ब्राह्मण अनुयायांत रूढ केली. पृथ्वी नि:शस्त्रीय करण्याचा प्रयोग त्याने एकवीस वेळा केला. पण जुने क्षत्रिय बुद्ध्या मारावयाचे आणि अबुद्धीने नवीन निर्मावयाचे या प्रक्रियेने फलित काय निघणार? शेवटी रामचंद्राने याच्या डोळ्यात अंजन घातले, तेव्हापासून त्याची दृष्टी निवळली.

परशुराम पृथ्वी नि:शस्त्रीय करण्याच्या प्रयत्नात स्वतःच क्षत्रिय झाला. काँग्रेसमुक्त भारत करण्याच्या भानगडीत काँग्रेसच्या लोकांना स्वतःच्या पक्षात घेऊन भाजप स्वतःच काँग्रेसयुक्त झाला आहे. विश्वगुरुंची ताकद आणि क्षमता उघड पाडणारी ही अवस्था आहे.

**डॉ. विवेक कोरडे यांची 'जातीयवादी राजकारणाचा अन्वयार्थ', 'गांधीची दुसरी हत्या', 'शहीद भगतसिंग', 'वैचारिक बंदुकांचे शेत', 'गांधीहत्येचे राजकारण', 'आरएसएस आणि नथुराम गोडसे', 'भगतसिंग, गांधी आणि सावरकर : अपप्रचारामागचे वास्तव' ही पुस्तके प्रसिद्ध आहेत.**


**ई मेल :** drvivekkordeg@mail.com

## आमचे पाठीराखे

समतावादी मुक्त-संवाद पत्रिका


**कुमार केतकर, हुसेन दलवाई, रवींद्र टी. प्रधान, जयराज साळगावकर, दत्ता नायक, टी. जगत, विनोद शिरसाठ, डॉ.आनंद जोशी–सुमती जोशी, आशिष पाटकर, डॉ.दिलीप खताळ, डॉ.प्रदीप कर्णिक, प्रसाद केरकर, अतुल देऊळगावकर, डॉ.अजित जगताप, डॉ.रेखा शेळके, प्रशांत पवार, डॉ.मंदार काळे, सुशीलकुमार शिंदे, विकास महाडिक, दत्ता बाळसराफ, चिन्मय दामले, प्रशांत खुंटे, प्रा. राजेंद्र भोईवार, सचिन परब, पांडुरंग शिवलकर, सोहन भांगले, अविनाश हावळ, प्रभाकर कुंभार, चंद्रकांत पाटणकर, सुधीर साठे.**

# कुठून येते ही बेफिकिरी?



रवि आमले

पाळतशाहीच्या पाऊलखुणा – २



**कौटिल्यांनी त्या काळात पाळतीचा, हेरगिरीचा विचार किती बारकाईने केलेला आहे, हे पाहिले तर आज थक्क व्हायला होते. पाळतशाहीमध्ये 'विदा' म्हणजेच 'डेटा'ला अनन्यसाधारण महत्त्व. शस्त्र आहे ते पाळतशाहीचे. पण हे महत्त्व आजचेच नाही. आज 'डेटा इज न्यू ऑइल' वगैरे म्हटले जाते, ते तो डेटा उपयोगात आणायची नवनवी तंत्रे निर्माण झाली आहेत यास्तव. अशी तंत्रे पूर्वी नव्हती. तरीही नागरिकांचा 'डेटा' जमा केला जात होता...**

यम आणि यमी हे जुळे भाऊ-बहीण. यांची एक अत्यंत विचित्र कथा ऋग्वेदात आहे. सनातन वैदिक आर्य धर्मातील पवित्र असा हा वेद. त्याच्या दहाव्या मंडलातील एक संपूर्ण सूक्तच या कथेस वाहिलेले आहे. आपल्याला त्याच्याशी देणेघेणे आहे, ते फक्त पाळतशाहीच्या संदर्भात.

ती कथा अशी, की यम आणि यमी एक निर्जन, विस्तीर्ण बेटावर गेले आहेत. यमी अतिशय कामविव्हल झालेली आहे. तिला तिच्या भावापासून पुत्र हवा आहे. ती त्याला म्हणते, 'एकाच शय्येवर झोपताना पत्नी ज्या प्रमाणे पतीसमोर आपला देह प्रदर्शित करते, त्या प्रमाणे मी माझे शरीर दाखवीन. ये, आपण एकाच रथाच्या दोन चाकांप्रमाणे एकच कार्य करू.' यम तिला समजावतो, 'हे योग्य नाही. सूर्य आणि सरण्यू हे आपले माता-पिता आहेत. आपण सख्खे भाऊ-बहीण आहोत. तू बहीण असल्याने या संबंधांस योग्य नाहीस.' यमी ऐकण्याच्या मनस्थितीत नाही. ती म्हणते, 'सर्वात्मक प्रजापतीने गर्भातच आपल्याला पती-पत्नी बनवलेले आहे आणि पहिल्या दिवशीचा संभोग कोण जाणतो? तो कोणी पाहिला आहे?' यानंतर यम जे म्हणतो, ते अत्यंत महत्त्वाचे आहे. तो म्हणतो, 'येथे जे देवांचे गुप्तचर फिरत असतात. ते ना कधी विश्रांती घेतात, ना कधी डोळे बंद करतात!'

'न तिष्ठन्ति न नि मिषन्त्येये देवानां स्पश इह ये चरन्ति

अन्यने मदाहनो याहि तूयं तेन वि वृह रथ्येव चक्राः' (ऋग्वेद, १०.१०.८) – ही ती ऋचा. यात 'स्पश' हा शब्द आला आहे. चतुर्वेदी द्वारकाप्रसाद शर्मा यांच्या 'चतुर्वेदीकोश' म्हणून प्रसिद्ध असलेल्या 'संस्कृत-हिंदी कोषा'त (१९१७) स्पशचा अर्थ आहे गुप्तचर. तेव्हा या ऋचेचा काही वेगळा अर्थ काढणे कठीण.

**वेदकालीन पाळतशाही**

आता या सूक्ताचा प्रारंभ पाहा. त्यात उल्लेख आहे, की हे दोघे जण अशा द्वीपावर आहेत, की जेथे अन्य कोणीही नाही. त्यांच्या संवादातून समजते, की ते तेथे काही तत्कालीन व्यवस्थेविरोधात षड्यंत्र रचत नव्हते. ते आर्यशत्रू दस्यूंसाठी हेरगिरी करीत नव्हते, की पणींसाठी गौ तस्करी करीत नव्हते. त्यांचे बोलणे अत्यंत खासगी होते. तरीही यम सांगत आहे, की आपले कर्म देवांच्या हेरांपासून लपून राहणार नाही. ते हेर तेथे आहेत की नाहीत हेही त्याला माहीत नाही. पण त्याच्या मनात त्यांचे भय मात्र आहे. ते कशामुळे? तो म्हणतो, बहीण-भावाच्या संबंधांना पूर्वी असलेली मान्यता व्यवस्थेने काढून घेतलेली आहे. तो नियम मोडल्यास ते व्यवस्थेला, देवांना कळेल. ही यमाची भीती आहे. कोणी पाहात असो वा नसो, आपण मात्र व्यवस्थेने ठरवून दिलेल्या नियमांचे नीट पालन करणे आवश्यक आहे, ही जाणीव त्याच्या मनात आहे. हे संपूर्ण सूक्त नीट पाहिल्यावर लक्षात येते, की हा केवळ पाळतीचा – सर्व्हेलन्सचा – प्रकार नाही. ही केवळ हेरगिरी नाही.

ऋग्वेदात या गुप्तचरांचा स्वामी – स्पशराज – आहे वरूण. त्याला आपण समुद्र वा पर्जन्यदेवता मानतो. पण ऋग्वेदात तो व्यवस्थेचा (ऋत) संरक्षकही आहे. लोक नियम पाळतात, की नाही हे पाहणारा आहे. अथर्ववेदात त्याचे कार्य अधिक स्पष्टपणे मांडलेले आहे. अथर्ववेदाच्या चौथ्या कांडात 'सत्यानृतान्वीणम्' नावाचे एक सूक्त आहे. ते सांगते, की हा वरुण सर्व काही जाणत असतो. लोक काय करतात ते जवळून पाहात असतो. पृथ्वीवर जाहीर वा गुप्तपणे जे काही व्यवहार चालतात ते त्याला माहीत असतात. एवढेच काय, दोन व्यक्ती गुपचूप काही बोलत असतील, तरी त्याला त्यांचे बोलणे समजते. तो जणू त्यांच्यात तिसरा होऊन ते ऐकत असतो. त्याचे हेर पृथ्वीवर सतत फिरत असतात. ते हेर म्हणजे त्याचे हजार नेत्रच. त्यांद्वारे तो या भूमीचे निरीक्षण करीत असतो. आणि तेही कसे, तर एखाद्याची पापणी किती वेळा लवते, याकडेही त्याचे लक्ष असते. तो सर्व काही मापत असतो, जाणत असतो, पाहत असतो. ही केवळ पाळत नाही. पाळत विशिष्ट लोकांवर, गटांवर ठेवली जाते. हे सर्व्हेलन्स स्टेट – पाळतशाही – आहे. येथे सगळेच पाळतीखाली आहेत. लोकांना त्याची जाणीवही आहे. पाळतशाहीत ही जाणीव गरजेची असते. ऑर्वेलच्या '१९८४' मध्ये सर्वत्र पाट्या लावलेल्या असतात, की 'बिग ब्रदर इज वॉचिंग यू'. 'तुम्ही सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या कक्षेत आहात', हा त्याचाच किरकोळ प्रकार. हा एवढासा इशाराही लोकांस नियंत्रणात, दाबात ठेवण्याकरीता पुरेसा असतो.


ऋग्वेद रचनेचा काळ साधारणतः इ.स.पूर्व दोन हजार ते चौदाशे मानला जातो. आता वेदांचा – आणि वेदांचाच का, कोणत्याही धर्मग्रंथांचा – विषय आला, की त्या ग्रंथाचा काळ अधिकाधिक मागे नेण्याची आपली प्रवृत्ती जुनीच आहे. ग्रंथ जेवढा प्राचीन, तेवढा थोर, तेवढी आपली संस्कृती थोर वगैरे न्यूनगंडात्मक अहंगडातून येते ते. पण अभ्यासकांच्या मते, सुमारे चार हजार वर्षांपूर्वी ऋग्वेदाची रचना झाली. बाकीचे वेद त्यानंतरचे. त्या काळी अशा प्रकारची पाळत का ठेवली जात

असेल, तिचे नेमके तंत्र काय असेल, ते वरूणाचे हजार नेत्र ही केवळ कवी कल्पना की वास्तव, हे सांगता येणे कठीण. यावर काही लोक असेही म्हणू शकतील, की हा साराच प्रकार पारलौकिक, अध्यात्मिक वगैरे अर्थाने घ्यावा. जेथे जेथे अशा प्रकारच्या अडचणीच्या बाबी येतात, त्या ठिकाणी नेहमी असाच सल्ला दिला जातो.

पण यम-यमी संवाद, वरुणाचे वेदांत वर्णिलेल्या त्या विविध युद्धांत भाग घेणे अशा कथांना कितीही धार्मिक संकल्पनांच्या गडबडगुंड्यात गुंडाळले, तरी वास्तवाचे तुकडे मागे राहतातच. त्या वेदकालीन समाजव्यवस्थेचे वास्तव काय होते? कशी होती ती? ती जातीभेदात्मक नव्हती हे खरे. पण तिच्यात व्यवसायभेद नक्कीच होते. ब्रह्म, क्षत्र आणि विश् असे तीन व्यवसायनुरूप वर्ग त्या काळी होते. त्यातील पौरोहित्य करणारा आणि राज्य करणारा हे दोन वर्ग अर्थातच प्रमुख होते. बाकीचा तिसरा विश् हा वर्ग म्हणजे सामान्य प्रजा. वरूणाचे ते हजार नेत्र नजर ठेवत असणार ते या सामान्य प्रजेवर. अखेर वरूण ही व्यवस्थेची संरक्षक देवता आहे. एवढेच नव्हे, तर वेदांत वरूणाचा राजा म्हणूनही उल्लेख आलेला आहे. ही राज्यव्यवस्था, तिचे कायदे-नियम अबाधित राहावेत; त्या व्यवस्थेला धोका देण्याचे काम कोणी करू नये, हे पाहण्याची जबाबदारी त्याच्यावर आहे. ती तो उत्तमरित्या सांभाळत असल्याचे दिसते. शिवाय अशी हेरगिरी चालते, पाळत ठेवली जाते, याची जाणीव लोकांना आहे. अशी जाणीव असणे हे व्यवस्थेच्या फायद्याचे असते.

**रामायण-महाभारतकालीन पाळत व्यवस्था**

वेदकाळाप्रमाणेच पुढे रामायण-महाभारतातही पाळतीचे, हेरगिरीचे उल्लेख आढळतात. वाल्मिकींच्या रामायणात प्रजेवर सर्वंकष पाळत ठेवण्याचे उल्लेख नाहीत, हे खरे. मात्र राज्ययंत्रणेशी संबंधित असलेल्या सेनापती, अंतःपुराचा प्रमुख, खजिनदार, नगराध्यक्ष, बांधकामप्रमुख, धर्माध्यक्ष आदी प्रमुख लोकांवर मात्र राजाने बारीक नजर ठेवावी असे सांगितलेले आहे. वाल्मिकींनी भरतभेटीचा जो प्रसंग रंगवलेला आहे, त्यात हा उपदेश आलेला आहे. तेथे राम भरताला म्हणतो, की 'तुला आणि तुझ्या अमात्यांना इतरांच्या गुप्त विचारांचा पत्ता लागतो ना? तू तुझ्या शत्रुपक्षाच्या १८ आणि स्वपक्षाच्या १५ तीर्थांची तीन-तीन गुप्तचरांद्वारे तपासणी, चौकशी करत असतोस ना?' तीर्थे म्हणजे राज्ययंत्रणेतील विविध अधिकारी. सामान्य प्रजेवरील







*जनतेवर, हितशत्रूंवर आणि हितचिंतकांवरही पाळत ठेऊन सत्ता अधिकाधिक बळकट करत जाण्याचा प्रघात अगदी पुराण काळापासून आहे...*

पाळतीबाबत वाल्मिकींचा काय विचार होता, हे मात्र रामायणातून समजत नाही. महाभारत मात्र याबाबतीत अधिक स्पष्ट आहे.

पं. श्रीपाद दामोदर सातवळेकरांनी संपादित केलेल्या महाभारताच्या शांतिपर्वातील एका श्लोकात भीष्म सांगतात - 'उदासीनारिमात्राणां सर्वमेव चिकीर्षितम्। पुरे जनपदे चैव ज्ञातव्यं चारचक्षुषा।।' (शांतिपर्व, ८६.२१) याचा अर्थ असा, की 'नगरांमधील, छोट्या गावांतील, खेड्यांतील आपले शत्रू, मित्र, तसेच तटस्थ लोक केव्हा काय करू पाहत आहेत. याकडे राजाने गुप्तचररूपी नेत्रांनी नेहमी लक्ष ठेवावे.' आणखी एका श्लोकात तर थेटच प्रजेवरील पाळतीचा उपदेश आहे. 'बाह्यामाभ्यन्तरं चैव पौरजानपदं तथा। चारैः सुविदितं कृत्वा ततः कर्म प्रयोजयेत्।।' (शांतिपर्व, ८६.१९). येथे भीष्म सांगत आहेत, की राजाने 'नगरात तसेच छोट्या छोट्या गावांतील जाहीर आणि अंतर्गत बातम्या गुप्तचरांद्वारे व्यवस्थित माहिती करून घ्याव्यात आणि त्यानुसार कार्य करावे.' याचा अर्थ स्पष्ट आहे. हा पाळतीचा इशारा आहे.

कौटिल्याचे 'अर्थशास्त्र'ही हेच सांगते. ते इसवी सनाच्या चौथ्या शतकातले, सतराशे वर्षांपूर्वीचे. ते तर आजच्या पाळतशहांचे प्राथमिक पाठ्यपुस्तक ठरावे. त्यात, राजाने हेरांच्या साह्याने 'कंटकशोधन' करावे हा जसा त्यांचा सल्ला आहे, तशीच 'राजाने नागरिक आणि जानपद यांच्यावरही हेरांची नेमणूक करावी', म्हणजे नागरिकांवर पाळत ठेवावी अशीही सूचना आहे.



*कौटिल्याने अर्थशास्त्राचा विचार मांडताना प्रत्येक माणसावर पाळत ठेवण्यासाठीचे पाळत तंत्रही सुचवले होते...*

**पाळतखोरीचे तंत्रमंत्र**

कौटिल्यांनी त्या काळात पाळतीचा, हेरगिरीचा विचार किती बारकाईने केलेला आहे, हे पाहिले तर आज थक्क व्हायला होते. पाळतशाहीमध्ये 'विदा' म्हणजेच 'डेटा'ला अनन्यसाधारण महत्त्व. शस्त्र आहे ते पाळतशाहीचे. पण हे महत्त्व आजचेच नाही. आज 'डेटा इज न्यू ऑइल' वगैरे म्हटले जाते, ते तो डेटा उपयोगात आणायची नवनवी तंत्रे निर्माण झाली आहेत यास्तव. अशी तंत्रे पूर्वी नव्हती. तरीही नागरिकांचा 'डेटा' जमा केला जात होता. अर्थशास्त्राच्या ५६व्या अध्यायातील खानेसुमारीचा उल्लेख या दृष्टीने पाहण्यासारखा आहे. कौटिल्य सांगतात, राजाने स्त्रियांची, पुरूषांची खानेसुमारी करावी. आणि त्यात कशाकशाची नोंद घ्यावी, तर लहानापासून थोरापर्यंत प्रत्येक माणसाचा वर्तनक्रम, धंदा, उत्पन्न आणि खर्च. लोकांची घरे, जमीनजुमला. झालेच तर त्यांच्याकडील जनावरांची संख्या अशा विविध गोष्टींची. या खानेसुमारीला केवळ अर्थकारणाचा संदर्भ नाही. ती पाळतीच्या दृष्टीनेही महत्त्वाची आहे. याच अध्यायात कौटिल्य सांगतात, राजाने लोकांच्या हालचालींवर नजर ठेवावी. एखादी व्यक्ती कुठे परगावी गेल्यास वा परगावातील व्यक्ती गावात आल्यास ती का आली आहे, याचा तपास करावा. आजच्या परिभाषेत सांगायचे, तर हे सर्व पाळतखोरीसाठी उपयुक्त असे 'ऑपरेशनल डेटा पॉइंट' आहेत. हा असा पाळतीचा विचार केवळ भारतीय परंपरेतच आहे, असे मानायचे कारण नाही. सर्वच धर्मग्रंथांत आणि परंपरांत तो सापडतो. तेथे ईश्वर 'सर्वसाक्षी' – सर्व काही पाहणारा, जाणणारा – असतो. राजा हा ईश्वराचा अंश. दैवी अधिकाराने त्यास राजगादी मिळालेली. तेव्हा परंपरेचे म्हणणे हे, की त्यानेही सर्वसाक्षी असावे. हे सर्वसाक्षी असणे ईश्वराचे असो वा राजाचे वा ख्रिश्चन विश्वात चर्चचे, ते अंतिमतः समाजहितासाठीच असते. राजाने 'व्यवस्था' टिकवणे आवश्यक. ती का टिकवायची, तर लोकांच्या भल्यासाठी. राजाला राज्याची आणि प्रजेची सुरक्षा पाहायची आहे. ती पाहायची, तर त्यासाठी त्याला प्रजेवरच पाळत ठेवणे आवश्यक आहे. हेरांना राजाचे नेत्र म्हटलेले आहे. त्या डोळ्यांची दोन पाखरे लोकांभोवती सतत फिरती ठेवायलाच हवीत. दैवी कार्य आहे ते, त्याचे.

हा आपला पाळतीचा इतिहास आहे. ही आपली वैचारिक परंपरा आहे. भारतीय समाजात खासगीपणाला मूल्य नाही, याचे कारण यात दडलेले आहे. एकदा हेरगिरी हे राज्ययंत्रणेने करावयाचे दैवी कार्य ठरले, ती केली जाते ती लोकहितासाठीच हे नक्की झाले, की मग त्यात नागरिकांच्या हक्कांचा, खासगीपणाचा विचार येणार कुठून? प्राचीन भारतात त्या विचारास स्थान नव्हते. आपला प्राचीन भारतीय समाज हा नेहमीच व्यक्तीपेक्षा समष्टीस महत्त्व देणारा राहिलेला आहे. तो नेहमीच कर्तव्यप्रधान राहिलेला आहे. त्यात हक्कांपेक्षा कर्तव्यास अधिक महत्त्व आहे. आपले धार्मिक ग्रंथ सातत्याने ठासून सांगत असतात, ते हेच की समाजाची व्यवस्था टिकण्यासाठी प्रत्येकाने आपापल्या कर्तव्याचे योग्य निर्वाहन केले पाहिजे. पण मग सर्व लोक तसे करतात की नाही हे कसे पाहायचे? त्यासाठी हेरगिरी आवश्यक. पाळत आवश्यक. राज्ययंत्रणेकडे प्रत्येक नागरिकाचा अधिकाधिक 'डेटा' असणे आवश्यक. यात खासगीपणाचा मुद्दाच येत नाही. हक्कांना महत्त्व नाही म्हटल्यावर खासगीपणाच्या हक्काचा प्रश्नच येत नाही. कौटिल्य याचेच संकेत देत आहेत. यम–यमी संवादसूक्तातून हेच दिसत आहे. पाळतखोरीबाबत, खासगीपणाच्या अधिकारां–बाबतची सामाजिक बेफिकिरी ही आपल्या या अशा वैचारिक परंपरेची निर्मिती आहे. ती आजच्या पाश्चात्य समाजात नाही. त्यामुळेच तेथे 'स्नोडेन' जन्मू शकतात. तो सारा इतिहास पाहण्यासारखा आहे.

**रवि आमले हे ज्येष्ठ पत्रकार–संपादक, प्रथितयश लेखक आणि भाष्यकार आहेत. त्यांची प्रोपगंडा, रॉः भारतीय गुप्तचर संस्थेची गूढ गाथा, मॅनहंट (अनुवादित), परकीय हात, वरुण ते बहिर्जी आदी पुस्तके वाचकप्रिय ठरली आहेत.**
**संपर्क:** ravi.amale@icloud.com

# राजकीय अर्थशास्त्राची पद्धत आणि जगाची जडणघडण



हितेश पोतदार

अर्थबोध



**स**माजशास्त्रज्ञ आणि आर्थिक इतिहासकार इमॅन्युएल वॉलर्स्टाइन यांच्या मते, समाजशास्त्रांना अनेक छोट्या-छोट्या विशेषीकृत शाखांमध्ये विभागण्यामागे प्रस्थापित व्यवस्थेचा एक ठराविक राजकीय उद्देश होता. यामुळे जास्त नुकसान झाले ते राजकीय अर्थशास्त्राचे. ते अधिकाधिक बाजार, खासगी कंपन्याभिमुख आणि त्यांच्यातील नफानिर्मितीच्या प्रक्रिया सुलभ होण्यासाठी कार्यरत झाले. अर्थशास्त्राची सामाजिक बांधिलकी व बदलाच्या भाषेविषयी असणारी जबाबदारी लोप पावली. दुसरीकडे, नव्याने आलेल्या विद्याशाखांमध्ये अस्मितावादी राजकारणाचा शिरकाव झाला. दोघांच्या मिसळणीतून वर आलेल्या उदारमतवादी धोरणामुळे समाजातील समस्यांना तात्पुरत्या मुलामा देणाऱ्या संशोधनांना व चर्चांना उधाण आले. मूळ समस्या मागे पडल्या, बदलाची भाषा नाहीशी झाली, राजकीय अर्थव्यवस्था चर्चाविश्वातून बाहेर फेकली गेली...

राजकीय अर्थशास्त्रावरील वर्गात शिकवताना आणि स्वतःसाठी त्याचा अभ्यास करतानाही सुरुवातीला माझा संघर्ष स्वतःशीच असायचा. कारण राजकीय अर्थशास्त्राची स्वतःची एक ठोस वैचारिक बैठक आणि विश्लेषणाची विशिष्ट पद्धत आहे. वर्गात विषयाला हात घालण्यापूर्वीच मला सृष्टीतील विविध घटकांचे एकमेकांशी असणारे अतूट नाते अधोरेखित करून विषयाची पार्श्वभूमी तयार करावी लागते. असे करताना विषय पहिल्याच प्रयत्नात अमूर्ततेच्या – ॲबस्ट्रॅक्शच्या पातळीला जाण्याचा सदैव धोका असे. कारण राजकीय अर्थशास्त्र कितीही ठोस परिस्थितीशी संलग्न असले तरी छोट्या कालावधीत विषयाचे संपूर्ण आयाम मांडण्यासाठी विविध सिद्धांतांचा वापर विषयाला सुरुवातीलाच अमूर्ततेत ढकलतो आणि मग लोकांना हे सगळं आपल्या रोजच्या जगण्याशी फार काही संबंध ठेवत नाही, असा संभ्रम निर्माण होण्याचा धोका अधिक असतो.

त्या सगळ्या एरवी सुटसुटीत वाटणाऱ्या विविध घटकांमधील म्हणजेच मानव, त्यांचे श्रम, निसर्ग आणि मानवी व नैसर्गिक वैविध्यता यांच्यातील नातेसंबंध उलगडणे अधिक जिकरीचे होते. त्याकारणाने विषय अधिक क्लिष्ट होत जातो, तेव्हा त्याचे सुलभीकरण करण्यात अधिक श्रम लागतातच, पण ते रोजच्या जगण्याशी अप्रासंगिकही वाटू लागते. म्हणून त्यासाठी बहुतांशी अगदी मानवाच्या उत्क्रांती प्रक्रियेपासून सुरुवात करत मानव, त्यांचे श्रम व निसर्गावर केलेले श्रमसंस्कार आणि त्यातून जगण्यासाठी, मानवी विकासासाठी केलेले उत्पादन ह्यांचे इतिहासातील सतत बदलत जाणारे स्वरूप विचारात घ्यावे लागते.

दुसरे आव्हान, राजकीय अर्थशास्त्राचा इतिहासच दाखवून देतो की अशा प्रकारच्या विश्लेषणाला समाजात तग धरून ठेवण्यासाठी सातत्याने संघर्ष करावा लागलेला आहे. प्रस्थापित व्यवस्थेकडून आणि त्या व्यवस्थेच्या सोयीसाठी काम करणाऱ्या अभ्यासकांकडून अशा अर्थशास्त्राला कायमच धोका राहिला आहे. कारण हे अर्थशास्त्र तटस्थतेची भाषा न करता, सतत थेट व्यवस्थेला आव्हान देत बदलाची भाषा करते.

समाजशास्त्रज्ञ आणि आर्थिक इतिहासकार इमॅन्युएल वॉलर्स्टाइन[१] यांच्या मते, समाजशास्त्रांना अनेक छोट्या-छोट्या विशेषीकृत शाखांमध्ये विभागण्यामागे प्रस्थापित व्यवस्थेचा एक ठराविक राजकीय उद्देश होता (व आहे). वंश, वर्ण, लिंगभाव, प्रदेश, जात अशा व इतर अनेक भेदांवर आधारित आणि विकासशास्त्र, पब्लिक पॉलिसीसारख्या स्वतंत्र विद्याशाखा निर्माण केल्या आणि हे मूळ शाखांपासून म्हणजेच अर्थशास्त्र, राज्यशास्त्र इ. पासून वेगळे ठेऊन व्यवस्थे-विरोधातील एकसंध संघर्षाच्या शक्यतेलाच छेद देण्याचा प्रयत्न झाला. मात्र त्यांच्या नवीन विद्यापीठीय प्रभागांमध्ये सुदैवाने पुरोगामी विचारवंतांनी प्रभाव टिकवून ठेवल्यामुळे, तिथे घडणाऱ्या संशोधनांना आणि चर्चांना अनेकदा आंतर/बहुविद्याशाखीय स्वरूप प्राप्त झाले (इतर अनेक फायद्यांसह).

तरीही याचा अर्थ असा नाही, की प्रस्थापितांचे मनसुबे पूर्णपणे उधळले गेले. अनेक अर्थांनी हा प्रयोग विद्यापीठीय शाखांना परस्परविरोधी उभे करण्यात यशस्वी ठरला. यामुळे जास्त नुकसान झाले ते राजकीय अर्थशास्त्राचे. ते नाहीसेच झाले. अशा फोडणीमुळे दोन हेतू साध्य झाले. एक, अर्थशास्त्र हे अधिकाधिक बाजार, खासगी कंपन्याभिमुख आणि त्यांच्यातील नफानिर्मितीच्या प्रक्रिया सुलभ होण्यासाठी कार्यरत झाले. अर्थशास्त्राची सामाजिक बांधिलकी व बदलाच्या भाषेविषयी असणारी जबाबदारी लोप पावली. दुसरीकडे, नव्याने आलेल्या विद्याशाखांमध्ये अस्मितावादी राजकारणाचा शिरकाव झाला. दोघांच्या मिसळणीतून वर आलेल्या उदारमतवादी धोरणामुळे समाजातील समस्यांना तात्पुरत्या मुलामा देणाऱ्या संशोधनांना व चर्चांना उधाण आले. मूळ समस्या मागे पडल्या, बदलाची भाषा नाहीशी झाली, राजकीय अर्थव्यवस्था चर्चाविश्वातून बाहेर फेकली गेली.

**राजकीय अर्थशास्त्राची पद्धत आणि तिचा संघर्ष**

व्यवस्थेला राजकीय अर्थशास्त्र धोकादायक का वाटते? याचं एक मुख्य कारण म्हणजे, एक जाणिवसिद्ध प्राणिजात म्हणून आपण विचारत असलेले मूलभूत प्रश्न, विशेषतः असमानतेविषयीचा प्रश्न. जगात काही लोक इतकी प्रचंड संपत्ती गोळा करतात, की त्यांच्या अनेक पिढ्या काम न करता जगू शकतील, तर दुसरीकडे बहुतांशी लोकांना रोजच्या एक वेळच्या भोजनासाठीही संघर्ष करावा लागतो. व्यक्ती जन्मताच स्वयंस्फूर्तीने आपले आर्थिक-सामाजिक स्थान निवडत नाही, हे जर खरे असेल, तर मग निव्वळ जगण्यासाठीचे लढे काहींच्याच वाट्याला का येतात? अशा शोषक आर्थिक-सामाजिक उतरंडी खरोखरच नैसर्गिक आहेत की त्या विशिष्ट ऐतिहासिक प्रक्रियांमधून निर्माण झालेल्या आहेत? आणि

एकदा निर्माण झाल्यावर त्या जन्मापासून चिकटल्यासारख्या कशा टिकून राहतात?

म्हणूनच राजकीय अर्थशास्त्र आपले प्रश्न अधिक धारदार करत विचारते. पहिला प्रश्न : संपत्ती कुठून निर्माण होते आणि ती कुणाच्या श्रमातून निर्माण होते? हा प्रश्न केवळ उत्पादनाच्या आकड्यांपुरता मर्यादित राहत नाही. तो थेट श्रम, वेळ, शरीर, निसर्ग आणि सामाजिक परिस्थितींचे पुनरुत्पादन यांच्याशी जोडलेला असतो. त्यामुळेच राजकीय अर्थशास्त्र हे मूल्य या संकल्पनेला आणि मूल्यनिर्मितीच्या प्रक्रियेला नैतिक, ऐतिहासिक आणि राजकीय संदर्भांशिवाय पाहू देत नाही. याच कारणामुळे राजकीय अर्थशास्त्राच्या गाभ्यातच बहुविद्या–शाखीय पद्धती सदैव कार्यरत असते.

दुसरा मूलभूत प्रश्न असतो : ही संपत्ती कोणाच्या ताब्यात जाते आणि का? इथे राजकीय अर्थशास्त्र केवळ 'पुरवठा–मागणी'च्या तांत्रिक चौकटीत अडकत नाही. उलट, ते मालकी, सत्ता, वर्ग, जात, लिंगभाव, प्रदेश आणि राज्यसत्ता यांच्यातील गुंतागुंतीच्या नातेसंबंधांचा छडा लावते. त्यामुळे असमानतेकडे अपघाती, नैसर्गिक किंवा वैयक्तिक अपयश म्हणून न पाहता, ती व्यवस्थात्मक निर्मिती म्हणून समजून घेतली जाते.

तिसरा निर्णायक प्रश्न असा उभा राहतो की : ही सामाजिक–आर्थिक उतरंड नैसर्गिक आहे की ऐतिहासिक? मुख्य प्रवाहातील अनेक सामाजिक शास्त्रे दारिद्र्य, बेरोजगारी, जातीय विषमता किंवा लिंगभावाधारित शोषण यांना 'समस्या' म्हणून मांडतात. परंतु राजकीय अर्थशास्त्र त्यांना ऐतिहासिक प्रक्रियांचे व त्यातील बदलांचे परिणाम म्हणून समजून घेते. त्यामुळे 'काही लोक श्रीमंत, उच्चभ्रू आहेत आणि काही गरीब, वंचित' हा प्रश्न बदलून 'काही लोक श्रीमंत–उच्चभ्रू का आहेत आणि काही लोक गरीब व वंचित का ठेवले जातात?' असा पुढे येतो.

चौथा आणि कदाचित सर्वात अस्वस्थ करणारा प्रश्न असा असतो : ही व्यवस्था टिकून कशी राहते? फक्त दडपशाहीमुळे नव्हे तर विचारसरणी, संस्कृती, शिक्षण, धर्म, कायदे आणि 'सामान्य समज–उमज' (common sense) यांच्या माध्यमातून असमानतेला कसं नैसर्गिक आणि अपरिहार्य ठरवलं जातं, हे राजकीय अर्थशास्त्र उघड करतं. त्यामुळेच ते केवळ अर्थव्यवस्थेचा नव्हे, तर सत्तेच्या वैचारिक पायाभूत रचनेचाही अभ्यास करतं.


शेवटी, राजकीय अर्थशास्त्र विचारतं : हे सगळं बदलता येऊ शकतं का? इथेच ते इतर अनेक शाखांपेक्षा मूलतः वेगळं ठरतं. कारण राजकीय अर्थशास्त्र स्वतःला केवळ वर्णनात्मक शास्त्र मानत नाही. ते बदलाची शक्यता तपासणारे आणि बदलाची भाषा करणारे पद्धतीशास्त्र आहे. त्यामुळेच ते संघर्ष, संघटन, प्रतिकार आणि पर्यायी भवितव्य याविषयी बोलायला कचरत नाही. याच कारणामुळे राजकीय अर्थशास्त्र व्यवस्थेला धोकादायक वाटतं. कारण ते प्रश्न विचारण्यात थांबत नाही. ते प्रश्न कुणा एका समूहाच्या सोयीसाठी दाबता येत नाहीत. ते प्रश्न कुठल्या एकाच शोषित समूहापुरते मर्यादित राहत नाहीत, तर शोषण आणि अत्याचाराच्या संपूर्ण व्याख्येला आणि व्यवस्थेलाच एकसंध पद्धतीने आव्हान देतात.

**मानव, श्रम आणि निसर्ग : उत्पादनाच्या सामाजिक इतिहासाची जडणघडण**

पृथ्वीतलावरील जगाच्या कोणत्याही कोपऱ्यातली, कुठलीही व्यक्ती एका पोकळीत जीवन जगत नसते. हे विधान फक्त नैतिक किंवा तात्त्विक नाही, तर ते मुळात सामाजिक सत्य आहे. मानवाचं जगणं सुरुवातीपासूनच निसर्गावर, इतर सहकारी मानवांच्या श्रमांवर आणि सामूहिक जीवनावर अवलंबून राहिलेलं आहे. कुण्या एका व्यक्तीने पोकळीत कोणत्याही गोष्टीची निर्मिती केलेली नाही. अगदी वैयक्तिक विचार, कला किंवा कोणतेही उत्पादक हे एकाच व्यक्तीचे कधीच नसते. अन्न, पाणी, निवारा, ऊब, सुरक्षितता या सगळ्या गोष्टी एका व्यक्तीने निर्माण केल्या नाहीत किंवा त्या बाजारातही जन्माला आलेल्या नाहीत. त्या निसर्ग आणि श्रम या दोन मूलभूत अटींवर व त्यातून निर्माण होणाऱ्या शक्यतांवर उभ्या राहिल्या.

अशा वेळी आपलं पहिलं आणि सर्वात मूलभूत काम म्हणजे माणूस, निसर्ग आणि श्रम यांच्यातील नातं पुन्हा एकदा स्पष्टपणे समोर ठेवणं. कारण आज ज्या पद्धतीने आपण जगाची अर्थव्यवस्था, उत्पादन व्यवस्था किंवा विकासाकडे पाहतो, त्यात माणूस जणू एखादा स्वतंत्र, एकाकी घटक आहे आणि निसर्ग हा फक्त वापरासाठी उपलब्ध असलेला साठा आहे, अशी एक सूक्ष्म पण घातक गृहीतकं जनमानसात खोलवर रुजवली गेली आहेत. राजकीय अर्थशास्त्र या गृहितकांनाच सर्वप्रथम प्रश्न विचारतं.

मानवी इतिहासाकडे पाहिलं, तर माणूस कधीच निसर्गापासून वेगळा नव्हता. अन्न गोळा करणाऱ्या समाजांपासून ते शेतीच्या सुरुवातीपर्यंत आणि पुढे हस्तव्यवसाय व




*एकपत्नी कुटुंब व्यवस्था ही नैतिक प्रगती नसून खासगी मालकी हक्कासाठी निर्माण झालेली सामाजिक गरज होती.*
*– इति फ्रेडरिक एंगल्स...*

कारागिरीपर्यंत उत्पादन ही प्रक्रिया नेहमीच निसर्गाशी थेट संबंध ठेवून घडत गेली. त्यात मानवाच्या अस्मिता व निसर्गातील भेद कधी आड आले नाहीत. माणूस हा त्याच निसर्गाचा एक घटक होता आणि आहे. कोणतेही मानव समाज निसर्गावर श्रमसंस्कार करतात, निसर्गातून साधनं घेतात आणि पुन्हा त्या निसर्गातच आपलं जीवन परत गुंफतात. पूर्वापार हा संबंध नैतिक किंवा भावनिक नसून मुळात जैविक, भौतिक आणि आर्थिक होता.

याच संदर्भात फ्रेडरिक एंगेल्स यांचा हस्तक्षेप अत्यंत मूलभूत ठरतो. The Part Played by Labour in the Transition from Ape to Man[२] या छोटेखानी निबंधात एंगेल्स श्रमाकडे केवळ उत्पादनाचं साधन म्हणून न पाहता, मानव उत्क्रांतीची मूलभूत अट म्हणून पाहतात. त्यांच्या मते, मानवाची दोन पायांवर चालण्याची सुरुवात ही केवळ शारीरिक बदलाची घटना नव्हती. ती श्रमांच्या शक्यतेची व विकासाची सुरुवात होती. हात व कालांतराने अंगठा मोकळा झाल्यामुळे साधनांचा वापर शक्य झाला, साधनांच्या वापरातून श्रम अधिक जाणीवपूर्वक, अधिक उद्देशपूर्ण बनत गेले. म्हणजेच, श्रम हे नंतर आलेले नव्हते. श्रमांनीच मानव घडवला.

एंगेल्ससाठी हा मुद्दा अत्यंत महत्त्वाचा आहे आणि तेवढाच आपल्यासाठी सुद्धा. मानवी हात श्रमाचं केवळ साधन नाही, तर स्वतः श्रमातून झालेली निर्मिती आहे. हजारो वर्षांच्या श्रमप्रक्रियेत हात विकसित होत गेला. हाताच्या या विकासाचा परिणाम मेंदू, इंद्रियसंस्था आणि समाजजीवनावर झाला. श्रमांनी केवळ निसर्ग बदलला नाही, तर त्यांनी मानवाचं शरीर, त्याची जाणीव आणि त्याची सामाजिकता बदलली. म्हणूनच एंगेल्स ठामपणे म्हणतात, की भाषा, सहकार्य आणि समाजजीवन यांची सुरुवात ही श्रमांच्या प्रक्रियेतूनच झाली. माणूस एकटा श्रम करू शकत नाही. श्रम हे मुळात सामूहिकच असते. इथूनच मानव हा 'सामाजिक प्राणी' बनतो. नैसर्गिकरित्या वा नैतिक उपदेशामुळे नव्हे.

कार्ल मार्क्स या मुद्द्याला आणखी खोल आणि अधिक अस्वस्थ करणाऱ्या पातळीवर नेतात. Economic and Philosophical Manuscripts of 1844[३] मधील Estranged Labour या पाठात मार्क्स सांगतात, की माणूस श्रमाशिवाय निसर्गाशी नातं जोडूच शकत नाही. श्रम ही ती प्रक्रिया आहे, ज्यामध्ये माणूस निसर्गासोबत काम करतो, पण त्याच वेळी निसर्गाचाच एक भाग राहतो. म्हणजेच, श्रम ही मानव–निसर्ग यांच्यातील चयापचयी नाळ (Stoffwechsel/ Metabolic Relation) आहे. ज्यात पदार्थ, ऊर्जा आणि जीवनाची पुनरुत्पत्ती सतत होत राहते.

पण मार्क्स इथे थांबत नाहीत. ते दाखवून देतात, की भांडवली उत्पादन पद्धतीत ही चयापचयी नाळ विकृत होते. भांडवलशाहीत श्रम माणसाच्या आत्मअभिव्यक्तीचं साधन राहत नाहीत. ते माणसापासून परके (alienated) होते. कामगार जे निर्माण करतात, ते त्यांचं राहत नाही. उलट, ते त्यांच्या विरोधात उभं राहतं आणि शोषणाचं साधन बनतं. त्याचप्रमाणे निसर्गही माणसाचा सहकारी न राहता, भांडवलासाठी वापरली जाणारी वस्तू/माल बनतो. मार्क्स याला केवळ आर्थिक समस्या मानत नाहीत. त्यांच्या मते, ही मानवी अस्तित्वाची विकृती आहे.

इथे एंगेल्स आणि मार्क्स यांची सांगड स्पष्टपणे दिसते. एंगेल्स दाखवतात, की श्रमांनी माणूस घडवला. मार्क्स दाखवतात, की भांडवलशाहीत तेच श्रम माणसाविरुद्ध उभे राहतात. ज्या श्रमांनी माणसाला निसर्गाशी जोडले, त्याच श्रमांच्या माध्यमातून भांडवलशाही माणसाला निसर्गापासून तोडते. उत्पादन प्रक्रिया वाढते, पण जीवनाची पुनरुत्पत्ती

धोक्यात येते. माणूस अधिक उत्पादनक्षम बनतो, पण त्याच वेळी अधिक असुरक्षित आणि स्वतःलाच परका होतो.

याच अर्थाने, एंगेल्स आणि मार्क्स यांचं लेखन आपल्याला हे समजावून सांगतं, की मानव, निसर्ग आणि श्रम यांचं नातं हे नैसर्गिकरित्या सुसंवादी असू शकतं, पण त्याला दिलेली सामाजिक-आर्थिक रचना निर्णायक ठरते. भांडवली उत्पादन व्यवस्था ही रचना अशी घडवते, जिथे श्रम आणि निसर्ग दोघेही माणसाच्या जगण्याच्या अटी न राहता, भांडवल साठवणीची साधनं बनतात. म्हणूनच, आजची उत्पादन व्यवस्था समजून घ्यायची असेल, तर या मूलभूत नात्यांकडे परत जाणं आणि त्यांचा राजकीय अर्थशास्त्रीय विचार करणं अपरिहार्य ठरतं.

**भेद : उत्पादनसंबंधांतून घडलेली रचना**

परंतु सामाजिक गरजांसाठी उभी राहिलेली उत्पादनप्रक्रिया इतिहासभर तशीच राहिली नाही. जसजसं उत्पादनाचा विस्तार झाला, श्रमांची गरज वाढत गेली आणि संसाधनांवर ताबा मिळवण्याची स्पर्धा तीव्र झाली, तसतसं उत्पादनव्यवस्थेत एक निर्णायक वळण आलं. ते म्हणजे, भेदांची निर्मिती. हे भेद एखाद्या सांस्कृतिक गैरसमजुतीतून किंवा नैसर्गिक फरकांमधून जन्माला आलेले नव्हते. ते मुळात आर्थिक आणि श्रमाधारित होते. कोणाचे श्रम नियंत्रित करायचे, कोण उत्पादन करणार आणि त्या उत्पादनावर कोणाचा हक्क राहणार, हे ठरवण्यासाठीच भेद घडवले गेले. एकदा हे भेद निर्माण झाल्यावर, त्यांना टिकवण्यासाठी त्यावर नैसर्गिकता, नैतिकता, धर्म आणि परंपरेचं आवरण चढवण्यात आलं.

भारताच्या संदर्भात बाबासाहेब आंबेडकर[४], डी.डी. कोसंबी[५] आणि शरद पाटील[६] यांचे लेखन हे ठामपणे दाखवते, की जात ही केवळ सामाजिक ओळख नव्हती, तर इतरांच्या श्रमांवर नियंत्रण मिळवण्याची संस्थात्मक रचना होती. आंबेडकर दाखवतात की जात म्हणजे, आधी तुलनेने एकसंध असलेल्या समाजाचं कृत्रिम तुकडेकरण होतं. ज्यात श्रम करणाऱ्या समूहांना जन्मतःच बंदिस्त करण्यात आलं. डी. डी. कोसंबी स्पष्ट करतात. की ही रचना इतिहासाला गोठवण्यासाठी होती, कारण परिस्थितीत बदल झाला, तर श्रमांवरील ताबा ढासळण्याची भीती होती. शरद पाटील पुढे जाऊन दाखवतात की वर्णांपासून जातीकडे झालेला प्रवास म्हणजे जमीन, वरकड मूल्य (तात्पुरता, 'नफा' असा वाचूयात) आणि राज्यसत्तेवर आधारित वर्गसंबंधांच्या वारसाहक्की-करणाचे प्रस्थापित होत जाणे होते. कोण काम करणार, कोण ज्ञानावर आणि उत्पादनावर नियंत्रण ठेवणार हे ठरवण्यासाठी श्रम जन्मतःच वेगळे करण्यात आले. या भेदाला नंतर शुचिता-अशुचिता, विधी, धार्मिक कर्तव्य आणि नैतिक आदेश यांचं स्वरूप देण्यात आलं. जेणेकरून ती व्यवस्था शोषण म्हणून नव्हे, तर 'सामाजिक क्रम' म्हणून स्वीकारली जाईल.

जागतिक पातळीवरही हीच प्रक्रिया वेगवेगळ्या रूपांत दिसून येते. स्त्री-पुरुष असा जैविक फरक हा मानवी इतिहासातला पहिला 'फरक' असला, तरी एंगेल्स[७] दाखवून देतात, की हा फरक स्वतःहून शोषणात्मक नव्हता. The Origin of the Family, Private Property and the State या ग्रंथात एंगेल्स स्पष्ट करतात की प्रारंभीच्या सामुदायिक समाजांमध्ये स्त्री-पुरुष संबंध तुलनेने समतावादी होते. उत्पादन सामाजिक गरजांसाठी होत असताना आणि खासगी मालकी अस्तित्वात नसताना, स्त्रियांची सामाजिक स्थिती दुय्यम नव्हती.

मात्र निर्णायक वळण येते, ते वरकड मूल्य (नफा) उत्पादन, खासगी मालकी आणि वारसाच्या प्रश्नाशी. ज्या क्षणी उत्पादन सामाजिक वापरापुरतं न राहता साठवणीसाठी होऊ लागलं, त्याच क्षणी मालकी टिकवण्याचा प्रश्न उभा राहिला. मालकी टिकवण्यासाठी वारसा निश्चित करणं आवश्यक बनलं. इथूनच कुटुंबाची रचना बदलते. एंगेल्स यांच्या मते, एकपत्नी कुटुंब व्यवस्था (monogamous family) ही नैतिक प्रगती नसून, खासगी मालकीची सामाजिक गरज होती. कारण त्यातूनच पुरुषांच्या मालकीचा वारसा 'वैध' ठरवता येत होता.

या प्रक्रियेत स्त्रियांच्या श्रमांवर विशेषतः घरकाम, जीवनपोषक श्रम (care-work), अपत्यप्रसव आणि इतर पुनरुत्पादनाच्या श्रमांवर नियंत्रण मिळवणं अत्यावश्यक ठरलं. स्त्रीचं शरीर, तिची श्रमशक्ती आणि तिचं पुनरुत्पादक कार्य हे खासगी मालकी टिकवण्यासाठी व्यवस्थेच्या अधीन करण्यात आलं. म्हणूनच एंगेल्स स्त्रीदास्याला 'पहिलं वर्गदमन' म्हणतात. कारण इथे शोषणाचं मूळ जैविक फरकात नसून, मालकीच्या सामाजिक रचनेत होतं.

गुलामगिरीच्या इतिहासातही हेच सूत्र स्पष्टपणे दिसतं. अनेक मार्क्सवादी कृष्णवर्णीय अभ्यासक दाखवून देतात, की गुलामगिरी म्हणजे फक्त कृष्णवर्णीय लोकांवरचं वर्चस्व नव्हतं. तर श्रम, जमीन, निसर्ग आणि संपूर्ण भूगोलावर ताबा मिळवण्याची ती प्रक्रिया होती. गुलामांचे श्रम, नव्या



कृष्णवर्णीयांवर गुलामगिरी लादणे ही कृष्णवर्णीय राहत असलेल्या खंडावर, तिथल्या साधनसंपत्तीवर ताबा मिळवण्याची एक प्रक्रिया होती...

सगळ्यांचा एकत्रित वापर करूनच आधुनिक जागतिक उत्पादनव्यवस्था, त्या अर्थाने अर्थव्यवस्था उभी राहिली. इथे भेद हे अस्मितेपुरते मर्यादित नव्हते, ते उत्पादन आणि साठवणीच्या गरजांमधून निर्माण झाले होते.

**राष्ट्र–राज्य भेद आणि भांडवलशाही : जागतिक राजकीय अर्थव्यवस्थेची पायाभरणी**

वसाहतवादही कोणत्या नैतिक फटीतून किंवा साहसी, जिज्ञासू वृत्तीतून जन्माला आलेला नव्हता. तो उदयाला आला, युरोपातील उत्पादन संकटांमधून. जसे जमिनीच्या मर्यादा, सरंजामशाहीतील नफ्याचा ऱ्हास व त्याच्या अस्तानंतरचे भांडवशाहीतील संकट आणि नव्या बाजारपेठांची तातडीची गरज. नव्या भूभागांचा शोध म्हणजे, मुळात नव्या स्वस्तातील श्रमसाठ्यांचा, संसाधनांचा आणि विस्तृत बाजारांचा शोध होता. इथूनच देशांमधील अधीनता आणि प्रभुत्वाची आर्थिक रचना आकाराला येते. जिथे काही देश उत्पादन, नफा आणि नियंत्रणाच्या केंद्रस्थानी राहतात, तर काही कायम श्रम, संसाधनं आणि स्वस्त बाजार म्हणून वापरले जातात.

आजची राष्ट्र–राज्य व्यवस्थाही या दीर्घ इतिहासातूनच उभी राहिलेली आहे. राष्ट्रे ही स्वयंसिद्ध, नैसर्गिक घटक नसून, ते स्वतः एक कृत्रिम भेद आहेत. जात, वंश, लिंगभाव, प्रदेश आणि श्रम यांवरील भेद संस्थात्मक स्वरूपात टिकवण्याची यंत्रणाही तेच आहेत. म्हणूनच, जसा जात, लिंगभाव आणि वंश यांचा राजकीय अर्थशास्त्रीय अभ्यास आवश्यक आहे, तसाच देशांमधील भेद, अधीनता आणि वर्चस्व समजून घेण्यासाठी जागतिक राजकीय अर्थशास्त्राचा दृष्टिकोन अनिवार्य ठरतो. 'जागतिक' म्हणून नव्हे, तर भेद, नियंत्रण आणि प्रभुत्वाच्या ऐतिहासिक प्रक्रियांचा अभ्यास म्हणून. त्या अर्थाने हाच या लेखमालेचा पाया ठरतो.


i) Wallerstein, I. M. (2001). Unthinking social science: The limits of nineteenth-century paradigms (2nd ed.). Temple University Press.

ii) Engels, F. (1876/1896). The part played by labour in the transition from ape to man. In Dialectics of nature.

iii) Marx, K. (1844/2007). Estranged labour. In Economic and philosophic manuscripts of 1844 (M. Milligan, Trans.). Dover Publications.

iv) Ambedkar, B. R. (1916/2014). Castes in India: Their mechanism, genesis and development. In Dr. Babasaheb Ambedkar: Writings and speeches (Vol. 1). Government of Maharashtra.

v) Kosambi, D. D. (1956). An introduction to the study of Indian history. Popular Prakashan.

vi) Patil, S. (1979). Dasa-Sudra slavery (Vols. 1-2). Sugawa Prakashan.

vii) Engels, F. (1884/1902). The origin of the family, private property and the state (E. Untermann, Trans.). Charles H. Kerr Co.


**संदर्भांच्या पीडीएफ मिळवण्यासाठी खालील क्यूआर कोड स्कॅन करा:**


**लेखक किंग्स कॉलेज, लंडनमधील इंटरनॅशनल डेवलपमेंट आणि जियोग्राफी विभागात पीएच.डी. अभ्यासक आहेत. युनिव्हर्सिटी ऑफ ऑक्सफर्ड येथेही ते अध्यापन सहाय्य करतात. त्यांचे संशोधन मुख्यत: कामगार (श्रम), तंत्रज्ञान आणि सार्वजनिक वित्त यांच्या अर्थराजकीय व्यवस्थेवर केंद्रित आहे. संपर्क : ९६५७७९९९८६,**

**ईमेल :** hiteshdpotdar@gmail.com

# ट्रंप यांनी व्हेनझुएलावर रुमाल टाकला!



डॉ. मोहन द्रविड

**विश्वकारण**



ट्रंप अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदी दुसऱ्यांदा निवडून आल्यापासून भारताचंच राष्ट्रीय धोरण सुकाणू तुटलेल्या जहाजासारखे भरकटत चालत असल्याने इतर जगात काय घडामोडी चालल्या आहेत, इकडे लक्ष द्यायला आपल्याला फारशी सवड नाही. त्यातील काही गोष्टींचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर मोठ्या प्रमाणात आणि दूरगामी असा परिणाम होणार आहे. व्हेनझुएलातील चाललेली धामधूम ही त्यातील एक. आपल्याकडे एसटीतली जागा बळकावण्यासाठी दांडगट जसे रुमाल टाकतात, तसे ट्रंप यांनी दांडगाई करत व्हेनझुएलावर रुमाल टाकला आहे. बरे एवढे करूनही त्यांचे समाधान झालेले नाही, आता त्यांनी ग्रीनलँड ताब्यात घेऊन अवघ्या युरोपीय देशांना टाचेखाली आणण्याचा इरादा जाहीर केला आहे. याचे परिणाम जगाची घडी बसवणारे नसणार हे उघडच आहे...

दक्षिण अमेरिका खंडातील उत्तर किनाऱ्यावर असलेल्या व्हेनेझुएला या देशात एक ऐतिहासिक नाट्य गेले पंचवीस वर्ष चालू आहे. २०२६चे नवीन वर्ष चालू होते न होते तोच तिथे नाटकाचा क्लायमॅक्स झाला. व्हेनेझुएलावर अमेरिकेने आक्रमण करून त्याच्या अध्यक्षाचंच अपहरण केलं!

व्हेनेझुएला या देशाची राजधानी असलेले कराकस हे बंदर अमेरिकेतील मायेमी या शहरापासून फक्त दोन हजार किलोमीटर (आणि पोर्टो रीको या अमेरिकन बेटापासून अवघ्या एक हजार किलोमीटर) अंतरावर आहे. त्यामुळे अमेरिकेला या देशाबद्दल खास 'जवळीक' वाटत असल्यास त्यात आश्चर्य नाही. शिवाय, ज्या देशात तेल आहे, त्या देशाबद्दल अमेरिकेला खास आपुलकी वाटते हे सर्वश्रुत आहे. तेलाव्यतिरिक्त व्हेनेझुएलात चोरी करण्यास उद्युक्त करणारं सोनं आहे, युरेनियम आहे!

जगात सर्वात जास्त सापडलेले तेलाचे साठे कुठे असा प्रश्न विचारला, तर सौदी अरेबिया किंवा इराणी आखातातील आणखीन कुठला तरी देश, असं उत्तर मिळण्याची शक्यता दांडगी. पण त्या प्रश्नाचे योग्य उत्तर आहे व्हेनेझुएला. या देशात ३०० अब्ज बॅरल (१ बॅरल म्हणजे १६० लीटर) तेलाचे साठे आहेत. (आणि अमेरिकेतल्या काही रिफायनरींचं त्या विशिष्ट तेलाशिवाय चालत नाही.) सौदी अरेबिया (२६० अब्ज बॅरल) आणि इराण (२०० अब्ज बॅरल) यांचा क्रमांक दुसरा आणि तिसरा लागतो. रशिया आणि अमेरिका यांचे क्रमांक बरेच खाली, म्हणजे आठवा आणि नववा, असे आहेत. पेट्रोलियम निर्यात करणाऱ्या देशांची 'ओपेक' नावाची एक संघटना आहे. व्हेनेझुएला तिचा संस्थापक-सभासद आहे. आज अमेरिकेने त्याची सर्वप्रकारे गळचेपी चालवली असली तरी तो देश आज दिवसाला साडेसात लाख बॅरल तेल निर्यात करतो. त्यापैकी ६ लाख बॅरल तेल अधिक एकटा चीन आयात करतो!

कोलंबसला अमेरिकन जगत सापडल्यानंतर काही दशकातच स्पॅनिश लोक सबंध दक्षिण अमेरिका खंडात पसरले. त्यातल्या कुणाला तरी व्हेनेझुएला पाहून इटलीमधल्या व्हेनिस शहराची आठवण झाली आणि त्याने त्याप्रमाणे या नवीन प्रदेशाचे बारसे केले. गोऱ्या लोकांनी इथल्या मूळ रहिवाशांची मोठ्या प्रमाणात कत्तल केली. शिवाय काही मूळ रहिवासी (इंडियन) रोग होऊन मेले, तर काही अतिश्रमाने. तरीसुद्धा गोऱ्यांची आणि इंडियन लोकांची थोडीफार भेसळ झालीच. त्यानंतर अफ्रिकेतले नीग्रो गुलाम आले. त्यांचीही मिश्रणात भर. मिश्रित लोकांना स्पॅनिश शब्द आहे 'मेस्तिझो'. मेस्तिझो यांच्यात रंगाच्या सर्व प्रकारच्या छटा आहेत.

**जातिव्यवस्थेचे प्रस्थ आणि चाव्हेजचा शहाणपणा**

भारतासारखे व्हेनेझुएलामध्ये कातडीच्या रंगाचे आणि जातीव्यवस्थेचे फार मोठे महात्म्य आहे. (इंग्लिशमधला caste हा शब्द स्पॅनिशमधल्या casta वरूनच घेतला आहे.) जेवढा माणूस गोरा तेवढा तो श्रेष्ठ. शुद्ध युरोपीयन सर्वश्रेष्ठ! पण तसे लोक फारच कमी असल्याने युरोपीयनमध्ये एक अष्टमांशापर्यंत 'अशुद्ध' रक्त मिश्रित असलेल्यांना ते गोरे म्हणून चालवून घेतात. असे गोरे साधारण ४० टक्के आहेत तर नीग्रो ३ टक्के आणि इंडियन ५ टक्के. बाकी मेस्तिझो. व्हेनेझुएलाचे क्षेत्रफळ जवळजवळ पाकिस्तान-एवढे तरी वस्ती तीन कोटींच्या आसपास आहे. बराचसा देश जंगल आणि पर्वत यांनी व्यापला आहे.

हे सर्व एवढ्या तपशिलात द्यायचे कारण व्हेनेझुएलामधल्या माणसाची आर्थिक परिस्थिती, त्याची राजकीय प्रणाली आणि त्याचा राजकीय पक्ष त्याच्या कातडीच्या रंगावरून ठरतो. ऊगो चाव्हेज या सावळ्या रंगाच्या क्रांतिकारकाने गोऱ्या लोकांची मक्तेदारी मोडून १९९८ साली अध्यक्षपदाची निवडणूक जिंकली. अर्थातच गोऱ्यांचा जळफळाट झाला आणि ते रस्त्यावर उतरले. जाळपोळ केली. अमेरिकेकडे धाव ठोकली. शेवटी २००२ मध्ये सूत्रं हलली आणि व्हेनेझुएलाच्या सैन्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी चाव्हेजला पदच्युत केले. पण दोन दिवसांच्या आतच चाव्हेजचे बारा लाख समर्थक - यांना चाव्हिस्टा म्हणून संबोधतात - व्हेनेझुएलाच्या राजधानीवर चालून आले आणि लष्कराच्या अधिकाऱ्यांना दाती तृण घेऊन चाव्हेजकडे सत्ता परत द्यावी लागली. त्यानंतर चाव्हेज शहाणा झाला. त्याने आपल्या माणसांची सैन्यात भरती केली. शिवाय चाव्हिस्टांची पंधरा लाखाची स्वतंत्र अशी स्वयंसेवी सशस्त्र सेना (मिलिशिया) उभी केली. त्यात निम्म्या स्त्रिया आहेत. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, चाव्हेजने गावोगावी कम्युन बनवले. असे संख्येने ३००० च्या आसपास असलेले कम्युन संपूर्णपणे स्वावलंबी आहेत. त्यांत छोटेमोठे उद्योग आहेत, शेतं आहेत, गाईगुरं आहेत, पोल्ट्री आहेत, बेकरी आहेत, पतपेढ्या आहेत, पाळणाघरे आहेत, आणीबाणीत उपयोगी पडावीत म्हणून धान्याची कोठारे आहेत. एकेका कम्युन मध्ये चार ते दहा हजार कुटुंबे असतात. गेली अनेक वर्षे अमेरिकेने नाकेबंदी केली तरी देश खंबीरपणे उभा आहे याचे कारण ही कम्युन्स!

**अमेरिकेची गुंडगिरी**

चाव्हेजने पेट्रोलियम रिफायनरींचे राष्ट्रीयीकरण केले. Petróleos de Venezuela हे राष्ट्रीय कंपनीचं नाव. त्यातून मिळणारे उत्पन्न चाव्हेजने कल्याणकारी योजनात घातले. बेघर लोकांसाठी थोडथोडकी नव्हे तर पंधरा लाख घरे बांधली. थोडक्यात म्हणजे, समाजवादी समाजरचनेसाठी प्रयत्न केले. दारिद्र्यात राहणाऱ्यांची संख्या साठ टक्क्यावरून दहा टक्क्यावर आली. या सर्वाच्या जोरावर २००६ आणि २०१२ मध्ये चाव्हेज राष्ट्राध्यक्ष म्हणून प्रचंड बहुमतांनी निवडून आला. २०१३ मध्ये चाव्हेज कॅन्सरमुळे मृत्युमुखी पडला आणि उपाध्यक्ष असलेला निकोलास मदुरो त्या वर्षी घेतलेल्या खास निवडणुकीत राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडून आला.

मदुरो हा मूळचा बस-ड्रायव्हर. बस कामगारांचा एक नेता. तो चाव्हेजइतका लोकप्रिय नसणार अशा समजुतीखाली विरोधकांनी दंगा करायला सुरुवात केली. २०१८ साली झालेल्या राष्ट्राध्यक्षाच्या निवडणुकीवर बहिष्कार घातला. तोपर्यंत आंतरराष्ट्रीय – विशेषतः अमेरिका खंडातल्या स्पॅनिश भाषिक राष्ट्रांतील – राजकारणात बदल व्हायला लागले होते. क्यूबा आणि निकराग्वा हे दोन सोडून दक्षिण आणि मध्य अमेरिकेतली इतर सर्व देशांतील डाव्या पक्षांची सरकारे कोसळली.

आता पाळी आली व्हेनझुएलाची. तेव्हा अमेरिकेने व्हेनझुएलाच्या नाड्या आवळायला सुरुवात केली. असाच एक प्रयोग अमेरिकेने १९७० च्या दशकात केला होता (Operation Condor). पाराग्वाय, आर्जेंटिना, चिले, ब्राझिल, उरुग्वाय, बोलिव्हिया, ग्वाटमाला या देशांतील निवडून आलेली सरकारे पाडून त्या जागी लष्करी किंवा कडव्या उजव्या पक्षांची राज्ये आणली होती. क्यूबाचं सरकार पाडायचे प्रयत्न गेले साठ वर्षे चालू आहे. पण त्याला अजून यश नाही. निकराग्वात मोठा रक्तपात झाला आणि डावे सरकार गेले. पण आश्चर्य म्हणजे, २००६ साली डाव्या पक्षाची मंडळी परत सत्तेवर आली ती आजतागायत. यावेळी क्यूबा, निकराग्वा आणि व्हेनझुएला यांना 'जुलमी त्रिकूट' (Troika of Tyranny) ही संज्ञा बहाल करून त्यांची आर्थिक नाकेबंदी करायचं अमेरिकेने ठरवलं. ती प्रयोगाची पहिली पायरी. मग जनक्षोभाच्या आगीत तेल ओतणे ही दुसरी. हे काम स्थानिक तसेच इंग्लंड-अमेरिकेची सीएनएन, बीबीसीसारखी प्रसारमाध्यमे करतात. आणि शेवटी सरकार उलथवणे. हा प्रयोग युक्रेन, सिरिया, बांगलादेश अशा ठिकाणी यशस्वी झाला. क्यूबा, निकराग्वा, हाँगकाँग इथे फसला.

निकोलास मदुरोच्या २०१८च्या निवडणुकीनंतर अमेरिकेने व्हेनझुएलाची नाकेबंदी चालू केली. व्हेनझुएलात महागाईने अक्राळविक्राळ स्वरूप धारण केलं. विरोधी पक्षांच्या लोकांनी जाळपोळ करायला सुरुवात केली. मोर्चे काढले. मदुरोचे समर्थक काळे सावळे, झोपडपट्टी (Barrio) मधले, तर विरोधकांच्या मोर्चात उच्चवर्णीय आणि सांपत्तिकदृष्ट्या मध्यमवर्गीय किंवा वरच्या वर्गातील गोऱ्या लोकांचा भरणा जास्त. त्यांच्या आग ओकणाऱ्या म्होरकीचं नाव आहे, मरिया कोरिना मचाडो. त्यांचा रोष समाजवादावर आहे. समाजवादामुळे ही झोपडपट्टीमधली मंडळी शेफारली आहेत, आळशी झाली आहे, यांना काम न करता सगळं फुकट पाहिजे. त्यामुळे देशाचे नुकसान होते. समाजवाद्यांचं म्हणणं की समाजवाद व्हेनझुएलात आलाच नाहीय. एक पेट्रोलियम सोडून सर्व उद्योगधंदे खाजगी क्षेत्रात आहेत. शिवाय १९८० सालीसुद्धा जेव्हा तेलाच्या किंमती झपाट्याने खाली आल्या तेव्हाही अशीच परिस्थिती होती. तेव्हा तर समाजवाद नव्हता!

२००२ साली फसलेल्या कटानंतर पुढील १७ वर्षे अमेरिकेने व्हेनझुएलात अंतर्गत बंडाळी माजवण्यासाठी विरोधकांना कोट्यवधी डॉलर्स दिले. या सर्वांचा पाहिजे तसा परिणाम दिसेना. पुन्हा एकदा सत्ता उलथवून कट करायचा आणि यशस्वी करून दाखवायचा असे अमेरिकेने ठरवले. परराष्ट्रखाते, सीआयए यांचे हात तर शिवशिवत होतेच. २२ जानेवारी २०१९ रोजी अमेरिकेने जाहीर केलेः आजपासून व्हान ग्वाइडो हा ३८ वर्षाचा विरोधी पक्षाचा तरूण नेता व्हेनझुएलाचा हंगामी अध्यक्ष. तो कालांतराने निवडणुका वगैरे घेईल. सर्व काही ठीक होईल. पण मदुरो अध्यक्ष नाही. खरं म्हणजे केव्हाच नव्हता. त्याने जबरदस्तीने सत्ता बळकावलेली आहे. २०१८ची निवडणूक आम्ही मानत नाही. ती स्वच्छ आणि प्रामाणिक नव्हती. चाव्हेझ आणि मदुरो दोघंही हुकूमशहा होते. त्यांच्या दडपशाहीने देशाचा उकिरडा केला आहे. लोक उपासमारीनं मरताहेत. औषधांच्या अभावी रोगराईने मरताहेत. अमेरिकेच्या हाताला हात लावून युरोपमधल्या देशांनी 'मम' म्हटले आणि व्हान ग्वाइडोला अध्यक्ष म्हणून मान्यता दिली.

अमेरिकेने जंगजंग पछाडले तरी इतर कोणतेही देश त्यांच्या




*लोकशाहीमूल्यांच्या गप्पा मारत ट्रंप यांनी व्हेनझुएलातल्या चक्क तेल संपत्तीवर दरोडा टाकला आहे...*

गोटात सामील व्हायला तयार होईनात. तेव्हा संतापून अमेरिकेने व्हेनझुएलाचे त्यांच्या तेलाच्या विक्रीतून आलेले बँकेतले पैसे जप्त केले. वीज प्रकल्पात घातपात करून देशाची वीज दोन–तीन वेळा बंद पाडली. साथीदार इंग्लंडने व्हेनझुएलाचे टनभर सोनं जप्त केलं. व्हेनझुएलाशी कोणत्याही प्रकारचा संबंध ठेवलात तर खबरदार अशी तंबी अमेरिकेने सर्वांना दिली. (त्यात आपणही होतो. आणि काही खळखळ न करता आपण शरणही गेलो!) अफ्रिका खंड, रशिया, इराण, चीन हे मात्र खंबीरपणे मदुरोच्या मागे उभे राहिले. युनो या संस्थेने मदुरो सरकारची मान्यता काढून घ्यायला नकार दिला.

व्हेनझुएलातील सहा महत्त्वाच्या वर्तमानपत्रांपैकी चार विरोधी पक्षांची आहेत. विरोधी पक्ष मोर्चे काढतात, सभा घेतात. सभेत चाव्हेझ आणि मदुरो यांचा काळी माकडे असा उल्लेख असतो. कोणताही वक्ता उभा राहिला की भाषणाची सुरुवात 'मदुरोच्या आईची...' अशी करतो, आणि त्याला हशा आणि टाळ्यांची साथ मिळते. हे सर्व असताना मी हुकूमशहा कसा, असा मदुरोचा प्रश्न आहे. व्हान ग्वाइडो हा देशभरच काय, पण देशाच्या बाहेरही फिरत असताना मदुरोने त्याला कटाक्षाने हात लावला नाही. एका अर्थी मदुरोला व्हान ग्वाइडो हा तुरुंगाच्या आत असण्यापेक्षा बाहेरच हवा आहे. आत टाकला तर अमेरिकेला निमित्तच मिळेल. उलट बाहेर त्याची विदुषकी जगजाहीर होते.

**रिपब्लिकनांचा उच्छाद**

शेवटी ज्याच्या हातात पोलीस आणि सैन्य त्याचे राज्य. त्यांना फोडण्यासाठी डॉलरच्या खोक्यांचे अमिश दाखवण्यात आले. पण त्यांच्यात जवळजवळ फितुरी झाली नाही. ३० एप्रिल २०१९ रोजी व्हान ग्वाइडोने देशात उठाव करायचे आवाहन केले. पण त्याला काहीच प्रतिसाद मिळाला नाही. जॉन बोल्टन, माइक पाम्पेओ आणि अमेरिकेचे उपाध्यक्ष पेन्स यांनी भरपूर डरकाळ्या फोडल्या. वर्षाच्या सुरुवातीस दोन्ही सभांसमोर (हाउस आणि सेनेट) होणाऱ्या २०२० सालच्या राष्ट्राध्यक्षांच्या 'देशाची सद्यपरिस्थिती' या अभिभाषणास ट्रंपनी ग्वाइडोला खास आमंत्रण दिले. तेव्हा दोन्ही पक्षांच्या सभासदांनी दोन मिनिटे उभं राहून टाळ्यांच्या कडकडात त्याचे भव्य स्वागत केले. तेव्हा या प्रश्नावर ट्रंप यांना अमेरिकेत अंतर्गत विरोध होतोय, असं अजिबात नाही. दुसऱ्या देशाची संपत्ती राजरोस लुटण्यात दोन्ही पक्षांना काहीही गैर वाटत नाही. ट्रंपनी मदुरोच्या डोक्यावर दीड कोटी डॉलरचे बक्षिस लावले. (ते नंतर ५ कोटी डॉलर केलं.) पण तेवढ्यात कोव्हिड येऊन टपकला आणि व्हेनझुएलाचा प्रश्न मागे पडला.

पुढील चार वर्षं डेमोक्रॅटिक पक्षाचा कारभार चालू झाला. त्या पक्षाच्या धुरिणांना युक्रेनच्या प्रश्नाबद्दल अधिक जिव्हाळा असल्यामुळे व्हेनझुएला जरा दुर्लक्षित झाला. नुसता दुर्लक्षितच नव्हे तर जेव्हा अमेरिकेला तेलाची गरज लागली, तेव्हा बायडनसाहेबांनी व्हेनझुएलाला विनंती केली आणि मदुरोंनी त्यांना दिवसाला १३२ हजार बॅरल इतकं तेल दिलं. (या खनिज तेलाचे दोन मुख्य प्रकार असतात. त्यांतल्या जड तेलाची अमेरिकेत कमतरता आहे, आणि ते व्हेनझुएलाकडे आहे.) त्यानंतर राष्ट्राध्यक्ष परत झाले ट्रंप. त्यांनी युक्रेनमधून लक्ष बाहेर काढून व्हेनझुएलात घालायचं ठरवलं. एवढंच काय पण बायडननी व्हेनझुएलाला तेलासाठी विनंती केली याचीच चेष्टा केली. 'मी असतो तर ते तेल हिसकावून घेतलं असतं,' असं ते म्हणाले. ट्रंपसारखाच मदुरो २०२४ च्या नोव्हेंबरमध्ये व्हेनझुएलाचा राष्ट्राध्यक्ष म्हणून परत निवडून आला आणि २०२५ च्या जानेवारीत त्याचा शपथविधी झाला. नेहमीच्या प्रथेप्रमाणे अमेरिकेने त्याची निवडणूक अवैध ठरवली. विरुद्ध पक्षाच्या 'फायरब्रँड' नेत्या मरिया कोरिना मचाडो यांनी ट्रंपना आपल्या देशावर आक्रमण करायचं आमंत्रण दिलं. त्यावेळी

ट्रंपसाहेब जगावर टॅरिफ टाकायच्या मूडमध्ये होते. त्यांनी व्हेनझुएलाच्या सर्व प्रकारच्या व्यापारावर सर्वंकश बंदी घातली.

**कांगावेखोरांचा थयथयाट**

नुसत्या निर्बंधांना मदुरो जुमानत नाही तेव्हा अमेरिकेने त्याचा गळा अधिक आवळायचं ठरवलं. संपूर्ण देशाला वेढा घालून त्याचा जगाशी संबंध तोडायचा डाव ट्रंपनी टाकला. अशी कृती जागतिक कायद्यात बसत नाही. असाच सल्ला १९६२ साली क्यूबा प्रकरणात राष्ट्राध्यक्ष केनेडी यांना त्यांच्या सहकाऱ्यांनी दिला, तेव्हा केनेडी यांनी तो मानला. पण ट्रंप कायदा पाळणाऱ्यांपैकी नाहीत. त्यांनी इराक युद्धापूर्वीच्या जॉर्ज बुश (कनिष्ठ) यांचं अनुकरण करायचं ठरवलं. खोटं बोलून अमेरिका किती धोक्यात आली आहे आणि मीच तिचा रक्षणकर्ता कसा आहे, अशी धूळफेक करायची. सद्दाम हुसेनकडे व्यापक विनाश करणारा अणुबाँब आहे असा बुशने दंगा केला तसा मदुरो अमेरिकेला अफू पुरवून व्यवसाधीन करत आहे, असा आरडाओरडा ट्रंप यांनी चालू केला. सुरुवातीस म्हणाले, मदुरो कोकेन हा मादक पदार्थ पाठवतो. पण कोकेन कोलंबिया, हाँडुरस या देशातून येतं हे कळल्यानंतर ट्रंप म्हणाले, मग फेंटनिल असेल. (त्यानंतर त्यांनी २०० टन कोकेन अमेरिकेत स्मगल करणाऱ्या हाँडुरसच्या माजी राष्ट्राध्यक्षाला तुरुंगातून सोडले!) पण फेंटनिलसुद्धा व्हेनझुएलातून येत नाही, तर मेक्सिकोतून येतं. (मूळात ते औषध आहे आणि चीनमध्ये तयार होते. अमेरिकेत त्याचा दुरुपयोग होतो.)

लोकशाही, मानवी हक्क, मादक पदार्थ, अशी कारणं अमेरिकेने पुढे केली असली तरी अमेरिकनांना शेवटी खरी गोडी तेलात आहे. आज अमेरिकेच्या दुसऱ्या ज्वलंत प्रश्नाचं – इराण – मूळही तेलात आहे. या दोन्ही प्रश्नांचा भारताला प्रचंड त्रास होणार आहे. इराणचा 'जलवा' अजून चालूच आहे. दोन्ही देशांकडून तेल घ्यायला भारताला बंदी आहे. तेव्हा आपली तेलाची बिलं वाढणार आहेत. बरं, अमेरिकेचं ऐकलं नाही तर इमिग्रेशनच्या प्रश्नावर अमेरिका आपले आणखी राडे करणार. आपला आंतरराष्ट्रीय व्यापार नेहमी घाट्यात असल्यामुळे आपल्या डॉलरची आवक बरीचशी अमेरिकेतून येणाऱ्या मोबदल्यातून (रेमिटान्स) मधून असते. इकडे आड तिकडे विहीर अशी आपली परिस्थिती आहे.

**चोरी चकारी आणि राष्ट्राध्यक्षाचं अपहरण**

सप्टेंबर महिन्यापासून व्हेनझुएलाच्या आजूबाजूला फिरणाऱ्या मासेमारी करणाऱ्या लहानसहान होड्यांवर विमानांतून बाँब टाकायचं ट्रंपनी मनावर घेतलं. असे हल्ले थोड्याच काळात तीसच्यावर झाले. त्यात शंभरावर कोळी मरण पावले. (अमेरिकेच्या एका विमानाची एका प्रवासी विमानाशी होणारी टक्कर थोडक्यात टळली. अमेरिकन विमानाने रेडिओ संपर्कही बंद केला होता.) तेवढ्याने समाधान झाले नाही, तेव्हा व्हेनझुएलाच्या तेलाच्या संपूर्ण भरलेल्या टँकरची चोरी करायचा कार्यक्रम हाती घेतला गेला. असे तीन टँकर डिसेंबर महिन्यात पळवले. मदुरोने आमची जमीन आणि तेल चोरलं आहे, आम्ही ते कोणत्याही परिस्थितीत परत घेणार, असं जाहीर केलं आहे. व्हेनझुएलाच्या जहाँबाज मचाडोला नोबेल शांती पारितोषिक दिलं गेलं आहे. तिने ते ट्रंपला अर्पणही केलं आहे. म्हणजे अमेरिकेचा लांब हात कुठवर पोचतो, हे समजून येतं.

१८२० साली अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष जेम्स मन्रो यांनी एक तत्त्वप्रणाली अंमलात आणली होती. ती म्हणजे मन्रो डॉक्ट्रिन. त्याप्रमाणे पश्चिम गोलार्धात अमेरिका सोडून कोणत्याही सत्तेला प्रवेश नाही. ती तत्त्वप्रणाली आजपर्यंत – दोनशेहून अधिक वर्ष – सर्व सत्ता– महासत्तांनी पाळली आहे. त्या तत्त्वप्रणालीची दुसरी बाजू म्हणजे, अमेरिकेने पूर्व गोलार्धात लुडबूड करायची नाही. पण अमेरिका महासत्ता असल्याने ती हे बंधन पाळत नाही. तिची आज जगभर सैनिकांचे आठशे तळ आहेत. चीनला दुखवण्यासाठी अमेरिकेने तैवानला १२ अब्ज डॉलरची शस्त्रात्रं द्यायचा बेत घाटला. ते ऐकून चीनने अमेरिकेत शस्त्रात्रं बनवणाऱ्या मोठ्या वीस कंपन्यांवर निर्बंध घातले आणि त्यांच्या मुख्य अधिकाऱ्यांवर चीनमध्ये प्रवेश करायला मनाई केली आहे. त्यामुळे त्या कंपन्यांना आपोआपच दुर्मीळ धातूंचा (रेअर अर्थ) पुरवठा होणार नाही, आणि अर्थातच शस्त्रात्रं बनवता येणार नाहीत. अर्थात तो चीनविरुद्ध चाललेल्या व्यापक व्यापारयुद्धाचा एक भाग होता. या युद्धामुळे अमेरिकेतील अनेक घटक – विशेषतः शेतकरी घायाळ झाले आहेत आणि चीनबरोबर तह करायची मागणी करत आहेत. चीनचे व्हेनझुएलाबरोबर दोस्तीचे संबंध आहेत. या पार्श्वभूमीवर ट्रंप घिसाडघाईने व्हेनझुएलाविरुद्ध कृती करतील, ही अपेक्षा नव्हती.

ज्या धाडसाने ही कृती केली ते मात्र खरोखरच अभूतपूर्व होतं. दुसऱ्या देशातील अवाढव्य अध्यक्षीय प्रासादात जाऊन अध्यक्ष आणि त्यांच्या पत्नींना त्यांच्या बेडरूममधून वेचून काढून त्यांच्या मुसक्या बांधल्या यात अमेरिकन सैन्याचं कसब आणि प्रावीण्य दिसून येतं. या सर्वाचा व्हेनझुएलाच्या सैन्याला आणि स्थानिक लोकांना पत्ता कसा लागला नाही, हे आता तरी मोठं गूढ आहे. एक बातमी अशी आहे की ही कृती करायच्या अगोदर अमेरिकेने सायबर हल्ला करून संपर्क दळणवळण तोडून टाकले. राजधानीत सर्वत्र बाँबहल्ला केला. मग सुसज्ज हेलिकॉप्टर प्रासादाच्या आवारात उतरली. प्रथम त्यांनी सुरक्षा सैनिकांना ठार केले आणि मग प्रासादात शिरले. झोपलेल्या मदुरो पति-पत्नीला त्यांच्या रात्रीच्याच कपड्यांत अटक केली. या प्रसंगावरून टेक्ससच्या सॅम ह्यूस्टन याने १८३६ साली मेक्सिकोचा सर्वेसर्वा सँटा ॲनाला उचलून आणले आणि टेक्ससला स्वातंत्र्य मिळवून दिलं, या घटनेची आठवण होते.

दुसऱ्या दिवशी कराकस हे राजधानीचं शहर शांत होतं. त्यामुळे मदुरोविरुद्ध दगाफटका झाल्याची शंका व्यक्त केली जात होती. उपराष्ट्रपती डेल्सी रॉड्रिगेझ यांच्या एकनिष्ठते-बद्दलसुद्धा संदेह व्यक्त झाले. व्हेनझुएलाच्या घटनेप्रमाणे उपराष्ट्रपती निवडून येत नाही, तर त्याची नेमणूक राष्ट्रपतीच करतो. त्याच्या गैरहजेरीत उपराष्ट्रपती काम करतो. पण राष्ट्रपतीची कायदेशीर अर्धी मुदत संपली नसेल तर निवडणूक घ्यावी लागते. सुरुवातीच्या धक्क्यातून सावरल्यानंतर डेल्सी रॉड्रिगेझने खंबीरपणे तिचा पक्ष, पक्षाचं धोरण, सरकार आणि मदुरो यांची साथ सोडणार नाही, असं जाहीर केलं. ते ऐकून रागावलेल्या ट्रंपसाहेबांनी आम्ही तुलासुद्धा उचलू अशी धमकी दिली आहे. आमचे लोक आता रस्त्यावर येतील, असं तिनं म्हटलं असलं, तरी मदुरोच्या अटकेनंतर यात सत्य किती आणि पोकळ बढाया किती हे सांगणं कठीण आहे.

आतापर्यंतच्या आंतरराष्ट्रीय प्रतिक्रिया तशा सौम्यच आहेत. शेजारचे मेक्सिको आणि कोलंबिया हे त्याला अपवाद. दोन्हीमध्ये व्हेनझुएलासारखं समाजवादी सरकार आहे. 'कोलंबियाचा अध्यक्ष गस्टाव्हो पेड्रो हा माणूस खराब आहे. मी त्याला एक दिवस उचलणार,' असं ट्रंप म्हणतात. क्यूबावर तर अमेरिकेचा खानदानी राग! शिवाय, अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मार्को रुबिओ हे मूळचे क्यूबाचे. त्यांना जुना सूड काढायचा आहे. या साठमारीत युरोपने सालाबादाप्रमाणे अमेरिकेच्या कारवाईला मूक संमती दिली आहे. ट्रंपसाहेबांची मेहेरनजर खरोखरच जेव्हा ग्रीनलँडकडे वळेल तेव्हा युरोपची मजा होणार आहे. ते बेट ट्रंपसाहेबांना किसी भी हालत में पाहिजे आहे आणि त्यांनी तिथे व्हाइसरॉय केव्हाच नेमला आहे. १९३०च्या दशकात हिटलरने जी मग्रुरी आणि बळजबरी दाखवली, ती आता ट्रंप दाखवत आहेत. त्यांच्याकडेसुद्धा पादाक्रांत करायच्या देशांची यादी तयार आहे. त्यात शेवटचा इराण आहे.

बऱ्याच निरीक्षकांचा अंदाज होता, की चीन आणि रशिया पाऊल उचलतील. पण आतापर्यंत त्यांनी 'तीव्र' प्रतिक्रिया व्यक्त करण्यापलीकडे काही केलं नाही. सिरिया, गाझा यानंतर ही तिसरी वेळ की ज्यात त्यांनी पळपुटेपणा दाखवला आहे. संकटसमयी हे दोन देश तरी मदतीला येतील असा लोकांचा विश्वास होता. एका अर्थी या देशांनी जगाचा विश्वासघात केला आहे. रशियाकडे एवढी ताकद राहिलेली नाही, तर चीनला व्यापाराशिवाय कशातही स्वारस्य नाही, असं दिसतंय.


'यापुढे व्हेनझुएलाचं राज्य मी चालवणार,' असं ट्रंपसाहेबांचं वक्तव्य आहे. त्याकरता त्यांनी अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री आणि संरक्षणमंत्री (या पदाचं नाव ट्रंपसाहेबांनी युद्धमंत्री असं केलं आहे!) यांना नेमलं आहे. या त्यांच्या तत्त्वप्रणालीला त्यांनी Donroe Doctrine असं नाव दिलं आहे. (यातला डॉन हे ट्रंपच्या नावावरून आहे, की माफियावरून आहे हे सांगता येत नाही.) त्यांच्याबरोबर तेलकंपन्या आणि त्यांचे भाडोत्री सैनिक असतील. असं राज्य चालवणं हा जगाच्या इतिहासातला पहिलाच प्रयोग होणार आहे, त्यामुळे तो कसा होणार याची कुणाला अंधुकशीही कल्पना नाही. कंपन्यांनी देश चालवले अशी उदाहरणं भरपूर आहेत. ब्रिटिश इस्ट इंडिया कंपनीचं उदाहरण आपल्या डोळ्यासमोर आहे. पण त्याकरता देश जिंकावा लागतो. ट्रंपसाहेब ते करणार आहेत का?

**डॉ. द्रविड हे फिजिक्समधील पीएच.डी. असून राजकारण, विज्ञान, इतिहास या विषयांवरील त्यांचे लिखाण वेगवेगळ्या मासिकांतून प्रसिद्ध होते. त्यांचे वास्तव्य अमेरिकेत असून 'मुक्काम पोस्ट अमेरिका' हे अमेरिकेचं सर्वांगीण दर्शन देणारे पुस्तक 'रोहन प्रकाशन'ने प्रसिद्ध केले आहे.**

**संपर्क :** ९८२०५ ६३१३०


**ई मेल :** mohan.drawid@gmail.com

# चीनची अद्वितीय क्रीडा संस्कृती



गजानन जोशी

शोधक नजर



**२०४७** हे लक्ष्य ठेवून विकसित भारत हे घोषवाक्य जनमानसात असे काही रुजवले गेले आहे की, जणू भारत विकसित देश झालेलाच आहे. हेच सूत्र २०३६ च्या ऑलिम्पिक संदर्भानेही राबवल्याचे दिसते आहे. म्हणजे, अजून पुलाखालून बरेच पाणी वाहून जायचे आहे, पण माहोल असा आहे, २०३६ ऑलिम्पिकचे यजमानपद भारताने कधीच पटकावले आहे. तसे शासनसत्तेच्या सवयीप्रमाणे सेलिब्रेशन सुरूही झाले आहे. मात्र, अलिकडेच अहमदाबाद येथे भरलेल्या स्पोर्ट्स गव्हर्नन्स कॉनक्लेव्हमध्ये केंद्रीय क्रीडा सचिव हरी रंजन राव यांनी, आधी आपल्या क्षमता जोखा, क्रीडा धोरण पक्के करा, क्रीडा प्रकारांचा परीघ विस्तारा, अशा कानपिचक्याही दिल्या. त्यांच्या म्हणण्याचा मथितार्थ, केवळ आयोजक होण्यात हशील नाही, देशाने ऑलिम्पिक क्रीडा प्रकारांतही अग्रगण्य स्थान मिळवले तर त्या आयोजनात शान आहे, या पार्श्वभूमीवर अमेरिकेनंतर दुसऱ्या क्रमांकाने पदकांची लयलूट करणाऱ्या चीनच्या क्रीडा संस्कृतीचे आणि त्यातून येत गेलेल्या क्रीडासत्तेचे उमजलेले हे अंतरंग...

आपल्या देशात लहानपणापासूनच आपल्या मुलगा-मुलगी यांच्यावर एकच विचार सतत मारला जात असतो तो म्हणजे, शिक्षण घ्यायचे. परंतु, शिक्षण म्हणजे काय तर शाळेत जाऊन भाषा-विज्ञान-गणित हे महत्त्वाचे आणि त्यानंतर जमलं तरच चित्रकला-संगीत-क्रीडा-काही व्होकेशनल शिक्षण. शालेय शिक्षणाची पायरी ओलांडल्यावर मग महाविद्यालय ज्यामध्ये विज्ञान-वाणिज्य-कला हेच महत्त्वाचे. परंतु त्यातही जर एखाद्या विद्यार्थी-विद्यार्थीनीला चांगले गुण मिळाले असतील, तर त्यांनी विज्ञान शाखेमध्येच प्रवेश घेणे गरजेचे आहे, अशा काळामध्ये मी शालांत परीक्षा पास होऊन महाविद्यालयात प्रवेश घेतला होता.

जर चांगले मार्क घेतलेल्याने कोणीतरी आर्ट्स किंवा वाणिज्य शाखेला प्रवेश घेण्याचा विचार जरी केला, तरी मोठा हलकल्लोळ होणार जणू काही त्या विद्यार्थी-विद्यार्थीनीने फार मोठा अपराध केला आहे, असे सर्वत्र वातावरण करून त्याचे स्वत:चे मत पूर्णपणे दाबून टाकले जायचे. इतरांनी सुद्धा एक तर वाणिज्य नाही, तर मग नाईलाजाने आर्ट्सलाच प्रवेश घेणे गरजेचे असायचे. अशा विद्यार्थ्यांनी आयटीआयमध्ये प्रवेश घेणे म्हणजे अगदीच बेताचे गुण असले तरच. अशा तऱ्हेने सर्व काही चाकोरीबद्ध-साचेबद्ध जीवन होते. या मधलाच आणखी एक महत्त्वाचा साचेबद्धपणा म्हणजे, पालक जे शिकले असतील तिकडेच पाल्याने गेले पाहिजे, अन्यथा घराण्याची अब्रू गेलीच म्हणून समजा.

महाविद्यालयामध्ये सुद्धा विज्ञान शाखेकडे गेलेल्या विद्यार्थ्याने एक तर इंजिनीअर अथवा डॉक्टर हेच लक्ष ठेवले पाहिजे. अगदीच शक्य नसेल तर निदान पदवीधर झाले पाहिजे.

थोडक्यात, तुमच्या घरातील परंपरा तुमचे परीक्षेतील गुण, या प्रमाणेच तुम्ही महाविद्यालयीन शिक्षणच घेतले पाहिजे, जसे या आधी नमूद केले आहे. इतर कला-क्रीडा-व्यावसायिक शिक्षण (जसे सुतारकाम-शिवणकाम-चांभार काम-बांधकाम) याचा विचार जरी केला तरी घरातील सगळे आणि आजूबाजूचा समाज म्हणणार काय भिकेचे डोहाळे लागले आहेत? घराण्याच्या नावाला बट्टा आणणार/लावणार का? पुढचे आयुष्य कसे काढणार? इ.इ.

**खेळाचे कसले शिक्षण नि कसले करियर?**

आता मी थोडंसं क्रीडा शिक्षण आणि क्रीडा हा पूर्णपणे जीवनाचा व्यवसाय (करिअर) करण्याच्या विचाराबद्दल आणि संकल्पना आणि संस्कृतीबद्दल माझ्या अनुभवांकडे आणि त्यामुळे काही प्रमाणातील माझ्या विचारांकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करणार आहे.

चाकोरीबद्ध आणि साचेबद्ध शिक्षणाची निवड आणि आपली नोकरी अथवा व्यवसाय याबद्दल थोडं यापूर्वी सांगितले आहेच. आमच्या काळी सुद्धा बरेच चांगले खेळाडू होते. या खेळाडूंमध्ये सगळ्यात जास्त आकर्षित करणारे म्हणजे, क्रिकेटपटू. इतरही खेळ होते, परंतु त्यांच्याबद्दल बऱ्याच जणांना अतिशय जुजबी माहिती किंवा संपूर्ण अनभिज्ञता होती. आपण जर क्रिकेट या खेळाकडे आणि खेळाडूंकडे बघितले तरी लक्षात येईल की चांगले क्रिकेटपटू त्यांच्या खेळांमधील प्राविण्याबरोबरच त्यांच्या शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षणाबद्दल देखील चर्चेत असायचे. एखाद्या खेळाडूने शतक नोंदविले असले, तरी मी लोकांच्या चर्चेत त्यांच्या कॉलेज आणि तेथील विज्ञान-वाणिज्य-कला शाखेमधील पदवी अथवा उच्च पदवीबद्दल जास्त प्रशंसा केलेली बघितलेली आहे. याचे एक महत्त्वाचे कारण होते, की क्रीडा या प्रकारात पूर्णवेळ शिक्षण आणि संपूर्ण करिअर असे नव्हते. तशी संकल्पना रुजलेली नव्हती किंवा समाजातील मोठ्या लोकसंख्येमध्ये त्याची माहिती नव्हती. दुसऱ्या देशाला हरवून भारतात परत आलेल्या क्रिकेटपटूंचे जंगी स्वागत आपण बघितलेले आहे. परंतु लगेच काही दिवसांत हे खेळाडू आपल्या बँकेतल्या अथवा सरकारी खात्यांमधल्या किंवा खाजगी आस्थपनांमधल्या नोकरीमध्ये रुजू होत असत. पुन्हा नवीन सीझन सुरू होईपर्यंत त्यांची नोकरी आणि खेळाचा सराव चालू राही. परंतु माझ्या माहितीमध्ये तरी संपूर्णपणे खेळ आणि त्या त्या खेळांशीच निगडित इतर विषय शिकविणारी महाविद्यालये अथवा विश्वविद्यालये नव्हती किंवा अगदी थोडी होती. परंतु महत्त्वाचा मुद्दा होता, तो पारंपरिक विषयाचे शिक्षण सोडून खेळासाठी संपूर्ण शिक्षण त्यामध्येच पदवी पदव्युत्तर आणि पी.एचडी. करणे ही संकल्पना नव्हती.

या बाबतीत बदल होण्याची सुरूवात झाली काही दशकांपूर्वी. विद्यार्थ्यांनी खेळाचा संपूर्ण करिअर म्हणून विचार करावा याला त्यांच्या कुटुंबाकडून आणि समाजाकडून मान्यता मिळायला सुरूवात झाली. तरी देखील मनामध्ये

समज–गैरसमज यांच्या तिढ्यामध्ये जहाज हेलकावे खातच होते. अजूनही हेलकावे खाताना दिसत आहे. परंतु तरीदेखील शिक्षणाच्या बाबतीत इतर नेहमीचे पारंपारिक शिक्षण सोडून फक्त विशिष्ट खेळांच्यासाठी पदवी–उच्च पदवी, पी. एचडी. देणारी महाविद्यालये अजूनही सुरू व्हायची होती.

साचेबद्ध शिक्षणप्रणाली मधून आपण आता कित्येक दशकं पुढे आलो आहोत. परंतु काय फरक झाला आहे शिक्षण पद्धतीत? काय आता तरी प्रत्येक प्रकारच्या शिक्षणाला ऑब्जेक्टिव मान्यता मिळते आहे, की अजूनही आपण सब्जेक्टिव वातावरणातच आहोत शिक्षणाच्या बाबतीत? आजचे खेळाडू–कोणत्याही खेळ प्रकारचे असतील त्यांच्या शिक्षणाच्या पद्धतीमध्ये काही फरक पडला आहे का? इतर कोणतीही नेहमीची पदवी/पदविका न घेता आपापल्या खेळामधील पदवी/पदविका त्यांनी घेतल्या आहेत का? त्या खेळ प्रकारामधील प्रत्यक्ष खेळ सोडला तर इतर सलग्न परंतु अतिशय महत्त्वाच्या अंगांचे/विषयांचे शिक्षण घेऊन – फक्त त्याच संदर्भात महाविद्यालयीन शिक्षणाची सोय आहे का? अशा तऱ्हेने विषय मनापासून निवडून त्यामध्येच महाविद्यालयीन शिक्षण घेऊन आपले करिअर जीवन पद्धती आनंदाने आणि इमाने–इतबारी करण्याची सोय आणि वातावरण उपलब्ध आहे का? की अजूनही विज्ञान–वाणिज्य–कला किंवा तत्सम विषयांच्याच नेहमीच्या कॉलेजमध्ये प्रवेश घ्यायचा आणि त्याबरोबर आपल्या आवडीच्या खेळाचे शिक्षण–प्रशिक्षण घ्यायचे?

आपल्या या पद्धतीबद्दल माझा अनुभव आणि त्याबद्दलचे माझे विचार तात्पुरते थांबवतो आणि एका अतिशय वेगळ्या अनुभवाबद्दल माझे निरीक्षण आणि अनुभव सांगण्याचा प्रयत्न करणार आहे.

**क्रीडासत्तेचे अंतरंग**

२००७ साली माझ्या नोकरीच्या निमित्ताने चीनला जाण्याचा आणि ३–४ वर्षे तेथेच राहण्याचा मला योग आला. मी बीजिंगमध्ये राहात होतो. २००८ मध्ये बीजिंगमध्ये ऑलिम्पिक होणार होते आणि त्याची तयारी सर्वत्र चालू होती. नवीन एअरपोर्ट पूर्ण होण्याच्या शेवटच्या टप्प्यावर होते. सगळे हमरस्ते आणि त्यांच्या आजूबाजूला मोठे फलक लावण्याचे काम चालू होते. महत्त्वाचे स्टेडियम 'बर्ड नेस्ट' जे खास ऑलिम्पिकसाठी तयार होते ते देखील पूर्ण झाले होते. त्याचप्रमाणे इतर खेळांची मैदाने–स्टेडियम–खेळाडू आणि संलग्न टिम मेंबरसाठी ऑलिम्पिक सिटी तयार होऊन फिनिशिंग टच देणे चालू होते. ऑलिम्पिक सुरू होण्यास अजूनही १२–१४ महिने बाकी होते.

परंतु एक फार महत्त्वाचे लक्ष वेधून घेणारी गोष्ट मी बघितली ती म्हणजे बीजिंग शहरातील बऱ्याच ठिकाणी सार्वजनिक ठिकाणी तसेच हाऊसिंग कॉम्प्लेक्स मध्ये प्रशस्त अशी स्पोर्ट्‌स कॉम्प्लेक्स मला बघायला मिळाली. ही स्पोर्ट्‌स कॉम्प्लेक्स बीजिंग ऑलिम्पिक होणार आहे म्हणून बांधलेली नव्हती तर फार आधीपासून ती बांधली गेली होती. खेळ ही चीन मधली जीवन पद्धती आहे, त्याची ही मला आलेली पहिली प्रचिती.

मी राहत असलेल्या आमच्या रहिवाशी संकुलापासून जवळच मोठे असे क्रीडा संकुल होते. जे सार्वजनिक ठिकाणी होते. बीजिंगमधील एका जिल्ह्यामधील हे खेळाचे संकुल काही लाख रहिवाशांसाठी सुविधा पुरवणारे होते. कित्येक रहिवाशी संकुलांना या खेळ संकुलाचा उपभोग घेता येत होता. संध्याकाळच्या माझ्या फिरण्याच्या रस्त्याजवळच हे क्रीडा संकुल होते. बाहेरून तर हे क्रीडा संकुल प्रचंड महाकाय दिसत होते आणि त्यामध्ये बऱ्यापैकी अवाढव्य हॉल दिसत होते. बाहेर मैदानी खेळांसाठी (फुटबॉल, धावणे, घोडेस्वारी, टेनिस, बास्केट बॉल) मैदाने होती. फुटबॉल, धावणे, घोडेस्वारीसाठी एखादे मैदान सोडले तर बाकी खेळांसाठी कमीत कमी २–३ खुली मैदाने होती. माझे फिरणे चालू असायचे, त्या वेळेला काही लहान–मध्यम वयाच्या तरुण–तरुणी तेथे खेळत असलेले दिसायचे. त्यांचे कोच आणि इतर सपोर्ट स्टाफ पण तेथे असायचा. बरेच दिवस मी संध्याकाळच्या माझ्या भटकंतीच्या वेळेला हे मैदानी खेळ बघत होतो.

एक दिवस असेच फिरत असताना पाऊस सुरू झाला म्हणून मी एका हॉलच्या बाहेर आडोशाला उभा होतो. सहज कुतूहल म्हणून मी आत डोकावून बघितले, तर आश्चर्याचा मोठा धक्काच बसला. हा हॉल प्रचंड मोठा होता. तेथे फक्त बॅडमिंटन खेळले जात होते. या एका हॉलमध्ये साधारण १०–१२ बॅडमिंटनची कोर्ट होती. काही कोर्टवर लोक खेळत होते, तर ३–४ कोर्टवर प्रशिक्षक शिकवीत होते.



*जनतेला वश करण्यासाठी केवळ अति भव्यतेचा सोस राखण्यापेक्षा चीनचा भर अति भव्य मांडणीतून सर्वांगीण क्रीडा प्रगती साधण्याकडे राहिला आहे...*

प्रशिक्षण सुरू असलेल्या अशा एका कोर्टवर मी गेलो. त्या प्रशिक्षण सुरू असलेल्या कोर्टवर नेटच्या एका बाजूला प्रशिक्षक तर दुसऱ्या बाजूला एक १२-१४ वर्षाची एक अतिशय चुणचुणीत मुलगी. माझे लक्ष खरे जर कशाने वेधून घेतले असेल, तर त्या प्रशिक्षकाच्या एका हातात साधारण २५-३० शटल्स एकात-एक खोवलेले तर दुसऱ्या हातात बॅडमिंटनची रॅकेट. एका पाठोपाठ एक अशी शटल्स प्रशिक्षक नेटच्या दुसऱ्या बाजूला एका विशिष्ट जागीच टाकत होता. दुसऱ्या कोर्टमधील त्या मुलीला ते शटल एका विशिष्ट प्रकारेच परतवायचे आणि पुन्हा मध्यभागी जाऊन लगेच येणाऱ्या पुढच्या शटलची प्रतिक्षा करून पुन्हा त्याला त्याच पद्धतीने परतवायचे. प्रशिक्षक इतक्या वेगाने एका मागे एक शटल टाकायचा, त्यामुळे त्या विद्यार्थीनीला लगेच दुसरे शटल पुढे आलेल्या जागी मारता येणे शक्य होते, परंतु त्याला अनुमती नव्हती. प्रत्येक शटल नंतर पुन्हा मध्यभागी जाणे आणि त्यानंतरच येणारे शटल मारणे. साधारण पाच मिनिटात २५-३० शटल संपली की ती पुन्हा गोळा केली जायची आणि पुन्हा तोच रियाज. मला मोठी गंमत वाटत होती.

दुसऱ्या दिवशी पुन्हा माझे पाय आपसूक बॅडमिंटन कोर्टकडे वळले. पुन्हा त्या कोर्टवर, तोच प्रशिक्षक, तीच विद्यार्थीनी, तोच सराव, त्याच जागी शटल मारणे आणि त्याच पद्धतीने परतविणे सुरू होते. हे सगळे बघून मी अचंबित झालो. तिसऱ्या दिवशी पण तेच. ना तो प्रशिक्षक ना ती विद्यार्थीनी थकताहेत किंवा त्यांना कंटाळा येतोय.

तिसऱ्या दिवशी मी साधारण एक तास तेथे थांबलो. मध्ये साधारण अर्ध्या तासानंतर त्यांनी काही मिनिटांसाठी विश्रांती घेतली. न राहवून मी त्या प्रशिक्षकापाशी जाऊन तोकड्या चीनी भाषेमध्ये बोलण्याचा आणि काही विचारण्याचा प्रयत्न करत होतो. तेवढ्यात त्या प्रशिक्षकाने एका दुसऱ्या स्त्री प्रशिक्षिकेला बोलावले कारण तिला थोडे फार इंग्रजी येत होते. ती मग आमची दुभाषी बनली. मला जी माहिती या संवादामधून कळली ती अशी.

१. रोज साधारण एक तास सराव; २. एकाच ठिकाणी शटल टाकून परतवण्याचा सराव कमीत कमी ४-५ दिवस; ३. बॅडमिंटन कोर्ट मधील अशा एकूण कमीत कमी १५ जागा जेथे हा सराव शटल परतवण्याचा; ४. त्याचप्रमाणे त्या विद्यार्थीनीने पण अशा तऱ्हेने शटल टाकण्याचा सराव; ५. यामध्ये अजिबात सवलत नाही; ६. हा सराव करायच्या आधी कमीत कमी अर्धा तास वॉर्म-अप; ७. असे एक प्रशिक्षक रोज साधारण ७-८ विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देतात; ८. एकूण बॅडमिंटन कोर्टपैकी साधारण ४-५ कोर्ट या प्रशिक्षणासाठी राखीव; ९. याच पद्धतीने बॅडमिंटन या खेळासंदर्भातील इतरही अनेक धडे गिरवणे हा त्यांच्या प्रशिक्षणाचा अविभाज्य भाग; १०. या व्यतिरिक्त आणखीन ही बऱ्याच गोष्टी त्यांनी सांगितल्या होत्या; ११. हे क्रीडा संकुल साधारण २० वर्षापूर्वीपासून चालू झाले होते. (२००७ सालची माहिती) म्हणजे साधारण १९८७ साली सुरू झाले; १२. सुरुवातीला लहान प्रमाणात आणि नंतर त्याचा विस्तार होत गेला; १३. या क्रीडा संकुलापासून एक ३-४ कि.मी. अंतरावर आणखी एक संकुल होते. तेथे सुद्धा सर्व खेळामध्ये अशाप्रकारे प्रशिक्षण दिले.

हळूहळू माझ्या कार्यालयीन कामाचा व्याप वाढत जाऊ लागला आणि माझा बीजिंगच्या बाहेर म्हणजे शांघाई, हार्बिन, चेंगडू, नानजिंग, निंगबो, हंगजाऊ, गुंआगजाऊ, ऊशी, चिंगदाऊ, शीयान, तियांनजिन आणि इतर शहरांकडे प्रवास सुरू झाला. त्यामुळे या क्रीडा संकुल, तेथील प्रशिक्षक आणि खेळाडू यांच्याशी भेटणे कमी होऊ लागले. परंतु एक सवय मला लागली, ते म्हणजे इतर गावांमध्ये कशाप्रकारची क्रीडा संकुले आहेत ते बघणे. तेव्हा लक्षात आले की जे मी बीजिंगमध्ये बघितले, ते प्रत्येक गावामध्ये होते.

**क्रीडा धोरण आणि संस्कृती**

मी माझ्या कामानिमित्त ज्या उत्पादक कंपन्यांमध्ये जात

होतो, त्यांची क्षमता बघून मी अवाक् झालो. आमच्या विद्युत निर्मिती क्षेत्रामधील ज्या महत्त्वाच्या तीन मोठ्या कंपन्या चीनमध्ये होत्या, त्यांना कायम भेटी देत होतो. एक गमतीची गोष्ट वा सत्य सांगावेसे वाटते. भारतामध्ये वीज निर्मिती संच बनवणारी एकच मोठी कंपनी ज्याची उत्पादन क्षमता १०,००० मेगावॅट वर्षाला होती, तर चीन मधील तीन ज्या मोठ्या कंपन्या आहेत त्यांची प्रत्येकाची क्षमता साधारण ३५,००० मेगावॅट वर्षाला. म्हणजेच या तीन कंपन्या मिळून चीन मध्ये एकूण १,००,००० मेगावॅट क्षमतेची मशिन्स/संच वर्षाला उत्पादन करत होती. यावरून लक्षात येईल की एका उत्पादन केंद्राचा आवाका केवढा प्रचंड असेल. अशा ठिकाणी प्रत्येक उत्पादन केंद्रावर एक मोठे क्रीडा संकुल. त्या ठिकाणी गावामधील तरुण-तरुणी आणि थोडे वयस्क देखील खेळायला आणि खेळ शिकायला येत असत रोज तसेच या कंपन्यांच्या मधील काम करणारे कर्मचारी देखील जात होते.

चीनमधील काम करण्याची देखील एक संस्कृती आहे, जी आपण खरंच समजून अमलात आणण्याची गरज आहे. सकाळी आठ वाजता, काम सुरू. दुपारी साडेबारा वाजता, जेवणाची सुट्टी. अर्धा/पाऊण तास विश्रांती, झोप. तर दुपारी दोन वाजता पुन्हा काम चालू. संध्याकाळी सहा वाजता काम बंद. (यामध्ये कोठेही कोणीही टंगळ-मंगळ करणार नाही.) संध्याकाळी काम संपल्यावर बरेच कर्मचारी व्यायाम अथवा खेळासाठी संकुलात जाणार. सायंकाळी सात वाजता घरी किंवा बाहेर जेवण. हा रोजचा दिनक्रम.

यामध्ये महत्त्वाची गोष्ट म्हणजे, येथे देखील खेळ आणि व्यायाम याला अतिशय महत्त्व. या मुळेच जवळजवळ सर्व पुरुष-स्त्रिया अतिशय स्वाथ्यशील आणि पोट न सुटलेले. साधारण ६५-७० वर्षाची व्यक्ती बघायला ४०-४५ वयाची वाटणार आणि ती देखील अतिशय चपळ. मी देखील एक-दोनदा टेबल टेनिस आणि व्हॉलीबॉल खेळायला मैदानावर उतरलो होतो.

हळूहळू काम वाढत होते, त्यामुळे या सर्व गोष्टींकडे बघायला देखील वेळ नव्हता. परंतु बीजिंग ऑलिम्पिक २००८ दारावर दस्तक देऊ लागले होते. त्याबद्दलच्या बातम्या टीव्ही आणि इंग्रजी वर्तमान पत्रांमधून वाचायला मिळत होत्या. ठरल्याप्रमाणे ८ ऑगस्ट २००८ रोजी



*अथक नि बिनचूक सराव आणि त्यासाठी जागतिक दर्जाच्या सोयीसुविधा हे चीनच्या क्रीडा धोरणाचे वैशिष्ट्य राहिले आहे...*

संध्याकाळी ८:०८:०८ वाजता ऑलिम्पिकचे उद्घाटन होणार होते. हा दिवस आणि ही वेळ जर मी इंग्रजीमध्ये लिहिली तर 08.08.2008 at 08.08.08 Time येथे लक्षात येईल सगळे नंबर हे आठ आहेत. चीनमध्ये ड्रॅगनला प्रचंड महत्त्व आहे. इंग्रजी '8' हा ड्रॅगनचेसुद्धा प्रतीक आहे. चीन हा कम्युनिस्ट देश आहे पण याबाबतीत मात्र हा समज आहे, की ड्रॅगनलाच महत्त्व द्यायचे. यावरून अजून एक सांगावेसे वाटते. चीनमध्ये '4' किंवा 'Four' हे निषिध्द मानले जाते. नंबर '4' किंवा 'Four' याचा उच्चार चिनी भाषेमध्ये 'स' असा आहे. याच 'स'चा थोडासा उच्चार बदलला, तर त्याचा अर्थ मत्यू/मरण असा होतो. त्यामुळे कित्येक बिल्डिंगमध्ये '4', '14', '24' मजलेच नाहीत. शेवटी कोणतीही विचारसरणी कितीही प्रगत देश असू देत मृत्यूचे भय वाटतेच जरी मृत्यू ही एक अटळ घटना प्रत्येकाच्या आयुष्यात आहेच. परंतु चीनसारख्या प्रगत आणि डाव्या विचारसरणीच्या देशामध्ये देखील अशाप्रकारची अंधश्रद्धा बघायला मिळाली.

ठरलेल्या दिवशी आणि ठरलेल्या वेळेप्रमाणे ऑलिम्पिक खेळांची सुरुवात बीजिंगमध्ये सुरू झाली. साधारण एक महिना आधीपासूनच परदेशी लोक चीनमध्ये फिरताना दिसत होते. काही लोक मेट्रोमध्ये किंवा बसमध्ये भेटले, की कधी तरी बोलण्याचा प्रसंग देखील. ८ ऑगस्टला सुरू झालेले ऑलिम्पिक २४ ऑगस्टपर्यंत चालणार होते. त्यामध्ये १५ ऑगस्ट भारताचा स्वातंत्र्य दिन देखील येत होता. बीजिंगमधील वास्तव्यास असलेले आम्ही भारतीय १५ ऑगस्ट, २६ जानेवारी या महत्त्वाच्या दिवशी भारतीय दूतावासामध्ये जाऊन ते महत्त्वाचे

दिवस नेहमीच साजरे करतो. १५ ऑगस्ट २००८ रोजी देखील आम्ही भारतीय गेलो होतो. नेहमीचे बीजिंगमध्ये राहणारे भारतीय जसे होते, तसेच काही नवीन भारतीय चेहरे पण दिसत होते. त्यापैकी एक ओळखीचे सुरेश कलमाडी तेवढे मला माहीत होते. मुख्य झेंडावंदन आणि राष्ट्रगीताचा कार्यक्रम झाल्यावर खानपान व्यवस्था असलेल्या ठिकाणी इतर लोकांची ओळख करून घेण्याची आणि गप्पा मारण्याची संधी मिळाली. त्यामध्ये बरेच लोक भारतीय ऑलिम्पिक कमिटीशी सलग्न होते, तर बरेचसे भारतीय क्रीडा पत्रकार होते. त्यामध्ये विनायक दळवी, संदीप चव्हाण आणि मोहन बने या क्रीडा पत्रकारांशी ओळख झाली. खूप गप्पा मारल्या. त्यांना चीनमधील लोक, संस्कृती, समाज याबद्दल खूप जिज्ञासा होती. पुढील ८-१० दिवस मी त्यांच्याबरोबर रोज भेटत होतो आणि मला जमेल तेवढी माहिती देत होतो. या तिन्ही पत्रकारांशी नंतर चांगलीच मैत्री झाली. आजदेखील आमचा संवाद-भेटणे चालू असते.

त्या सुमारास ४-५ दिवसांनी आमची भेट झाली असताना दळवीसाहेब आणि संदीप यांनी मला सरळ विचारले, की ऑलिम्पिक संपल्यावर येथेच पॅरालिम्पिक होणार आहे, त्यासाठी भारतामधून त्यांच्याकडून कोणीही क्रीडा पत्रकार येणार नाही, त्यामुळे मी पॅरालिम्पिकसाठी क्रीडा पत्रकाराचे काम करणार का? माझ्या स्वप्नात देखील मी याची कल्पना केली नव्हती. मला पॅरालिम्पिक माहीत नव्हते. त्याचप्रमाणे पत्रकारीता देखील कधीही केलेली नव्हती. त्यामुळे मी त्यांना नाईलाजाने नाही म्हटले. पण...

**क्रमशः**

**(हा लेख लिहिताना जेन लिऊ (जेन) आणि चेन शुओ चु (रेन) यांची मोलाची मदत झाली. दोघांचेही आभार.)**

**गजानन जोशी नामवंत ऊर्जानिर्मिती अभ्यासक, भाष्यकार आहेत. समाज, साहित्य आणि कला हे त्यांचे चिंतन आणि आस्वादनाचे विषय आहेत.**

**संपर्क :** joshigajanan@hotmail.com



# प्रेमाची मुळाक्षरे



प्रा.श्रीनिवास हेमाडे





'प्रेम' जाणण्याचा अनेकांपैकी एक मार्ग भाषेच्या अथांग प्रांतातून जातो. प्रेम भावनेचा अनुभव व्यक्त करण्यासाठी भाषेत अनेक शब्दनिर्माण होतात. प्रेमाच्या प्रकारानुसार प्रेमाभिव्यक्तीसाठी शब्द आणि शब्दांचे प्रकार होतात. जितक्या भाषा निर्माण होतात तितके शब्द निर्माण होतात. 'प्रेम' भावना उर्फ संकल्पना व्यक्त करण्यासाठी मुख्य संस्कृती आणि सभ्यता यांच्यात शब्द रुळतात, रुजतात. प्रेम भावनेभोवती गुंफण झालेल्या त्यातल्या काही मुख्य शब्दांचा हा परिचय...

‘प्रेम’ जाणण्याचा अनेकांपैकी एक मार्ग भाषेच्या अथांग प्रांतातून जातो हे तर खरेच. प्रेम भावनेचा अनुभव दुसऱ्या व्यक्तीपर्यंत पोहोचवण्यासाठी भाषेत अनेक शब्द निर्माण होतात. प्रेमाची तऱ्हा निराळी, रंगरुप निराळे. त्यामुळे प्रेमाच्या प्रकारानुसार प्रेमाभिव्यक्तीसाठी शब्द आणि शब्दांचे प्रकार रुजत जातात. जितक्या भाषा निर्माण होतात तितकेच शब्दही निर्माण होतात. ‘प्रेम’ शब्दाला (खरे तर संकल्पनेला) समांतर असणाऱ्या Love, Fondness, Affection, Devotion, Adoration, प्रीती, प्यार, इश्क, मोहब्बत, स्नेह, आपुलकी, अनुराग, मोहब्बत, प्यार, प्रणय, भक्ती, आसक्ती, चाह, दुलार, मित्रता, भक्तिभाव असे अनेक शब्द असून ते विविध भावना आणि संबंधांचे सूचन करतात.

या सारख्या इतर कोणत्याही भाषेतील शब्दाला त्या त्या भाषेतील विशिष्ट अर्थ लाभलेला असतो. ‘स्नेह’पासून ‘ईश्वर भक्ती’ पर्यंत अनेकदा प्रेमाचा अर्थ मानवी पातळीवरून दैवी पातळीवर पोहोचलेला असतो. मानवी प्रेमाला दैवी झळाळी प्राप्त होते, हे खरे असले तरी ते सामाजिक मानवी प्रेम उरत नाही. तरीही त्याचे उपयोजन (application) मात्र मानवी पातळीवर केले जाते. असे खूपच उच्च प्रेम मानवी वास्तव क्षमतेच्याच बाहेर गेले की, सदासर्वकाळ प्रत्येकावर किंवा सर्वांवर प्रेम करणे अशक्य होते. कारण मानवी समाजात प्रेमाच्या विरुद्ध दुःख किंवा दुरित (evil) ही असते. ‘सर्वांवर प्रेम’ या संकल्पनेत आणि कृतीत ‘दुरिता’ वरही प्रेम हा चमत्कारिक विरोधाभासही तयार होतो. त्यामुळे अनेक नैतिक आणि ज्ञानात्मक पेचांना सामोरे जावे लागते.

‘ज्ञान’ या अर्थाने ‘प्रेम’ ही एक संकल्पना आहे आणि ‘आनंदानुभव, सौंदर्यानुभव आणि नैतिक अनुभव’ या अर्थाने ती ‘भावना’ आहे. प्रत्येक भाषेत वेगवेगळ्या शब्दांत प्रेम संकल्पना व भावना मांडली जाते. संकल्पना म्हणून सर्वत्र तिची भावनिक अभिव्यक्ती साधारणतः एकसमान असते.

भाषेच्या दृष्टिकोनातून पाहता ‘प्रेम’ हा शब्द क्रियापद आहे की केवळ ‘नाम’ आहे की ‘सर्वनाम’ आहे, यावरही प्रेमाकडे पाहण्याचा दृष्टिकोन तयार होतो. प्रेमाबाबत आपण एक गोष्ट पुरेशी समजावून घेतलेली नाही; ती अशी की प्रेम ‘कोणाशी’ करावे आणि नेमके ‘काय’ करावे या पेक्षा ‘प्रेम कसे करावे’ या कृतीशी जास्त निगडित आहे. तांत्रिक परिभाषेत सांगायचे तर ‘प्रेम’ ही गोष्ट ‘नाम’ आणि ‘क्रियापद’ असण्यापेक्षा ‘क्रियाविशेषण’ आहे.

आपण येथे ‘प्रेम’ भावना उर्फ संकल्पना व्यक्त करण्यासाठी मुख्य संस्कृती (culture) आणि सभ्यता (civilisation) यांच्यात बनविल्या गेलेल्या काही मुख्य शब्दांचा परिचय करुन घेऊ.

**मराठी, संस्कृत, हिंदी, मराठी–प्रेम**

‘प्रेम’ हा मराठी शब्द ‘प्रेमन्’ या संस्कृत शब्दापासून बनतो. ‘प्री’ या संस्कृत धातुपासून प्रेम शब्द बनतो. या ‘प्री’ धातूचे गणभेदाने तीन प्रकारचे पाठ सिद्ध होतात. ‘प्रीङ् प्रीतौ’, ‘प्रीञ् तर्पणे कान्तौच’, ‘प्रीञ् तर्पणे’. यातील ‘प्रीङ्’ (प्रीञ्) हा संस्कृत व्याकरणातील एक धातु (क्रिया) असून त्याचा अर्थ ‘प्रसन्न करणे’, ‘तृप्त करणे’ (तर्पण), ‘प्रिय वाटणे’ व ‘प्रेम करणे’ असा होतो. पाणिनीय व्याकरणानुसार ‘लट् लकारा’ची प्रथम– पुरुष एकवचनाची सर्व मिळून सात प्रकारची रूपे होतात. प्रीयते, प्रीणाति, प्रीणीते प्रीणयति, प्राययति, प्रयति व प्रयते. ‘प्रियस्थभावः प्रेम अथवा प्रेमा । परमः प्रेमारूपं यस्याः सा परमप्रेमरूपा’. अर्थ : प्रियत्वाचा जो भाव (अस्तित्व) ते प्रेम, परम प्रेम आहे. तीच ती परमप्रेमरूपा भक्ती होय. प्रेयते इति प्रेमः या व्युत्पत्ति नुसार प्रेयसी रूपात असणे.

**संस्कृत मूळ**

१. ‘प्रीङ् प्रीतौ’ : प्रसन्न करणे’

२. ‘प्रीञ्’ धातु (उच्चार ‘प्रिंग’) : संस्कृत ‘प्रीञ्’ धातु (प्रीञ् तर्पणे कान्तौ च) म्हणजे तृप्ती (satisfaction) आणि कांती (loveliness) असा होतो.

३. प्रिय (प्रिया) : ‘प्रीञ्’ धातुपासून ‘प्रिय’ शब्द बनतो. अर्थ ‘जी नेहमी प्रिय भावते ती व्यक्ती’ किंवा ‘पसंत असलेली व्यक्ती (प्रीणति इति प्रियः)

४. प्रेम : ‘प्रिय’ शब्दाला ‘इमनिच्’ हा प्रत्यय लागून ‘प्रेमा’ हा पुल्लिंगी किंवा ‘प्रेमन्’ शब्द बनतो. त्याचा अर्थ आहे, ‘प्रियता भाव’ अर्थात प्रिय होणे.

५. ‘प्रीति’ : ‘प्रीञ्’ धातुला ‘क्तिन्’ प्रत्यय लागून ‘प्रीति’ शब्द बनतो. अर्थ अर्थातच प्रेम किंवा प्रसन्नता.

**अर्थ आणि सारभाव**

‘प्रेम’ चा संक्षिप्त अर्थ केवल शारीरिक आकर्षण असा नसून एक खोल आत्मीयता, तृप्ती आणि संतुष्टीची भावना. मनाच्या इच्छा, भावना आणि त्यांच्या आविष्काराचा अस्तित्वगत अनुभव आहे, जो मानवी समाज, प्राणी सृष्टीशी,

निसर्गाशी आणि विश्वाशी जोडतो. हा मूलार्थ सर्व भारतीय भाषांमध्ये आणि दैनंदिन संस्कृतीमध्ये झिरपला. हे सर्व शब्द प्रोटो-इंडो-युरोपीय, प्रोटो-इंडो-जर्मन भाषा कुटुंबांशी निगडित आहेत.

हिंदीतील 'प्रेम' शब्दाची व्युत्पत्ती संस्कृत भाषेतील 'प्रिय'पासून प्रियस्थ भावः इमनिच् प्रत्यय प्रादेश प्रियस्य भावः 'प्र'ला भावार्थक 'इमन्' प्रत्यय लागून 'प्रेम' शब्द निष्पन्न होतो. म्हणून 'प्रेमन्'चा अर्थ होतो, 'प्रियता'. किंवा 'प्रियभाव'. 'प्रेम'ची अन्य व्युत्पत्ती प्रेयते इति प्रेमः अर्थात् प्रेयसी रूप होणे .


'प्यार' हा हिंदी शब्द देखील संस्कृत 'प्रेम' पासूनच तयार होतो. प्यार चा अर्थ होतो 'आदर, आनंद, स्नेह भावना' जी इतरांबद्दल असते, अनुभवली जाते.

'इश्क' शब्द मूळ अरबी (عشـــق) असून त्याचा अर्थ होतो आसक्ती, प्रेम. मुख्यतः ईश्वर प्रेम (अल्लाह विषयी प्रेम भाव) इस्लामी जगतात आणि भारतीय उपखंडातील बहुतेक सर्व भाषांमध्ये हा शब्द मोठ्या प्रमाणात वापरला जातो.

इस्लामचा धर्मग्रंथ 'कुरआन'मध्ये 'इश्क़' शब्द नाही. त्या जागी 'हब्ब' (حَبَ) धातुपासून व्युत्पन्न शब्द जसे की 'हुब्ब' (حُبّ) प्रयुक्त आहे. आधुनिक अरबी भाषेत रोमांटिक प्रेमासाठी हब्बपासून व्युत्पन्न शब्द 'हुब्ब' (حُبّ), हबीब (حَبِيْـــب - प्रिय) आणि महबूब ( مَحْبُوْب-- प्रियतम) हे शब्द वापरले जातात.

पारंपरिक उत्पत्तीनुसार हा शब्द अरबी धातु 'अशक़' (عَشَ - चिकटणे, घट्ट बांधले जाणे). पारंपरिक फ़ारसी कोशकारांच्या मते, फ़ारसी शब्द एश्क़ आणि अरबी इश्क़ (عشـــق), अरबी धातु अशक़ (عَشَق)पासून व्युत्पादित होतो. 'अशक़ा' (عَشَقَه) नावाची वेल वृक्षांना लपेटून वाढते.

'इश्क़' भाववान व्यक्ती माशूक़ (प्रियतम) ला प्राप्त करण्याची अदम्य इच्छा दर्शवतो तो आशिक़. प्रेमाची ही धारणा 'अल-हुस्न' या सौंदर्याचे आकर्षण आहे, ज्याला 'ईश्वराने आदम स्वरूपात सृजित करून प्रकट केले. त्याला अरबी दर्शन व्यवस्थेत 'सत्य' (अल-हक़्क़), शिव आणि सुंदर यांची अविभाज्य एकता (वह्दा) मानले जाते. धार्मिक अर्थाने तीन शब्दप्रयोग केले जातात : इश्क़-ए-हक़ीक़ी (सत्य/ईश्वर प्रेम), इश्क़-ए-मजाज़ी (ईश्वर निर्मित सृष्टी अर्थात् मानव प्रेम), इश्क़-ए-रसूल किंवा इश्क़-ए-मुहम्मदी (पैगंबर मुहम्मद विषयी प्रेम).



*जगभरातल्या विविध संस्कृतीत फुलणाऱ्या प्रेमाला त्या त्या भाषेतल्या शब्दांनी भावनांचे विविध पदर जोडले...*

असावा. आणि 'इश्' या शब्दाचे मूळ मध्ययुगीन फ़ारसी 'इश्त' (इच्छा)चे विद्यमान रूप आहे. भाषाविद् हेदारी-मलायरी यांच्या मते, 'इश्क़'चे मूल इंडो-युरोपीय भाषा परिवारामध्ये असू शकतात. संस्कृतमधील 'ईश्'पासून 'ईश्वर' शब्द बनतो. 'ईश्' म्हणजे नियंत्रण करणे, म्हणून विश्वाचा नियंत्रक तो ईश्वर.

सुफी संप्रदायाने 'प्रेम' किंवा 'इश्क' ची संकल्पना निर्गुण निराकार पर्यंत आध्यात्मिक (metaphysical आणि ontological) पातळीवर नेली.

इंग्लिशमधील Love शब्द प्रोटो-इंडो-युरोपीय (PIE) आणि प्रोटो-इंडो-जर्मन (PIG) आहे. मध्ययुगातील प्रोटो-इंडो-युरोपीय lufu शब्दापासून Love शब्द बनतो. lufu यांचे नाते 'लोभ' या संस्कृत शब्दाशी असावे.

Love शब्द मध्ययुगीन किंवा जुन्या इंग्लिशमधील luve, loven, luvien, lufu, lufianपासून बनतो. 'lufu' म्हणजे प्रेमाची भावना, रोमँटिक लैंगिक आकर्षण, आपुलकी, मैत्री, ईश्वर प्रेम. Lufian या अन्य मध्य युगीन इंग्लिश शब्दापासून



*प्रेम 'कोणाशी' करावे आणि नेमके 'काय' करावे या पेक्षा 'प्रेम कसे करावे' या कृतीशी जास्त निगडित आहे. तांत्रिक परिभाषेत सांगायचे तर 'प्रेम' ही गोष्ट 'नाम' आणि 'क्रियापद' असण्यापेक्षा 'क्रियाविशेषण' आहे...*

प्रोटो- वेस्ट जर्मनिक 'lubo - अमूर्त भावना (जुने अभिजात जर्मन liob, liubi म्हणजे आनंद तर Lob म्हणजे स्तुती आणि नवा जर्मन शब्द Liebe, lieb म्हणजे प्रेम), डच lief अथवा lof, गॉथिक liufs म्हणजे प्रिय. या साऱ्या जर्मन शब्दांचे मूळ प्रोटो-इंडो-युरोपीय (PIE) 'leubh' (काळजी घेणे, इच्छा करणे, प्रेम करणे) या शब्दात आहे. प्रोटो-इंडो-युरोपियन lewb, lubMn (प्रेम, काळजी, इच्छा) मध्ये आहे. लॅटिनमधील Lubetचे libet झाले, त्याचा अर्थ आनंद. Libet पासून liberty आणि libido किंवा Lubido (कामवासना) बनला. फ्रेंचमध्ये amour शब्द आहे.

आवडणे (liking, fondness), a beloved person हा शब्दप्रयोग तेराव्या शतकात रूढ झाला, तर नावडणे - no score म्हणजे प्रेमाच्या खेळात मागे पडणे हा १७४२ च्या दरम्यान वापरात आला, तेथून नेहमीच्या खेळांच्या स्पर्धेत १६७० दरम्यान रूढ झाला.


Love, Lufu, lubo lof अशा बहुतेक शब्दांचे संस्कृत 'लोभ' शी ( लिप्यंतर lobha पासून हे अनेक शब्द निष्पादित झाले, लुभ्या, लुभायते, लोभस ).

मूळ इंग्लिशपासून इंग्रजी भाषेत शेकडो, हजारो शब्द, म्हणी, वाक्यप्रचार, सुभाषिते, सुविचार प्रचलित झाले. इंग्रजीत किमान ३५० समांतर शब्द असावेत, असा अंदाज व्यक्त केला जातो. उदाहरणार्थ काही निवडक शब्द असे : In love with, Love life, Love affair, Love beads, Love bug, Love and leave, Lady love, Beloved... त्याचप्रमाणे काही असभ्य शब्दही भाषेत रुळले गेले; जसे love blobs वृषण, love bumps स्तन स्त्रियांची छाती किंवा Love bubbles (हा दुसऱ्या महायुद्धात आलेला पर्यायी शब्द), love muscle पुरुषाचे जननेंद्रिय शिश्न, love handles पुरुषाच्या कमरेवर पडलेल्या मांसाच्या घड्या, सुटलेले पोट उर्फ डेरेदार ढेरी (स्त्रियांकडून वापरला जाणारा हेटाळणी शब्द), love-in n कामोत्सुक तरुण-तरुणींचे स्नेहमेलन, love-in-a-punt पाणी झालेली बियर (ब्रिटिश), पाणचट मद्य, lover's nuts किंवा lover's balls रोगग्रस्त आजारलेले, निष्काम वृषण (पर्यायी शब्द blue balls).

जिला Gen Z पिढी म्हटले जाते, त्या पिढीत प्रेम, Love या शब्दासाठी अनेक शब्द रुळले आहेत. त्यातून त्यांच्या प्रेमाची कल्पना (idea) व्यक्त होते, संकल्पना (concept) नाही. 'GenZ प्रेम' हा स्वतंत्र लेखाचा विषय आहे. जसे की क्रश (Crush) म्हणजे चुरा, बुकणा, धडक, तुडवणे, तुकडे करणे. पण आधुनिक अर्थ दिल की धड्कन!. हा विषय नंतर कधीतरी अनुक्रमाने पाहू.

**लेखक व्यावसायिक तत्त्ववेत्ते आणि सल्लागार आहेत.**
**संपर्क : ९१५ ८६५ ८०६६,** wiselove2026@gmail.com

# बौद्ध दर्शन : नास्तिकतेकडे पाहण्याचा एक दृष्टिकोन



जगदीश काबरे





**बौद्ध दर्शन हे प्राचीन भारतीय तत्त्वज्ञानातील एक महत्त्वपूर्ण आणि प्रभावशाली विचारसरणीची मांडणी करणारे दर्शन आहे. गौतम बुद्ध यांनी स्थापित केलेल्या या दर्शनाने मानव जीवनातील दु:ख, त्याची कारणे आणि त्यापासून मुक्तीचा मार्ग यावर प्रकाश टाकला आहे. बौद्ध दर्शन केवळ धार्मिक किंवा आध्यात्मिक दृष्टिकोनापुरते मर्यादित नसून, ते तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र, मानसशास्त्र आणि सामाजिक सुधारणांचा समावेश करते. बौद्ध दर्शनाचा प्रभाव भारताबाहेरही, विशेषतः आशिया खंडावर पसरला. नव्हे, जगभरातील लाखो लोकांच्या जीवनावर आजही त्याचा प्रभाव दिसून येतो...**

बौद्ध दर्शनात मूलभूत तत्त्वांचा, त्याच्या विकासाचा, प्रमुख शाखांचा, आणि आधुनिक काळातील त्याच्या प्रासंगिकते–बरोबरच बुद्धांचे जीवन, चार आर्य सत्ये, अष्टांगिक मार्ग, कर्म आणि पुनर्जनन, अनित्यता आणि अनात्मवाद, तसेच बौद्ध दर्शनाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक प्रभावांचा समावेश केला आहे.

या दर्शनाचे संस्थापक गौतम बुद्ध, त्यांचे मूळ नाव सिद्धार्थ गौतम. यांचा जन्म इ.स.पू. ५६३ मध्ये लुंबिनी (सध्याचे नेपाळ) येथे शाक्य कुळातील राजकुमार म्हणून झाला. त्यांचे वडील, राजा शुद्धोधन, यांनी त्यांना ऐश्वर्यपूर्ण जीवन प्रदान केले. परंतु वयाच्या २९व्या वर्षी सिद्धार्थांनी जीवनातील दुःख, वृद्धत्व, रोग आणि मृत्यू अशा पाहिलेल्या घटनांमुळे त्यांना जीवनाच्या सखोल अर्थाचा शोध घेण्यास प्रवृत्त केले. त्यासाठी सिद्धार्थांनी गृहत्याग केला आणि सहा वर्षे कठोर तपश्चर्या आणि ध्यान केले. अखेरीस, बोधगया येथे बोधिवृक्षाखाली त्यांना ज्ञानप्राप्ती झाली, ते 'बुद्ध' (जागृत) म्हणून ओळखले गेले. त्यांनी आपले पहिले प्रवचन सारनाथ येथे दिले, ज्याला 'धम्मचक्कप्पवत्तन सुत्त' असे म्हणतात. यात त्यांनी चार आर्य सत्ये आणि अष्टांगिक मार्गाचा उपदेश केला, जे नंतर बौद्ध दर्शनाचे मूलभूत आधारस्तंभ बनले.

**बौद्ध दर्शनाचे मर्म**

बौद्ध दर्शनाचा गाभा चार आर्य सत्यांमध्ये आहे. ते मानवी जीवनाच्या वास्तविक स्वरूपाचे वर्णन करतात.

१. दुःख (दुक्ख अरियसच्चं) : जीवन दुःखाने भरलेले आहे. जन्म, वृद्धत्व, रोग, मृत्यू, अप्रिय व्यक्तींसोबतचा सहवास, प्रिय व्यक्तींपासून वेगळे होणे आणि इच्छित गोष्टींची प्राप्ती न होणे हे सर्व दुःखाचे प्रकार आहेत.

२. दुःखाचे कारण (दुक्ख समुदय अरियसच्चं) : दुःखाचे मूळ कारण तृष्णा (लालसा) आहे. ही तृष्णा भौतिक सुख, इंद्रियसुख, किंवा स्वतःच्या अस्तित्वाशी संबंधित असते.

३. दुःखाचा निरोध (दुक्ख निरोध अरियसच्चं) : दुःखापासून मुक्ती शक्य आहे. ही मुक्ती म्हणजे निर्वाण, जिथे सर्व तृष्णा आणि अज्ञान नष्ट होतात.

४. दुःख निरोधाचा मार्ग (दुक्ख निरोध गामिनी पटिपदा अरियसच्चं) : दुःखापासून मुक्तीचा मार्ग म्हणजे, अष्टांगिक मार्ग, ज्यात नीतिमत्ता, ध्यान आणि प्रज्ञा यांचा समावेश आहे.

अष्टांगिक मार्ग हा निर्वाणाकडे जाणारा व्यावहारिक मार्ग आहे, जो आठ भागांमध्ये विभागलेला आहे:

१. सम्यक दृष्टी (सम्मा दिट्ठी) : जीवन आणि विश्वाबद्दल योग्य दृष्टिकोन, विशेषतः चार आर्य सत्यांचे ज्ञान.

२. सम्यक संकल्प (सम्मा संकप्पो) : योग्य विचार आणि उद्देश, जसे की हिंसेपासून मुक्ती आणि करुणा.

३. सम्यक वाचा (सम्मा वाचा) : सत्य, दयाळू आणि उपयुक्त संभाषण.

४. सम्यक कर्म (सम्मा कम्मंता) : नैतिक आचरण, जसे की हिंसा, चोरी आणि व्यभिचार यांपासून दूर राहणे.

५. सम्यक आजीव (सम्मा आजीवो) : नैतिक आणि इतरांना हानी न पोहोचवणारा व्यवसाय करणे.

६. सम्यक व्यायाम (सम्मा वायामो) : मनाला अकुशल विचारांपासून मुक्त ठेवण्यासाठी प्रयत्न करणे.

७. सम्यक स्मृती (सम्मा सति) : सध्याच्या क्षणाबद्दल जागरूकता आणि सावधानता बाळगणे.

८. सम्यक समाधी (सम्मा समाधी) : ध्यानाद्वारे मनाची एकाग्रता साधणे आणि शांती मिळवणे.

बौद्ध दर्शनानुसार, सर्व काही अनित्य आहे. विश्वातील प्रत्येक गोष्ट सतत बदलत आहे, कोणतीही गोष्ट कायमस्वरूपी नाही. ही अनित्यतेची संकल्पना मानवाला आपल्या आसक्तींपासून मुक्त करण्यास मदत करते. बौद्ध दर्शनातील आणखी एक क्रांतिकारी तत्त्व म्हणजे, अनात्मवाद. यानुसार, स्वतंत्र आणि कायमस्वरूपी 'आत्मा' किंवा 'स्व' अस्तित्वात नाही. व्यक्ती ही पंच स्कंधांचा (रूप, वेदना, संज्ञा, संस्कार, विज्ञान) संयोग आहे, यातील कोणतीही गोष्ट कायमस्वरूपी नाही. तसेच बौद्ध दर्शन कर्माच्या सिद्धांतावर विश्वास ठेवते. त्यात व्यक्तीच्या कृतींचे परिणाम त्याच्या वर्तमान आणि भविष्यातील जीवनावर होतात, असे गृहीत धरले आहे. पुनर्जननाची संकल्पना याच्याशी जोडलेली आहे. यामध्ये आत्म्याऐवजी कर्मांचा प्रवाह नवीन जन्माला कारणीभूत ठरतो. निर्वाण प्राप्त झाल्यावर हा पुनर्जननाचे चक्र थांबते.

बौद्ध दर्शनाच्या विकासाबरोबरच त्याच्या विविध शाखा उदयाला आल्या. त्यांनी बौद्ध तत्त्वज्ञानाला वेगवेगळ्या दृष्टिकोनातून समृद्ध केले.

१. थेरवाद (हिनयान) : थेरवाद ही बौद्ध दर्शनाची सर्वात प्राचीन शाखा आहे, जी पाली भाषेतील त्रिपिटकांवर आधारित आहे. यात बुद्धांचे मूळ उपदेश आणि चार आर्य सत्य,

अष्टांगिक मार्ग यावर भर दिला जातो. थेरवादात व्यक्तिगत निर्वाणावर (अर्हत) लक्ष केंद्रित केले जाते. ही शाखा श्रीलंका, थायलंड, म्यानमार, लाओस आणि कंबोडियामध्ये प्रचलित आहे.

२. महायान : महायान बौद्ध पंथाचा उदय इ.स.च्या पहिल्या शतकात झाला. यात बोधिसत्त्वाचा आदर्श मध्यवर्ती आहे, ज्यामध्ये व्यक्ती केवळ स्वतःच्या निर्वाणासाठी नव्हे, तर सर्व प्राण्यांच्या मुक्तीसाठी प्रयत्न करते. महायानात शून्यतावाद (सर्व काही शून्य आहे) आणि करुणा यावर विशेष भर दिला जातो. ही शाखा चीन, जपान, कोरिया आणि व्हिएतनाममध्ये प्रचलित आहे.

३. वज्रयान : वज्रयान ही महायानाची एक उपशाखा आहे, जी तांत्रिक आणि गूढ प्रथांवर आधारित आहे. यात मंत्र, यंत्र आणि ध्यानाच्या विशेष पद्धतींचा समावेश आहे. वज्रयान तिबेट, भूतान आणि मंगोलियामध्ये प्रचलित आहे.

**सामाजिक नि सृजनशील प्रेरणा**

बौद्ध दर्शनाने भारत आणि आशिया खंडातील संस्कृती, कला, साहित्य आणि सामाजिक सुधारणांवर खोलवर प्रभाव टाकला आहे. बौद्ध धर्माने अजंठा, वेरूळ, साचीचा स्तूप, बामियान यांसारख्या स्थळांवर अप्रतिम कला आणि स्थापत्यकृती निर्माण केल्या. बुद्धांच्या मूर्ती, स्तूप आणि विहार यांनी भारतीय आणि आशियाई कलेला नवीन दिशा दिली. तर दुसरीकडे नालंदा आणि तक्षशिला यांसारख्या बौद्ध विद्यापीठांनी प्राचीन काळात शिक्षणाचा प्रसार केला. पाली आणि संस्कृतमधील बौद्ध ग्रंथांनी तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र, विज्ञान या ज्ञानशाखांना समृद्ध केले. बौद्ध धर्माने जातीपातीच्या भेदभावाला विरोध करत सर्व मानवांना समान मानले. यामुळे सामाजिक समतेचा विचार पुढे आला. स्त्रियांसाठी सुरुवातीला बौद्ध संघात स्थान देण्यात आले नव्हते, पण नंतर बुद्धांना आपली चूक उमगली आणि त्यांनी स्त्रियांनाही संघात स्थान दिले. त्यामुळे लैंगिक समानतेचा पाया घातला गेला. अशा गुणवैशिष्ट्यांमुळे आधुनिक काळात बौद्ध दर्शनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. मानसिक तणाव, पर्यावरणीय संकटे आणि सामाजिक असमानता यांसारख्या समस्यांना तोंड देण्यासाठी बौद्ध तत्त्वज्ञान उपयुक्त ठरत आहे.

बौद्ध ध्यानपद्धती, विशेषतः विपश्यना आणि माइंडफुलनेस, यांना पाश्चात्य देशांमध्ये मानसिक आरोग्यासाठी स्वीकारले गेले आहे. माइंडफुलनेस तंत्रज्ञानामुळे तणाव कमी होतो आणि एकाग्रता वाढते. बौद्ध दर्शनातील अहिंसा आणि सर्व प्राण्यांबद्दल करुणा ही तत्त्वे पर्यावरण संरक्षणासाठी प्रेरणादायी आहेत. बौद्ध विचारसरणी मानवाला निसर्गाशी सुसंवाद साधण्यास शिकवते. बौद्ध धर्मातील समता आणि करुणेची तत्त्वे सामाजिक न्याय आणि मानवाधिकारांच्या चळवळींना बळ देतात. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतात बौद्ध धर्म स्वीकारून दलित समुदायाला सामाजिक समतेचा मार्ग दाखवला.

**सामाजिक क्रांतीचे साधन**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वीकारलेला आणि प्रचार केलेला बौद्ध धर्म, ज्याला अनेकदा 'नवयान' किंवा 'आंबेडकरी बौद्ध धम्म' असे संबोधले जाते, हा पारंपरिक बौद्ध धर्मापासून, विशेषतः थेरवाद (हिनयान) आणि महायान आणि वज्रयान परंपरांपासून, काही महत्त्वपूर्ण बाबतीत भिन्न आहे. आंबेडकरांनी बौद्ध धर्माची आधुनिक काळातील सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक संदर्भात पुनर्व्याख्या केली, ज्यामुळे तो केवळ आध्यात्मिक दर्शन न राहता सामाजिक न्याय आणि समतेच्या लढ्यासाठी एक साधन बनला.

बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धम्म तयार करताना म्हणजे, नवयान पंथ तयार करताना मूळ बौद्ध धर्मातील अंधश्रद्धायुक्त असलेल्या कर्मकांडाच्या काही गोष्टी त्यागल्या आणि काही नवीन गोष्टींचा अंतर्भाव केला. त्या अशा;

१. सामाजिक न्याय आणि समतेवर विशेष भर: गौतम बुद्धांचा मूळ बौद्ध धर्म प्रामुख्याने व्यक्तिगत दुःखापासून मुक्ती (निर्वाण) आणि आध्यात्मिक प्रगतीवर केंद्रित होता. यात सामाजिक समस्यांवर उपदेश होते, परंतु त्याचा प्राथमिक उद्देश व्यक्तिगत आत्मशुद्धी आणि कर्मसिद्धांतावर आधारित नैतिक जीवन होता. बुद्धांनी जाती भेदाला थेट आव्हान दिले नाही, परंतु सर्वांना संघात सामील होण्याची संधी दिली. तर आंबेडकरांनी बौद्ध धर्माला सामाजिक क्रांतीचे साधन बनवले. त्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार प्रामुख्याने हिंदू धर्मातील जाती व्यवस्था आणि अस्पृश्यतेच्या विरोधात केला. आंबेडकरी बौद्ध धर्मात समता, स्वातंत्र्य आणि बंधुता ही तत्त्वे मध्यवर्ती आहेत. त्यांनी बौद्ध धर्माची दलित आणि उपेक्षित समुदायांच्या उत्थानासाठी आणि सामाजिक अन्यायाविरुद्ध लढ्यासाठी पुनर्व्याख्या केली.



*बुद्ध धर्माने नैतिक मूल्यांच्या आचरणाबरोबरच तत्त्वचिंतनाचीही भूमिका मांडली...*

२. कर्मकांड आणि अंधश्रद्धांचा नकार : पारंपरिक बौद्ध धर्मात, विशेषतः महायान आणि वज्रयान शाखांमध्ये, मंत्र, यंत्र, पूजा आणि कर्मकांडांना महत्त्व आहे. काही परंपरांमध्ये बुद्धांना दैवी व्यक्तिमत्त्व म्हणून पूजले जाते. थेरवादात कर्मकांड कमी असले, तरी पुनर्जनन आणि कर्माच्या संकल्पनांना महत्त्व आहे. आंबेडकरांनी बौद्ध धर्मातील सर्व कर्मकांड, अंधश्रद्धा आणि गूढ तत्त्वांना स्पष्टपणे नकारले. त्यांनी बौद्ध धर्माला तर्कनिष्ठ आणि वैज्ञानिक दृष्टिकोनावर आधारित बनवले. त्यांच्या मते, बौद्ध धर्म हा जीवन जगण्याचा एक व्यावहारिक मार्ग आहे, जो कर्मकांडांवर अवलंबून नाही. त्यांनी बुद्धांकडे दैवी व्यक्ती म्हणून नव्हे, तर एक समाजसुधारक आणि तत्त्वज्ञ म्हणून पाहिले.

३. पुनर्जनन आणि कर्म यांच्या पुनर्व्याख्येवर भिन्न दृष्टिकोन : मूळ बौद्ध धर्मात कर्म आणि पुनर्जनन ही मध्यवर्ती तत्त्वे आहेत. व्यक्तीच्या कृती (कर्म) त्याच्या पुनर्जननाच्या स्वरूपावर परिणाम करतात आणि निर्वाण प्राप्त होईपर्यंत हे चक्र सुरू राहते. पण आंबेडकरांनी पुनर्जननाच्या संकल्पनेवर प्रश्न उपस्थित केले. त्यांच्या मते, पुनर्जननाची कल्पना वैज्ञानिक दृष्टिकोनाशी सुसंगत नाही. कर्माच्या संकल्पनेचीही त्यांनी पुनर्व्याख्या केली. त्यामध्ये त्यांनी कर्माला सामाजिक आणि नैतिक कृतींशी जोडले, पुनर्जननाशी नव्हे. आंबेडकरांचा बौद्ध धर्म वर्तमान जीवनातील सामाजिक सुधारणांवर केंद्रित आहे, पुनर्जनन किंवा परलोकावर नाही.

४. निर्वाणाची पुनर्व्याख्या : मूळ बौद्ध धर्मात निर्वाण ही तृष्णा आणि अज्ञानापासून पूर्ण मुक्ती आहे, ज्यामुळे पुनर्जननाचे चक्र थांबते. ही एक व्यक्तिगत ध्यान आणि आत्मशुद्धीद्वारे प्राप्त होणारी आध्यात्मिक अवस्था आहे. आंबेडकरांनी मात्र निर्वाणाला सामाजिक आणि व्यावहारिक संदर्भ दिला. त्यांच्या मते, निर्वाण म्हणजे सामाजिक अन्याय, असमानता आणि शोषणापासून मुक्ती. हे निर्वाण केवळ व्यक्तिगत नसून सामूहिक आहे. ते समतामूलक असून समाजाच्या निर्मितीद्वारे प्राप्त होते.

५. बौद्ध धर्माचे राजकीय आणि सामूहिक स्वरूप : मूळ बौद्ध धर्म प्रामुख्याने व्यक्तिगत आध्यात्मिक प्रगतीवर केंद्रित होता. बुद्धांनी जरी नैतिक शासनासाठी मार्गदर्शन केले, तरी राजकीय किंवा सामूहिक क्रांतीला थेट प्रोत्साहन दिले नाही. आंबेडकरांनी बौद्ध धर्माला राजकीय आणि सामूहिक लढ्याचे स्वरूप दिले. त्यांनी बौद्ध धर्माला दलित चळवळीचा आणि सामाजिक न्यायाच्या लढ्याचा आधार बनवले. १९५६ मध्ये नागपूर येथे लाखो अनुयायांसह बौद्ध धर्म स्वीकारणे हे एक राजकीय आणि सामाजिक कृत्य होते. त्याने हिंदू जातीव्यवस्थेला आव्हान दिले.

६. धम्माची नवीन व्याख्या : मूळ बौद्ध धर्मात 'धम्म' म्हणजे चार आर्य सत्य, अष्टांगिक मार्ग आणि नैतिक आचरण सांगणारे बुद्धांचे उपदेशामृत होते. पण आंबेडकरांनी 'धम्म' या शब्दाला व्यापक अर्थ दिला. त्यांच्या मते, धम्म म्हणजे सामाजिक समता, स्वातंत्र्य आणि बंधुता यांचा समावेश असलेली जीवनपद्धती. त्यांनी धम्माला भारतीय संविधानातील न्याय, स्वातंत्र्य आणि समता या मूल्यांशी जोडले.

७. संघाची भूमिका : मूळ बौद्ध धर्मात संघ (भिक्खू आणि भिक्खुणी) हा आध्यात्मिक साधकांचा समुदाय होता, जो ध्यान, उपदेश आणि नैतिक जीवनासाठी समर्पित होता. आंबेडकरांनी संघाला सामाजिक सुधारणांचे केंद्र बनवले. त्यांनी संघाची संकल्पना सामान्य लोकांसाठी खुली केली, ज्यामुळे तो सामाजिक कार्य आणि समुदायाच्या एकतेचे प्रतीक बनला. आंबेडकरी बौद्ध धर्मात संघ सामाजिक जागरूकता आणि शिक्षणाच्या प्रसारासाठी कार्य करतो.

८. 'बुद्ध आणि त्यांचा धम्म'मधील दृष्टिकोन : आंबेडकरांनी त्यांच्या या ग्रंथात बौद्ध धर्माची पुनर्रचना केली. या पुस्तकात त्यांनी पारंपरिक बौद्ध ग्रंथांमधील तर्कविरुद्ध आणि सामाजिक समतेच्या विरोधी असलेल्या काही भागांना नकारले. उदाहरणार्थ, त्यांनी काही सुत्तांमधील पुनर्जनन आणि कर्मकांडांशी संबंधित भागांना नाकारले आणि बौद्ध धर्माला

आधुनिक आणि वैज्ञानिक स्वरूप दिले.

थोडक्यात, आंबेडकरी बौद्ध धम्म हा मूळ बौद्ध धर्माचा एक आधुनिक, तर्कनिष्ठ आणि सामाजिकदृष्ट्या प्रासंगिक अवतार आहे. मूळ बौद्ध धर्म प्रामुख्याने आध्यात्मिक मुक्तीवर केंद्रित असताना, आंबेडकरी बौद्ध धर्म सामाजिक शोषण, जातीवाद आणि असमानतेविरुद्ध लढण्यासाठी एक साधन बनला. आंबेडकरांनी बौद्ध धर्माची भारतीय संदर्भात पुनर्व्याख्या करून तो दलित आणि उपेक्षित समुदायांच्या सक्षमीकरणासाठी प्रभावी अस्त्र बनवला. यामुळे आंबेडकरी बौद्ध धर्म हा केवळ धार्मिक परंपरा नसून, सामाजिक आणि राजकीय क्रांतीचा एक मार्ग बनला आहे.

एकीकडे, तत्त्वांची चिकित्सक मांडणी करणाऱ्या मूळ बौद्ध दर्शनालाही काही टीकांना सामोरे जावे लागले आहे. काहींच्या मते, त्याचा व्यक्तिगत निर्वाणावरचा भर सामाजिक जबाबदाऱ्यांकडे दुर्लक्ष करतो. तसेच, काही बौद्ध परंपरांमध्ये अंधश्रद्धा आणि कर्मकांडांचा समावेश झाला, ज्यामुळे मूळ तत्त्वज्ञानापासून विचलित झाल्या. तरीही, बौद्ध दर्शनाने स्वतःला काळानुसार सुधारित केले आहे. बौद्ध दर्शन हे मानव जीवनातील दुःखापासून मुक्तीचा मार्ग दाखवणारे एक समग्र तत्त्वज्ञान आहे. त्याची तत्त्वे आजही प्रासंगिक आहेत. बौद्ध धर्माने केवळ आध्यात्मिकच नव्हे, तर सामाजिक, सांस्कृतिक आणि पर्यावरणीय क्षेत्रातही महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. म्हणून आधुनिक काळातील मानसिक आणि सामाजिक समस्यांना सामोरे जाण्यासाठी बौद्ध दर्शन एक मार्गदर्शक प्रकाश आहे, असे म्हटले तर चूक ठरू नये. तरीही बौद्ध दर्शनाला पूर्णपणे नास्तिक दर्शन मानले जात नाही, याची कारणे त्याच्या तत्त्वज्ञानाच्या स्वरूपात आणि त्याच्या विविध परंपरांमध्ये आढळतात.

**नास्तिकतेकडे जाणारे पाऊल**

बौद्ध दर्शन हे पारंपरिक नास्तिकतेच्या (जसे चार्वाक किंवा पाश्चात्य नास्तिकता) व्याख्येपासून वेगळे आहे. बौद्ध दर्शन, विशेषतः गौतम बुद्धांचे मूळ उपदेश, ईश्वराच्या (सर्वशक्तिमान, विश्वनिर्माता) अस्तित्वाबाबत स्पष्ट नकार किंवा स्वीकार व्यक्त करत नाही. बुद्धांनी अशा तात्त्विक प्रश्नांना 'अव्याकृत' (अनिर्णीत) म्हणून संबोधले, ज्यांचा थेट संबंध मानवी दुःख आणि निर्वाणाशी नाही. उदाहरणार्थ, बुद्धांनी स्पष्ट केले की,



*बौद्ध दर्शनाच्या विकासासोबत विविध ज्ञानशाखा उदयास आल्या. या ज्ञानशाखांच्या प्रभावातून विविध देशांत बौद्ध धर्माने मूळ धरले...*

'विश्व अनादी आहे की सादी?' किंवा 'ईश्वर आहे की नाही?' यांसारख्या प्रश्नांवर चर्चा करणे म्हणजे वेळेचा अपव्यय आहे, कारण यामुळे दुःखापासून मुक्ती मिळत नाही. ही मौनाची भूमिकाच बौद्ध दर्शनाला पूर्ण नास्तिकतेपासून वेगळे करते, कारण नास्तिकता सामान्यतः ईश्वराच्या अस्तित्वाला स्पष्ट नकार देते, तर बौद्ध धर्म त्या प्रश्नाला गौण मानतो. तसेच पुनर्जननाची संकल्पना, जरी आत्म्याच्या पारंपरिक हिंदू संकल्पनेपेक्षा भिन्न असली, तरी एक प्रकारच्या चेतनेच्या सातत्याचा स्वीकार करते. बौद्ध दर्शनाचा उद्देश केवळ भौतिकवादी किंवा तर्कवादी विश्लेषण करणे नाही, तर ते निर्वाणाच्या प्राप्तीसाठी आध्यात्मिक आणि नैतिक जीवनावर आधारित आहे.

निर्वाण ही एक अशी अवस्था आहे, की जी दुःख आणि तृष्णेपासून पूर्ण मुक्ती दर्शवते. ही संकल्पना पारंपरिक नास्तिक दर्शनात आढळत नाही, कारण नास्तिकता सामान्यतः आध्यात्मिक उद्देशाना नाकारते. बौद्ध धर्मातील ध्यान, मनपूर्तता (माइंडफुलनेस) आणि करुणा यांसारख्या प्रथा आध्यात्मिक अनुभव आणि अंतर्दृष्टीवर आधारित आहेत, ज्या नास्तिक दर्शनाच्या भौतिकवादी दृष्टिकोनापासून वेगळ्या आहेत. त्यामुळे बौद्ध दर्शन हे पूर्णपणे भौतिकवादी किंवा नास्तिक दर्शनापासून वेगळे अर्थात, नास्तिकतेकडे नेणारे एक पाऊल आहे, हे मात्र नक्की.

**जगदीश काबरे हे विज्ञानप्रसार आणि सामाजिक उन्नयनाशी निगडित कार्यकर्ते, ज्येष्ठ लेखक आणि आस्वादक आहेत.**
**संपर्क :** ९९२०१९७६८०
**ई मेल :** jetjagdish@gmail.com

# मेट्रोत मेट्रो...दिल्ली मेट्रो!



**आशय गुणे**

बरसाती मजला


दिल्ली मेट्रो


मुंबई लोकल



दिल्ली मेट्रोचे सुस्पष्ट दिशादर्शन

**आ**पल्याला अनेकदा कळतही नाही, पण सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय प्रभावातून व्यक्तीचे सार्वजनिक वर्तन आकार घेत जाते. या वर्तनाचा दाखला वा अनुभव मिळण्याचे मेट्रो सेवा ही दिल्लीतली लक्षवेधी जागा. नियोजनात, दैनंदिन संचालनात दिल्ली मेट्रोला तोड नाही. मात्र त्याचा लाभ घेणारे दिल्लीकर हे अजब रसायन आहे. मुंबई लोकल प्रवासातल्या सामूहिक जगण्याला सरावलेल्या मुंबईकरांमध्ये मुरलेला कॉस्मोपोलिटन इंटेलिजन्स शान–ओ–शौकतमध्ये राहणाऱ्या दिल्लीकरांमध्ये तसा गायबच दिसतो...

दिल्ली या शहराकडे 'तिथे जाऊ नये' या नजरेने पाहणारे अनेक सापडतात. आपल्या भूमिकेच्या समर्थनात ही सर्व मंडळी तिथल्या लोकांपासून ते तिथल्या प्रदूषित हवामानापर्यंत अनेक मुद्दे मांडतील. परंतु एका मुद्द्यावर दिल्लीच्या बाजूने बोलायला ही मंडळी देखील संकोच करणार नाहीत, आणि तो म्हणजे दिल्ली मेट्रो! आजच्या घडीला नागरिकांची इतकी मोठी सोय पुरवणारा, शहरातील जवळजवळ प्रत्येक भाग इतर सर्व भागांशी प्रभावीपणे जोडणारा, शहरातील प्रमुख रेल्वे स्थानक, बस स्थानक व विमानतळातील टर्मिनस यांच्या अगदी दारापर्यंत घेऊन जाणारा आणि शहर नियोजनाचा एक महत्त्वाचा घटक सिद्ध होऊन वाढत्या शहराच्या बरोबरीने 'अपग्रेड' होत राहिलेला दुसरा वाहतूक प्रकल्प देशभरात कुठेही नाही.

वाहतूक प्रकल्प उभे राहिले की गुंतवणूक वाढते, असा दावा आपण मुंबई व पुणे या शहरातील अशा अनेक प्रकल्पांच्या घोषणे दरम्यान ऐकतो. परंतु ते आकारास येण्याआधी तिथल्या व तिथून अनेक किलोमीटर लांबपर्यंत असलेल्या जागांचे भाव वाढणे व तिथे नवीन गृहनिर्माण प्रकल्प उभे राहण्यापलीकडे आणखी काहीही घडत नाही. किंबहुना, मुंबई (नवी मुंबई, खरंतर) व पुणे या दोन्ही शहरांना इतकी वर्ष विमानतळ या पलीकडे कोणत्याही घोषणेची सवय नव्हती. मुंबई मेट्रो किंवा पुणे मेट्रो यांच्या घोषणा व पूर्तता अलीकडचीच. तोपर्यंत या दोन्ही शहरातील नागरिक कलकत्त्यात मेट्रो आहे, ही माहिती 'सामान्य ज्ञान' या विषयांद्वारे गप्पा किंवा स्पर्धांमधून व्यक्त करीत होती.

**दिल्ली मेट्रोची भुरळ**

परंतु आपल्या शहरात रिक्षाचालकांमुळे होणारा त्रास, त्यांना द्यावे लागणारे अतिरिक्त पैसे व पारंपरिक वाहतूक पद्धतींची कोलमडणारी परिस्थिती याची सवय इथल्या नागरिकांना होऊन गेलेली आहे. वेगाने वाढणाऱ्या शहरीकरणाच्या बरोबरीने तिथली वाहतूक सुविधा अजिबात तग धरू शकत नाही, ही देशातील प्रत्येक शहराची कथा (खरंतर व्यथा) निश्चित झाली असताना दिल्ली मेट्रोने बाजी मारली! आता इथे वर्षाहून अधिक काळ राहिल्यानंतर तिच्याबद्दल आपुलकी, जिव्हाळा व भुरळ या सर्व भावना माझ्या मनात दाटून आल्या आहेत.

दिल्ली मेट्रोबद्दल लिहायला सुरु करण्याआधी तिचा अगदी सुरुवातीचा काळ अनुभवल्याची आठवण सांगतो. २००३ या वर्षी मी आई-वडिलांबरोबर प्रथम दिल्लीला फिरायला म्हणून गेलो होतो. तेव्हा दिल्ली मेट्रो सुरु होऊन वर्षही पूर्ण झालं नव्हतं. परिणामी, दिल्लीकरांसारखीच आम्हीही ही मेट्रो 'बघायला' म्हणून गेलो होतो. काही मोजक्या स्टेशनांचीच व्याप्ती असणारी ही मेट्रो बघण्यासाठी गर्दी झाली होती. दिल्लीकर आपल्या मुलाबाळांना घेऊन आले होते. मेट्रो आली की उत्साहाने आत जाऊन सीट पकडायची, शेवटचं स्टेशन आलं की उतरायचं व पुन्हा मागे यायचं, असा क्रम मोठ्या आनंदात सुरू होता.

आता या घटनेला २३ वर्ष झाली, तरीही त्या दिवशी तिथे उपस्थित नागरिकांच्या चेहऱ्यावरील उत्साह, आपलेपणा हा मला स्वच्छ आठवतो आहे. मला त्या स्टेशनांची नावं देखील आठवत नाहीत, परंतु मेट्रोचा इतिहास इंटरनेटवर उपलब्ध असल्यामुळे तो स्टेशनांचा पट्टा शाहदरा ते इंद्रलोक (Red Line) होता, हे समजलं. गेल्या २३ वर्षात दिल्लीचं झालेलं परिवर्तन, त्याच्यामुळे एनसीआर (नॅशनल कॅपिटल रिजन) हे महानगरीय क्षेत्र उभं राहणं, गुडगाव व नोएडा ही महत्त्वाची औद्योगिक व निवासी क्षेत्रं उभी राहणं, याचं श्रेय याच दिल्ली मेट्रोला जातं.

परंतु दिल्ली मेट्रो हा प्रकल्प हा केवळ त्याच्या वाढलेल्या जाळ्यामुळेच अनुकरणनीय नाही. तर, त्याच्यापेक्षा कितीतरी जास्त महत्त्वाचं-प्रवास करणाऱ्यांना प्रत्येक टप्प्यावर उत्कृष्ट सोय कशी उपलब्ध होईल, याचा विचार या प्रकल्पाच्या रचनेत झालेला आहे.

**सुविधाकेंद्री सुधारणा हाच यशाचा मंत्र**

या सोयी नेमक्या कोणत्या स्वरूपाच्या आहेत, यासाठी एक उदाहरण देतो. मागच्या वर्षी जानेवारी महिन्यात मी आणि माझा एक मित्र हौज खास या मेट्रो स्टेशनवर चालत होतो. हे स्टेशन इंटरचेंज स्टेशन आहे, म्हणजे मुंबईच्या भाषेत सांगायचं झालं तर 'जंक्शन' दिल्ली मेट्रोच्या 'मॅजेंटा लाइन' वरून 'येलो लाइन'साठी ट्रेन बदलावी लागणार होती. इतक्यात माझं लक्ष दोन परदेशी स्त्रियांकडे गेलं. 'मॅजेंटा लाइन'पासून 'येलो लाइन'कडे जाण्याची दिशा समजावी म्हणून संपूर्ण रस्त्यावर पिवळ्या रंगाचे पावलाचे ठसे रंगवले आहेत. हे ठसे आळीपाळीने डाव्या व उजव्या पायांचे आहेत. त्या प्रत्येक ठश्यावर आपला पाय ठेवीत आणि 'आपल्याला कुणालाही विचारावं लागणार नाही' असा आनंदी भाव चेहऱ्यावर ठेवून स्टेशनवर चालत होत्या. माझा मित्र रशियन भाषेचा विद्यार्थी असल्यामुळे त्या एकमेकांशी रशियन भाषेत बोलत होत्या, हे त्याच्या चटकन लक्षात आले. परंतु या प्रसंगावरून एवढे लक्षात आले की भाषेची अडचण असली तरी साध्या व सोप्या चिन्हांद्वारे प्रवासी मंडळींना अनेक सोयी उपलब्ध

केल्या जाऊ शकतात. दिल्ली मेट्रोच्या प्रत्येक जॅक्शन स्टेशनांवर असे पावलांचे ठसे आहेत, ज्यांचा रंग ते आपल्याला कोणत्या 'लाइन'कडे घेऊन जाणार आहेत यावर अवलंबून असतो. उदाहरणार्थ; 'ग्रीन लाइन'वरून 'रेड लाइन'कडे जायचे असल्यास संबंधित इंटरचेंज स्टेशनवर त्या दिशेकडे लाल पावलांचे ठसे रंगवले आहेत व तिथून 'ग्रीन लाइन'कडे येणाऱ्या मार्गावर हिरव्या रंगाचे.

तसंच प्रत्येक स्टेशनावर तिथल्या चारही गेटचे नंबर दिसतील, अशा जागी प्रदर्शित केले आहेत. शिवाय एकदा स्टेशन परिसरात गेलं की 'लिफ्ट' नेमकी कुठे आहे, याच्या दिशा प्रदर्शित केलेल्या असतात. जर तुमच्याकडे मेट्रो कार्ड असेल, तर ते रिचार्ज कुठे करायचं, तिकीट काढायला रांग नको म्हणून 'तिकीट व्हेंडिंग मशीन' कुठे आहेत, त्याद्वारे तिकीट काढायला तुम्ही कॅश वापरणार की युपीआय याची देखील माहिती स्पष्ट दिसेल अशा थाटात प्रदर्शित असते.

याच्या बरोबरीने दिसेल अशा ठिकाणी दिल्ली मेट्रोच्या सर्व मार्गांचा (lines) नकाशा आढळतो व त्याच्या बरोबरीने सुरक्षे संबंधित सूचना देखील दिसतात. थोडं पुढे गेलं की कचऱ्याचे डबे दिसतात. एकूण दिल्लीची सर्व मेट्रो स्थानकं स्वच्छ व सुटसुटीत आहेत. ती या सोयींमुळे. मात्र आपण जसे दिल्ली परिसराच्या बाहेर जातो व गुडगाव किंवा नोएडामधील स्थानकांवर पोचतो, तेव्हा मात्र स्थानकांवरची स्वच्छता कमी झालेली आढळते व पान खाऊन थुंकलेल्या अवशेषांमध्ये व एकूण प्लास्टिक व अन्य कचऱ्यात लक्षणीय वाढ आढळून येते.

याच्या व्यतिरिक्त आणखी एका गोष्टीसाठी दिल्ली मेट्रोचं कौतुक करायला हवं. ते म्हणजे, योग्य ठिकाणी प्लॅटफॉर्मचे नंबर लिहिणे व त्याच्यावर संबंधित 'लाइन'चे शेवटचे स्थानक लिहिणे. एकदा प्लॅटफॉर्मवर गेलं की किमान दोन ठिकाणी तरी संबंधित मार्गाचा नकाशा प्रदर्शित असतो. या नकाशावर आपण उभे असलेल्या स्थानकाचे नाव व तिथून पुढे ज्या स्थानकांकडे मेट्रो प्रस्थान करणार आहे, ती दिशा दाखवणारी खूण प्रदर्शित असते. त्यामुळे दिल्ली मेट्रो ने पहिल्यांदाच प्रवास करणारी व्यक्ती ही कुणालाही न विचारता केवळ लिखित मार्गदर्शनाद्वारे संबंधित ठिकाणी पोचू शकते.

२०१७ या वर्षी मी जेव्हा दिल्ली मेट्रोने पहिल्यांदा प्रवास केला, तेव्हा मला या वाहतूक प्रणालीबद्दल आपलेपणा वाटला, तो याचमुळे! देशात अनेक शहरात मेट्रो सेवा एक तर प्रस्तावित आहेत किंवा नुकत्याच सुरू झाल्या आहेत. त्यांनी या सर्व बाबींसाठी दिल्ली मेट्रोचा आदर्श घ्यायला हरकत नाही.

**मुंबई– दिल्ली: फरक साफ हैं...**

दिल्ली मेट्रोची रचना व त्याची मुंबई मेट्रोशी तुलना असा अनुभव नुकताच (ऑक्टोबर २०२५) आला. मुंबई ते दिल्ली विमानाने प्रवास करायचा होता म्हणून मी घाटकोपर मेट्रो स्थानकावर 'एअरपोर्ट टी–२'साठी तिकीट विचारलं. तर मरोळ पर्यंतच तिकीट मिळेल असं उत्तर मिळालं, कारण तिथून वेगळी अक्वा लाइन सुरू होते व टी–२ हे त्या लाइनवर आहे. मला निमूटपणे 'मरोळ'चं तिकीट काढावं लागलं. मरोळला पोचल्यावर कळलं की पुढच्या लाइनवर असलेलं 'मरोळ' हे स्थानक इथल्या 'मरोळ'शी जोडलेलं नाहीच!

त्यामुळे जिना उतरून रस्त्यावर येऊन थोडसं चालून जमिनीखाली असणाऱ्या या पुढल्या लाइनवरील मरोळ स्थानकात मी शिरलो. तिथे गेलो आणि नवीन स्थानकावर आल्यामुळे पुन्हा एकदा तिकीट काढलं, पुन्हा बॅगा तपासायला दिल्या व एअरपोर्टकडे प्रस्थान केलं. दिल्लीत असा प्रसंग मुळीच येत नाही. इथे तुम्ही एकदा एखाद्या मेट्रो स्थानकात शिरलात तर तुम्ही कोणत्याही स्थानकाचे तिकीट मागू शकता व त्यात अगदी दोन वेळा लाइन बदलावी लागली तरी त्यासाठी कोणत्याही स्थानकाच्या बाहेर यावे लागत नाही. तुम्ही बाहेर येता ते तुमच्या इच्छित ठिकाणीच!

मात्र मुंबई मेट्रोने दिल्लीसारखं प्रावीण्य अजून मिळवलेलं नसलं तरीही एक गोष्ट पाहून मात्र मला अतिशय आनंद झाला. आणि ती म्हणजे, प्रवासी मंडळींचे रांग न मोडता आत शिरणे! ही शिस्त दिल्लीत कधीच येणार नाही, अशीच एकूण परिस्थिती आहे!

मुंबई मेट्रोने दिल्लीचा आणखी एक गुण उचलला आहे. तो म्हणजे प्रत्येक स्थानकाच्या बाहेर पडायच्या चारही मार्गावर आपण बाहेर पडतो तिथल्या प्रमुख ठिकाणांची नावं प्रदर्शित करणं!

परंतु या सर्व बाबींव्यतिरिक्त दिल्ली मेट्रो ही खऱ्या अर्थाने सोयीची ठरली आहे, ती तिच्या अन्य वाहतूक साधनांशी जोडल्या गेल्यामुळे. इथल्या विमानतळातील दोन्ही टर्मिनस, सर्व रेल्वे स्थानक (नवी दिल्ली, जुनी दिल्ली, हजरत निजामुद्दीन व आनंद विहार) व सर्व आंतरराज्यीय बस स्थानक (आंतरराज्यीय बस स्थानकं – काश्मिरी गेट, आनंद विहार व साराय काले खान) ही सर्व मेट्रोशी थेट जोडली गेली आहेत. दिल्लीत आल्यापासून मी ऋषिकेश, मसुरी, धर्मशाला, नैनिताल, सिमला आदी ठिकाणी

बसने प्रवास केला. तसेच सिक्कीमला जाण्यासाठी विमानाने प्रवास केला. परंतु प्रत्येक वेळेस मला रिक्षा किंवा टॅक्सीवर अवलंबून राहावं लागलं नाही. घराजवळ असलेल्या मुनिरका मेट्रो स्थानकावर मेट्रो पकडून मी संबंधित बस स्थानक किंवा विमानतळ टर्मिनसच्या अगदी दाराशी पोचलो!

उत्कृष्ट सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचे यापेक्षा दुसरे उदाहरण कोणते? मुंबई किंवा अन्य कोणत्याही शहराला मेट्रो प्रणाली विकसित करायची असल्यास ती अशाप्रकारे जोडलेली असायला हवी. तरंच लोकांना ती वापरण्यात व थोडेसे जास्त पैसे खर्च करून तिचे तिकीट काढण्यास रस वाटेल. मात्र जर मेट्रो ही इतर वाहतूक माध्यमांपासून तुटलेली असेल किंवा एकदा मेट्रो स्टेशनामधून बाहेर पडल्यावर जर इच्छित स्थळी पोचण्यासाठी पुन्हा टॅक्सी किंवा रिक्षाच करावी लागणार असेल तर थोडंसं आकर्षण कमी झाल्यावर लोकं तिचा वापर करणं कमी किंवा बंद करतील. सध्या मुंबई मोनोरेल त्याच परिस्थितीत आहे, योग्य नियोजन न केल्यास समग्र मुंबई मेट्रोदेखील त्याच मार्गाने धावेल.

साहजिकच, एवढ्या मोठ्या व्यवस्थेला सुरळीत सुरू ठेवण्यासाठी आर्थिक पाठबळ लागणारच. एका मर्यादेपेक्षा तिकिटांची किंमतही वाढवता येणार नाही. त्यामुळे दिल्ली मेट्रोने अनेक वर्षांपासून खाजगी प्रायोजक, जाहिराती यांच्यासाठी आपले दरवाजे खुले केले आहेत. प्रत्येक मेट्रो स्थानकावर अनेक जाहिराती बघायला मिळतातच, परंतु प्रत्येक मेट्रो स्थानकाला एखाद्या कंपनीचे नाव जोडून त्यांच्याकडून प्रायोजक म्हणून पैसे घ्यायचे ही इथली जुनी नियोजन-नीती आहे. मुंबई मेट्रोच्या काही स्थानकांच्या बाबतीत या सह-प्रायोजकत्वाबद्दल अस्मितेचा वाद निर्माण झाला होता. मात्र विरोधी पक्षांनी मेट्रो प्रणालीला सक्षम करण्यासाठी या सार्वजनिक, खाजगी भागीदारीला मान्यता देण्यात शहाणपण आहे.

मात्र इतकं होऊनही दिल्ली मेट्रोचे सर्वात कमी कौतुक किंवा जरासा तिरस्कार जर कुणाला असेल तर तो दिल्लीच्या मध्यम, उच्च-मध्यमवर्गाला! इतक्या सोयी उपलब्ध करून देखील हा वर्ग 'आम्ही मेट्रोने जात नाही' हेच सांगण्यास धन्यता मांडतो. जो दिल्लीवासी मेट्रोने प्रवास करतो तो देखील सोयी व सेवा यांचा योग्य वापर करतोच असं नाही. किंबहुना, नाहीच करत!

इथे मला मुंबई आणि दिल्ली या दोन शहरांची तुलना करावी वाटते. एखादं शहर तिथल्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला कसे सामोरे जाते, या बाबतीत केलेले हे छोटे विश्लेषण आहे.

**दिल्लीची तबियत आणि मुंबईचं चापल्य**

दिल्लीत मेट्रो आली त्याला आता पंचवीस वर्ष झाली. त्याआधी इथे सामूहिक पातळीवर वापरले जाणारे एकच साधन होते, ते म्हणजे बस. मुंबईत लोकल ट्रेन ही अनेक दशकांपासून आहे. त्यामुळे मोठ्या संख्येने एकत्र चालायची, प्रवास करण्याची, एक विशिष्ट वेळ गाठण्यासाठी अनेकांना एकत्र करायची सवय मुंबईला खूप आधीपासून आहे. त्यामुळे मुंबईला एक विशिष्ट गती आहे. ती गती आपल्याला मुंबईच्या सर्व लोकल स्थानकांवर सकाळी व संध्याकाळी दिसतेच दिसते. शिवाय मुंबईत केवळ सरकारी क्षेत्र नाही, तर अनेक प्रकारच्या खाजगी कंपन्या, छोटे मोठे उद्योग, असंख्य दुकानं आणि दुरून प्रवास करून तिकडे पोचणारे लोक देखील आहेत. दिल्लीची पार्श्वभूमी या बाबतीत पूर्णपणे वेगळी आहे. दिल्ली मेट्रो येण्याआधी 'नॅशनल कॅपिटल रिजन' (NCR) ही संकल्पना जरी अस्तित्वात असली तरीही, जशी दिल्ली मेट्रो विकसित होत गेली तशी गुडगाव व नोएडा या दोन भागांचा विकास अधिक वेगाने होऊ लागला. दिल्लीत जरी प्रामुख्याने सरकारी क्षेत्र अबाधित राहिलं तरी गुडगाव (हरियाणा) व नोएडा (उत्तर प्रदेश) येथे खाजगी कंपन्या, निवासी प्रकल्प यांचा विस्तार झाला. मंडळी एका भागातून दुसऱ्या भागात कामानिमित्त प्रवास करू लागली. इतके दिवस रिक्षा (वैयक्तिक) व बस (काही प्रमाणात सामूहिक) हा प्रवास मेट्रोमुळे खऱ्या अर्थाने सामूहिक होऊ लागला. परंतु त्याने शहराला आधीपासून असलेल्या सवयी बदलल्या नाहीत, असं माझं निरीक्षण आहे.

उदाहरणार्थ, मुंबई लोकलमध्ये कितीही गर्दी असली तरी एकदा सर्व प्रवासी उतरल्याशिवाय एकही प्रवासी चढत नाही. ही शिस्त शहरात नवीन आलेली व्यक्ती पटकन आत्मसात करते. याच्या उलट दिल्ली मेट्रो. मेट्रो स्थानकावर, मेट्रोचा दरवाजा जिथे उघडतो, तिथे मध्यभागी उतरण्याच्या दिशेने एक बाण रंगवलेला आहे. त्याच्या दोन्ही बाजूंनी चढण्याच्या दिशेने दोन बाण रंगवलेले आहेत. तात्पर्य : उतरणाऱ्या लोकांनी मधून उतरावं, तोपर्यंत चढणाऱ्या लोकांनी प्लॅटफॉर्मवर दरवाजाच्या दोन्ही बाजूला रांगेत प्रतीक्षा करत उभं राहावं. हे जवळजवळ प्रत्येक स्थानकावर, मेट्रो थांबल्यावर जिथे जिथे तिचा दरवाजा उघडतो तिथे रंगवलेलं आहे. परंतु दिल्लीकर मंडळी चढताना रांगेत तर उभं राहत नाहीतच, उलट उतरणाऱ्या लोकांसमोर घोळका करून उभे राहतात. परिणामी चढणाऱ्या व उतरणाऱ्या लोकांची एकमेकांना आदळआपट होते व मला रोज किमान एकदा तरी शिव्या ऐकू येतात.

हीच मंडळी एकदा आत शिरली की साखरेला मुंग्या चिकटाव्यात तशी दरवाजा जवळच्या जागेला चिकटतात. मी एकदा हौज खास या स्थानकावर मेट्रो पकडली, तेव्हा अगदी मला चढताही येणार नाही अशा जागी, मध्येच, एक व्यक्ती उभी होती. कुठे उतरायचं आहे हे विचारल्यावर कळलं, शेवटचे स्थानक, जे जवळजवळ १३ स्थानकांनंतर येणार होतं! साहजिकच, माझा पारा चढला. आत जाऊन उभं राहायला सांगितलं, तर माझ्या बोलण्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केलं गेलं. हे म्हणजे चेंबूरला ट्रेनमध्ये चढणं व सीएसटी येईपर्यंत दरवाजात उभं राहणं! मुंबई हे असलं वागणं अजिबात खपवून घेणार नाही. मुंबईसारखी आणखी एक सवय, जी इथे अजिबात अनुभवायला मिळत नाही ती म्हणजे, ट्रेन मधून उतरण्याआधी केलेले नियोजन. दादरला उतरायचं असल्यास मुंबईकर मंडळी माहिमपासून तयारीला लागतात. मग 'दादर?', असा प्रश्न विचारत विचारत वाट काढत घोळक्यात समील होतात. न उतरणारे देखील त्यांना तितकंच सहकार्य करतात. दिल्ली मेट्रोत अगदी गर्दी असतानाही स्टेशन आल्यावर आणि दरवाजे उघडल्यावर आत बसलेल्या व्यक्तीला उठावंसं वाटतं. त्यात देखील चपळता नसतेच! मग ती व्यक्ती उठते व इतरांनी आपल्याला उतरण्यासाठी जागा द्यावी या अपेक्षेने त्रासिक चेहऱ्याने उतरू लागते. परंतु या गडबडीत ट्रेनमध्ये चढणारे आत येऊ लागलेले असतात. मग पुन्हा आदळआपट आणि शिव्या!

मुंबई आणि दिल्लीच्या तुलनेत आणखी एक मजेशीर उदाहरण आहे. मेट्रो असल्यामुळे 'फास्ट' आणि 'स्लो' हा प्रश्नच येत नाही. तरीही कारभाराची कार्यक्षमता टिकून राहावी यासाठी रेल्वे किंवा मेट्रो असं एक मधलं स्टेशन निवडते, जिथपर्यंत काही गाड्या जातात. सर्व गाड्या शेवटच्या स्थानकापर्यंत जातात असं नाही. उदाहरणार्थ, चर्चगेटहून काही गाड्या अंधेरी किंवा बांद्र्यापर्यंतच जातात. साहजिकच, अशा गाड्यांना कमी गर्दी असते. ज्यांना या स्थानकाच्या आधी उतरायचं असतं त्यांना कमी गर्दीच्या गाडीतून प्रवास करायची संधी मिळते. इथे मी मेट्रोच्या 'येलो लाइन'ने प्रवास करतो. मेट्रो सिटी सेंटर – गुडगाव वरून ही गाडी सुटते व समयपूर बादली या स्थानकापर्यंत जाते. परंतु सर्व गाड्या शेवटच्या स्थानकापर्यंत जात नाहीत, काही 'विश्वविद्यालय' या स्थानकापर्यंत जातात. साहजिकच, संध्याकाळची गर्दी टाळण्यासाठी मी या गाड्यांची निवड करतो. परंतु आपलं सर्व आयुष्य दिल्लीत घालवलेल्या माझ्या ऑफिसमधील एकही व्यक्तीला ही बाब माहिती नव्हती आणि माझा अनुभव सांगितल्यावर जणू काय मी फार मोठा शोध लावला आहे, अशा थाटात सगळे अवाक् झाले होते! मी मात्र 'मुंबई लोकल' या भांडवलाच्या जोरावर हा 'शोध' दुसऱ्याच दिवशी लावला होता.

याच मधल्या स्थानकापर्यंत जाणाऱ्या मेट्रोची आणखी एक गंमत आहे. मुंबईत बोरिवलीला जाणारी मंडळी बांद्राच्या ट्रेनने बांद्र्यापर्यंत जाऊ आणि मग तिथून मागून येणाऱ्या बोरिवली ट्रेनमध्ये बसून पुढे जाऊ असं शक्यतो करत नाहीत. आता उल्लेख केलेल्या 'येलो लाइन'वर सकाळी मी मेट्रो पकडतो, ती समयपूर बादलीहून येते व मिलेनियम सिटी सेंटर – गुडगाव इथपर्यंत जाते. मात्र सकाळी सव्वा दहाच्या सुमारास एक मेट्रो येते, ती पुढे सुलतानपूर या वाटेत असलेल्या स्थानकापर्यंत जाते. मी गेल्या वर्षभरात अनेकदा पाहिलं आहे, की माझ्या आजूबाजूला उभी असलेली अनेक माणसं या मेट्रोत चढतात. मी मात्र मागून येणाऱ्या मेट्रोत चढतो, जी शेवटच्या स्थानकापर्यंत जाणार असते. माझी मेट्रो जेव्हा सुलतानपूरला येते तेव्हा माणसांचा हाच समूह मला पुन्हा माझ्या ट्रेनमध्ये चढताना दिसतो! अशा अनेक गंमतीजंमती दिल्लीत घडत असतात.

तात्पर्य – दिल्लीत जरी पंचवीस वर्षांपासून मेट्रो आली असली तरीही दिल्लीकरांच्या शरीरात–मानसिकतेत ती अजून भिनली नाहीये. अगदी मुंबईचेच उदाहरण द्यायचे तर: संध्याकाळी गर्दीमुळे सीएसटीहून येणाऱ्या ट्रेनमध्ये कुर्ल्याहून चढता येणार नाही म्हणून पलीकडच्या सीएसटीकडे जाणाऱ्या ट्रेनने उलटा प्रवास करायचा व चुनाभट्टीला उतरून तिथे सीएसटीहून येणारी गाडी पकडायची, असं अनेक लोक करतात. किंवा 'सीएसटी'वरून मस्जिदला जायचं किंवा चर्चगेटहून मरीन लाइन्सला जायचं व तिथून चर्चगेटकडे येणाऱ्या ट्रेनमध्ये बसायचं व जागा पकडायची. मग संबंधित गाडी सीएसटी किंवा चर्चगेटला आली की परत आपल्या घराच्या दिशेने जाताना आपल्याला आधीच जागा मिळालेली असते. दिल्ली मेट्रोला अजून खूप मोठा पल्ला गाठायचा आहे. गमतीत म्हणायचं तर, दिल्लीकरांसाठीच दिल्ली अभी दूर है...

**आशय गुणे हे दिल्लीस्थित अमेरिका इंडिया फाउंडेशनचे कम्युनिकेशन कन्सल्टंट, लेखक, अनुवादक आणि संगीत आस्वादक आहेत. त्यांचे डॉ. मनमोहन सिंग–ए टेम्पेस्टुअस टेन्यूर–सहलेखक सुजय शास्त्री– हे पुस्तक प्रकाशित आहे.**
**संपर्क:** gune.aashaygmail.com

# दी लास्ट सपर : लिओनार्दोचे अद्वितीय चिंतन रंग



डॉ. आनंद जोशी

ज्ञान रंग



'येशूचे शेवटचे भोजन' असो वा इतर कोणतेही पेंटिंग असो लिओनार्दो हा नुसता चित्रकर्मी नव्हता तर शब्दकर्मी सुद्धा होता. त्याने 'एसे ऑन पेंटिंग' हा निबंध लिहिला होता. 'चांगल्या चित्रकाराला पेंटिंग करताना दोन गोष्टी साधायच्या असतात. त्याला माणूस तर रंगवायचा असतो, पण त्याबरोबर त्या माणसाची मन:स्थितीही चित्रलिखित करायची असते' असे त्याने या निबंधात लिहिले आहे. या त्याच्या विधानाचा संबंध आणि संदर्भ 'येशूचे शेवटचे भोजन' या भित्तीचित्राशी आहे...

लिओनार्दोच्या 'दी लास्ट सपर' या गाजलेल्या भित्तीचित्राबाबत विचार करत होतो, तेव्हा लक्षात आले 'भित्तीचित्र' या प्रकाराबद्दल उपलब्ध असलेली माहिती शोधली पाहिजे. त्याच सुमारास 'Encyclopaedia Visual Art Of Maharashtra' संपादक : सुहास बहुळकर, दीपक घारे प्रकाशक पुंडोल आर्ट गॅलरी, मुंबई, २ मार्च २०२१ हा संग्राह्य चित्रकोश हातात आला. त्यात पहिल्याच पानावर एक महत्त्वाचे अवतरण आहे, त्याचा आशय असा 'मोठ्या लढाया, राजघराणी, यांच्याबद्दलच्या नोंदींपेक्षा राष्ट्राच्या चित्र दप्तराच्या शोधाभ्यासामधून त्या राष्ट्राचा इतिहास प्रभावीपणे उलगडतो.'

जेम्स कझिन्स (१८७३-१९५६) यांचा हा विचारलेख आहे. जेम्स हे आयरिश नाटककार नि आयरिश-भारतीय लेखक होते. ते आंध्र प्रदेशातील मदनापल्ले येथे स्थायिक झाले होते. Mac Oisin आणि जयराम या टोपणनावाने ते लिहीत. दी रेनोसां इन इंडिया हे त्यांचे पुस्तक त्या काळात प्रसिद्ध झाले होते. माझ्या या लेखाचा विकास या विचाराच्या प्रकाशात केला आहे.

**भित्तीचित्रांचे दिलदप्तर**

दिलदप्तर या शब्दाचा अर्थ मोल्सवर्थच्या शब्दकोशात 'हृदय आणि मनात राहणाऱ्या आठवणी' असा दिला आहे. हा शब्द मला चित्रांच्या इतिहासाला काव्यमय आणि समर्पक वाटला. इतिहास म्हणजे काय, आठवणी तर असतात.

भारतातील भित्तीचित्रांना जुनी परंपरा आहे. मध्यप्रदेशातील भीमबेटका येथील खडकाळ टेकड्यातील भित्तीचित्रे इ.स. पूर्व १०००० या कालखंडातील आहेत, तर अल्तामीरा-स्पेन आणि लास्को-फ्रान्सच्या गुंफांतील आदिम चित्रे इ.स. पूर्व १५००० या काळातील आहेत.

भीमबेटका येथील खडकाखाली असलेल्या नैसर्गिक आश्रयस्थानात कालक्रमाने येऊन राहिलेल्या भटकत्या टोळ्यांनी ही रेखने केली आहेत. ती 'आजही' आदिवासी तसेच ग्रामीण भागात चुना वा सफेद मातीने तसेच गेरूने तयार केल्या जाणाऱ्या भिंतीवर आजूबाजूचे विश्व उभ्या करणाऱ्या चित्रांशी जुळते आहे. (दृश्यकला जागतिक कलेचा संक्षिप्त इतिहास, संपादक : गुलाममोहम्मद शेख, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई पहिली आवृत्ती २०२१/ शके १९४३) हे वाचल्यानंतर मी विचारस्तब्ध झालो. यातील 'आजही' हा शब्द महत्त्वाचा. म्हणजे, दहा हजार वर्षाची चित्र परंपरा घेऊन काही मानवीय उपप्रजाती भारतात जगत आहेत. युरोपात असे कुठेही दिसत नाही. भारतात ही बहुविधता आहे, पण असे का?

विचारपुरुष डार्विन याचे काही उत्तर देईल असे वाटले म्हणून त्याचे 'दि ओरिजिन ऑफ स्पिशीज' हे पुस्तक कपाटाबाहेर काढले. त्यात डार्विनने नमूद केले आहे. त्याचा भर असा, 'उष्णकटिबंधातील प्रदेशात समशीतोष्ण प्रदेशांपेक्षा प्राणी-पशू, हिंस्त्रपशू, पाखरे, कीटक, तसेच वनस्पती यांच्या प्रजाती आणि उपप्रजाती जास्त संख्येने आढळतात.' डार्विनच्या या विधानात बरेच लखख झाले. उष्णकटिबंधीय भारतात जी बहुविधता आहे, त्या तुलनेत समशितोष्ण युरोपात अशी बहुविधता आढळत नाही. होमो सेपियन्स ही जगभर एक 'प्राणी-प्रजाती' असली तरी त्यात 'व्हेरिएशन्स' म्हणजे 'विभिन्नता' आहे. भारतात ही विभिन्नता जास्त प्रमाणात आहे. ही विभिन्नता म्हणजे मानवाच्या जणू उपप्रजाती. म्हणून भारतात निरनिराळ्या कालखंडात राहणारे लोक वर्तमानात राहात आहेत. उत्क्रांतीचा ओघ जात असताना काही प्रजाती काठावर राहतात, त्यांना उत्क्रांतीचा स्पर्श होत नाही. डार्विनने अशा प्रजातींना 'लिव्हिंग फॉसिल्स', 'जिवंत जीवाश्म' असे म्हटले आहे. भारतात सामाजिक उत्क्रांतीत अंदमान निकोबार पासून कन्याकुमारी पर्यंत निसर्गाच्या काही कुशीत अशा मानवीय उपप्रजाती आजही दिसतात. भित्तीचित्रांचा गतकाळ उलगडताना मला माणसाचा इतिहास असा उमलला.

भारतातील भित्तीचित्रांचा विलास पाहाता पाहाता गतकाळ उमटत जातो. 'दृश्यकला' या पुस्तकातील वानगीदाखल कोचीन येथील वलंदेज महाल या नावाने ओळखल्या जाणाऱ्या मट्टानचेरीमध्ये रामायणावर आधारित कथाचित्रे आहेत. त्यांतील दशरथाच्या राण्यांच्या प्रसुतीचे आलेखन हे भारतीय परंपरेमध्ये केवळ अजोड असेच म्हणावे लागेल. अभिमानाने भारलेल्या त्या राण्या-पुत्रांना जन्म देत आहेत, अशा या दृश्यात स्त्रीदेह आणि स्त्रीजीवन यांचा अपूर्व गौरव सामावलेला आहे. दशरथाच्या तिन्ही राण्यांच्या प्रसवसमयीचे सतराव्या शतकात काढलेले हे भित्तीचित्र आहे. इतके धीट भित्तीचित्र आजच्या भित्तीचित्रांत म्हणजे 'ग्राफिटी' मध्येही आढळणार नाही.

भारतात चित्रकलेची परंपरा पुरातन, त्याचबरोबर चित्रकलेच्या शिक्षणाची परंपरा जुनी असावी. 'विष्णुधर्मोत्तर पुराणातील चित्रसूत्रामध्ये चित्रकार कसा असावा या विषयीचे वर्णन येते. जो वायूची चंचलता, अग्निज्वालेचे कंपन, धुराचे उठणारे ढगांवर ढग, पताकांचे फडफडणे, तसेच झोपलेल्या माणसातील चेतना आणि मृताची अचेतना आणि उंचसखलतेचे भेद दाखवू शकतो, तो खरा

कलाकार असे त्यात म्हटले आहे.' (दृश्यकला– संपादक : गुलाममोहम्मद शेख, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई)

**चित्र–शब्दांचा कॅनव्हास**

चित्रभाषा ही जगभरची आहे. लिओनार्डोच्या काळात काय चालले होते, ते पाहू.

धार्मिक कथा चित्रभाषेत म्हणजे रुपात दाखवणे, हाच धागा युरोपमध्येही होता. सर्वसामान्य दर्शक मोठ्या चर्चमध्ये जावो वा छोट्या, तो बायबल मधील कथांनी प्रभावित झाला पाहिजे. ख्रिस्ताचे जीवन त्याच्या नजरेपुढे उलगडले पाहिजे, अशी व्यवस्था धर्म आणि राजसत्तेने करून ठेवली होती. अशी व्यवस्था सत्ता–धार्जिणी असते.

मध्ययुगीन पंडित तसेच धर्म व राज्यसत्तेतील अधिकारी लॅटिनमध्ये लिहीत नि बोलत, पण लिओनार्दोचा काळ यापासून तुटत चालला होता. नागरीकरण सुरु झाले होते. व्यापारी आणि मध्यमवर्गीय यांचा प्रभाव वाढत होता. कारागीर, कुशल कारागीर, हस्तकलाकार यांच्या 'गिल्ड्स', 'संघ' म्हणजे आजच्या युनियन्स बांधल्या जाऊ लागल्या होत्या. याच संधिकालात 'चित्रकलेला कमी लेखू नका, ही विज्ञाना–सारखीच चतुर कला आहे आणि निसर्गाची औरस संतती आहे' हा विचार आचारात आणत लिओनार्दो उभा होता.

**मठातील भोजनालय**

तो काल होता १४९५! इटलीच्या मिलान शहरात सांता मारिया डेले ग्राझि हा ख्रिश्चन भिक्षुंचा मठ आहे. या मठातील भोजनालयाच्या एका भिंतीवर हे चित्र रंगवायचे काम लिओनार्दोवर सोपवले होते. या गंभीर प्रसंगाचे कलाकर्म एका मोठ्या भिंतीवर निर्माण करणे ही मोठी जबाबदारी लिओनार्दोवर होती.

येशू ख्रिस्ताचे हे शेवटचे जेवण त्याच्या बारा शिष्यांबरोबर जेरुसलेम येथे झाले. जेवणाआधी नम्रता, विनयशीलता शिकवण्याकरता येशूने शिष्यांचे पाय धुतले. सगळे शिष्य येशूसह टेबलावर जेवायला बसले. त्या वेळी येशू म्हणाला, 'तुमच्या पैकी एकजण माझा विश्वासघात करेल' जुडास इस्कॅरिऑट याचे नाव पुढे आले. जेवणानंतर येशू ख्रिस्त आणि त्याचे शिष्य माऊंट ऑफ आलिव्हज् येथे गेले. तेथे रात्री येशूला अटक करण्यात आली. पुढे काय घडले, हे सर्वाना ठाऊक आहे. असा हा गंभीर प्रसंग. लिओनार्दोचे हे चित्र म्हणजे, अभिजात कलेचा नमुना मानले जाते. त्या चित्र निर्मितीची गोष्ट कला निदर्शक आहे.


१४९५ साली लिओनार्दोने पेंटिंगला सुरुवात केली १४९८ मध्ये हे चित्र पुरे झाले. भोजनालयाची एक मोठी भिंत चंद्रकोरी सारखी होती, त्या पृष्ठभागावर हे चित्र रंगवायचे होते. हे भित्तीचित्र धार्मिक कथेवर आधारित असले, तरी त्याला धार्मिक विधी दाखवणारे चित्र काढायचे नव्हते, तर प्रत्यक्ष मंडळी जेवायला बसली आहेत, जेवत आहेत, हे दाखवणारे जिवंत चित्र त्याला रंगवायचे होते. ही कथिका कशी दाखवायची, याची पूर्ण मुभा चित्रकाराला असल्यामुळे त्याने त्याचे कसब पणाला लावले. याच कीर्तनावर आधारित त्या काळच्या इतर चित्रकारांनी चित्र काढण्याचा प्रयत्न केला होता, पण तो यशस्वी झाला नव्हता. ज्ञानवारा लागलेला माणूस ज्ञानभैर होतो, अशा माणसामुळे ज्ञानाचा परीघ रुंदावतो. चित्रकर्मीला अभिजाततेचे वारे लागले म्हणजे, तो चित्रभैर होतो आणि त्याच्या चित्रकलेचा परीघ रुंदावतो, सखोल होतो. वारे लागणे, भैर होणे म्हणजे काय? प्रचंड मेहनत! लिओनार्दोने अशी मेहनत केली. तो श्रमवंत होता. या कथालापाची त्याने 'प्रिपॅरट्री स्केचेस' पूर्वतयारीची रेखाटने केली. ही रेखाटने इंग्लंडच्या विंडसर येथील रॉयल लायब्ररीत जपून ठेवली आहेत. यावर त्याने 'एसे ऑन लाइट, शेड अँड परस्पेक्टिव' हा दोन प्रकरणी निबंध लिहिला. म्हणजे प्रकाश, छाया आणि द्विमियतेत त्रीमियतता या बद्दल त्याने त्याचे विचार मांडले होते.

मनुष्याकार हा पूर्वापार पासून चित्रकारांचा आकर्षणबिंदू ठरला आहे. असा मनुष्याकार भित्तीचित्रात उत्तम उमटावा म्हणून लिओनार्दोने अनेक रेखाटने केली. शब्दात ज्याला व्यक्तिमत्व म्हणतात, ते चित्रात आकृतीमत्व होते.

या रेखाटनात त्याने माणसांचे बहुविध हातवारे, हावभाव याचे अनेक नमुने आलेखले. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे, येशू ख्रिस्ताच्या चेहऱ्यावरील भावगंभीरता आणि मनोमयी वेदना दाखवणे, हा त्याचा प्रयत्न होता. प्रत्यक्ष चित्र निर्मिताना सहजता यावी, यासाठी ही प्रयत्न–रेखाटने होती. 'सहजते मागे साहस प्रयत्नांचे', हा वस्तुपाठ चित्रकर्मींच्या पुढील पिढ्यांकरता लिओनार्दोने घालून दिला होता, असे एका कलासमीक्षकाने नमूद करून ठेवले आहे.

**रचनेतील आपसमेळ**

भित्तीचित्र काढताना चित्रकार बांधलेल्या परांचीवर उभे राहून चित्र काढत असतो. भिंत ओली असताना रंगवलेल्या चित्रकर्माला 'फ्रेस्को' म्हणतात. फ्रेस्को या इटालियन शब्दाचा अर्थ फ्रेश–ताजा असा होतो. भिंत सुकल्यावर मग चित्र रंगवणे याला सेस्को



*लिओनार्दो हा सर्वार्थाने श्रमवंत होता. त्याने ‘दी लास्ट सपर’साठी जी प्रिपॅरट्री स्केचेस तयार केली, त्यालादेखील अंतिम चित्राइतकेच जतनमूल्य प्राप्त झाले…*

म्हणतात. या दोन तंत्रात फरक आहे, पण त्यात शिरण्याची गरज नाही. लिओनार्दोचे ‘दी लास्ट सपर’ हे सुक्या भिंतीवर काढलेले चित्र आहे, असे भित्तीचित्राच्या संशोधकांचे म्हणणे आहे.

लिओनार्दो परांचीवर उभा राहून चित्र काढत असे, पृष्ठभाग चंद्रकोरी सारखा बाकदार होता. भिंतीच्या दोन्ही बाजूला खिडक्या होत्या त्यातून प्रकाशाचे झोत आत येत असत. भोजनालयाचे त्या काळचे दिवे हॉलभर होतेच. चित्र दिवसा कसे दिसेल, रात्री दिवेलागणी झाल्यावर कसे दिसेल, चंद्रप्रकाश आत डोकावेल तेव्हा चित्र कसे दिसेल, एकंदरीत छाया प्रकाशाचा खेळ चित्रावर काय प्रभाव पाडेल याचा विचार त्याला सतत करावा लागे.

भित्तीचित्राच्या रचनेतील आपसमेळ म्हणजेच मांडणीतील समतोल साधण्यासाठी त्याने विचाररेखाटने आधीच केली होती. टेबलाच्या मध्यभागी येशू ख्रिस्त बसला होता, एका बाजूला सहा आणि दुसऱ्या बाजूला सहा, असे बारा शिष्य बसले होते. ‘तुमच्यातील एकजण माझा विश्वासघात करेल’ असे दुःखद शब्द येशू उच्चारतो त्यावेळी शिष्यांमध्ये काय घडले असेल, हे सगळे लिओनार्दोला दाखवायचे होते. कधी कधी पुन्हा कुंचला हातात घेण्याआधी दिवस दिवस दोन्ही हाताची घडी घालून तो चित्राकडे बघत बसे. त्याच्या बरोबर असणाऱ्या एकाने हे नमूद करून ठेवले आहे. उगाच नाही हे चित्र पूर्ण करण्याकरता त्याला तीन वर्षे लागली.

पेंटिंगच्या बरोबर मागे मध्यभागी तीन खिडक्या लिओनार्दोने मुद्दाम बसवून घेतल्या होत्या. त्यातून येणारा प्रकाश आणि दोन्ही बाजूच्या खिडक्यांतून येणारा प्रकाश यामुळे येशूच्या मागे निसर्गतःच ‘हॅलो’–‘तेजवलय’ निर्माण होईल, अशी त्याची योजना होती. येशू इतरांपेक्षा वेगळा दाखवण्याकरता कोणताही धार्मिक ‘सिम्बॉल’ ‘चिन्ह’ न वापरता लिओनार्दोने हे साधले आहे, असे कलासमीक्षकाने लिहून ठेवले आहे. ‘आपल्यापैकी कोण येशूचा विश्वासघात करेल’ हे ऐकण्यास उतावीळ झालेल्या शिष्यांचे हातवारे दाखवण्यात लिओनार्दो यशस्वी झाला आहे.

**कालातीत कलानुभव**

अभिजात कलाकृतीचा अनुभव म्हणजे, त्या चित्रातील अनुभवाची दर्शकाची पुनर्निर्मिती असते. चित्र बघून दर्शकाचे डोळे पाणावतात वा आनंदतात, जेव्हा तीच वेदना किंवा आनंद चित्रकर्मीला चित्र रंगवताना झाली असेल तरच हे घडते. असा अनुभव दर्शक ख्रिश्चन भिक्षुंना आला आणि पुढे अनेक वर्षे भाविकांना येत राहिला. याचे श्रेय निर्मिक लिओनार्दोला आहे. १४९८ साली त्या मठातील भोजनालयात ‘ख्रिस्ताचे शेवटचे भोजन’ हे चित्र खुले करण्यात आले तेव्हा ख्रिश्चन भिक्षुंची काय स्थिती झाली असेल याचे वर्णन पाश्चात्य कलेचे इतिहासकार इ. एच. गॉम्ब्रिच (१९०९–२००१) यांनी केले आहे त्याचा भावाशय ‘पेंटिंग खुले केल्याबरोबर हॉलच्या अवकाशात चित्राचा अवकाश असा काही मिसळून गेला आणि हॉलचाच भाग बनला. भिक्षूंच्या टेबला जवळच येशू आणि त्याचे शिष्य यांचे टेबल आहे. येशूच्या जीवनातील हा प्रसंग इतका जवळ स्पर्शाळू घाटाने त्यांच्याकरता जणू जिवंत होत होता. चित्रातील खिडकीतून दिसणारी पसरलेली उंचसखल हिरवळ, झाडाझाडूल्ला आणि टेबलावर पडणारा प्रकाश, यामुळे चित्रातील मनुष्याकाराला एक घनता प्राप्त झाली होती. टेबलावर टेबलक्लॉथ पांघरला होता त्यावर डिशेस ठेवल्या होत्या, पांघोळलेल्या टेबलक्लॉथला पडलेल्या मोहक चुण्या, हे मोहजाल अगदी जिवंत होते. पण त्या पेक्षाही अर्थपूर्ण होता, लिओनार्दोने घेतलेला बिब्लिकाल घटनेचा वेध. शिष्यांचा उडालेला गोंधळ, वेदनेने पिळवटलेला पण शांतगंभीर येशू ख्रिस्त. पूर्वी त्यांनी या विषयावरची चित्रे पाहिली होती, पण असे चित्र अनुभवले नव्हते.’

या भित्तीचित्राच्या अनेक प्रतिकृती युरोप–अमेरिकेतील चित्रालयात बघायला मिळतात. पण ज्या दर्शकांना हे संकीर्तन माहीत नाही, त्यांना हे चित्र आवडेल का? कोणत्याही ललितकृतीचा इतिहास, तिच्या निर्मिकाचे नाव, जीवन, कुळकथा वगैरे माहीत नसले तरीसुद्धा ती कलाकृती भावली तर ती अभिजात ठरण्याची शक्यता असते. म्हणजे कोण म्हणतो,

त्या पेक्षा काय म्हटले आहे याला महत्त्व. हा अभिजाततेचा एक निकष आहे. हे चित्रकृतींनाही लागू आहे.

लिओनार्दोच्या या भित्तीचित्राची रचना, त्यातील संतुलन आणि त्यातील चित्रघटक सहजतेने आले आहेत. चित्रातील मनुष्याकृतीने जुळून आलेला आकृतीबंध विलोभनीय आहे. माणसांचे हातवारे, हावभाव अभ्यासकांकरता अर्थपूर्ण आहेत. असे कलासमीक्षकांनी लिहिले आहे.

**जीर्णोद्धार**


हवामानातील उलथापालथीने पेंटिंग अनावृत्त झाल्यानंतर पहिल्या दशकातच चित्रात सूक्ष्म बदल होऊ लागले. पेंटिंग पूर्वस्थितीला आणण्यासाठी अनेक खटपटी केल्या गेल्या. मायकेल अँन्जेलो या सुप्रसिद्ध चित्रकाराने सुद्धा प्रयत्न केले. लिओनार्दोच्या 'दी लास्ट सपर' या पेंटिंगला ५०० वर्षाहून जास्त वर्षे होऊन गेली आहेत. चित्राच्या जीर्णोद्धाराचा इतिहास पेंटिंगच्या इतिहासाइतकाच उद्‌बोधक आहे. १९७८ साली चित्राच्या जीर्णोद्धाराला सुरुवात झाली, ती अजून चालू आहे.

१९०८ मध्ये स्थापन झालेल्या ऑलिव्हेट्टीनामक इटालियन कंपनीने यासाठी पैसा ओतला तसेच वैज्ञानिक साधने आणि मनुष्यबळ उपलब्ध करून दिले. (माझ्याकडे ऑलिव्हेट्टीचा टाइपरायटर होता त्याची या निमित्ताने आठव झाली.) या जीर्णोद्धारावरचे शोधनिबंध कॉन्फरन्समध्ये वाचले गेले. चित्राचा मूळ रंग त्यानंतर वापरलेले रंग, विविध प्रकारचे गोंद, त्यात उबवलेली बुरशी, अशा अनेक चलपदांचे सूक्ष्मदर्शक वापरून विश्लेषण करण्यात येत होते. सगळ्यात महत्त्वाचे होते, ते पेंटिंग ज्या हॉलमध्ये आहे, तेथील हवामान पर्यावरण, हवेत तरंगणारे सूक्ष्मकण. हिवाळा आणि उन्हाळा यातील तापमानात खूप फरक असतो. हजारो दर्शक येत असतात. त्यामुळे हा शोधाभ्यास काही वर्षे सुरू होता. हॉलमधील 'मायक्रो क्लायमेट', 'सूक्ष्म-हवामान', 'मायक्रो पार्टिकल्स', 'सूक्ष्म-कण' आणि 'मायक्रो-करंट्स', 'हवेचे-सूक्ष्म प्रवाह' याच्या दीर्घकालिक नोंदी करण्यात आल्या. याला 'Anemometric Measurements'- 'पवनमापी' म्हणतात. हवेत तरंगणारे सूक्ष्म-कण हवेतील सूक्ष्म प्रवाहातून वाहत जाऊन पेंटिंगवर येऊन आदळतात आणि पेंटिंगचे सर्वात जास्त नुकसान करतात, असे या संशोधनात आढळले. असे घडू नये म्हणून यंत्रणा उभारण्यात आली आहे. इतक्या वैज्ञानिक पद्धतीने पेंटिंगच्या सुरक्षिततेचे आणि जीर्णोद्धाराचे काम चालू आहे, हे ऐकून चित्रवैज्ञानिक लिओनार्दो समाधान पावला असता.

**चित्रनजरण्याचे मेंदूविज्ञान**

'लिओनार्दो दिवस दिवस काढत असलेल्या भित्तीचित्राकडे नुसता बघत उभा असे. मग एका क्षणी हातात कुंचला घेऊन पुन्हा चित्र काढण्यास सुरुवात करत असे' हे वाचल्यावर माझ्यातील मेंदूविज्ञानाचा अभ्यासक जागा झाला. चित्र-संग्रहालयात अभ्यासक तासन्‌तास एकाच चित्राकडे बघत असतात, याचा शोध पॅरिस येथील बोधनाच्या मनोवैज्ञानिकानी घेतला आहे, त्याची आठवण झाली. त्याचा मगज असा एखाद्याने एका प्रतिमेकडे काही क्षण बघितले, तर मेंदूतील फक्त व्हिज्युअल कॉर्टेक्समधील काही भाग उजळून निघतो. असे मेंदूच्या स्कॅनिंगमध्ये दिसते. म्हणजे तेवढाच भाग उद्दीपित होतो. पण जसजसा अभ्यासक जास्त वेळ त्याच प्रतिमेकडे बघत राहातो, तसतसे मेंदूतील बहुविध भाग उजळू लागतात. हे 'ॲक्टिवेशन' मेंदूतील केंद्रोपकेंद्रात पसरते आणि व्हिज्युअल कॉर्टेक्समध्ये माघारी येते आणि पुन्हा पसरू लागते. याचा अर्थ, जेव्हा अभ्यासक लक्षपूर्वक त्या प्रतिमेकडे बघत राहतो, तेव्हा मेंदू ती माहिती वेगवेगळ्या भागांकडे पाठवून त्यांना कामाला लावतो. हे मेंदूच्या स्कॅनिंगमध्ये अगदी स्पष्ट दिसून आले. हा कॉन्शस-जाणिवेच्या पातळीवरचा अनुभव असतो. मात्र अभ्यासक एखाद्या प्रतिमेकडे फक्त काही क्षण बघतो, तेव्हा छोटेसे ॲक्टिवेशन होते. ते काही मर्यादेपर्यंतच असते. मेंदू त्याची दखल घेतो, पण ती नेणिवेत. त्याची जाणीवही होत नाही. तो कॉन्शस अनुभव नसतो. कॉन्शस अनुभव घेण्यासाठी त्या चित्राकडे बराच वेळ पाहावे लागते. यालाच रोजच्या भाषेत आपण 'डोळ्यात साठवून घेणे' म्हणतो. ते खरे 'डोक्यात-मेंदूत' साठवून घेणे असते. लिओनार्दो दिवस दिवस पाहात असे, तेव्हा तो हेच करत असे. त्याच्या मेंदूतील अनेक स्मृतीवर येत असतील, त्याला आणखी काही गोष्टी, बिब्लिकल कथा आठवत असतील आणि मग एका क्षणी तो कुंचला हातात घेऊन रंगवायला सुरुवात करत असेल. माझ्या डोळ्यांपुढे हे दृश्य तरळून गेले. चित्रकर्मीच्या चित्र काढतानाच्या मेंदूतील काही प्रक्रिया पाहिल्या.

आता दर्शक हे भित्तीचित्र नजरताना काय घडते ते पाहू. एवढे मोठे भित्तीचित्र माणूस एका नजरेत पाहू शकतो. याला कारण म्हणजे, डोळ्यांची एका बिंदूवरून दुसऱ्या बिंदूकडे





*देशाची संस्कृती आणि चित्रांचा इतिहास यांचा पुस्तकरुपी दस्तावेज आणि मट्टानचेरी येथील दशरथाच्या राण्यांच्या प्रसुतीचे आरेखन करणारे सतराव्या शतकातील धीट भित्तीचित्र...*

होणारी अत्यंत जलद हालचाल. याला saccades– सॅकेड्स म्हणतात. ही मानवी शरीरातील सगळ्यात वेगवान हालचाल मानली जाते. दृश्यपटलातील महत्त्वाचा भाग म्हणजे, 'fovea', या मध्यवर्ती भागावर दृश्य आल्यावर त्याचे मेंदूला दृष्टी ज्ञान होते. या झटकेदार हालचालीची गती कॅमेऱ्यापेक्षा जास्त असते. या सततच्या डोळ्यांच्या हालचालींमुळे सबंध चित्र नजरेत मावते. जेव्हा दर्शक वेगाने जाणारी मोटार बघतो किंवा आकाशात उडणारे पाखरू बघतो, तेव्हा वस्तू गतिमान असते. पण स्थिर चित्र बघताना डोळ्यांच्या झटकेदार हालचालीमुळे ते चित्र सगळ्या दृष्टी पटलावर फिरते. येथे चित्र स्थिर आहे आणि डोळ्यांची हालचाल होत आहे, हे मेंदू ओळखतो. कारण गतिमान वस्तू बघण्याची मेंदूतील दृष्टी केंद्रे वेगळी असतात. स्थिर वस्तू बघण्याची मेंदूतील दृष्टी केंद्रे निराळी असतात. डोळे दोनच, पण भवतालातील गतिमान आणि स्थिर वस्तू एकाच वेळी समजण्याची मेंदूची क्षमता विलक्षण आहे. त्याच्यातील काही थोडा भागच समाजाला आहे, बराच भाग अजून उमजायचा आहे, असे मेंदूवैज्ञानिकांनी नमूद केले आहे.

एखादी कथा, कादंबरी, कविता, पुन:पुन्हा वाचताना त्याचा अर्थ वाचकाला दर वेळी निराळा लागू शकतो, कारण दर वेळी वाचकाचा मेंदू अनेक चलपदांमुळे सूक्ष्मतेने बदलेला असतो. तसेच चित्राबाबतही आहे. तेच चित्र पुन्हा पाहताना दर्शकाला निराळा कलानुभव येण्याची शक्यता असते.

लिओनार्दो परांचीवर उभा आहे आणि हाताची घडी घालून भित्तीचित्राकडे बघत आहे, त्यावेळी त्याच्या मेंदूत कोणते विचार रुंजी घालत असतील, याची कल्पना मी करत होतो, तेव्हा कवी सुरेश भट यांच्या दोन ओळी फक्त एक शब्द बदलून मला आठवल्या ''माझिया 'चित्रांत' वेडे/दु:ख संतांचे भिनावे', (सुरेश भट यांची निवडक कविता संपादन व प्रस्तावना, शिरीष पै मुखपृष्ठ साहित्य प्रसार केंद्र सीताबर्डी, नागपूर ४४० ०१२ पाचवी आवृत्ती २०१०)

...आणि लिओनार्दोने पुन्हा कुंचला हातात घेतला असेल.

**व्यवसायाने हृदयरोग तज्ज्ञ असलेले डॉ. आनंद जोशी हे मराठीतले नामवंत विज्ञानलेखक, ललितलेखक आहेत. 'बोलकी हाडे', 'मेंदूतला माणूस', 'कर्कविज्ञानाची गोष्ट', 'अक्षर पाविजे निधरि', 'व्यूहचक्र', 'आपले वर्तन, आपला मेंदू' (सहलेखक सुबोध जावडेकर) 'ऑर्वेलच्या अवतीभोवती' ही त्यांची प्रकाशित झालेली पुस्तके आहेत.**


**ई मेल :** drjoshianand628@gmail.com

# राधा : लौकिक, अलौकिक नि पारलौकिक विश्वाची अनोखी सांगड




डॉ. नेहा सावंत

काव्यगत संवाद



पु. शि. रेगे




**पु.** शि. रेगे यांची राधा  ही कविता म्हणजे राधेचं मनोगत आहे. या मनोगतातून राधेने आपले 'इथल्या' आणि 'तिथल्या' म्हणजेच लौकिक आणि पारलौकिक जीवनाशी असलेलं नातं विषद केलं आहे. पौराणिक वातावरणाचे, कृष्णयुगाचे यात संदर्भ आले आहेत. या कवितेतील राधा अतिशय निर्मल, कोमलवृत्तीची, संवेदनशील अशी आहे...

# राधा

मी नच इथली;
नव्हतेच कधी मी इथली
मन माझे गुंतुन पडले
ती सुरावलीहि न इथली.
वाऱ्यावर पाऊल माझे,
अन् पानापानावरती
थरथरते हृदयच माझे.
निजले,
नभ जळात जे बिंबले,
ते जळ या डोळा भिजले...

नव्हतेच कधी मी इथली.
मी राधा
मी एक तृणाचे पाते;
त्या पात्यावरचा दंवबिंदू;
त्या दंवबिंदूतिल इंद्रधनू,
मी माझिच बाधा.
मी असून नुरले उरले...
नव्हतेच कधी मी इथली.
अवचित परि मज शैशव माझे भेटे
अनुपम, लाडेवाडे
झेपावत कंठी हात,
गालांवर जुळवित गाल–
ज्या रीत न ठाउक काही,
ठाउक ज्या सारे काही.
ती श्यामल मूर्त मनोहर
धरधरून हृदयाशी मी–
मी हरले,
मी हरले, बुडले, तरले
जी नव्हते कधीच इथली
अन् येता, जाता, उठता, बसता
ते हास्य खेळते आता उरी;
डोळ्यांत नाचती
त्या लास्याच्या लहरी...
जय जय कृष्ण हरी
जय जय कृष्ण हरी
ते गोकुळ, त्या गाई, ते मेळे,
ती यमुनेची फुसलावणि,
अन् एकली एक मी राणी,
राणी–
कारण हृदय न पंजर माझे;
मी शकतच नाही बांधू
जग भोवतालचे,
शब्द कुणाचा–
मी शकतच नाही बांधू
हृदय न पंजर माझे.
अन् नकळे
म्हणुनिच का ते मधुकोषच ऐसे बनले...
मी ठायी ठायी उरले;
मी केवळ इथली झाले.

– पु.शि.रेगे सुहृद्‌गाथा, संपादक गंगाधर पाटील
(कॉन्टिनेन्टल प्रकाशन)

मराठी काव्यविश्वात १९४५ च्या दरम्यान मूलगामी परिवर्तन झाले, नवकवितेचा एक नवाप्रवाह उदयाला आला. तर १९६० नंतर या प्रवाहाचा दुसरा टप्पा सुरू झाला. या नवकवितेवर बा.सी.मर्ढेकर यांचा विशेष ठसा उमटलेला होता. या कालखंडात नवकवितेच्या प्रभावातून रोमँटिक परंपरा जपणाऱ्या कवींमध्ये उल्लेखनीय कवी होते, पुरुषोत्तम शिवराम रेगे. साधना आणि इतर 'कविता', 'फुलोरा', 'हिमसेक', 'दोला', 'गंधरेखा', 'पुष्कळा', 'दुसरा पक्षी', 'स्वानंदबोध' आणि 'प्रियाळ' हे त्यांचे काव्यसंग्रह प्रकाशित आहेत. रेग्यांच्या कवितेने मनावर गारूड केलं, ते पदव्युत्तर शिक्षण घेत असताना.

एम.ए.च्या तासांना प्राध्यापक गंगाधर पाटीलसर साहित्य समीक्षेतील आस्वाद, अर्थानिर्णयन, मूल्यमापन या प्रक्रिया समजावून सांगताना तसेच रूपवादी समीक्षा, आदिबंधात्मक समीक्षा शिकवताना पु. शि. रेगे यांच्या कविता उपयोजनासाठी

घेत असत. 'पुष्कळा', 'पाहिले न पाहिले', 'त्रिधाराधा' अशा अनेक कविता त्यांनी मुळातून शिकवल्या. समीक्षा समजून घेण्यापेक्षा त्यांची कविता शिकवण्याची पद्धत अधिक भावत होती. कधी कालिना येथे दुपारी, तर कधी फोर्ट विभागात अनेकदा सकाळी तास होत असत. तास संपला की मैत्रिणींसोबत रमतगमत चालताना सोबतीला असायची वर्गात शिकवलेली ताजी ताजी पु. शि. रेगे यांची कविता. कितीतरी कवितांची पारायणं करीत होतो, त्या काळात. पुढे मी अध्यापनाच्या क्षेत्रात आले आणि एक दोन वर्षातच 'सुहृदगाथा' हा पु. शि. रेगे यांचा काव्यसंग्रह अभ्यासक्रमात लावला होता. वर्गात कविता शिकवणं हे आव्हान होतं खरं, परंतु या कविता शिकवण्याचा आनंदच वेगळा होता. आजही त्यांच्या कितीतरी कविता मनात रूंजी घालताहेत. त्यातलीच एक कविता म्हणजे, 'राधा'. आजही अर्थाचे विविध पदर ही कविता उलगडवित जाते.

**बहुपदरी राधा**

प्रेमकविता हा पु. शि. रेगे यांचा प्रकृतिधर्म. रेगे यांची कविता एकीकडे आत्मलक्ष्यी तर दुसऱ्या बाजूने ती सौंदर्यलक्ष्यी आहे. स्त्री हे त्यांच्या कवितेचे केंद्र आहे. स्त्री सौंदर्य, स्त्रीचे विविध विभ्रम, तिचे विविध भाव हे सारे घटक त्यांच्या कवितेत येतात. निसर्ग सौंदर्य ही त्यांच्या मनाला सतत भुरळ घालत असते. सौंदर्याबरोबरच प्रणय, शृंगार, रतिभाव हे देखील त्यांच्या कवितेत विलक्षण नजाकतीने येतात. कदाचित म्हणूनच ही कविता सौंदर्यलक्ष्यी आहे. जशी रतिक्रीडा तशीच शब्दक्रीडा किंवा शब्दलाघव, नवीन नवीन शब्दांचे उपयोजन हे त्यांच्या कवितेचं विशेष वैशिष्ट्य सांगता येतं.

मूलतः नव्यानेच तयार केलेले शब्द, ज्यांना मूळचा असा काही अर्थ नसतो, परंतु तो त्यांच्या कवितेत आल्यामुळे त्याला अर्थसघनता प्राप्त होते आणि कवितेचे सौंदर्यही वाढतं उदाहरणार्थ; झनन झांजरे, ठिबक ठाकडे, बहर बावरे किंवा पुष पुष्कळावंती, पुष्कळ पुष्कळ पुष्कळणारी, महिरपले, लाजभिऊ शेला इ. एखाद्या अमूर्त अनुभवालाही अशा शब्दांमुळे मूर्तरूपात साकारतात. अशा तऱ्हेच्या या शब्दलाघवामुळेही त्यांची कविता त्यांच्या समकालीन कवींच्या तुलनेत वेगळी ठरलेली दिसते.

**जीवनोत्कट काव्यप्रभा**

स्त्री हा रेग्यांच्या कवितेचा केंद्रबिंदू असला, तरी लौकिक आणि पारलौकिक जीवनाचेही उत्कट असे नाते त्यांच्या कवितेत दिसते. लौकिक जीवनातील स्त्री आणि पारलौकिक जीवनातील स्त्री किंवा पुराणयुगातील स्त्री उदाहरणार्थ राधा, अहिल्या, उर्वशी, मेनका अशा कितीतरी स्त्रिया त्यांच्या कवितेच्या केंद्रस्थानी दिसतात. राधाकृष्ण हे तर त्यांच्या कवितेचं खास वैशिष्ट्य म्हणावं असं आहे. कारण ही जोडी प्रेम भावाचं प्रतीक मानली जाते, त्यामुळे राधा, राधा कृष्ण हे मिथक त्यांच्या कवितेत वारंवार येताना दिसते. राधा या एकाच विषयावर त्यांनी अनेक कविता लिहिल्या आहेत. उदा,– 'बुंथी', 'संग', 'त्रिधाराधा', 'द्वारिकेत राधिका', 'चांपेयाची पिवळी पवळण' इत्यादी. एकाच विषयावरील या कविता असल्या तरी त्यात तोच तोचपणा दिसत नाही. राधेवर आधारित असलेल्या सगळ्याच कवितांनी माझ्या मनाला भुरळ घातली आहे, म्हणून 'राधा' हीच कविता मला जशी भावली तशी उलगडून सांगण्याचा हा प्रयत्न.

**एकरुपतेचे प्रतिबिंब**

पु. शि. रेगे यांची राधा ही कविता म्हणजे राधेचं मनोगत आहे. या मनोगतातून राधेने आपले 'इथल्या' आणि 'तिथल्या' म्हणजेच लौकिक आणि पारलौकिक जीवनाशी असलेले नातं विषद केलं आहे. पौराणिक वातावरणाचे, कृष्णयुगाचे यात संदर्भ आले आहेत. या कवितेतील राधा अतिशय निर्मल, कोमलवृत्तीची, संवेदनशील अशी आहे. म्हणूनच ती म्हणते–

**मी नच इथली.**
**नव्हतेच कधी मी इथली.**
**मन माझे गुंतून पडले**
**ती सुरावलीहि न इथली**

येथे राधेने थेटपणे कृष्णाचा किंवा बासरीचा उल्लेख केलेला नसला, तरी ती ज्या सुरावलीत गुंतून पडली आहे, ती निश्चितच कृष्णाच्या बासरीची सुरावली असणार हे सहज कळून येते. त्या सुरावलीचे विश्वही इथले नाही, तर ते तिथले म्हणजेच अलौकिक, पारलौकिक आहे. ही सुरावली ज्याची आहे, तो कृष्णही पारलौकिक विश्वातील आहे. येथे कृष्ण ही प्रतिमा जशी आध्यात्मिक, पारलौकिक आहे, तशीच ती राधेच्या मनातील आंतरिक पुरुष प्रतिमा देखील आहे. ही प्रतिमा अर्थातच प्रेमाची जशी आहे, तशीच ती भक्तीचीही आहे, त्यामुळे भक्ती आणि प्रेम या पार्श्वभूमीवर ही राधा देखील पारलौकिक, आध्यात्मिक जगातीलच ठरते.

ही राधा निसर्गाच्या विविध विभ्रमात तद्रूप झाली आहे.



*पु.शि. रेगे यांनी राधा या कवितेतून राधेचा मानवी रुपाकडून अशारीरी रुपापर्यंतचा प्रवास मुक्तावस्था दर्शवणारा प्रवास विलक्षण तरलतेने रेखाटला आहे...*

वाऱ्याच्या लयीतच तिची चाल एकवटलेली आहे. इवल्याशा पानांच्या थरथरीत तिचे हृदय सामावले आहे. येथे पानांची थरथर आणि हृदयाची थरथर किंवा हृदयाचे धडधडणे या दोन क्रियांमध्ये नाजुक साम्य दर्शवले आहे. इतकेच नव्हे, तर जलाशयात जे आकाशाचे प्रतिबिंब आहे, तेच राधेच्या डोळ्यांतल्या जळात आहे. हा तरल अनुभव घेणारी राधा निसर्गाच्या रंध्रारंध्रांत सामावलेली आहे, म्हणूनच राधा जेव्हा म्हणते 'मी नच इथली' त्यावेळेला तिला इथल्या जगाचे वेगळेपण नोंदवायचे आहे. हे जग  इहवादी आहे, लौकिक आहे. ते माणसांच्या कोलाहलाने व्यापलेले आहे, अशा विश्वात तिचे मन रमणे शक्यच नाही. तिचे मन अलौकिक विश्वात रमणारे आहे, म्हणूनच तिला निसर्ग अधिक जवळचा वाटतो; कारण निसर्गातल्या सूक्ष्मातिसूक्ष्म गोष्टींमध्येही ती आपले अस्तित्व शोधते. म्हणूनच या कवितेतील राधा आपली ओळख करून देताना, आपली प्राथमिक अवस्था विशद करताना म्हणते–

**मी राधा**
**मी एक तृणाचे पाते;**
**त्या पात्यावरला दवबिंदू;**
**त्या दवबिंदूतील इंद्रधनु,**
**मी माझीच बाधा.**

येथे 'मी राधा' असे म्हणताना तिचे मानवी देहधारी स्थूल (जाडेपण नव्हे) रूपच ती सांगते. 'मी एक तृणाचे पाते' असे म्हणताना त्या तृणाच्या पात्याचे तरल, कोमल, नाजूक स्वरूप ती सांगते. केवळ पातेच नाही तर पात्यावरला दवबिंदू म्हणजे पात्याहूनही त्याचे स्वरूप अधिक तरल व सूक्ष्म हे ती सूचित करतेच; पण त्या दवबिंदूतील इंद्रधनु म्हणजे, सूक्ष्मातिसूक्ष्म अवस्था, त्यातील सौंदर्य  ती व्यक्त करते.

**तत्त्वज्ञानात्मक सौंदर्यस्थळे**

योग तत्त्वज्ञानाच्या भाषेत मानवी देहाच्या अष्टसिद्धी सांगितल्या आहेत. (अणिमा, महिमा, लघिमा, गरिमा, प्राप्ती, प्राकाम्य, इशता, वशिता) त्यातील सूक्ष्मरूप म्हणजे अणिमा, तर 'वाऱ्यावरती पाऊल माझे,' पानापानवरती थरथरते हृदयच माझे असे म्हणताना हलकेपण व्यक्त करते, ही हलकेपणाची अवस्था म्हणजे लघिमा अवस्था. ही अवस्था म्हणजेच लौकिकाहून वेगळी पारलौकिक अवस्था म्हटली जाते. तर विशाल रूप म्हणजे महिमा ही अवस्था, जी स्थुलाकार, विश्वव्यापीही असू शकते. याचाच अर्थ राधा ही वास्तवात स्थूलरूप म्हणजेच मानवी देहरूप धारण करते आहे, तशीच ती दवबिंदूतील इंद्रधनुचे सूक्ष्मरूपही धारण करणारी आहे, म्हणूनच ती पारलौकिक आहे. योग तत्त्वज्ञानातील अष्टसिद्धी मधल्या अणिमा, लघिमा व महिमा या तीन अवस्था राधेने निसर्गरूपात धारण केलेल्या दिसतात. (अर्थात हा मला जाणवलेला अर्थ आहे. तो सर्वांना पटेलच असे नाही आणि तो पटावा असा माझा आग्रहही नाही.)

दुसऱ्या बाजूने विचार करता येथे आलेली कृष्ण ही प्रतिमा आध्यात्मिक तसेच आंतरिक मनातील पुरुष प्रतिमा आदिबंध (अनिमस) म्हणूनही आलेली दिसते. मुळात राधा ही एकाकार आणि एकरूप झाली आहे ती कृष्णाशी. कृष्णाचे हे रूप विश्वव्यापी आहे, तो चराचरात व्यापून उरलेला आहे, त्यामुळे तो तृणाच्या पात्यामध्ये आहे आणि दवबिंदूच्या इंद्रधनुतही आहे या इंद्रधनुशी ती एकरूप झालेली आहे, म्हणजेच सूक्ष्म रूपातील कृष्णाशीही ती एकरूप झालेली आहे असंच येथे कवीला सूचित करायचे आहे का? म्हणजेच कृष्ण जसा विश्वव्यापी स्थूलकाय आहे तसाच तो दवबिंदूतील इंद्रधनुत सामावणारा, सूक्ष्म देहाकार रूपही आहे. याच स्थूलाशी आणि

सूक्ष्माशी राधेच मनोमिलन झालेलं आहे आणि म्हणूनच अशा विश्वात रमणारी राधा, आपलं इहलोकातील, लौकिक जीवनातील अस्तित्त्व नाकारते.

'राधा' या कवितेतही रेगे यांच्याच 'त्रिधाराधा' या कवितेप्रमाणेच राधेच्या आयुष्यातील तीन टप्पे, तीन अवस्था सांगितलेल्या आहेत. पहिली अवस्था, देहरूपातून निसर्गाच्या सूक्ष्म रूपात प्रतिबिंबित झालेली. ती म्हणते– **मी असून नुरले उरले**, म्हणजेच देहरूपाने असूनही या निसर्गात तद्रूप, असून नसल्यासारखीच माझी अवस्था झाली आहे. 'नव्हतेच कधी मी इथली' असे म्हणताना तिला निसर्गाच्या अलौकिक रूपातच आपण कायम विरून गेल्यामुळे या इहवादी, लौकिकजगात कधीच नव्हते ते ती ठासून सांगते.

**मंत्रमुग्ध भावप्रदेश**

शैशव किंवा बाल्यावस्था ही निर्मळ, निरागस, निस्वार्थ भावाचे प्रतीक असते. एकार्थाने शैशव ही अवस्थाही अलौकिक म्हणावी अशीच आहे. म्हणूनच राधेला तिचे शैशव आठवते. शैशवाला लगटूनच शामल मूर्त म्हणजेच कृष्ण सख्याची संगत आठवते. त्यामुळे जशी ती निसर्गात विरून जाते तशी ती कृष्णाच्या संगतीतही विरून जाते. म्हणूनच कृष्णाच्या आठवणी पर्यायाने तिच्या अवखळ बाल्याच्या आठवणी ती हृदयाशी जपते. या कृष्णाने तिचे हृदय चोरले आहे, म्हणूनही ती तिची अशी स्वतःची राहिलीच नाही. कृष्ण सख्याच्या प्रेमात आठवात ती बुडून गेली आहे, पण त्यातच तरलीही आहे. जशी निसर्गाच्या सहवासात 'असून नुरले उरले' अशी तिची अवस्था झाली आहे, तशीच कृष्णाच्या या पारलौकिक जगातही ती बुडून तरली आहे.

या ठिकाणी कवीने विरोध दर्शविणारी क्रियापदे वापरून नेमका भाव अधोरेखित केला आहे. जसे की उरले नुरले, बुडले तरले इ. येथे राधाकृष्णही प्रेमभावाचे प्रतिमा म्हणून आलेली आहे, तर त्याची मुरली, मुरलीच्या स्वरलहरी आणि आजूबाजूचे वातावरण, निसर्ग म्हणजेच गोकुळ, बासरी, गाईगुरे, यमुना नदी, वृंदावन हे सर्व पौराणिक घटक राधा कृष्णाच्या प्रेमभावनेच्या वातावरण निर्मितीसाठी आलेले दिसतात. त्यामुळेच येथे राधा आणि कृष्ण या आदिबंधात्मक प्रतिमा म्हणूनही महत्त्वाच्या ठरतात.

राधेच्या आयुष्यातील तिसरा टप्पा म्हणजेच बालपणातून तारुण्यात आलेली अवस्था. अर्थात हे तारुण्य म्हणजेही एक अलौकिक भावविश्वच. तारुण्यातील चंचलवृत्ती व्यक्त करताना राधा म्हणते–

**जी नव्हते कधीच इथली**
**अन् येता, जाता, उठता बसता**
**ते हास्य खेळते आता उरी;**
**डोळ्यात नाचती**
**त्या लास्याच्या लहरी.**
**जय जय कृष्ण हरी**
**जय जय कृष्ण हरी.**

येथे हास्य खेळते, लास्याच्या लहरी या शब्दातून तारुण्यवस्था व्यक्त करतानाच ती कृष्णाशी भावभक्तीनेही एकरूप झाल्यामुळे, जयजय कृष्ण हरी असा कृष्ण नामाचा जप करते. येथे ती पौराणिक जगातून पुन्हा भक्तीच्या, अध्यात्माच्या, अलौकिक भावविश्वात प्रवेश करते.

**अथांग नि उन्मुक्त**

या कवितेतील हा पुढचा टप्पा म्हणजेच पौराणिक भावविश्वाचे वातावरण रेखाटणारा आहे. यमुना, गोकुळ, मेळे, गाई असे सगळे कृष्णयुगाचे, कृष्ण जीवनाचे म्हणजेच गोकुळाचे संदर्भ आले आहेत. त्या वातावरणाशी तर राधेचे निकटचे नाते आहेच, कारण त्या साऱ्या वातावरणात तिला राज्ञीपण मिळाले होते. पण आता राधा या साऱ्यातून मुक्त होऊन त्या आठवणी मनात घोळवतेय. गोकुळातल्या वातावरणातून ती मुक्त झाली आहे, अलिप्त झाली आहे. म्हणूनच कोणालाच आपल्या हृदयाच्या पिंजऱ्यात बांधू इच्छित नव्हती. ना कोणाचा शब्द ना भोवतालचे जग. राधेचीही तिसरी अवस्था म्हणजे मुक्त मनाची अवस्था आहे. पारलौकिकाच्याही पलीकडली अशी उन्मुक्त, उन्मनी अवस्था आहे, मुक्त म्हणजे इथे, तिथे, कुठेही. म्हणूनच साऱ्यातच सूक्ष्मरूपाने सम्मिलित झालेली. अशी विचित्र अवस्था तिने व्यक्त केली आहे. त्यामुळेच इथल्या तिथल्या विश्वातून मुक्त होऊनही सर्वत्र व्यापून उरलेले आहे, म्हणजेच सर्वत्र असूनही नसल्यासारखी आणि नाही म्हणावं, तर सर्वत्र सूक्ष्मरूपाने विराजलेली. येथेही योग साधनेच्या भाषेत सांगायचे झाल्यास सूक्ष्म रूपातून आता अवकाश व्यापी अथांग रूपात ती सामावली आहे, म्हणूनच ती म्हणते–

**म्हणूनिच का ते मधुकोषच ऐसे बनले**
**मी ठायी ठायी उरले;**
**मी केवळ इथली झाले.**

हे हृदयही आता स्वतःचे उरले नाही, ते मधुकोषच बनले आहे, असे राधेला वाटते. ती आता चराचरातच व्यापलेली आहे, म्हणूनच ती म्हणते मी केवळ इथलीच झाले आहे. म्हणजेच अद्वैताच्या पलीकडे जाऊन या विश्वाशी एकाकार झाली आहे. साऱ्यातून मुक्त होऊन अधिक आनंदावस्थेला पोहोचली आहे, असं तर तिला सुचवायचं नाहीये ना?

भारतीय तत्त्वज्ञानानुसार, योगशास्त्रात म्हटल्याप्रमाणे मानवी अस्तित्वाचे पाच टप्पे सांगितले जातात. अन्नमय कोष, प्राणमय कोष, मनोमय कोष, विज्ञानमय कोष आणि आनंदमय कोष. मनाची विमुक्तावस्था म्हणजेच निरिच्छ, निरपेक्ष मनाची अवस्था. ही आनंदावस्थाच असते. राधा भौतिक जगातून, पारलौकिक जगातूनही मुक्त होऊन आनंदवस्थेला पोहोचली आहे, म्हणूनच तिला आपलं मन मधुकोष झाल्यासारखे वाटते. या मधुकोषाच्या रूपाने, आनंदाच्या रूपाने आपण सर्वत्रच आहोत म्हणजेच इथे, तिथे सर्वत्रच आहोत असं ती सूचित करते.

एकंदरीतच या कवितेतून राधेचा मानवी रूपाकडून अशारीर रूपापर्यंतचा प्रवास, तसेच भावविश्वातून भक्ती विश्वातला, तसेच मुक्तावस्थेचा प्रवास रेखाटलेला दिसून येतो. अतिशय साध्या सोप्या शब्दांतून कोणतीही शब्दक्रीडा न करता राधेचे रूप, राधेचे मनोविश्व, राधेच्या बाल्य, तारूण्य, मुक्त अशा अवस्था रेग्यांनी उत्कटपणे रेखाटल्या आहेत. तसेच इथले, पडले, निजले, बिंबले, भिजले, पुरी, लहरी अशा यमकयुक्त शब्दांमुळे कवितेला विलक्षण लय प्राप्त झालेली दिसते. सुरावली, लास्य, शामल मूर्त, मधुकोष असे संस्कृतप्रचुर शब्द कवितेतील आशयाशी सुसंगत योजलेले दिसतात.

पु. शि. रेगे यांच्याच 'त्रिधाराधा' या कवितेशी या कवितेचे जवळचे नाते दिसून येते. निसर्गाच्या रूपात असलेली कृष्ण आणि राधेची व्यक्तिमत्वं परस्परविरोधी अशा विशेषणातून 'त्रिधाराधा' या कवितेत व्यक्त केली आहेत, उदाहरणार्थ अमर्याद, निश्चल, विस्तीर्ण अशा 'स्थूलरूपातील कृष्ण', तर 'सूक्ष्म रूपातील चांदणी', साळीचे क्षेत्र, बन या रूपातील राधा. येथेही चराचरांत व्यापून उरलेले राधा कृष्णाचे मिथ रेखाटले आहे. तसेच राधा या कवितेतूनही कवीने राधेचे चराचरात एकरूप झालेले, तरीही पारलौकिकाच्या पलीकडे म्हणून इथल्याच विश्वात सामावलेले रूप रेखाटलेले दिसते. त्यामुळे राधा या कवितेमध्ये इथली आणि तिथली ही केवळ कालनिदर्शक किंवा कालवाचक अव्यये म्हणून येत नाहीत, तर लौकिक जग आणि पारलौकिक या जगाचं नातं सांगणारे म्हणून हे शब्द येतात. शरीर रूपातून अशारीर रूपापर्यंत, स्थूल रूपातून सूक्ष्मरुपापर्यंतचा राधेचा प्रवास येथे विलक्षण संवेदनशीलतेने टिपला आहे. म्हणूनच या कवितेकडे वेगवेगळ्या परिप्रेक्ष्यातून पाहता येते, हे या कवितेचे वेगळेपण आहे, असे निश्चित म्हणता येते.

**प्रणयरम्यतेचे विभ्रम**

रेगे यांच्या कवितेचे नातं पूर्वसुरींशी आहे, तसंच त्यांच्या समकालीन कवींशीही आहे. विशेषतः त्यांच्या कवितेवर कवी बोरकरांचा विशेष प्रभाव जाणवतो, असं डॉ. विजया राज्याध्यक्ष दूरदर्शनवरील एका मुलाखतीत म्हणाल्या होत्या, ते खरेच आहे, कारण बा. भ. बोरकरांच्या कवितेमध्ये जशी राधाकृष्ण, गोपीकृष्ण, गोपिका या मिथ्स विविध अर्थाने येतात, कधी त्या निसर्गाशी सायुज्य पावून येतात, तर कधी त्या आध्यात्मिक जीवनाच्या प्रतिमा म्हणून येतात, तर कधी वास्तव जीवनातील प्रेम प्रतिमा म्हणून येतात. रेगे यांच्या कवितेतही त्या तशा अर्थाने येतात. रेग्यांची कविता इंदिरा संतांच्या कवितेशीही नाते सांगते. 'अजून नाही राधा जागी अजून नाही गोकुळ जागे' या कवितेची आठवण राधा ही कविता वाचताना होते. रेगे यांच्या कवितेचं वैशिष्ट्य नोंदवायचे झाल्यास, एकाच अनुभवाचे विविध विभ्रम टिपणाऱ्या संवेदनशीलवृत्तीमुळे त्यांची कविता अनन्यसाधारण ठरलेली दिसते. प्रा. गंगाधर पाटील म्हणतात, 'जीवनात विविध रूपाने वावरणारी सृजनशक्ती आणि विशेषतः तिचे स्त्री देहधारी स्वरूप हेच त्यांच्या कवी मनाला अधिक मोहवित असते. हीच स्त्री शक्ती रेग्यांच्या कवितेची मूल प्रेरणा आहे.' ही स्त्री शक्ती त्यांच्या कवितेतून विविध रूपातून प्रकटताना दिसते. प्रेयसी, कुमारी, कुमारी माता, पत्नी, सखी, आदिमाता तर कधी पौराणिक स्त्रियांच्या रूपातून म्हणजेच राधा, मीरा, शहनाज, उर्वशी, मस्तानी अशी विविध मिथ्स होऊन आलेली दिसतात.

या कवितेचे वेगळेपण असं नोंदवता येईल, की या कवितेत रेगे यांचे शब्दलाघव, शब्दक्रीडा फारशी दिसत नाही. साध्या सोप्या बोलीभाषेतील शब्दांच्या रचनेतूनच ही कविता साकारत जाते. शब्द लाघव आणि शब्दक्रीडा या दोन्ही गोष्टी रेगे यांच्या कवितेला पूर्वसूरींच्या कवितेपासून आणि समकालीन कवितेपासून वेगळं करतात. रेग्यांच्या

कवितेतील प्रणयरम्यतेला जी नजाकत आहे, तरलता आणि वैविध्य आहे, तसे पुढील काळातील कवींनी क्वचितच टिपलेले दिसते. रेगे हे कवी रोमँटिक परंपरेतील, आत्मलक्ष्यी, सौंदर्यलक्ष्यी कविता लिहिणारे असले तरी त्यांच्या प्रत्येक विषयांतील विविध विभ्रम, विविध छटा पाहण्याची त्यांची सौंदर्यासक्त दृष्टी, विविध परिप्रेक्ष्य यामुळे त्यांची कविता वेगळी ठरते. विषय तेच असले तरी मांडणीत मात्र नवेनवे प्रयोग केलेले दिसतात. या वैशिष्ट्यामुळे देखील त्यांची कविता ही एकसुरी झालेली दिसत नाही. भाषेचे विविध रूपात्मक आविष्कार, मांडणी, आशय आणि कवितेचे दृश्यरूप या सर्वच पातळ्यांवर रेगे यांची कविता सर्वस्वी भिन्न ठरलेली दिसते. त्यांची ही वैशिष्ट्ये पुढील काळातील रोमँटिक परंपरेतील कवींना तितक्या सर्वार्थाने आणि ताकदीने आत्मसात करायला जमलीच असे नाही. म्हणूनच त्यांच्या कवितेची परंपरा निर्माण झालेली नाही, हेच रेगे यांचे सामर्थ्य म्हणायला हवे. म्हणूनच शब्दसामर्थ्य, आशय आणि आविष्कृती यामुळे पु. शि. रेगे यांची कविता नेहमीच ताजी, रसरशीत, चिरतरूण नि अनन्यसाधारण ठरलेली दिसते.

**संदर्भ : १) पाटील गंगाधर, 'सुहृद्गाथा', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे**

**डॉ. नेहा सावंत अंधेरी–मुंबई येथील भवन्स महाविद्यालयात मराठी विभागप्रमुख आहेत. त्यांनी 'कुपारी बोलीतील साहित्याचा चिकित्सक अभ्यास' या विषयावर पीएच.डी. मिळवली असून, लेखन, शब्दांकन, संपादन, अभिनय, डबिंग, सूत्रसंचालन आदी क्षेत्रांत त्या सक्रिय राहिल्या आहेत.**
**संपर्क** : nehasawant603@gmail.com

KITABKHANA, MUMBAI

Located in a 150-year old heritage building in Fort, Kitab Khana is a bookstore with a soul. With an old world charm, the bookshop houses a beautifully curated collection of books from modern fiction, classics, children's books to titles in regional languages like Hindi, Marathi, Gujarati and more. KitabKhana offers a 10-15% discount all year round and also regularly hosts author events, bookclubs and workshops. Readers can unwind at the in-house cafe. A literary haven for bibliophiles.



Somaiya Bhavan 45/47 MG Road, Fort +91 22 61702276/77/78
Whatsapp: +91 88795 40538 / 10:30 am - 7:30 pm, Open all days

kitabkhanabooks

# सोसायटी के गले की हड्डी



प्रसाद कुमठेकर

भाऊ पाध्ये जन्मशताब्दी विशेष – २




‘फिल्म जर्नालिजममध्ये भाऊची शैली अफलातून आहे. हिंदी चित्रपटांना जर पाया वगैरे असता, तर इथे मी भाऊनेच मराठीत पहिल्यांदा चित्रपट समीक्षेचा पाया रोवला, असं भारदस्त विधान केलं असतं. भाऊचं या क्षेत्रातलं थोरपण इतकं ग्रेट आहे.’ इति चंद्रकांत पाटील (चौकटीबाहेरचे चेहरे)

भाऊ पाध्येंच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्ताने माझ्याबरोबर सगळ्यात भारी गोष्ट घडली, ती म्हणजे मला भाऊंचं सिनेमाविषयक लिखाण मिळवून, शोधून, वाचन करता आलं. त्यातूनच स्फुरलेलं ‘भाऊ आणि त्यांचं सिनेमालेखन’ या विषयावरचं हे दुसरं टिपण...

'सजती है यूं ही मैफिल' हे भाऊंनी लिहिलेल्या फिल्मी अदाकारांच्या व्यक्तीचित्रांचं 'वाचलंच पाहिजे' या कॅटेगरीमधलं पुस्तक. यात अमिताभ, संजीव कुमार, सैगल, फरिदा जलाल, शत्रुघ्न सिन्हा, वहिदा रहमान, देवानंद, राजेश खन्ना, राखी, किशोर कुमार, मोहम्मद रफी, मुमताझ, लीना चंदावरकर, नर्गिस, रेखा अशी एकूण पंधरा 'मतलबवाली' व्यक्तीचित्रं आहेत.

यातल्या लेखांची शीर्षकं तुफान कॅची आहेत. दिलखेचक आहेत. मुख्यतः प्रेक्षकांच्या मनातली आहेत. उदाहरणार्थ; 'बेबस दुनियेमध्ये असंतोषाची स्वप्न विकणारा अमिताभ', 'मुझे संजीव कुमार कहते है' 'फरीदा जलाल: ती नेहमीच कमाल काम करते, पण...', 'शत्रू आता माणसात आला!' इत्यादी इत्यादी..

अदाकारी ही वेगळी गोष्ट असते, असं सांगत भाऊ पाध्ये त्यांच्या या सिनेलेखांतून तत्कालीन भारतीय फिल्म इंडस्ट्रीतील नेमकी निरीक्षणे नोंदवत जातात. उदाहरणार्थ;

'वोह अच्छी ॲक्ट्रेस है लेकिन उनको बिलिंग व्हॅल्यूज किधर है?'

'हिंदी चित्रपट सृष्टीत आर्टिस्टला दोनच भूमिका असतात; एक हिरो किंवा हिरोईनची आणि दुसरी पिता किंवा माँ चीः'

'आपल्याकडे पटाका या बिरुदाला साजसं असं झणझणीत 'मिटी रोल्स' किंवा नटखट भूमिका, हे आपल्या अभिनेत्रींना तळहातावरील फोडासारखे येतात. त्यामुळे 'रोटी'मधली मुमताज, 'सेवक'मधली नीतू सिंग आणि 'मंथन'मधली स्मिता पाटील यांच्या अदाकारीचे वेगळे मोजमाप करणे कठीणच असते.'

'मला वाटतं, आपल्या सिनेमाच्या जमान्यामध्ये एक तरी तनुजा असतेच जिच्या अदाकारीचे चीज होत नाही.'

'चित्रपटांमध्ये चटणी– कोशिंबिरी प्रमाणे दोन कव्वाल्या एक कॅब्रे साँग दोन हिरो–हिरॉईनींची गाणी, एक जज्बाती गीत असे रामभरोसे हिंदू हॉटेलची राइसप्लेट पेश केली जाते, तिथे ओपी हा एकच संगीतकार पुन्हा संगीतकाराचा झेंडा कसा फडकावा याचा विचार करत बसलाय.'

'या देशांमध्ये सिनेमा ही बाब आपल्याशी संबंधित नसतेच. तिचं काम दोन घटका करमणूक करून विसरून जाण्यासाठी तरी असतं किंवा तुमच्या आमच्या डोळ्यासमोर प्रत्यक्षात कधीही प्रत्ययाला न येणारे आदर्श दाखवून व्यवसायाचं एक प्रकारे पापक्षालन साधण्यात येतं.'

'हिंदी सिनेमाच्या जमान्यातली नर्गिस मधुबाला, नूतन, वहिदा रहमान असे स्पेशल चार्म असलेले सितारे शर्मिला मुमताज बरोबर लयाला गेले, पण परविन बाबी आणि मौशुमी याच आता पाहण्यासारख्या उरल्यात. एरवी, रंजीता कौर किंवा दीप्ती नवल यांना पाहताना वाटतं, की आपल्या शेजारचीच चिंगी पडद्यावर आली आहे, म्हणून नखरे करते आहे!'

'हिंदी चित्रपटांमध्ये प्रत्येक सगेवाल्यांचे पेटंट घेणारी मंडळी तयार होतात. उदाहरणार्थ, राज मेहरा, विपिन, नासिर हुसेन हे पिताजी, सुलोचना, उर्मिला भट्ट, निरुप रॉय, अचला सचदेव या माँ, नाझिमा ही कायम बहीण, सुजित कुमार भाई वगैरे वगैरे.'

'आमची चित्रपटातील गाणी काही खरी नाहीत, प्रेमात पडलेले तरुण–तरुणी कधीही बागेत गाणं गात नाचत बागडणार नाहीत' असं किशोर कुमार एकदा म्हणाला होता.

'चित्रपट ही गोष्टच इतकी भराभर बदलते आहे की त्या काळातला टेम्पो, मूड, वेग वगैरे वगैरे गोष्टी एकदा का बदलल्या की दुसऱ्या काळामध्ये त्या पाहताना चार्ली चॅप्लीन इतका मोठा फनकार असेल तरच लोकांना भिडतात.'

'फरिदा नेहमीच कमाल करते. कधी कधी कमाल करण्यापूर्वीच तिला आपला सिनेमावाला निर्माता मारून टाकतो. पण फरिदा पिक्चर मध्ये असली, ती एखाद्या लहानशा भूमिकेसाठी असली तरी सुद्धा ते पिक्चर कसे उभरते.'


'हिंदी चित्रपटसृष्टी पूर्वीही क्रूएल होती आता तर ती अधिकच क्रूएल झाली आहे.'

'अदाकारी तर बोंबलली. मग उरले काय? पोरींची लफडी आणि दुसऱ्या अदाकारांना फालतू म्हणणे.'

देव शिवाजी पार्कवर वसंत साठे वगैरे मित्रांना जमवून सैगलची गाणी गाऊन दाखवत असे.

**भाऊंची दृष्टी आणि सृष्टी**

थोडक्यात, भाऊ पाध्ये यांच्या फिल्मी सिलसिल्यात असे अनेक 'इनसाइटफुल इनसाइट' मिळतात. 'रिळा'ची ष्टोरी सांगत 'रिअल'मधल्या प्रेक्षकाला जोडून घेण्याची हातोटी त्यांच्याकडे आहे. ते चित्रपट, स्वतःचं आयुष्य आणि बाहेरचं जग या तिन्हींला एकाचा दोऱ्यात ओवतात. उदाहरणार्थ; 'सुमारे वीस वर्षांपूर्वी डॉ. राम मनोहर लोहिया, फ्युदोर दोस्तोवस्की, वहिदा रहमान किंवा माझा मित्र अशोक शहाणे यांच्यापेक्षाही माझ्यावर अधिक प्रभाव ज्या व्यक्तीचा होता, तो




*भाऊ पाध्यांनी लेख, समीक्षा आणि अनुवादाच्या माध्यमातून तथाकथित सभ्यतेचे सारे नियम झुगारून देत, फिल्मी विश्वातले नागडे सत्य आपल्या बंडखोर शैलीत उत्कटपणे मांडले...*

म्हणजे महंमुद; मेहंमूद असेही त्याला म्हणतात. म्हामुदमियां हे मी ठेवलेलं नाव.'

इथे भाऊ पाध्ये एका कट्टर फॅनसारखं महंमुदला राजकीय विचारवंत (लोहिया), महान कादंबरीकार (दोस्तोवस्की), सौंदर्यवती (वहिदा) आणि स्वतःचा जिवलग मित्र (अशोक शहाणे) यांच्या पंगतीत नेऊन बसवतात. त्याला प्रेमाने अधिकचा गुलाबजामून किंवा बासुंदीची वाटीदेखील देतात. वर 'म्हामुदमियां' हे टोपणनाव देऊन त्याला घरचा करत अदाकाराला प्रेक्षकांपासून अंतरावर ठेवणारा पडदाच काढून टाकतात. हिजड्यांना पडद्यावर आणणं म्हणजे, त्यांच्या जिंदगीला कुर्निसात करणं आणि हे मेहमूदन केलं हे सखोल सामाजिक निरीक्षणसुद्धा आवर्जून नमूद करतात. म्हणून मग महंमूद पडद्यावरच्या कॉमेडियनच्या पलीकडे पण बराच उरतो.

हॉलीवूडमध्ये गोळागोळींच्या चित्रपटांमध्ये क्लिंट इस्टवुड या नटाने 'अस्सलपणाला' एक कमर्शियल व्हॅल्यू निर्माण केली होती.

हिंदी सिनेमात रेहना सुलतान नामक एक अदाकारा काही काळ गाजून गेली. तिची मला आठवण होते. दस्तक, चेतना वगैरे सिनेमातून तिचा गाजावाजा झाला व तिला उर्वशी अवॉर्डही मिळाले. पण अखेर तिचा भाव इतका उतरला की निर्माते तिला घेईनात. तिला ब्रेक देणारे निर्माते प्रसिद्ध लेखक राजिंदरसिंग बेदी एकदा मला म्हणाले, की 'रेहानाने मला लिहिले आहे बेदीसाहेब मला पुन्हा एकदा ब्रेक द्या. तिचे ते पत्र वाचताना मला जाणवले की ती, ढसाढसा रडत असावी' अदाकाराला असे दूर फेकले गेल्यानंतर जी वेळ येते ती वेळ मोठी जालीम असते.

हाय ए 'बिलिंग व्हॅल्यु'! पाध्यांच्या लेखात कुठे कुठे येणारा हा महत्त्वाचा शब्द. सो, फिल्लीम इज ए पब्लिक फीलिंग हे भाऊंच्या लिखाणाचं मूलतत्त्व.

'ड्राइव्ह इन थेटर परिसरातल्या बलात्काराची बातमी वाचल्यानंतर मी अनेक वेळेला हा 'घर'मधला बलात्कार डोळ्यासमोर आणत होतो आणि हळवा झालो होतो, हे मी कबूल करतो.' इथे रेखाचा अभिनय भाऊंसाठी केवळ सीन–सिनेमापुरता मर्यादित राहत नाही. हा भळभळता अनुभव रील आणि रिअल दुनियाच एकमेकांत मिसळवून टाकतात...

'मयूर माधवानी हा युगांडातून इदी अमिनने पळून लावलेला उद्योगपती. इथेही त्याचे मुंबईतील मुकेश मिलशी आर्थिक संबंध आहेत. 'मुमताज नटी' आमच्या गिरणीमध्ये येऊन जाते म्हणून मुकेश मिलचे कामगार अभिमानाने सांगताहेत.'

**एका दमात दोन जगांचा वेध**

'नटखट मुमताज' या लेखातली ही सहज म्हणून येणारी माहिती मुंबईच्या औद्योगिक सांस्कृतिक गुंतागुंतीचा एक सूक्ष्म कटआउटच आहे. भांडवलदार, मुकेश मिल, गिरणगावाचं श्रमिक विश्व, घाम, संप, युनियन आणि त्यात शिरलेलं नखशिखांत ग्लॅमर. 'नटी आमच्या गिरणीत येते हे अभिमानाने सांगणारे कामगार' भाऊ एका फटक्यात दोन विरुद्ध जग आपस में भिडवतात. आणि हे करत असताना चित्रपटात 'नटखट मुमताझ संधी सापडताच आपले जोहर चमकवतेच.' ही मुद्द्याची गोष्ट सांगायची अजिबात विसरत नाहीत.

I know we're public figures, but I strongly believe my private life should remain private. सांगणाऱ्या वहिदा रहमानबद्दल 'स्टार आणि इंटेलेक्च्युअल या दोन्ही व्यक्तिमत्त्वांचे एक आगळे मिक्श्चर आहे' म्हणून भाऊंना अपार प्रेम वाटते.

आठवणींची खपली उडवत, भाऊ पाध्यांच्या मैफिलीत बसून त्यांनी निवडलेल्या चित्रपटातल्या 'माणसां'ना उराउरी भेटणं हा खास अनुभव आहे. मला हे पुस्तक वाचताना प्रकर्षाने आठवण आली, ती 'यशाला भाव आणि सौंदर्याला किंमत' असणारा माया नगरीचा बाजार आतून बाहेरून फिरवून आणणाऱ्या सआदत हसन मंटोच्या 'मीनाबाजार' या पुस्तकाची.

**भाऊ आणि मंटो**

'मैं समाज के गले की हड्डी हूँ न निगली जा सकती है, न उगली जा सकती है।' हे मंटोचं वाक्य भाऊ पाध्येंना सुद्धा तंतोतंत लागू पडणारच. मंटोप्रमाणे भाऊसुद्धा 'समाज की निगली न उगली जानेवाली हड्डीच'. हाडाचे कथाकार असणाऱ्या मंटोनी 'हमें अपने क़लम से रोज़ी कमाना है.' या पूर्णवेळ लेखकाच्या भागध्येयाप्रमाणेच काही काळ उदरभरणासाठी सिनेपत्रकारिता केलेली आणि दोघांसाठीही बॉम्बे जानेमनच!

आधुनिक साहित्य शहराच्या उदयाचा, विस्थापनाचा आणि मानवी हिंसेच्या नागड्या नाचाचा इतिहास आहे. या आधुनिकतेच्या संघर्षाला अत्यंत प्रामाणिकपणे आणि तडफेने सामोरे जाणारे हे दोघे जणू, मेले में बिछडे भाईच!

वेगवेगळ्या काळात, भिन्न भाषिक, सांस्कृतिक, सामाजिक, परंपरेतून आलेले तरी त्यांच्या लेखनातली मूलभूत विश्वदृष्टी सारखीच. दोघांनाही भाषेच्या फुलोऱ्याने आणि नैतिकतेच्या फुग्याने समाज वास्तव टिपणाऱ्या कॅमेराची लेन्स झाकणे नामंजूरच.

अथांग अरबी समुद्र आणि गगनचुंबी इमारतीच्या चमचमत्या नेकलेसच्या भक्क उजेडाखाली असलेल्या काळ्यामिट्ट अंधारात नांदणाऱ्या बकाल झोपडपट्ट्या, चोरबाजार, मोहल्ले, पक्षांची कार्यालये, वासूनाके कवेत घेतलेली 'बडी बाका बंबईनगरी' लिहित्या हातांनी कायम झाकूनच ठेवलेली. या दोघांनी तिला गोषातून बाहेर काढलं.

'मैं यह सब लिखते हुए डरता हूँ, लेकिन न लिखना उससे भी बड़ा जुर्म है।' म्हणत जे आणि जसं दिसलं तस्सच आपल्या लिखाणातून मांडलं.

**जहरी टीकेचे धनी**

अश्लील, विकृत, नैतिकतेचा शत्रू, समाज का जानी दुश्मन अशी जहरी टीका त्यांच्या वाट्याला आली. अश्लील साहित्यनिर्मितीचा आरोप लावत मंटोवर स्वातंत्र्यपूर्व भारतात व पाकिस्तानात मिळून सहा वेळेला खटले भरले गेले. तर 'वासूनाका' लिहिली म्हणून भाऊंची 'अमृतांत मुतणारा' अशी संभावना केली गेली. अग्रलेखात फोटो देत 'या किळसवाण्या चोपड्याच्या लेखकाला, भाऊ पाध्येला जोड्याने मारले पाहिजे. त्याला तुरुंगात टाकले पाहिजे. या पुस्तकावर बंदी घातली पाहिजे.' अशी निषेध मोहिमच उघडली गेली. नैतिकतेचं गुत्त घेतलेल्या प्र. के. अत्रेंनी 'मी पुस्तकातला 'स्त' माझ्या वाङ्मयात लिहिला आहे. परंतु स्तनातला 'स्त' मी कधीही लिहिलेला नाही' अशा शब्दात फुशारकीसुद्धा मारली होती.

पण दहा हजार वर्षात न झालेले दोन्ही लेखक हात थांबेपर्यंत लिहितच राहिले.

अफसानानिगार, सिनेपत्रकार असलेल्या या दोघांत आणखी एक कॉमन गोष्ट होती. ते म्हणजे शिगोशीग कुंदनलाल सैगल प्रेम. मंटो म्हणायचे, 'जब तक रिकॉर्ड ज़िन्दा है, सहगलः की आवाज़ कभी नहीं मर सकती।'

आणि भाऊ पाध्यांची तर सिनेमावारीच सुरू झाली ती सैगलसाठी. ते लिहितात, 'दादरच्या बंबखान्यासमोरच्या चित्रा या चित्रगृहामध्ये न्यू थिएटर्सची चित्र लागत. त्यावेळी तीन आण्याच्या तिकिटाच्या रांगेमध्ये माझा पहिला नंबर असे. मी अनेक वेळेला तीन-चार चित्रपट पाहिल्यावर पुन्हा सहाच्या चित्रपटाच्या रांगेत उभा राहिलो आहे. हे वेड फक्त न्यू थिएटरच्या सिनेमातल्या गाण्यांनी डोक्यात घुसवलेले. पुढे न्यू थिएटरचे सिनेमे बंद पडले. सैगलची गाणी ऐकू येईनाशी झाली, त्यामुळे आयुष्य अगदी ढीले ढिले झाले.'

थोडक्यात, सैगल नावाच्या इत्तराने दोघांचेही आयुष्य दरवळून टाकले होते.

मंटोच्या काळातली मायानगरी 'शरीफ समाजा'ला पुरती 'कुबूल' नव्हती. अदाकारांची जिंदगी, हिरोइनचं कॅरेक्टर इत्यादी इत्यादीवर कुजबुजवाल्या चर्चा चालायच्या. मंटोने तो पर्दा बाजूला सारला आणि झगमगापाठची 'माणसं' दाखवली. पुढे भाऊ पाध्यांनी तीच वाट धरली. फक्त फ़िल्म नाही, फ़िल्म के लोग त्यांच्या लिहिण्याचा अस्सल विषय झाले. मंटोचा काळ 'सुपरस्टार निर्मितीचा' होता. आणि भाऊंनी 'सुपरस्टार निर्मिती आणि माती' दोन्ही पाहिली...

'मुझ पर अश्लीलता का इल्ज़ाम है, लेकिन मैं सिर्फ़ सच बयान करता हूँ।' असं मंटो म्हणायचा, तर भाऊंनी काही

म्हणण्यात, लढण्यात वेळसुद्धा घालवला नाही. ते हात थांबेपर्यंत लिहीत राहिले. त्यांचं सगळंच लिखाण कळायला अजिबात कठीण नाही. पण ते एवढं 'निक्क' आहे, की पचायला कठीण जातं.

'आपण इंटेल (इंटेलिजंट) नसल्यामुळे कुणाच्याही पागलपणाला न हसण्याचे बंधन नाहीच' असं सांगणाऱ्या या शहाण्या माणसाच्या 'शहाण्या' मित्राने अर्थात अशोक शहाणेंनी लिहूनच ठेवलंय, त्यात ते म्हणतात, 'आम्ही मराठी माणसं मुर्दाड आहोत. आमचा मख्खपणा एका ज्ञानेश्वरानं जात नाही, एका तुकारामानं जात नाही, एका साने गुरुजींनंसुद्धा जात नाही. भाऊ पाध्येनं तर तसा प्रयत्नसुद्धा केला नव्हता. त्यामुळे भाऊचं लिखाण काय प्रतीचं होतं, याबद्दल आम्ही अडाणी राह्यलो असलो तर नवल वाटायचं काहीच कारण नाही. 'कधीकाळी कुठंतरी माझा समानधर्मा निपजेल' ही प्रत्येकच लिहिणाऱ्याची आशा असते. अशी काही आशा भाऊ मागं ठेवून गेलाय का नाही, कोण जाणे!'


**संदर्भ : (महाराष्ट्र टाइम्स, ३ नोव्हेंबर १९९६)**
**भाऊ पाध्ये blog अवधूत डोंगरे**
**विशेष आभार : उमा नाबर (संदर्भ विभाग, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय)**

**आकाशवाणी, टेलिव्हिजन, ओटीटी अशा विविध माध्यम प्रकारांत आपला ठसा उमटविणारे प्रसाद कुमठेकर हे मराठी साहित्य विश्वातले पुरस्कारप्राप्त लेखक, कथाकार आहेत. अतित कोण? मीच..., बारकुल्या बारकुल्या ष्टोऱ्या, बगळा, इत्तरकथा ही त्यांची गाजलेली पुस्तके आहेत.**
**संपर्क: ७९७७८ ६५६३६**


**अक्षर प्रकाशनाचं नवं पुस्तक...**

# गोष्ट तिरंगा ध्वजाची

## निशा शिवूरकर




आपला राष्ट्रध्वज आपल्याला माहीत असतो. तसंच आपलं राष्ट्रगीतसुद्धा आपल्याला माहीत असतं, पाठही असतं. राष्ट्रगीताच्या बाबतीत आपल्याला ते रवींद्रनाथ टागोर यांनी लिहिलं आहे, हेदेखील माहीत असतं. पण राष्ट्रध्वजाचं डिझाइन कोणी बनवलं? कधी बनवलं? त्यामागची प्रेरणा काय होती? या प्रश्नांची उत्तरं मात्र आपल्याला माहीत नसतात. इतकं कशाला, भारत देशाच्या भौगोलिक सीमा माहीत असल्या, तरी या देशाचं 'राष्ट्र' कसं झालं, याची आपल्याला अजिबात कल्पना नसते.

निशा शिवूरकर यांनी या पुस्तकात या सर्व प्रश्नांची उत्तरं दिली आहेत. अगदी स्थळकाळाचे, व्यक्ती आणि घटना यांचे ऐतिहासिक संदर्भ देत दिली आहेत. निशा शिवूरकर यांची शैली रसाळ आहे. त्यामुळे अत्यंत महत्त्वाची माहिती रंजकपणे समोर येते. हे पुस्तक वाचनीय तर आहेच; परंतु त्यातील विधानांना भक्कम पुराव्यांचं पाठबळ असल्याने ते स्वत:च एक ऐतिहासिक दस्तावेज झालं आहे.

– हेमंत कर्णिक

किंमत रु.२००/–


अक्षर प्रकाशन ऑर्चिड रोड मॉल, रॉयल पाम, 'बी' विंग, युनिट नं. २३५, सर्वे नं. १६९, आरे कॉलनी, गोरेगाव (पू), मुंबई–६५ फोन : ९३२२३९१७२० email : aksharprakashan@gmail.com

# मूक आक्रोशाचे चित्रबिंब



रेखा देशपांडे









**गो**व्यातला आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव– इफ्फी संपून तीन महिने उलटलेत. लोक पुढल्या वर्षीच्या तयारीलाही लागले असतील. परंतु माझ्या मनात मात्र या महोत्सवात पाहिलेले दोन राजस्थानी चित्रपट रुतून बसले आहेत. पैकी एक आहे, जिगर नागदाचा 'व्हिस्पर्स ऑफ द माऊंटन्स' आणि दुसरा कपिल तनवर दिग्दर्शित रू–ब–रु. हे दोन्ही चित्रपट निष्ठूर शासनसत्ता आणि क्रूर समाजव्यवस्था यावर भाष्य करणारे आहेत. यात दिसलेला अरावली पर्वत वाचवण्यापासून पारंपरिक शोषणापासून स्वत:ची सुटका करून घेण्यासाठी धडपडणाऱ्या समाजघटकांचा संघर्ष आजचे वर्तमान पाहता दुर्लक्षिण्यासारखा नाही...

**भा**रत म्हणजे 'विकसित' नव्हे, तर विकासासाठी वखवखलेला देश अशी बदनामी दावोसच्या वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमपासून इतरत्र सध्या होताना दिसतेय. केंद्र शासन खडा टाकून पाहते, जमून आले की उद्योगस्नेही विकासाचा अजेंडा पुढे रेटते, नाही जमले की, मोठा आव आणत निर्णय रद्द करते. बरे हे, एकट्या शासनसत्तेबाबत घडत नाही. आता सर्वोच्च न्यायालयातही हा खेळ खेळला जात आहे. अलीकडेच अरावली पर्वतरांगा खाणींसाठी भांडवलदारांना मोकळ्या करून देण्याचा स्वतःचाच निर्णय प्रचंड जनक्षोभानंतर सर्वोच्च न्यायालयाने फिरवला. यातून राजकीय-न्यायालयीन-भांडवलदारी मनसुब्यांना काही काळापुरता जो काही चाप बसायला हवा तो बसला, परंतु प्रत्यक्ष अरावलीच्या डोंगरांची कत्तल होते आहे. ती थांबली नाही, तर अरावलीच्या हिरवाईचे रूपांतर वाळवंटात व्हायला वेळ लागणार नाही, हे उघड आहे. प्रत्यक्षात मात्र तिथल्या निसर्ग-संपत्तीचं रूपांतर वेगानं बड्या उद्योगपतींच्या तिजोरीतल्या नोटांमध्ये होऊ लागलं आहे. अरावली पर्वतरांगांमधल्या संगमरवराने त्यांच्या हवेल्या सजताहेत आणि सामान्य कष्टकऱ्यांची फुफ्फुसं संगमरवराच्या धुळीनं निकामी होत आहेत. इकडे नाशिकच्या तपोवनात सर्वसंगपरित्याग केलेल्या साधूंच्या सोयी-सुविधांसाठी झाडांची कत्तल होते आहे.

विकासाच्या कल्पनेने ज्यांचे डोळे दिपले आहेत त्यांचं सोडून देऊ, पण शुद्धीवर असलेल्या सामान्य लोकांना या विकासामागचा विनाश दिसू लागला आहे. अरावलीत लोक आता तिथल्या खाणकामांना विरोध करत अरावली पर्वतराजी वाचवण्यासाठी आंदोलने करू लागले आहेत. नाशिकमध्ये स्थानिक लोक आंदोलने करताहेत. खरं तर देशात जिथे जिथे ठिकठिकाणी विकासाच्या नावाखाली विनाशाची सत्रं आरंभली आहेत तिथे तिथे सामान्य कष्टकरी त्याला विरोध करताहेत. खरा विकास त्यांच्यापर्यंत पोहोचतच नाही. पोहोचतोय तो विनाश. पण सरकार नावाच्या बलाढ्य, दुराग्रही यंत्रणेपुढे आणि पर्यायाने स्वविकासेच्छू धनदांडग्या उद्योगपतींपुढे त्यांची शक्ती कमी पडते आहे. तरीही विविध मार्गांनी ते लढा देत आहेत. जिगर नागदा हा मुंबईत राहात असला तरी त्याची मुळं राजस्थानात आहेत. आणि तो या लढ्यात आपल्या माध्यमातून, सिनेमातून, सामील झाला आहे.

**राजस्थानी सिनेमांचे प्रगल्भ तरंग**

राजस्थानी सिनेमाचा इतिहास तसा १९४२ च्या 'नजराना'पासून सुरू होतो. मग थोड्या थोड्या कालावधीनं बाबासा री लाडली, बाई चली सासरिये, गणगौर, बाबा रामदेव, ढोला-मरवण, लाज राखो राणी सती, सती सुहागन, म्हारी प्यारी चनणा, सुहाग रो सिणगार, चोखे लागे सासरियो, सावण री तीज, देवराणी-जेठाणी, नानीबाई रो मायरो, बीनणी वोट देणे चली असे पारंपरिक विषयांत रमणारे चित्रपट येत राहिले आहेत. अशात २०२१चा नानेरा हा चित्रपट आपल्या वेगळ्या विषयाने आणि तरल आणि नेमक्या सादरीकरणाने वेगळा उठून दिसला होता.

नानेरा म्हणजे आजोळ. दीपंकर प्रकाश दिग्दर्शित नानेराच्या कॉलेजमध्ये शिकू लागलेल्या मुलाच्या वडिलांचं आकस्मिक निधन होतं आणि आईच्या माहेरचे नातेवाईक तेरा दिवसांतल्या सगळ्या विधींचा आणि मुलाचा ताबा घेतात. या निरर्थक विधींमध्ये मुलाला गुंतवून ठेवताना त्याच्या मनाचा विचार कुणालाच शिवत नाही आणि मुलाला आपल्या वडिलांच्या जाण्याचा शोक करण्याचीही उसंत दिली जात नाही. अखेर त्याची एक संवेदनशील मामेबहीण आणि तो असे दोघे मिळून घराबाहेर पडून दिवसभर मोकळ्या वातावरणात फिरतात, आइस्क्रीम खातात... कुठेही अनावश्यक तपशील, अनावश्यक शॉट न ठेवता दृश्याच्या नेमकेपणातून आणि वातावरणातल्या सहज ध्वनींतून- नेमक्या साऊंड डिझाइनिंगमधून - विधींमधील निरर्थकता टोकदारपणे नानेरा जाणवून देतो. राजस्थानी चित्रपटात येऊ घातलेल्या विषय-प्रगल्भतेचं आणि सादरीकरणातील प्रगल्भतेचं तो प्रतीकच होता.

'नानेरा' कौटुंबिक परिसरातल्या, नातेसंबंधातील पर्यावरण-प्रदूषणाचा आणि प्रथा-परंपरांच्या प्रदूषणाचा वेध घेतो, तर जिगर नागदाचे चित्रपट सामाजिक विषमतेच्या आणि निसर्गाचा नाश करणाऱ्या, सामान्यांच्या जीवनाला विनाशाच्या वाटेवर ढकलणाऱ्या प्रदूषणाविरुद्ध आपला सकारात्मक आवाज उठवतात, तेही कोणतीही आवाजी शैली न वापरता. महानगरांत झगमगाट करणाऱ्या सरकारी यंत्रणेला खेडोपाड्यातल्या अंधाराची पर्वा नसते. 'अ बॉय हू ड्रेम्ट ऑफ इलेक्ट्रिसिटी' या जिगरच्या पहिल्या चित्रपटात एका अभावग्रस्त मुलानं आपल्या गावात वीज आणण्यासाठी केलेली धडपड आहे. मेवाडी बोलीतल्या या चित्रपटातल्या भूमिका स्थानिक कलावंतांनीच केलेल्या आहेत. २०२५च्या म्हणजे ५६व्या इफ्फीमधला त्याचा 'व्हिस्पर्स ऑफ द माऊंटन्स' हा चित्रपट म्हणजे अरावलीच्या

मूक आक्रोशाला आपल्या माध्यमातून वाट करून देण्याचा प्रयत्न आहे.

**आक्रोशाचे रुपेरी प्रतिध्वनी**

'व्हिस्पर्स ऑफ द माऊंटन्स'चा छोटा नायक रघू मुकाच आहे. बहिरा नाही. हा शाळेतला हुशार, अभ्यासू मुलगा. अरावलीतील संगमरवराच्या खाणीच्या परिसरात त्याचा बाप तिलक खाणकामगारांना, ओव्हरसीअर्स, मॅनेजर वगैरेंना चहा पुरवून पैसे कमवतो, रघू त्याला मदत करतो. रघूला शाळेतून शहरातल्या स्पेशल स्कूलमध्ये शिकायला जाण्यासाठी स्कॉलरशिप मिळते आहे. तर इकडे आणखी एका खाणीचं काम सुरू होणार म्हणजे, आपल्याला तिथेही चहाची टपरी सुरू करून कमाई करता येईल, ती टपरी रघू चालवेल म्हणजे रघूच्या पोटापाण्याची सोय होईल, असा तिलकचा विचार. एका खाणीपायी गाव उजाडच झालंय. हिरवाईची जागा दगडधोंड्यांनी व्यापलीय आणि हवा संगमरवराच्या धुळीनं ग्रासलीय. गावकरी गाव सोडून गेलेत. दृष्टीच्या टप्प्यातले डोंगर खुजे होत होत सपाट होत चाललेत. मुक्या रघूला डोंगरांची ती मुकी वाणी कळते आहे. दुरून पाण्याचा ड्रम भरून आणण्याचं काम रघूचं. ते आणता आणता वाटेत रस्त्याच्या कडेला, तो एक बी पेरतो आणि ड्रममधलं थोडं पाणी त्याला घालायचं आणि तिथल्या गडग्यावर थोडा वेळ बसून डोंगराकडे पाहायचं, हा त्याचा रोजचा नेम. कष्ट करण्याविषयी रघूची तक्रार नाही. त्याला शिकायचंय, शिक्षण थांबेल या विचारानं तो उदास आहेच, पण डोंगर कापला जातोय यानं रघूचं उदासपण वाढत चाललंय. आजूबाजूचं भकासपण आणि रघूच्या आतलं उदासपण यांचं जवळचं नातं आहे.

रघूचं शिकण्याचं स्वप्न आणि तिलकचा चहाची टपरी टाकण्याचा, आणखी एका खाणीच्या कामाचा फायदा करून घेण्याचा विचार यांचा मुका संघर्ष सुरू होतो. गरीब स्वभावाचा रघू बापाच्या बेताने, आपल्या परिस्थितीने नाउमेद होतो, तरी घरी, टपरीत जमेल तेव्हा अभ्यास करीत राहतो. दगडाच्या धुळीनं तिलक खोकू लागला आहे. बायकोच्या माघारी तिलक आणि रघू या बाप-लेकांचाच संसार आहे. आता तिलकला दुसरी बायको आणून आपलं एकटेपण दूर करावंसंही वाटतंय, त्यासाठी आपल्या मातीच्या घराच्या जागी पक्कं घर बांधायचा त्याचा प्रयत्न आहे आणि त्यासाठी कर्ज काढायची धडपड आहे. बाप-लेकाच्या अभावग्रस्ततेला वैराण वाळवंट होत



*जिगर नागदा आणि कपिल तनवर या नवतरुण दिग्दर्शकांनी अस्वस्थ करणाऱ्या जळजळीत वास्तवाचा आरसा एकप्रकारे प्रेक्षकांसमोर धरला...*

चाललेल्या परिसराची पार्श्वभूमी आणि त्याउलट त्यांच्या आयुष्यातलं वैराणपण या परिसराच्या उजाडपणाला अधिकाधिक गडद करत चाललंय. हे या चित्रपटाच्या दृश्यात्मकतेचं मोठं वैशिष्ट्य आहे. परिसर बोलतो आहे. दुसरं लग्न करणं आणि घर बांधणं सोपं नाही. नियोजित वधूला पहिल्या नवऱ्यापासूनची एक सोळा-सतरा वर्षांची मुलगी आहे. तिला भेटायला तिचा बाप वेळोवेळी घरी येणार, असं त्या वधूचं म्हणणं तिलकला पटत नाही. त्यातच छोटा रघूदेखील आपल्याबरोबर राहता उपयोगी नाही, ही तिची अट तिलकला असह्य होते. तशातच तिलकची फुफ्फुसं सिलिकॉसिसनं निकामी झाल्याचं निदान होतं. गडग्यावर जिथे रघू बसतो, तिथे आज तिलक हताशपणे जाऊन बसलाय.

रघू मुका असला तरी त्याचं मुकेपण बोलकं आहे. बाप-लेकाचा संवाद त्यामुळेच सामान्य नाही. रोजची जगण्याची धडपडच इतकी की बापानं कधी रघूला प्रेमानं जवळ घेतलंय असं दृश्य नाही. बाप-लेकात कुठेही शारीरिक ऊब आढळत नाही. पण त्यांचं जैविक नातं या कोरड्या दिनक्रमातही जाणवत राहील असं पटकथेनं, दिग्दर्शकाच्या ट्रीटमेंटनं पाहिलं आहे. आपला लग्नाचा विचार रघूला सांगणं हे बापाला आवश्यक वाटतं. त्याचवेळी तो कसा सांगावा हा संकोच त्याला वाटत राहतो. रघूला आपल्यापासून दूर करण्याची कल्पना तर त्याला सहनच होत नाही. रघू कोणत्याच मुद्यावर आपलं मत मांडण्याच्या परिस्थितीत नाही. बोलता येत नाही, जे होतंय ते सहन करणं हाच त्याचा स्वभाव आहे आणि तरीही त्याचा चेहरा, त्याची नजर, त्याचं सगळं अस्तित्व आणि त्याचं मुकेपण ते मत व्यक्त करत राहतं. दृश्याच्या पलीकडे आशयाला घेऊन जाणं आहे, हे.



*व्हिस्पर्स ऑफ द माऊंटन्स आणि रु-ब-रू हे दोन चित्रपट पर्यावरणाच्या नाशाचा आणि स्त्री शोषणाचा कडेलोट मांडतात...*

माध्यमापुढचं मोठं आव्हान दिग्दर्शकानं आणि रघूच्या भूमिकेत हर्षांत शर्मा या स्थानिक बाल कलावंतानं यशस्वीरीत्या पेललंय. सिलिकॉसिस हा मोठा घटक कथेला वळण देतानाच कथेचं उद्दिष्ट अधिक ठळक करत जातो. अखेरीला तिलक लग्नाचा विचार रद्द करून रघूला शहरात जा, शिकून मोठा हो, या परिसरातून बाहेर पड, असं उत्कटतेनं म्हणतो. त्याला प्रथमच जवळ घेतो. दोघांतली जैव जवळीक बोलकी होते. आता रस्त्याच्या कडेला पेरलेल्या बीजातून एक रोप उगवलंय. त्याला हिरवी पानं फुटलीत...

अरावलीच्या आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर 'व्हिस्पर्स ऑफ द माऊंटन'चा मनात रेंगाळत राहिलेला प्रभावही गहिरा झालाय...

**रू-ब-रू: शोषणाशी आमनासामना**

इफ्फी २०२५च्या इंडियन पॅनोरमा विभागातल्या कपिल तनवर दिग्दर्शित आणखी एका राजस्थानी चित्रपटाविषयी सांगायला हवं. 'रू-ब-रू' हा लघुपट राजस्थानातील स्त्रियांचे शोषण करणाऱ्या पुरातन प्रथेवर प्रहार करतो. राजस्थानच्या रुक्ष, उन्हात तापलेल्या वाळवंटाच्या वैराण पार्श्वभूमीवर शोषणाची ही कथा अधिकच भेदक होऊन येते. आणि परिस्थिती जितकी भयाण, रुक्ष तितका दोन बहिणींचा विद्रोह धारदार. भद्रा ही रुदाली आहे आणि तिची बहीण रुक्मिणी नचनिया. कुणाचा मृत्यू झाल्यानंतरच्या राजस्थानी प्रथेनुसार रुदालीला शोक करायला बोलवले जाते. हा तिचा व्यवसाय असतो. तर शुभप्रसंगी नचनियाचा नाच ही आणखी एक प्रथा आणि तिचा व्यवसाय. एरवी, या स्त्रियांना समाज आपल्या घरापुढे उभेदेखील करत नाही. रुदाली ही अभद्र समजली जाते, तर नचनिया चरित्रहीन. रडून रडून भद्राचा घसा खरवडला जातोय, नाचून नाचून रुक्मिणीची हाडं खिळखिळी होताहेत, पण भद्राला पोट भरण्यासाठी रडण्याशिवाय पर्याय नाही आणि रुक्मिणीला बेधुंद नाचण्याशिवाय पर्याय नाही. पुरुष मंडळी तर या स्त्रियांना ओरबाडणं हा आपला हक्कच समजत असतात. भद्रा आणि रुक्मिणी या दोघी पोट भरण्यासाठी हे व्यवसाय करीत असल्या तरी त्या आपला आब सांभाळून असतात. पुरुषी नजरेचा जबाब त्या आपल्या तिखट जिभेने देतात.

समाजाकडून असं दुखावलं जाण्याचं दुःख दिवसाअखेर एकमेकींपाशी वाटून घेतात. दारूत ते बुडवून कमाई झाल्याचा आनंदही साजरा करतात. दोघींमधला भगिनीभाव हाच त्यांचा दिलासा आहे. कधी कधी त्यांना वाटतं एकमेकींच्या भूमिका बदलून पाहाव्यात. आणि एक दिवस दारूच्या नशेत खरंच तसं होतं.

एका वृद्ध आजोबांच्या मृत्यूचा शोक करण्यासाठी भद्राला बोलावलं जातं तर तिथे ती रुक्मिणीसारखी बेधुंद नाच-नाच नाचते आणि शोकग्रस्त घराला धक्का देते. त्याचवेळी रुक्मिणी लहान मुलाच्या वाढदिवसाच्या सोहळ्यात जोराजोरात छाती पिटून शोक करू लागते.

चित्रपटातला हा क्लायमॅक्स दोन्ही दृश्यांच्या समांतर एडिटिंगच्या साह्याने म्हणजेच आलटून पालटून वेगाने साकार होतो आणि टिपेला पोहोचतो. दोघींच्या क्रमशः नाचाचा आणि शोकाचा वाढत जाणारा राक्षसी वेग पडद्याचा, पडद्यावरील प्रेक्षकांचा आणि थिएटरमधील प्रेक्षकांचा ताबा घेतो. दारूच्या नशेत नव्हे, विद्रोहाच्या नशेत दोघी बहिणींनी समाजाचा घेतलेला तो सूड आहे. दोन्ही घरांकडून त्यांच्या या आगळिकीची संभावना जशी व्हायची तशीच होते, पण आता त्या पुरुषी समाजाचे वाभाडे काढताना मागे हटणार नाहीत. परिणामी अँटी-क्लायमॅक्स येतो तो वाढदिवस साजरा करणाऱ्या घरातील सुनेच्या बाळाच्या आईच्या - कृतीच्या रूपात. ती शांतपणे पुढे होते, रौद्र भासणाऱ्या भद्राकडे बाळासाठी आशीर्वाद मागते. अख्खं खानदान अवाक्.

लघुपटांना मिळायला हवी ती प्रसिद्धी, वितरण व्यवस्था मिळत नाही, ही खंत अशावेळी अधिकच गडद होते.

**रेखा देशपांडे या ज्येष्ठ पत्रकार, लेखिका, अनुवादिका आणि चित्रपट अभ्यासक आहेत. संपर्कः ९८२१२ ८६४५०**
**ईमेल :** deshrekha@yahoo.com

# रुत छा गयी रे...



गणेश मनोहर कुलकर्णी

सुरानुबंध



गाण्याच्या भोवताली स्वैर संचार नकळत का होईना सुरू होता. तसा अजून नोकरीतही हनिमून काळ सुरू होता. त्यातली दाहकता अजून अंगावर यायची होती, पण याही काळात अधूनमधून शास्त्रीय गाण्याच्या मैफली ऐकायला आवर्जून जात होतो, हट्ट एकच असायचा सखीनं सोबत असायला हवं, नंतर स्वप्निललाही अगदी त्याच्या लहानपणापासूनच या गाण्याच्या मैफलींना न्यायला लागलो. पुण्यातला सवाई चुकवायचं नाही, हे मनात असायचं. सुरूवातीला सलग काही वर्षे नेमाने जायचो. नंतर नोकरीच्या अवेळा आणि सगळ्या उत्सवातच शिरलेला उथळपणा बघून न जाण्याचा निर्णय घेतला. तरीही अधून मधून मोह व्हायचा तेव्हा एखादा दिवस चांगले कलाकार बघून जाऊन यायचो...

लेखमालेच्या सुरूवातीला उल्लेख केला ते, भाग्यदा लक्ष्मी बारम्मा हे भजन भीमण्णांच्या आवाजात ऐकून अक्षरशः दंग व्हायचो. एकदा मुंबईत जयतीर्थ मेवुंडींची मैफल सुरू होती. पुढच्या दुसऱ्या-तिसऱ्या रांगेतच सखी बरोबर बसलो होतो. नवीनच लग्न वगैरे झालेलं. तिला या भजनांची, एकंदरच शास्त्रीय गाण्याची चटक वगैरे अजून लागायची होती. माझी खूप इच्छा होती, की जयतीर्थांनी 'लक्ष्मी बारम्मा' गावं. त्यांच्या मैफलीच्या शेवटाकडे येताना ते आपल्या समोरील कागद चाळत होते, मी हलकेच आजर्व करता झालो, 'लक्ष्मी बारम्मा' होऊन जाऊ दे. त्यांनीही सूर धरला. नेमका शुक्रवारच होता आणि चेंबूरसारख्या ठिकाणी अतिशय श्रद्धावान अशी दाक्षिणात्य मंडळी प्रेक्षकांत होती. मला आठवतंय, त्यावेळी दिवंगत पोलिस कमिशनर अशोक कामटे देखील कार्यक्रमाला हजर होते. ऐनवेळी माझ्यासारख्या रसिकाचा मान राखून गायलेलं लक्ष्मी बारम्मा... हे भजन इतकं रंगलं की डोळे पाणावले...

**भीमण्णाचे गारुड**

या भजनात कर्नाटक संगीताचे जनक पुरंदर दास लक्ष्मीची वेगवेगळ्या रूपांत करूणा भाकतात, तिने समृद्धी घेऊन यावे आणि शुभाशीर्वाद द्यावा म्हणून तिची आर्जवे करतात. जयतीर्थही किराणा घराण्याचेच असल्याने त्यांना ऐकताना मनात नकळत भीमसेन उमलत असतात. मला भीमण्णांचं प्रचंड वेड. त्यांच्या उतारवयात त्यांना सवाईला प्रत्यक्ष ऐकण्याचा योगही आला आहे. खरं म्हणजे, आम्ही भीमसेन जोशींना गाताना प्रत्यक्ष ऐकले आहे, हे आनंदाभिमानाने मिरवण्याच्या काळातला मी प्रतिनिधी आहे. एकदा सवाईच्या कट्ट्यावर अशीच चर्चा सुरू झाली, की भीमण्णांना प्रत्यक्ष कुणी कितीवेळा ऐकलंय. कुणी आठ, कुणी दहा असे सांगत अनेक चढत्या भाजणीचे आकडे उधळले जात होते. इतक्यात एक म्हातारे बाबा काठी टेकत उभे राहिले, म्हणाले, मी भीमण्णांना आजतागायत ८५ वेळा प्रत्यक्ष ऐकले आहे आणि त्यांनी एक कागद पुढे केला. त्यावर लिहिले होते, की या गृहस्थांना माझ्या कुठल्याही मैफलीत पुढच्या रांगेत बसवावे आणि खाली चक्क लफ्फेदार अशी भीमण्णांची सही होती. सगळा सवाईचा कट्टाच या गृहस्थांनी गपगार करून टाकला!

**सूरसोबत न्यारी**

हे ऐकल्यापासून आम्हीही कुठल्या गायकाला किती वेळा ऐकले याचा मोठेपणा कधीच मिरवत नाही. गायक प्रत्येक वेळी नवनवीन प्रयोग करत असतो. एकच राग अनेक वेळा गायला तरी तो प्रत्येक वेळी नवीन वाटतो, तो या अशा प्रगल्भ गायकांमुळेच. त्यांच्या मेघ रागावर तर मी जीव ओवाळून टाकतो. या मेघ रागाची पण गंमत आहे. नुकताच कॅसेट जाऊन सीडींचा जमाना सुरू झाला होता. म्हणून मी पण याची खास सीडी तयार करून घेतली होती. कुठल्याही प्रवासात निवडक सामग्री नेताना या सीडीचा अग्रक्रम असायचा. जिथे जाणार असू तिथे अद्ययावत गाडीची त्यातही चांगले स्पीकर वगैरेची आमची मागणी असायची. जेणेकरून प्रवासात मनसोक्त गाणं ऐकता येईल. तर एकदा सौराष्ट्रात फिरून परतीच्या प्रवासात सगळं सामान परत आणलं, पण कार मधली सीडी काढून घ्यायला विसरलो. तर त्या गाडीवाल्याला फोन करून सीडी परत मागवून घेतली... त्यानेही नीट कुरिअरने आमच्या पत्त्यावर पोहोचती केली.

असेच लडाखमध्ये फिरताना आमचा नेपाळी ड्रायव्हर आम्ही लावलेल्या वेगवेगळ्या वेळांनुसारचे शास्त्रीय संगीत ऐकून वैतागून विचारायचा, ये आपका टुंग टुंग कब खतम हो गा, गाना कब शुरू होगा? त्या प्रवासादरम्यान एक दिवस पहाटे पेंगाँग लेकच्या दिशेनं निघालो. इतर लोक जशी प्रवासाच्या सुरुवातीला गाडीत मारूती, गणपतीची आरती लावतात, तसे आम्ही अण्णांच्या 'मेघ'ने प्रवासाला सुरुवात केली. अचानक निळभ्र आभाळ मेघांनी भरून गेलं आणि चक्क बर्फाचाच पाऊस सुरू झाला. आम्ही प्रतिक्षिप्त क्रियेनुसार सर्वात प्रथम भीमण्णांना बंद केले. आता हा म्हटला तर योगच, पण त्यांच्या स्वरांची ताकद त्याक्षणी तिथे अनुभवल्याच्या भावनेनं अंगावर शहाराच उमटलेला होता.

हा मेघ १९७१ साली कुणीतरी खाजगी मैफलीत रेकॉर्ड केलेला आहे. त्या कार्यक्रमस्थळावरची वीज कधी नव्हे, ती गेली होती. अंतिम क्षणाला द्रुत लयीत मेघ राग संपण्याच्या अगोदरच वीज गेल्याने तो राग अर्धवटच रेकॉर्ड झालाय. त्यामुळे तो मेघ अर्धवटच राहिला. पण त्या रागाची ताकद भन्नाट आहे. भीमण्णांची छाती गाताना २२ इंच वगैरे फुगायची असं म्हणतात. लहानपणी विजापुरात ते कुठल्याही बँडवाल्याच्या मागे निघून जायचे, त्यांना शोधणं हा आई-वडिलांना मोठाच व्याप असायचा. त्यावेळी कुठल्याही वरातीत किंवा उत्सवात बँड वाजवण्याची प्रथा होती. मीही लहानपणी अशा बँडवाल्यांच्या कोंडाळ्यात तालावर नाचत असायचो, अशी काहीशी अंधूक आठवण मनात आहे.

त्याकाळी अनेक जुन्या- नव्या बँड पथकाच्या जाहिराती वगैरे यायच्या. तो काळ चित्रपट संगीतातला सुवर्णकाळच होता. असं म्हणतात की नौशादच्या सासऱ्यांना चित्रपट क्षेत्रातला माणूस

जावई म्हणून नको होता आणि हे तर सिनेसंगीत क्षेत्रात नुकतेच नाव कमवू लागले होते. यांनी ही गोष्ट आपल्या बायकोकडच्या लोकांपासून लपवून ठेवली होती, पण वरातीत हे ऐकतात तर काय? त्यांच्याच 'रतन' चित्रपटातली 'ओ दूर के मुसाफिर' आणि 'अखियाँ मिलाके जिया भरमा के, चले नहीं जाना' ही गाणी बँडवाले मोठ्या झोकात वाजवत होते. नौशादांसारखे संगीतकार, ज्यांनी अनेक हिंदी चित्रपटांना संगीत दिलं, त्यांचा असाही दावा होता, की चित्रपटात अस्सल भारतीय संगीत मीच दिलं वगैरे. वरातीत बँडवर गाणं आलं म्हणजे ते हीट झालं, असं समजलं जाण्याचा तो काळ.

लोकांना करमणुकीचे अनेक प्रकार अजून उपलब्ध व्हायचे होते. नंतर या बँडवाल्यांचा पडता काळ आला. गावाकडची बँड पार्टी तिथल्या स्थानिक संस्थानिकांच्या आश्रयाला असायची. अशाच अक्कोळ म्हणजे निप्पाणी जवळच्या एका गावातील बँड पथकाच्या पडत्या काळात, बाळकुंद्रीकर महाराजांच्या ओळखीतल्या कुलकर्णी म्हणून एका जमीनदारांनी मोठी मदत केली. या लोकांना नवीन वाद्यं घेऊन दिली. मुंबईत जाण्या-येण्यासाठी प्रवासाची सोय केली. हे अक्कोळ गाव प्रत्यक्ष तंबाखू पिकवतं आणि निप्पाणीचे शेतकरी ते विकत घेऊन बाजारात विकतात. म्हणजे अडते निप्पाणीचे आणि खरे शेतकरी अक्कोळमध्ये. याच गावातल्या बँड पथकात एक गरीब सॅक्सोफोन वाजवणारे कलाकार होते. एके काळी अनेक कार्यक्रमात त्यांनी अतिशय सुरेल असं वादन केलेलं होतं. त्यांच्या पडत्या काळात त्यांना काही एक मदत करावी म्हणून गावातल्या जाणत्या लोकांनी त्यांचा सत्कार करण्याचा घाट घातला. सत्काराच्या वेळी त्यांना काही एक रकमेची थैली देण्यात आली, तेव्हा त्यांचे डोळे पाणावले. सत्काराला उत्तर देताना ते इतकंच म्हणाले, मी काही शाळा वगैरे शिकलेलो नाही, तेव्हा मला शब्दांतून व्यक्त होणं अशक्य आहे, पण मी माझ्या भावना या वाद्यातून तुमच्या समोर मांडण्याचा प्रयत्न करतो आणि त्यांनी 'एक धागा सुखाचा शंभर धागे दु:खाचे' हे गाणं आपल्या सॅक्सोफोनवर अतिशय सुरेल आणि इतकं करुण्यमय वाजवलं की तमाम उपस्थित रसिकांचे डोळे पाणावले.

**आठवणींचा असाही हिंदोळा**

कुठलंही गाणं आतड्यातून गायलं की रसिकांच्या काळजाला भिडतंच. आपण बऱ्याचदा कलाकारांना वेशभुषेवरून किंवा सामाजिक स्तरावरून कमी जास्त लेखतो. आमच्या स्वप्निलच्या




*पं. भीमसेनांची मैफल म्हणजे सुरांचा वर्षाव... कधी तो चिंब भिजवून टाकतो, कधी नाजूक थेंब तळहातावर सोडून जातो... एका मैफलीत पु.ल.देशपांडेंसोबत जुळून आलेला हा स्वरयोग...*

मुंजीत माझा गायक मित्र त्यांच्या कुणातरी नातेवाईकांना सनई वाजवायला घेऊन आला. या गृहस्थांनी अनेक नव्या-जुन्या चित्रपटात सनई वाजवली होती, त्यांचं सनई वादन इतकं सुरेल होतं, की ते ऐकायला तमाम मंडळी मुंज आणि जेवण सोडून त्यांच्यासमोर उभी होती. कुठलं गाणं कधी मनात घर करून बसेल, याचा काही नेम नाही किंवा एखादं गाणं आठवताना कुठल्या स्मृतींचा हिंदोळा झुलेल, याचाही काही नेम नाही.

एकदा भर पावसाळ्यातली रात्रीची वेळ होती. रस्त्यावरची वाहतूक मंदावलेली, परेल शॉपला शंटिंग इंजिनाचा चार्ज घ्यायला निघालेलो. कानाला वॉकमन लागलेला. एफ एम रेडिओवर नितांत सुंदर जुनी गाणी एकामागोमाग एक वाजत होती. एव्हाना भर पावसात, मी चालत इंजिनजवळ पोचलो. रात्रीचा तो पिवळ्या लाइटचा पडलेला उजेड, समोर संततधार पावसाचा पदर आणि अचानक 'अंखियों के झरोखों से, मैंने देखा जो सांवरे' हे गाणं कानावर वाजायला लागलं. तो भोवतालातला भन्नाट सन्नाटा, निव्वळ पावसाचा पडणारा आवाज, हेमलता गायिकेचा नितळ दवात भिजलेला सुरेल आवाज आणि रविंद्र जैनचा जबरदस्त ठेका, त्यातलं व्हायोलिन... अरे देवा, अगदी जीवघेणं. आताही जेव्हा केव्हा हे गाणं कानावर पडतं, तेव्हा या सगळ्या आठवणींची लड सोबत घेऊनच येतं.

बँड पथकाच्या, भीमण्णांच्या हरवण्याच्या आठवणीतून मी जे सुटलो ते कुठे कुठे भिरभिरून आलो. तर पुन्हा एकदा भीमण्णांकडे वळतो. भीमण्णांच्या वडिलांनी एक शक्कल लढवली, भीमण्णांच्या गळ्यात एक आयकार्ड लटकावून टाकलं आणि त्यावर लिहिले, की हा गुरूराजराव जोशींचा मुलगा आहे. कुठे




*अखियों के झरोखों से... असे एखादे गाणे जेव्हा कानावर पडते, तेव्हा मनाचा हळवा कोपरा झंकारून उठतो...*

सापडल्यास त्याला खालील पत्त्यावर पोहोचवावे. गाण्याच्या शोधात ते भरपूर फिरले, पण शेवटी धारवाडला सवाई गंधर्वांनीच त्यांना किराणा घराण्याची दीक्षा दिली. त्यावेळी त्यांच्या बरोबर गुरूभगिनी धोंडुताई कुलकर्णीही शिकायला होत्या. गुरूंची अपार सेवा करूनच त्यांनी गाणं मिळवलं. 'गुरूबिन ग्यान' ही त्यांची मारवा रागातली बंदिश ऐकणाऱ्याला अगदी करूण बनवून टाकते. खूप वर्षांनी, खूप नाव झाल्यावर पंडित भीमसेन कलकत्त्याला एका मानाच्या महोत्सवात गायला बसले होते. समोर अनेक दिग्गज कार्यक्रम ऐकायला आलेले होते. त्यात मातब्बर गायक पहाडी सन्यालही होते. भीमण्णांनी पहिली सरगम छेडली आणि अचानक समोर बसलेल्या पहाडी सन्याल यांना हात जोडून म्हणाले, 'गुरूजी बहोत साल पहले एक लडका आपके पास गाना सिखनेको आया था,' जराही वेळ न दवडता सन्याल म्हणाले, 'आया तो था लेकीन बहोतही मूर्ख था, इसलिए तुरंतही मैने उसको भगा दिया' यावर पंडितजी तितक्याच तप्तरतेनं म्हणाले, 'गुरूजी वह मुरख मैं ही हूँ' आणि सगळ्या सभागृहात टाळ्यांचा गजर दुमदुमला.

**घराला समृद्धी देणारे सूर**

एरवीसुद्धा भीमसेनांच्या मालकंस, पुरिया धनश्री, शुद्ध सारंग, यामनी बिलावलने आमच्या संपूर्ण घरालाच समृद्धी येत गेली. हे आणि असे अनेक वेगवेगळे राग माझ्या विश्रांतीच्या वेळी– अवेळी त्याकाळी वॉकमनवर आणि आताशा मोबाइलवर ऐकतच माझ्या नोकरीतले ताण मी सहन केलेत. आमच्या घरात नॉर्जचे स्पीकर केवळ शास्त्रीय संगीत ऐकण्यासाठीच घेतले आहेत. भीमण्णांचाच मालकंस नव्हे, तर कुणाचाही ताकदीनं सादर केलेला मालकंस ऐकला की प्रचंड शांत का वाटतं, याचा विचार करताना एक गोष्ट लक्षात आली. एक तर हा म्हणे उत्तररंग प्रधान राग आहे. म्हणजे, पहाटेच्या सुमारास गायला जाणारा राग आहे. आपल्या पूर्वजांनी संगीतातले विविध राग बांधताना ऋतूंबरोबर वेळेचाही समग्र विचार केलेला जाणवतो. उत्तम गाणं सादर करताना त्या त्या गायकांचा रियाजच पणाला लागतो. एकूणच, एखाद्या रागाची बांधणी करताना वादी-संवादी स्वरांची आवश्यकता असतेच. षड्जाला आपण अतिशय महत्त्व देतो. षड्ज या शब्दाची व्युत्पत्तीच सहाला जन्म देणारा अशी आहे, षड् आणि ज याच्यापासून सहा स्वरांचा जन्म होतो, हे आपण गृहीत धरतो. सगळं संगीत षड्जाशी बांधलेलं असतं. त्यामुळे षड्जसापेक्षता हा भारतीय संगीताचा प्राण आहे. या मालकंसची अशीही कथा आहे की, कैलासराणा भगवान शंकराची तपस्या रती-मदनाने भंग केल्यावर तो संतप्तपणे तांडव करायला लागला. त्या भयसूचक नृत्याने संपूर्ण पृथ्वीच डळमळीत होऊ लागली. सगळे देव घाबरून पार्वती मातेला साकडं घालायला जमा झाले. तिला सांगू लागले, याचा राग शांत होण्यासाठी काय वाट्टेल ते कर, पण शंकराला शांत कर. तेव्हा ज्या रागाची आळवणी पार्वतीने केली, तो मालकंसच होता. संतापाने तणतणलेला शंभो जिथं या स्वरांनी शांत होतो, तिथे तुम्हा-आम्हा पामरांची काय कथा? अफाट दमल्यावर माझ्या कानावर जेव्हा मालकंसचे स्वर पडतात, तेव्हा माझ्या शरीरातला रोमरोम शांत होताना त्यामागे गायकांनी, वादकांनी घेतलेले अपार कष्ट मला जाणवतात आणि मी नकळत नखशिखांत कृतज्ञ होऊन जातो...


**गणेश मनोहर कुलकर्णी प्रसिद्ध ललितलेखक, कला आस्वादक आहेत. त्यांच्या 'रूळानुबंध' या लेख संग्रहाला अलीकडेच राज्य पुरस्कार प्राप्त झाला आहे.**


**संपर्क : ९८१९९५७८५२**

# ‘अयोध्या’: विचारभ्रष्ट सामाजिक वास्तवाचे राजकीय चरित्र



दा. गो. काळे

ग्रंथ दालन




**जी.** के. ऐनापुरे यांनी समकालीन कादंबरीकार म्हणून आपली एक स्वतंत्र अशी ओळख निर्माण केली आहे. ‘ओस निळा एकांत’ नंतर पूर्णपणे राजकीय म्हणता येईल अशी ‘अयोध्या’ नावाची कादंबरी प्रसिद्ध झालेली आहे. ही कादंबरी म्हणजे बदलत्या सामाजिक वास्तवाचे राजकीय चरित्र म्हणता येईल. कोणतेही राजकीय चरित्र नसलेला तळसमाज केवळ तपशिलातून जिवंत करण्याचे कसब या लेखकात आहे. तपशिलातून प्रत्यक्ष जगण्यातील वास्तव चित्रण, त्यातून कादंबरीचा आशय या लेखकाने समृद्ध केला आहे. कोणत्याही वास्तवाचा ताजेपणा हा केवळ समकालीन परिस्थितीचे अपत्य असत नाही. त्याला जोडून आलेला भूतकाळ हा त्या घटितांचा प्रत्यक्ष साक्षीदार असतो. भविष्यासाठीचे आव्हानही असते. ‘अयोध्या’ या संवेदनशील शीर्षकाच्या माध्यमातून त्यांनी ते स्वीकारलेले आहे. तसे ते स्वीकारताना त्यांच्यामधील सर्जनशील लेखकाची ओळखही ठसठशीत समोर येताना दिसते आहे...

**को**णत्याही राजकीय कृतीचा प्रवास त्रिमीतीतून होत असतो. त्यादृष्टीने राजकीय कादंबरी ही लेखकांसाठीचे आव्हान असते. ते आव्हान 'अयोध्या' या नावाचे रूपक योजून ऐनापुरे यांनी पेलले आहे. या कादंबरीच्या दीर्घ अवकाशाचे सूत्र, अवशेष आणि सूचन करीत सूक्ष्म अशा तपशिलांतून या कादंबरीकाराने दीर्घ असा पट टिकवून ठेवला आहे.

कोणतेही राजकीय सूत्र एकटे वा अनाथ कधीच नसते. त्याला आपल्या सभोतालातील सगळ्या अधिरचना जोडून येत असतात. (सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक इत्यादी) आपल्या सामाजिक संरचनेत त्याची मुळं घट्ट रूजलेली असतात. तरीही त्या सगळ्या गिचमिडीच्या नोंदी म्हणजे कादंबरी नाही. त्यातून आलेले राजकीय घडामोडींचे सूचन महत्त्वाचे असते. सर्वसामान्यपणे विचार केला, तर, ही लेखकाची राजकीय कृतीच असते. तो कादंबरीतील उल्लेखनीय घटितांचा निरीक्षक असला तरी, त्याच्या स्वतंत्र चिंतनात त्याचा राजकीय दृष्टिकोनही अनुस्यूत असतो. यात कोणत्याही योगायोगाच्या शक्यता गृहीत धरता येत नाहीत. ही गोष्ट जादुई वास्तववादाच्या आडही लपवता येण्यासारखी नाही. त्या अर्थाने, लेखन म्हणजे लेखकाची भूमिकाच असते. त्यापासून त्याला पलायन करता येत नाही.

या कादंबरीच्या एकंदरीत अवकाशाचा नि आकृतीबंधाचा विचार केला तर, खऱ्या दृष्टीने प्रागतिक म्हणता येईल असा या लेखनाचा फॉर्म आहे. तो त्यांनी सर्वसामान्य माणसांच्या रोजमर्रा जिंदगीच्या तपशिलांतून जिवंत केला आहे. तर कादंबरीत आलेली परिसरनिष्ठा, अनुभवाला भिडण्याचे कसब, सामान्य माणसांच्या संवादातून ग्राम संस्कृतीचे होणारे सूचन लोकघाटी स्वरूपाचे आहे. या परिसराच्या निमित्ताने अवघ्या देशाचा विचार केला तर, या सहजतेवर आक्रमण करणाऱ्या एका उपऱ्या संस्कृतीची ओळख या लेखनातून होण्यासारखी आहे. म्हणजेच, दोन भिन्न संस्कृतींमधील विभाजन सहज समजण्यासारखे आहे.

**जळजळीत वास्तवाचे अन्वयार्थ**

केवळ अयोध्या कादंबरीच्या निमित्ताने विचार केला तर, जाणवते, की आपण कितीही म्हणत असलो तरीही, रामायण–महाभारत हे ग्रंथ सर्वसामान्य माणसांच्या आस्थेचे विषय कधीही राहिलेले नाहीत. फक्त ऐकता येणाऱ्या पुराणकथा म्हणूनच त्या गोष्टींचे महत्त्व राहिलेले आहे. किंबहुना, सर्वसामान्याच्या देव्हाऱ्यात त्यांचे अस्तित्व कधी दिसले नाही. तेहतीस कोटी देवांची गजबज सर्वसामान्यांना पुरेशी होती. मूर्तीच्या सुबकतेपेक्षा लोकघाटी आकारांचे दगड त्यांनी आपल्या श्रद्धा जपण्यासाठी वापरले. या देशातील श्रद्धेच्या सरळसरळ विभाजनाचा विचार केला तर, रामायणातील अँटी हिरो समजला गेलेला रावण येथील आदिम लोकांचे दैवत आहे. या नायकाच्या सभोवती त्यांच्या श्रद्धा गुंतलेल्या आहेत. एवढेच नव्हे तर, दुर्योधन नावाची कितीतरी माणसं आपल्याला दाखवता येतील. यावरून एक गोष्ट सिद्ध होते की, या उभारल्या गेलेल्या संस्कृतीचे आपण घडीव असे चिरे आहोत.

या कादंबरीची सारासार पार्श्वभूमी अडवाणी यांनी ऐंशीच्या दशकाच्या उत्तरार्धात काढलेल्या रामजन्मभूमी रथयात्रेत आहे. हीच खरी हिंदुत्ववादी मानसिकतेतील विरोधाची राजकीय परंपरा म्हणता येते. येथेच जवळजवळ पन्नास वर्ष अडगळीत पडलेल्या धर्म आणि राजकारणाच्या समन्वयाचा अजेंडा स्पष्ट झाला. त्यातूनच रामजन्मभूमीचा मुद्दा रामबाण व आश्वासक ठरला. ही गोष्टच मुळात संयतपणे पेरून ठेवलेल्या अल्गोरिदमची खरी सुरूवात होती.

लेखकाने ही कादंबरी कॉ. हरकिशनसिंग सुरजीत, कॉ. ज्योती बसू आणि लालूप्रसाद यादव यांना अर्पण केलेली आहे. येथे सतत प्रतिरोध करणाऱ्या डाव्या विचारांचे अस्तित्व, प्रस्थापित राजकारण्यांची राजसंस्थेवरील पकड ढिली होण्यास कारणीभूत ठरलेले लालूप्रसाद यादव व त्यातून तत्सम विचारांना मिळालेली संधी हे मुद्दे अधोरेखित करण्याचा लेखकाचा हेतू सुस्पष्ट आहे. या कादंबरीच्या निमित्ताने भूतकाळातल्या राजकीय घटनांचे प्रारूप भौमितिक आलेखात मांडता येतात. (अ) उपयोजित (ब) उपयोजन (क) पूर्तता (ड) सत्तांतरण. ही संयतपणे पेरलेल्या अल्गोरिदमची चार सूत्रात मांडणी आहे. ही नियोजित सूत्रे अधिक पारदर्शीपणेही सांगता येतात. उपयोजितात सुप्त असलेल्या धार्मिक भावनांची उकल. उपयोजन बाबरीचा विध्वंस. पूर्तता राममंदिर ते २०१४ साली झालेल्या सत्तांतराची बीजं या घटनांमध्ये लपलेली आहेत.

या साध्या वाटणाऱ्या धार्मिक मांडणीच्या प्रारूपाला शंभर वर्षांची परंपरा आहे. आजच्या समकालीन वास्तवाच्या पार्श्वभूमीवर त्याचे प्रत्यंतर येण्यासारखे आहे. या व्यवस्थेसाठी प्रतिरोधाच्या परंपराही नव्या नाहीत. त्या या व्यवस्थांबरोबरच

सतत चालत आलेल्या आहेत. तरीही आज वाटणारा खेद आणि व्यवस्थेचा खेळ संपणारा वाटत नाही. त्यानुषंगाने मुन्शी प्रेमचंद यांचे (नवंबर १९२४चे) वचन आजही लेखकांना, कलावंताला जिवंत ठेवत आलेले आहे. हा जिवंतपणा एक लेखक म्हणून जी. के. ऐनापुरे यांनी या कादंबरीरीच्या निमित्ताने पुढे ठेवला आहे. त्यांनी मांडलेला हा प्रवास आजच्या वास्तवापर्यंत भिडणारा आहे.

**अतृप्त घटकांचे गुंते**

हिंदुत्ववादी राजकारणाची, त्याच्या उपयोजनाला जोडून आलेली दुसरी परंपरा बाळासाहेबांच्या रूपाने महाराष्ट्रात सुरू झालेली होती. हिंदुत्व म्हणजेच राजकारण आणि शिवसेना म्हणजेच हिंदुत्व जपणारा परवलीचा शब्द झालेला होता. महाराष्ट्रातील धर्मनिरपेक्ष चळवळींना मोडीत काढणारा एक पर्याय निर्माण झाला होता. एवढेच नाही तर, आपल्या हिंदुत्वाचे प्रगटीकरण म्हणून बाबरीच्या विध्वंसाची पूर्ण जबाबदारी त्यांनी घेतल्याचा इतिहासही विसरता येण्यासारखा नाही. जहाल अशा धार्मिकतेबरोबर सामान्य माणसांमधील राजकीय आस्थांच्या केंद्रस्थानी राहण्याचे कसब बाळासाहेबांनी वापरलेले दिसेल. त्यासाठी त्यांनी दोन गोष्टी आवर्जून केल्या. एक म्हणजे, काँग्रेसच्या राजकारणाचा लाभ न मिळालेले अतृप्त कार्यकर्ते आपल्या राजकीय पटलावर आणले. त्यात सरंजामी वृत्तीच्या मराठ्यांचा समावेश अगत्याने केला. त्या दृष्टीने या कादंबरीतील दिवाकर या मराठ्याचा विचार करता येतो. त्यात निर्माण झालेले हिंदुत्ववादी राजकारणाचे स्पिरिट या लेखनाला पूरक ठरणारे आहे. त्यातल्या त्यात स्थानिक राजकारणासाठी कारसेवा केल्याचे नाटक रचून आपले अस्तित्व त्याने सिद्ध केलेले आहे. एवढेच नव्हे तर, त्याचे उपयोजन म्हणून आपल्या मुलीचे नाव अयोध्या ठेवेपर्यंत त्याच्या प्रॅक्टिकल हिंदुत्वाची ओळख तो करून देतो. त्याला जोडून येणारा कमालीचा मुस्लिम द्वेष त्याला राजकारणात स्थिर होण्यास पूरक ठरतो. त्याच्या परिणामाची पूर्तता मुलगी अयोध्या मुसलमान प्रियकरासोबत पळून जाण्यात होते. येथे त्याच्या सगळ्या जातीय अस्मिता विरघळून जातात.

नजीकच्या भूतकाळातली दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे, बहुजन सर्वसामान्य वर्गाचा राजकारणात समावेश झाल्याचे चित्र आपणास दिसेल. त्या काळात रस्त्यावर फिरणारे सामान्य लोकांमधील कार्यकर्ते राजकारणात केंद्रस्थानी आल्याचे आपणास दिसेल. हान्यासारखे कितीतरी लोक राजकारण्यांच्या जवळपास राहिलेले दिसतील. म्हणजेच, खऱ्या अर्थाने राजकारणाचे सामाजिकीकरण झालेले दिसेल. धर्माला वगळून वाढणाऱ्या सामाजिक चळवळी समाजाच्या तळागाळात पोहचल्या तरी, सत्ता संपादनातील त्यांचा टक्का घसरत गेलेला आपणास दिसेल. म्हणजे, धर्म आणि सामान्य माणसांपर्यंत जाणारे राजकारण या दोन्ही गोष्टी एका नाण्याच्या दोन बाजू आहेत.

शिवसेनेच्या भरभराटीच्या काळात खऱ्या अर्थाने राजकारणाचे स्रोत अगदी खालच्या वर्गापर्यंत गेलेले दिसतात. त्यांच्या उपयोजितेच्या दिशा कोणत्याही असोत तेव्हा गल्लीतील लहान मोठे दादा लोक राजकीय केंद्राभोवती आले. धर्मनिरपेक्षतेच्या तराजूत ही बाजू तपासल्यास त्याचे परिणाम आपल्याला दिसून आलेले आहेत. अगदी तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचलेली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वप्न दाखवलेली जमात अजूनही राज्यकर्ती झालेली नाही. भारतात सामान्यांपर्यंत रूजलेल्या कम्युनिझमच्या चळवळी एक दोन प्रदेश सोडले तर, आपल्या सत्तेचा राजकीय लाभ मिळवू शकलेल्या नाहीत. त्याचे कारणही त्यांच्या करंटेपणातही शोधता येतात. त्या संबंधीच्या काही गोष्टी ऐनापुरेंच्या लेखनात आलेल्या आहेत. 'अनेकांच्या डोक्यात घोळत असलेला प्रश्न होता, तो म्हणजे भारतीय कम्युनिस्ट पक्ष आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष यांच्या बरोबर काम का करायचे नाही? या प्रश्नाचे उत्तर हे ब्राह्मणी पक्ष आहेत. राज्य पातळीवर शेतकरी कामगार पक्ष आहे. त्यांच्या बरोबर का जायचे नाही? हे सगळे लोक महात्मा फुलेंच्या जवळचे. ब्राह्मणेतर. काही काळ महाराष्ट्राच्या काय भारताच्याच सांस्कृतिक राजकारणाला दिशा देणारे... असे असताना यांना विरोध कशासाठी? तर तो पक्ष सरंजामी मराठा लोकांच्या हातात आहे... असले नाजूक प्रश्न डोक्यात जिवंत ठेवून अनेक पुरोगामी संघटना, पक्ष छोट्या छोट्या आकारात, आपल्याच विश्वात कार्यरत आहेत. यातून कोणते बहुमत कसे प्राप्त होईल?' हे खरे लेखकाने अधोरेखित केलेले महत्त्वाचे मुद्दे आहेत.

**शोकांतिकेचा पट**

येथील सगळ्या डाव्या विचारसरणीची ही शोकांतिका आहे. हेच येथील धर्मनिरपेक्ष चळवळींच्या अपयशाचे फलित आहे. कादंबरीतले किरमणे आणि सर्वदे यांच्या कम्युनिस्ट



*जी. के. ऐनापुरेंची 'अयोध्या' ही कादंबरी धर्मवेडाने पछाडलेल्या, परधर्मद्वेषाने ग्रासलेल्या समाजाच्या अध:पतनाचा प्रवास मांडते...*

असल्याच्या निष्ठा या व्यवस्थेपुढे टिकत नाहीत. सत्तेतून मिळणाऱ्या लाभापुढे असणाऱ्या भूमिका मातीच्या पायासारख्या विरघळून जाणाऱ्या आहेत. सर्वदेचीही तीच गत झालेली आहे. 'सर्वदे त्यातलाच. सगळ्यांचं रक्त लाल असतं असं म्हणणाऱ्या एस. एफ. आय. या मार्क्सवाद्यांच्या विद्यार्थी संघटनेत सर्वदे वाढला. मोठा झाला. पण आता तो कुठं आहे?... आता पवार साहेब त्याच्यासाठी आयकॉन आहेत. गृहमंत्रालय सांभाळणाऱ्या आबांना तर तेहत्तीस कोटी देवानंतरचा आणखी एक देव असा वरचा नंबर देऊन टाकलाय.'

लाभाच्या राजकारणासाठी पक्षनिष्ठा गमावलेली पिढी या निमित्ताने लेखकाने बदललेल्या राजकीय आयामाच्या अनुषंगाने पटलावर आणली आहे. येथे लेखक म्हणून जी सापेक्षतेची एक दृष्टी लागत असते, ती या लेखकामध्ये निरपेक्षतेने आलेली आहे. त्यांना लेखक म्हणून एक भूमिका असली तरी, त्या भूमिकेचे अवाजवी समर्थन कोठेही ते करताना दिसत नाहीत. आपल्या छोट्या छोट्या तपशिलातून कादंबरीचे पात्र व त्याचे चरित्र उभे करणे जिकरीचे काम असते. त्यात आपल्या भूमिकेतील लेखकाची दृष्टी वरचढ होण्याची भीती असते. ती दृष्टी टाळण्यापुरता सावधपणा या लेखकात आहे.

वास्तविक पाहता, या खंडप्राय देशात टोकाचे अज्ञान आणि गरिबी असताना त्या परिस्थितीला प्रत्युत्तर म्हणून ज्ञानाच्या परंपरा रूजायला हव्या होत्या. त्याऐवजी अज्ञानमूलक अशा धार्मिक सत्ता फोफावल्या आहेत. याचा अर्थ, येथील डावेपणाचा परीघ केंद्राजवळच अनेक मतभेदांच्या खिडक्यांमध्ये अडकून असल्याचे चित्र भयावह स्वरूपाचे आहे. त्याच्या पडसादाचे परिणाम म्हणून आजच्या वास्तवात 'अयोध्या' हा येथील तथाकथित राजकीय तथा लोकदृष्टीच्या आस्थेचा प्रश्न राहिलेला आहे. या परिस्थितीत एकांगी पडलेल्या दलित चळवळीवर आत्मनिरीक्षण करण्याची पाळी आलेली आहे. समरसता या गोंडस नावाखाली सगळ्या चळवळी आज हायजॅक झालेल्या आहेत. येथील राजकीय स्रोतांवर पोसल्या गेलेल्या सरंजामशाहीचा नवा वर्ग उदयाला आलेला आहे. या दृष्टीने राजकारणातील गुन्हेगारीकरण वाढले आहे.

कादंबरीतील दिवाकर हा या वर्गाचा प्रतिनिधी आहे. त्याने सत्तेत आणलेले वेगवेगळ्या चरित्राचे प्रतिनिधी या कादंबरीत येतात. उदा. बापाच्या डोक्यात दगड घालून खून केलेला रमेश उर्फ हान्या पाटलाचे चरित्र यात आहे. अशी माणसं राजकारणात घुसवण्याची एकही संधी दिवाकर सोडत नाही. याबाबतीत त्याचे साधे तत्त्व आहे. 'ग्रामपंचायतीत हान्यासारख्या तरूण पोरांना घुसवायला पाहिजे. सरपंच, उपसरपंच तरूण, शिकलेला असल्यावर गावाचा विकास का होणार नाही? ही सगळी जुनी धेंड हाकलून दिली पाहिजेत.' तुकाराम आणि तनुजा एक आश्रित म्हणून या व्यवस्थेतील शोषणाची प्रतीकं आहेत. आपली अनैतिक कृत्ये पाठीशी घालणारे भांडवल म्हणून या लोकांचा वापर या लोकांनी केलेला आहे. असे एक सूचन या कादंबरीतून होत आहे.

वास्तवातल्या राजकारणाच्या अनुषंगाने अजून एक मुद्दा लक्षात घेण्यासारखा आहे. राजकारणाचे सामाजिकीकरण झाल्याने स्थानिक स्वराज्य संस्थामधील महत्त्वाचा घटक असलेल्या सोसायट्यांचे राजकारण संपले. सर्वसामान्य माणसाला आपल्या अधिकाराची झालेली जाणीव होणाऱ्या बदलांसाठी महत्त्वाची ठरली. तोवर लाभासाठी राजकारण हा नवा पॅटर्न अगदी तळागाळातील मतदारापर्यंत पोहोचला होता. त्याचा फटका काँग्रेसच्या मतपेटीला बसला. कारण शिवसेनेच्या घुसळणीत मराठा कार्डाची किंमत घटली. या राजकीय संक्रमणाच्या तळागाळातील बऱ्याच गोष्टी या कादंबरीत येतात.

**राजकीय अस्मितेचे रुपक**

प्रत्यक्षात ही राजकीय घुसळण होऊनही जात आणि धर्मनिहाय शोषणाचे चक्र न थांबता त्याला नवे वळण मिळाले. मुस्लीम म्हणून सतत नजरेखाली असलेल्या वर्गाची गोची

झाली. विशेषतः खेड्यापाड्यात हिंदूंच्या आधाराने राहणारी मुस्लीम जमात दहशतीत आली. त्या अनुषंगाने कादंबरीतल्या रशीद उस्मान पाशा व भाभी यांच्यावर झालेले अत्याचार लक्षवेधक आहे. त्यातून भविष्यातील राजकारणाच्या दिशा स्पष्ट होण्यासारख्या आहेत.

थोडक्यात, धर्म, जात वास्तव आणि सामाजिक तसेच सांस्कृतिक अभिसरणाच्या सांध्यावरील अनेक आत-बाहेरच्या गोष्टींची सलउकल या लेखनातून पुढे येते. अंगभूत असलेली सरंजामशाही, शिवसेनेच्या दयेने मिळालेली राजकीय वस्त्राची झूल, हिंदुत्वाच्या पाळलेल्या अस्मिताच्या चाकोरीत चालताना होणारी गिचमिड पाहण्यासारखी आहे. दिवाकरसहित सर्वदे, किरमणे, हान्या, मडक्या, पाशा उस्मान व मारूती कांबळे आपआपल्या परीने त्यात गुंतलेले आहेत. 'अयोध्या' हे केवळ येथील व्यवस्थेच्या राजकीय अस्मितेचे रूपक आहे. ते तळातील राजकारणाचा भाग होवू शकत नाही. येथे मंदिर व देवदेवळांच्या नात्यापेक्षा जात वास्तवाचे प्रश्न अधिक संवेदनशील आहेत. त्याचा बळी असलेला मारूती कांबळे हे या कांदबरीत आलेले राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक अभिसरणातील मोठे सूचन आहे.

शिवसेनेच्या राजकीय सामाजिकीकरणाचा फायदा बहुजन वर्गातील समूहाला झालेला दिसतो. तर त्यांचा खरा फटका आंबेडकरी अस्मितांना बसलेला असल्याचे जाणवते. धार्मिकतेच्या नावाखाली मुस्लीम समाजही वेगवेगळ्या दूषणांनी वेढलेला पाहावयास मिळतो. हा सगळा कोलाहल आजच्या वास्तवात अधिक अर्थपूर्णतेने राजकीय पटलावर आलेला आहे. ही खऱ्या अर्थाने धर्माला जोडून येणाऱ्या राजकीय व्यवस्थेची पूर्तता म्हणता येते. या दृष्टीने पाशा उस्मान आणि त्याच्या बायकोचा अनुभव काहीतरी सांगून जाणारा आहे. 'राजकारण इतकं घाणेरडं झालेलं आहे की हिंदू-मुसलमान या केसमध्ये मानवता नावाची गोष्टच राहिलेली नाही. आता हा दिवाकर. आपला गाववाला. अचानकपणे हिंदू झालाय. आपल्याला, बायकोला मुसलमान म्हणून बघायला लागलाय.' या गोष्टी दिवाकर या माणसात आल्यात कोठून? असे काही प्रश्न निर्माण होतात. दिवाकरचे अचानकपणे हिंदू होणे, या एकंदरीत बदलाला कारणीभूत असलेले राजकीय वळण मानवी संकल्पनेला काळिमा फासणारे आहे.

आजच्या वास्तवात माणसाचे अस्तित्व कोणत्या प्रेरणा आणि प्रवृत्तीच्या अंगाने विकसित होत आहे याची कल्पना आल्याशिवाय राहत नाही. या गोष्टीचे शेवटी झालेले परिणाम काय? तर अयोध्या उर्फ मोनालीचे पळून जाणे, निकाह आणि धर्मातर होणे. शेवटी जातीय अस्मिता म्हणून आपल्या बिरादरीतून वजा करण्यापर्यंत दिवाकर जातो.

**चिंतनशील निर्वाळा**

राजकारणातील मराठा आणि त्यांच्या आजच्या शेती वास्तवाबद्धलचे बरेचसे चिंतन या कादंबरीत आलेले आहे. त्या अनुषंगाने झालेल्या सांस्कृतिक व सामाजिक अभिसरणाच्या दिशा बदललेल्या आहेत. उरलेली कृषिनिष्ठा ही केवळ पदरात पडलेल्या संस्कृती इतकीच शिल्लक राहिलेली गोष्ट आहे. त्याला सोडून आणि ओलांडूनही न जाता येणारी अवस्था आहे. दुसऱ्या समाजाचा विचार केला तरी, 'फक्त नियोजन आणि खर्च शिलकेचा हिशेब याच्यापुरतीच शेती. श्रम करणारे दुसरेच. शेतकरी म्हणून आत्महत्या करणारे तिसरेच आणि या सगळ्यांचं राजकारण करणारे भलतेच... आणि शेती संस्कृती म्हणणारे एक मराठा... लाख मराठा म्हणत तळाकडे चाललेत... आणि हे बौद्ध सरकलेत त्यांच्या जागेत. सांस्कृतिक अदलाबदल...' या कादंबरीत आलेल्या विधानातून आपल्या सांस्कृतिक, राजकीय घटितांमध्ये झालेल्या बदलांचा सिग्नल मिळतो. त्यातून आपला एक चिंतनशील निर्वाळाही लेखक इथे देतात. जगण्यातून श्रमसंस्कृती व प्रामाणिकपणा वजा केल्यानंतर उरणारा विवेक भ्रष्ट असतो. सांस्कृतिक अनुषंगाने एक गोष्ट नमूद करण्यासारखी आहे. गावाच्या मध्यभागी वास्तव्यात असणारा मराठा वर्ग परिघावर तर, बौद्धाची घरे केंद्रावर सरकलेली आहेत. असे चित्र आपणास काही खेड्यांमधून दिसणारे आहे. या तशी अनेक कारणे आहेत. ती प्राकृतिक, आर्थिक तर काही स्थलांतराचीही असू शकतील. तो कसाही बदल असो तरीही तो सांस्कृतिक दृष्टीने बदलच असतो. या सगळ्या गिचमिड संस्कृतीत स्त्रियांचे वास्तवही वेगळे काढता येत नाही. त्यांच्या आजच्या अस्तित्वासंबंधीचे अनेक प्रश्न या लेखनातून आलेले आहेत.


हिंदुत्ववाद्याच्या उपयोजित ध्येयापासून ते सत्तांतराचा पट या कादंबरीचे प्रधान असे सूत्र मानता येते. त्यासाठीचे होत राहिलेले उपयोजित काम व त्यातील टप्प्याच्या सुसंगत अशा मांडणीत झालेली कामं सत्ता संपादनाची दारे उघडत गेलेली आहेत. रामजन्मभूमी रथयात्रा त्याला जोडून येणाऱ्या राजकीय

परंपरा अयोध्येतील राममंदिर उभारणीपर्यंत पोहोचतात. राजसत्तेतील त्याचा परीघ आताच्या ताज्या वास्तवात प्रधान सेवकाच्या हस्ते फडकविणाऱ्या धर्मध्वजेपर्यंत जातो. या घुसमटीत घडलेल्या बऱ्याच लहान मोठ्या घटनांमध्ये बाबरी मशिदीचा झालेला विध्वंस ही मोठी घटना आहे. या सारासार अतिरचनांच्या अध:पतनासाठी केवळ हिंदुत्ववादी संघटना जबाबदार ठरत नाहीत. मुळात, काँग्रेसप्रणित नरसिंहराव यांच्या सरकारला ओलांडून या अध:पतनाकडे पाहता येत नाही. पी. व्ही. नरसिंह राव आजच्या सत्तेसाठी मिथक बनून आलेले होते. तशी त्यांची प्रतिमा देशासाठी चांगली होती. स्वातंत्र्य लढ्यात त्यांनी भाग घेतला होता. परंतु विध्वंसावेळी राव प्रशासनातील ढिल काहीतरी सुचवणारी होती.

मिथक सृष्टीत नरसिंह अवतार प्रसिद्ध आहे. कोणत्या सत्तेसाठी तारक आणि मारकाच्या या दोन्ही भूमिका त्यांच्या कृतीतून आलेल्या आहेत. या राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक व सामाजिक अंगाने एकंदरीत माणसाचे, त्याच्यातील माणूसपणाचे झालेले विरूपीकरण या काळाचे अपत्य आहे. या निमित्ताने अनेक तपशिलांसह हा लेखक आपले समकालीन वास्तव सांगण्याचा प्रयत्न करतो आहे. या कादंबरीतील वास्तवाला त्या अनुषंगाने येणाऱ्या आशयाला अनेक बाजू आहेत. येथील राजकारण, समाजकारण, धर्मकारण, जातवास्तव, शेतीकारण अशा विविध विषयांमधून ते आजच्या वास्तवाकडे एक लेखक म्हणून पाहताहेत. त्यांचा हा प्रयत्न एका मौलिक राजकीय ऐवजाकडे घेऊन जाणारा आहे. ऐनापुरेंनी सांप्रत काळातल्या राजकीय अवस्था केंद्रस्थानी कल्पून त्याला जोडून आलेल्या सगळ्या अधिरचना अगदी तळागाळातून पाहण्याचा प्रयत्न या कादंबरीद्वारे केल्याचे प्रकर्षाने जाणवते आहे. त्यादृष्टीने आलेली परिसरनिष्ठा, भाषाशैली, लेखननिष्ठा आणि सत्य सांगण्याचे धाडस एक राजकीय कादंबरी म्हणून हे महत्त्वाचे घटक आहेत. या बृहत कामाचा विचार करीत असताना तूर्तास यातील काही बाबींवरच विचार करता आला आहे. वस्तुतः या लेखनाच्या बऱ्याच सामाजिक, राजकीय घटितांवर स्वतंत्रपणे विचार होण्यासारखा आहे, हे ही नमूद करणे इथे गरजेचे आहे.

**अयोध्या**
**लेखक : जी. के. ऐनापुरे, प्रकाशक : हस्ताक्षर प्रकाशन गृह**
**मूल्य : ११९९ मात्र.**

**दा. गो. काळे हे कवी, समीक्षक आहेत. शब्दवेध व अतिरिक्त या नियतकालिकांचे संपादन त्यांनी केले आहे. त्यांचे आकळ, (राज्य पुरस्कार) कवितावकाश हे समीक्षाग्रंथ तसेच अरण्याहत (यशवंत मनोहर प्रतिष्ठान पुरस्कार) हा काव्यसंग्रह प्रकाशित आहे. संपर्क: ९४२१४६७६४०**

लोकवाङ्मय गृह प्रकाशित
जातिव्यवस्थेची अश्लीलता
लेखिका : शैलजा पाईक / भाषांतर : अनघा लेले
पाने : ४२४ । मूळ किंमत : ७५०/-
सवलतीत रुपये ६००/-


संपर्क : भूपेश गुप्ता भवन, ८५ सयानी रोड, लेनिनग्राड चौक, प्रभादेवी, मुंबई - ०२५
भ्रमणध्वनी : ८४५४०४९०३६. ई-मेल :lokvangmayagriha@gmail.com
वेबसाइट : www.lokvangmaybooks.in
Available at amazon


# उत्तर



**अनुवाद : सुमती जोशी**

**मूळ कथा: वनफूल**

**बंग नाद**



लघुकथेची खुमारी काही औरच असते. त्यातही लघुकथेची मूळ भाषा बंगाली असेल, तर ती कथा बंगालच्या मातीचा आणि त्या मातीत फुलणाऱ्या मानवी नातेसंबंधांचा गंध घेऊनच अवतरते. त्यात त्या नातेसंबंधातून आलेली लय असते, नादही असतो. ही लय आणि हा नाद कधी वाचकाला धक्का देतो, कधी अंतर्मुख करतो, तर कधी बुचकाळ्यातही पाडतो. बंगाली भाषेचे सौंदर्य यात असतेच, पण त्या त्या लेखक–लेखिकेची दृष्टी वाचकांचे भानही विस्तारते. अशाच काही निवडक कथांचा हा भावानुवाद...

आकाशाची निळाई, झुळझुळ वाहणारा वारा, सुंदर फुलं. माझं नाव निहाररंजन. माझा विवाह झाला पाकडा गावी राहणाऱ्या क्षान्तमणी नावाच्या एका खेडवळ मुलीशी. वर्षाच्या आत तिने एका कन्येला जन्म दिला. तिचं नाव ठेवलं बुँची. मी त्या नावाला आक्षेप घेतला होता. घरातली आणि पाड्यावरची सगळी म्हणाली, ''ही मुलगी किती काळी आहे. तिचं नाव पुष्पमंजिरी ठेवायला हवं. तुझं सगळंच जगावेगळं...''

मुलगी खरोखरच कुरूप होती. रंग काळा होताच, शिवाय एक डोळा मोठा एक डोळा लहान होता, मंदबुद्धी असल्यासारखा चेहरा, तोंडातून लाळ गळत राही! पुष्पमंजिरी हे नावही शोभल नसतं.

दोन वर्षानंतर.

क्षान्तमणी बुँचीला घेऊन माहेरी गेली होती. त्या दिवशी रविवार होता. कोणालाच कामावर जायचं नव्हतं. देवळाच्या मंडपात बसून गप्पा चालल्या होत्या. अचानक माझा विषय निघाला.

नृपेन म्हणाला, ''निहारचं दुर्दैव बघ. मुलगी झाली आणि तीही अशी...''

श्याम बोस म्हणाला, ''काय सांगणार? लग्न ठरवताना नाकातोंडाशी फेस येणारेय! भरपूर पैसा हवा.''

तंबाखूचा तोबरा भरता भरता लंगडा हारू म्हणाला, ''अरे भैया आजकाल नुसता पैसा असून चालत नाही. लोकांना पैसाही हवा असतो आणि रुपही हवं असतं. एक डोळा लहान एक डोळा मोठा असल्यावर आणखीच कठीण...''

सगळ्यांना काळजी वाटू लागली. तितक्यात नोकराने मला एक पत्र आणून दिलं.

नृपेननं विचारलं, ''कोणाचं पत्र?''

पत्र वाचून झाल्यावर मी म्हटलं, ''बायकोचं पत्र. तिनं लिहिलंय – काल बुँची देवाघरी गेली.''

## कॅनव्हॉसर

भांडणाचं मूळ कारण होतं कात्यायनी.

कात्यायनीच्या वाक्यांच्या ठिणग्यांनी जेव्हा भैरवच्या मनाच्या दारुगोळ्यावर पडून तो पेटवून दिला आणि तुंबळ युद्ध सुरू केलं, तेव्हा भैरवला कॅनव्हॉसर हिरालाल भेटला नसता तर ही घटना घडली नसती.

एक उंची साडी खरेदी करावी, असं कित्येक दिवसांपासून कात्यायनीला वाटत होतं.

भैरव बेकार असल्यामुळे कात्यायनीची ती हौस त्याला पुरवता येत नव्हती.

'या महागड्या वस्तू मला बिलकुल आवडत नाहीत. अशा विलासी लालसेमुळेच देश रसातळाला जातोय' अशी सबब पुढे करत तो बायकोची दिशाभूल करायचा प्रयत्न करत होता.

कात्यायनी पतिव्रता असली तरी असली खोटी कारणं ऐकून घेणारी नव्हती.

ती म्हणाली, ''जांभई देताना ज्याच्या जबड्याचे स्नायू पिळवटून निघतात त्याने बंदूक खांद्यावर कशाला घ्यावी?''

किती कठोर आणि असह्य बोलणं होतं हे!

भडकलेल्या भैरवने डोक्यावर थोडं तेल थापलं आणि दाणदाण पावलं टाकत तो घराबाहेर आला. दुपारच्या कडक उन्हामुळे परिसर तापला होता. बाहेर पडल्यावर डोळ्यासमोर दिसलं कडूलिंबाचं झाड. सकाळपासून दात घासणं झालंच नव्हतं. भैरवने कडूलिंबाच्या झाडाची एक फांदी वाकवून दात घासण्यासाठी कटकन एक काटकी तोडली.

''दंतमंजन हवंय – उत्तम दंतमंजन''

भैरवने मागे वळून पाहिलं. हातात एक लहानशी सूटकेस घेतलेले अनोळखी सद्गृहस्थ त्याच्याकडे बघत होते.

चेहऱ्यावर मंद स्मित.

कॅनव्हॉसर हिरालाल.

वास्तविक कॅनव्हॉसर हिरालाल या खेडेगावात येणार नव्हता. त्याला शहरात जायचं होतं. तिथेच जायला तो निघाला होता – पण ट्रेनमध्ये गाढ झोप लागल्यामुळे तो बिचारा उगीचच पुढे आला आणि या खेडेगावी उतरला.

संध्याकाळच्या आधी परतीची गाडी नव्हती. काही बिझनेस मिळवता आला तर मिळवावा या आशेने या तळपत्या उन्हात तो बिचारा सगळीकडे पायपीट करत होता.

स्तिमित झालेल्या भैरवने विचारलं, ''आपण इथे कशासाठी आलायत महाशय?''

''मंजन आहे – उत्तम दंतमंजन. दातांना लागलेली कीड, सुजलेल्या हिरड्या, दातांची मुळं, दातातून येणारं रक्त, तोंडाची दुर्गंधी – सगळं ठाकठीक होऊन जाईल महाशय – दर्जेदार दंतमंजन आहे.''

''ते असेलही, पण आपण आलात कोठून? या खेडेगावात आम्ही शांतपणे राहतोय. आपण आल्यामुळे...''



*सर्व रेखाचित्रे : सागर शिंदे*
*(७०३०९९००८१)*

''एकदा वापरून तर बघा. उत्तम दंतमंजन.''

कडूलिंबाची काटकी चावता चावता भैरव म्हणाला, ''फालतू काहीतरी आणलंय.''

हसत हसत हिरालाल म्हणाला, ''तसं नाही हो! याने दात चमकदार होतील. एकदा वापरून बघा ना.''

हिरालालच्या चकाकणाऱ्या दातांकडे पाहत हिरालाल म्हणाला, ''आपले दात मस्त चमकतायत. तुम्हीही हेच दंतमंजन वापरता का?''

किंचित हसत हिरालाल म्हणाला, ''होय.''

चूळ टाकून भैरव पुन्हा एकदा हातातल्या काटकीने दात घासू लागला. अर्थात ते दृश्य डोळ्यांना सुखावणारं नव्हतं.

''दंतमंजन घ्या ना एक बाटली.''

तोंड वेडवाकडं करत भैरव म्हणाला, ''महाशय आपण चालते व्हा इथून. आपण देशाचे शत्रू आहात. जगातल्या सगळ्या बेकार वस्तू विकून तुम्ही देश रसातळाला नेताय. समजलं का?''

असं बोलून निर्विकारपणे तो पुन्हा दात घासू लागला.

आपल्या सुंदर दंतपंक्ती दाखवत हिरालाल पुन्हा एकदा हसला. म्हणाला, ''आपण काय म्हणताय ते मला समजलं नाही. देशात दंतरोगांचा अभाव नाही.''

अचानक रागावून भैरव म्हणाला, ''त्याच्याशी तुम्हाला काय करायचंय? या गावातून आपण निघून जा. मंजन-फंजन असल्या फसव्या वस्तू इथे खपणार नाहीत.''

हिरालाल कानव्हासर असला तरी रक्तामांसाचा माणूस होता. तो म्हणाला, ''आपण या गावाचे मालक आहात का?''

हे बोलणं सयुक्तिक असलं तरी त्यामुळे भैरवचा अहम् दुखावला गेला. भैरव बेकार होता हे खरं होतं, भैरव अशिक्षित होता हेही खरं होतं. तो गावाचा मालक नसला तरी तो या माणसाला गावातून हाकलून देऊ शकत होता. अशा लबाड माणसांनी देशातल्या तरुणाईची दिशाभूल चालवलीय.

चार घास मिळवण्याची भ्रांत, तिथे मंजन कसं खरेदी करणार!

चूळ टाकत भैरव म्हणाला, ''या गावातून आपण बऱ्या बोलाने निघून जा.''

''मला गावातून हाकलवून देणारे आपण कोण लागून गेलात महाशय?''

भीमगर्जना करत भैरव म्हणाला, ''इथून निघून जा...''

''आपल्यासारखे अनेक बघितलेयत महाशय.''

हे ऐकल्यावर भैरवने हिरालालच्या कानफटात ठेवून दिली.

भैरवचं हे वागणं स्तिमित करणारं होतं, यात शंकाच नव्हती.

पण त्याहीपेक्षा आश्चर्यजनक आणखी एक घटना घडली. कानफटात बसल्यावर हिरालालच्या तोंडाचं बोळकं झालं. त्याच्या दातांची कवळी बाहेर आली. स्तंभित झालेला भैरव त्याच्या काळ्याभोर मिशांकडे एकटक बघू लागला तेव्हा किंचित हसत हिरालाल म्हणाला, ''होय. माझ्याकडे उत्तम कलपही आहे. घेणार का? उगीच मारझोड कशाला करताय महाशय? मी गरीब माणूस - असे कष्ट करून संसार चालवतोय. या उतारवयात तरणाताठा मुलगा देवाघरी गेला...''

हतबल झालेला भैरव उत्स्फूर्तपणे म्हणाला, ''ठीक आहे. द्या, एक बाटली मंजन!''

**वनफूल या विसाव्या शतकातल्या बंगाली लेखकाने लिहिलेल्या कथांचा हा मराठी भावानुवाद. अनुवादिका सुमती जोशी या राज्य पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ लेखिका आहेत. त्यांची उत्क्रांती, बंगरंग, दैत्याचा बगीचा, मंत्र आदी स्वतंत्र तसेच अनुवादित पुस्तके प्रकाशित झाली आहेत.**

**ईमेल** : sumatijoshi154@gmail.com

# इन्स्टंट जीवनात आयुर्वेद कालबाह्य झाला आहे?



डॉ. श्रीराम सावरीकर

आयु:रंग



आयुर्वेद हे हजारो वर्षापूर्वीपासून प्रचलित भारतीय वैद्यकशास्त्र आहे. हे केवळ वैद्यकशास्त्र नसून ती एक जीवनशैली आहे असे म्हटले जाते. पण ही जीवनशैली आजच्या शहरी जीवनात उपयोगी आहे काय किंवा तिचे पालन करता येईल काय असा प्रश्न आपल्या सर्वांच्या मनांत निर्माण होत असतो. सकृतद्दर्शनी हा प्रश्न गैरलागू नाही. कारण आयुर्वेद प्राचीन शास्त्र असल्यामुळे त्यात वर्णित जीवनशैली त्याच प्राचीन समाज जीवनासाठी समयोचित असेल, आजचे समाज जीवन पूर्णत: बदललेले आहे. विद्युत उर्जेने आज रात्रीचा दिवस झाल्यामुळे आजचे दिवस रात्रीचे वेळापत्रकच पूर्णपणे बदलले आहे. अशा बदललेल्या वेळापत्रकाच्या गणितात समाज मनातील आयुर्वेद जीवनशैली बसण्यासारखी नाही म्हणून ती आचरणयोग्य नाही, असे वाटणे साहजिकच आहे. परंतु वास्तवात आयुर्वेदाच्या जीवनशैलीमधील दिनचर्येचे वेळापत्रक कालानुरूप स्वरूप धारण करू शकणारे आहे. पण त्यासाठी या जीवनशैलीतील निरोगी आयुष्याचे सूत्र समजणे आवश्यक आहे. हेच सूत्र समजवण्याचा प्रयत्न या लेखमालेतून करण्यात येणार आहे...

चिकित्सा शास्त्राची सुरूवात मंत्रयुगाने होऊन आज त्याने तंत्रयुगात प्रवेश केला आहे. या तंत्रयुगामध्ये एकीकडे जिवाणू संसर्गजन्य व्याधींची जागा सुखासीन आहार आणि जीवन शैलीशी संबंधित रोगांनी घेतली आहे. तर दुसरीकडे ज्येष्ठ नागरिकांची संख्या वाढल्यामुळे जीर्ण व्याधींचे प्रमाण वाढलेले दिसते आहे. संसर्गजन्य रोग सामान्यतः प्रतिजैविकादि औषधे सेवन करून काही दिवसात बरे होणारे असतात. बिघडलेल्या आहार व जीवनशैलीमुळे निर्माण होणाऱ्या व्याधीने एकदा शरीरांत प्रवेश केला, की तो त्या शरीराची साथ त्याच्या मृत्यूबरोबरच सोडतो. हे रोग कोणत्याच औषधाला जुमानत नाहीत. बिघडलेली आहार व जीवनशैली सुधारून ती रूळावर आणणे, हा त्यावरील मूळ उपाय आहे. पण आधुनिक वैद्यक शास्त्राच्या चिकित्सा सूत्रांत औषधाशिवाय अन्य उपायांना अत्यंत गौण स्थान आहे. या उलट आहार आणि जीवनशैली चिकित्सा हे आयुर्वेद चिकित्सासूत्राचे बलस्थान आहे. अशा प्रसंगी आयुर्वेद उपचारपद्धती योग्य रीतीने वापरल्यास काही प्रसंगी समर्थ पर्याय, तर नेहमीच पूरक चिकित्सा सिद्ध होऊ शकते. हे निश्चित.

कुरूक्षेत्राच्या युद्धभूमीवर श्रीकृष्णाने स्वतःचे तोंड उघडून त्यात अर्जुनाला विश्वरूप दर्शन घडवले होते, असे म्हटले जाते. हजारो वर्षापूर्वीच्या महाभारत कालातील हा प्रसंग आहे. लौकिकार्थाने विश्वरूप दर्शन दर्शनासाठी आज आपल्याला कुणा भगवान श्रीकृष्णाची गरज पडत नाही. संगणकाचे सामान्य ज्ञान असलेला कुणीही ऐरागैरा माणूस क्लिक करून त्याच्या हातातील मोबाइलच्या स्क्रीनवर जिथे असेल, तिथून इंटरनेटचे दार उघडून संपूर्ण जग काही क्षणांत पाहू शकतो. अशा या झटपट इन्स्टंट युगात आयुर्वेद कालबाह्य झाला आहे, असे मानणारा ज्याला सर्वार्थाने सूज्ञ म्हणावे असा एक मोठा वर्ग आहे. त्यातच एकीकडे आयुर्वेदिक औषधाला साइड इफेक्ट्स नसतात. तर दुसरीकडे आयुर्वेदिक औषधांमध्ये मर्क्युरी, लेड, कॅडमियमसारखे टॉक्सिक मेटल्स असतात, त्यामुळे त्यांच्या सेवनामुळे किडनी, लिवर खराब होते. आयुर्वेदिक औषध दीर्घकाल सेवन करावे लागते. त्याने रोग लवकर बरे होत नाहीत. त्यासाठी खूप पथ्यपाणी करावे लागते. यासारखे अनेक समज लोकांमध्ये खूप मोठ्या प्रमाणात पसरलेले आहेत.

यातील काही प्रत्यक्ष घडलेल्या घटनांवर तर मोठ्या प्रमाणातील समज ऐकीव माहितीवर आधारित आहेत. उपरोक्त गोष्टी खऱ्याखोट्या कशाही असल्या तरी आज भारतात आयुर्वेदाला कायदेशीर मान्यता आहे. २०२५ अखेरीस भारतात सात लाखापेक्षा अधिक नोंदणीकृत आयुर्वेद व्यावसायिक कार्यरत आहेत. यातील दीड लाख व्यावसायिक महाराष्ट्रात आहेत. या तथ्याकडे दुर्लक्ष करता येत नाही. त्यामुळे या लाखो आयुर्वेद पदवीधरांकडून आयुर्वेद उपचार करून घ्यावेत की नाही आणि घ्यायचे असतील तर ते कोणत्या परिस्थितीत असे प्रश्न समाजाला पडणे साहजिक आहे. या प्रश्नाचे उत्तर देणे हेच या लेखाचे प्रयोजन आहे.

**व्याधी प्रादुर्भावाचा बदललेला कल**

आज संपूर्ण जगातील व्याधी प्रादुर्भावाचा कल म्हणजेच डिसिज बर्डन ट्रेंड पूर्णपणे बदललेला दिसून येत आहे. आरोग्य सेवांची वाढलेली व्याप्ती तसेच प्रतिजैविके म्हणजे अँटि बायोटिक्सच्या सहज वापरामुळे आज सांसर्गिक रोगांचा प्रादुर्भाव नष्ट नाही, तरी खूपच कमी झाला आहे. त्यामुळे सांसर्गिक रोग ही काही आता समस्या राहिलेली नाही. दुसरीकडे देशातील अतिदुर्गम भागांत कुपोषणजन्य विकार काही प्रमाणात दिसत असले तरी शहरी जीवनात मात्र ओव्हर न्यूट्रिशन म्हणजे अतिपोषणाच्या परिणामी अतिस्थौल्य म्हणजे ओबेसिटी, मधुमेह, हृदय रोग, रक्तदाब वृद्धी , मेटॅबॉलिक सिण्ड्रोम, ऑटो इम्युन डिसिज यासारख्या आयुर्वेदाच्या भाषेतील संतर्पणजन्य रोगांचा प्रादुर्भाव वाढून तो दिवसेंदिवस नियंत्रणाबाहेर चाललेला दिसून येत आहे. त्याचे कारण, या प्रकारचे रोग पूर्ण बरे करू शकेल असे कोणतेही औषध आजच्या लोकमान्य ॲलोपॅथी चिकित्सा पद्धतीकडे उपलब्ध नाही. खरे तर ज्याला व्यावहारिक भाषेत टॅबलेट, कॅप्सूल, इंजेक्शन यासारखे औषध म्हटले जाते, ते असे रोग बरे करणारे औषध कुठल्याच चिकित्सा पद्धतीकडे नाही. या व्यतिरिक्त इतर उपचारांना आपला समाज औषध मानत नाही. किंबहुना, जगड्व्याळ पसरलेला बलाढ्य औषधी उद्योग त्याला तसे करू देत नाही. हा औषधी उद्योग अशा रोग्यांना रोज नवीन नवीन निरूपयोगी महागड्या औषधांच्या मात्रा घेण्यास भाग पाडत असतो. या बहुमोल कार्यामध्ये विविध प्रकारच्या विषय तज्ज्ञांची फौज त्यांना मदत करण्यास तत्पर असतेच. वास्तविक बिघडलेली आहार व जीवनशैली सुधारून ती रूळावर आणणे हा त्यावरील मूळ उपाय आहे. पण आधुनिक वैद्यक शास्त्राच्या चिकित्सा सूत्रांत औषधाशिवाय अन्य उपायांना अत्यंत गौण



*आयुर्वेदाचे नेमके भान आणि जाण असलेले तज्ज्ञ कॅन्सरसारख्या गुंतागुंतीच्या आजाराला भिडताना अवास्तव दावे कधीच करत नाहीत...*

स्थान आहे.

या परिस्थितीत आयुर्वेद हा अत्यंत समर्थ पर्याय होऊ शकतो. पण त्यासाठी आयुर्वेद तज्ज्ञांनी आधुनिक औषधांना पर्यायी आयुर्वेदिक औषध देण्यापेक्षा औषध योजनेपलीकडील आयुर्वेदाच्या उपचार पद्धतींचा योग्य वापर करणे आवश्यक आहे.

**आयुर्वेदिक औषध पर्यायी औषध नाही**

कोणत्याही आधुनिक औषधाला आयुर्वेदिक औषध पर्याय होऊ शकत नाही. पण संपूर्ण आयुर्वेद उपचार पद्धती योग्य रीतीने वापरल्यास काही प्रसंगी समर्थ पर्याय तर नेहमीच पूरक चिकित्सा सिद्ध होऊ शकते, हे निश्चित. आयुर्वेद चिकित्सापद्धती नव्हे तर जीवनपद्धती आहे अशी धारणा प्रचलित आहे. आयुर्वेदिक जीवन पद्धती म्हटले, की सामान्यतः भल्या पहाटे ब्राह्म मुहूर्तावर उठणे आणि सद्यकाली आचरणास अव्यावहारिक वाटणाऱ्या इतर गोष्टी आठवतात. परंतु, आयुर्वेदोक्त दिनक्रमांच्या या वेळांची सद्यकालीन असंगतता बघण्यापेक्षा त्यामागील आरोग्य रक्षणाचे मूळ सूत्र लक्षात घेतले गेले पाहिजे. या दृष्टीने केवळ पहाटे उठणे आणि रात्री लवकर झोपणे, म्हणजे आयुर्वेद जीवन पद्धती नव्हे. तर आपल्या व्यावसायिक कार्यवेळांना अनुरूप दिनचर्या योजून आपला आहार आणि विहार म्हणजे इतर दिनक्रम आपल्या शारीरिक व मानसिक आरोग्यास पूरक व पोषक राहील, असा ठेवणे म्हणजेच आयुर्वेद जीवन पद्धती आचरणे होय. यासाठी आयुर्वेदोक्त आहार सेवनाचे नियम जे अत्यंत वैज्ञानिक आणि आजच्या शहरी जीवनांतही सहज आचरण योग्य आहेत. त्यांचे एक उदाहरण मार्गदर्शक ठरेल.

या आहार सेवन नियमामध्ये संबंधित व्यक्तीची शारीरिक व मानसिक अवस्था, त्याच्या पचन संस्थेची भोजन समयीची स्थिती, त्याच्या एकंदरीत शरीरातील चयापचयादि प्रक्रिया, त्याच्या शरीराची ठेवण इत्यादिंना अनुरूप आहारातील घटकांची आवश्यकता यांचा विचार केला जातो. याशिवाय भोजन समयी भोजन करणाऱ्या आणि अन्न वाढणाऱ्या व्यक्तीच्या मानसिक अवस्थेसह त्याने पाळावयाचे स्वच्छतेचे बारीक-सारीक नियम ज्यात भोजन पात्रांची स्वच्छता आणि भोजनसमयीचे सभोवताल ज्याला इंग्रजीत ॲंबियन्स म्हणतात, यांचाही समावेश होतो. कोविडच्या प्रादुर्भावापासून हात धुण्याचे महत्त्व आधुनिक वैद्यक शास्त्राला पटून ते लोकांच्या मनावर बिंबवण्याचे भरमार प्रयत्न केले जात आहेत. परिणामी हॅण्ड सॅनिटायजरच्या जाहिरातीतून त्यांची विक्री कैक पटीने वाढून संबंधित उद्योजकांच्या तिजोऱ्या भरल्या जात आहेत. पण हात धुणेच नव्हे तर एकूणच वैयक्तिक स्वच्छतेचे आयुर्वेदाने अधोरेखित केलेले महत्त्व आजही दुर्लक्षितच राहिले आहे.

वास्तविक त्यात अव्यवहार्य असे काही नाही. आमच्या विद्यार्थी दशेत स्वस्थवृत्त विषयातील अशा वर्णनाकडे आम्ही असल्या फुटकळ गोष्टी मेडिकलच्या विद्यार्थ्यांना सांगणे हास्यास्पद ठरवून त्याकडे दुर्लक्ष करत होतो. हे आठवले की खजील व्हायला होते. तसे पाहिले तर एकूणच आयुर्वेदाकडे एक विज्ञान म्हणून आम्ही भारतीयांनी दुर्लक्षच केले आहे. समाजमनाने त्याला एक घरगुती उपचार पद्धती किंवा आजीबाईच्या बटव्यातील औषधी एवढीच मान्यता दिली आहे.

**आयुर्वेदिक औषधांचा अज्ञानमूलक वापर घातक ठरू शकतो**

आजारी पडल्यानंतर ठरवून आयुर्वेदिक उपचार घेणारी व्यक्ती आज भारतातही सापडणे तसे दुर्मीळ म्हटले पाहिजे. सामान्यतः एखादा आजार ॲलोपॅथी औषधाने बरा होत नाही, असे लक्षात येऊ लागले की मग लोकांना आयुर्वेदिक औषधाची आठवण येते. त्यातही आयुर्वेदिक उपचार घेतल्याने रोग बरा होईल या विश्वासापेक्षा हेही करून पाहू अशी भावना अधिक असते. म्हणूनच कॅन्सर, डायबेटिस, ओबेसिटी, सांधेदुखी, वंध्यत्व, पांढरे डाग, सोरियासिस सारखे त्वचा रोग, ऑटोइम्युन डिसिजेस यासारखे कधीही बरे न होणारे रोग बरे

व्हावेत या आशेने लोक आयुर्वेदाकडे वळत असलेले दिसतात. असे उपचार घेतानाही आयुर्वेदाचा उपयोग पूरक उपचार म्हणूनच अधिकतर केला जात असतो. म्हणजे यातील बहुसंख्य लोक ॲलोपॅथिक आणि आयुर्वेदिक अशी दोन्ही औषधे एकाच वेळी घेत असलेले आढळून येतात. बरे असे करत असल्याची माहिती त्यांच्या डॉक्टरलाही ते क्वचितच देत असतात. अशा प्रसंगी अनेकदा एकच कार्य करणारी आयुर्वेदिक आणि ॲलोपॅथिक औषधे एकत्र घेतली जात असतात. त्यामुळे कधी कधी त्यांच्या एकत्रित परिणामामुळे रूग्णाची प्रकृती अचानक बिघडते. उदा. डायबेटिसमध्ये रक्त शर्करेचे प्रमाण कमी करणाऱ्या औषधाबरोबर आयुर्वेदिक औषध घेतल्यास कधी कधी रक्त शर्करा अचानक कमी होऊन रूग्णाला धोका होऊ शकतो.

या उलट परस्पर विरूद्ध कार्य करणारी ॲलोपॅथिक व आयुर्वेदिक औषधे एकत्र दिली गेल्यास त्यांची परिणामकारकता थांबवली जाऊन परिणामी रोग बळावून आत्ययिक अवस्था निर्माण होऊ शकते. उदा. इपिलेप्सी, म्हणजे अपस्मारासारख्या विकारांत आक्षेप प्रतिरोधक ॲलोपॅथिक औषधांबरोबर जटामांसीसारखे औषध दिल्यास ॲलोपॅथिक औषधाची आक्षेप प्रतिरोध क्षमता कमी होऊन अपस्माराचे आक्षेप अचानक सुरू होण्याची शक्यता असते. असे काही घडले, की संबंधित ॲलोपॅथिक डॉक्टर लगेचच घडलेल्या दुर्घटनेसाठी आयुर्वेदिक औषधाला जबाबदार ठरवून संपूर्ण आयुर्वेदाला दूषणे देऊ लागतो. मग संबंधित दुर्घटनेचे बळी आणि साक्षीदार हे सर्व लोक आयुर्वेदाचे कट्टर विरोधक बनतात. वास्तविक घडलेली घटना ड्रग इंटरॲक्शन म्हणजे औषधांच्या परस्परपूरक अथवा प्रतिबंधक क्रियेमुळे घडलेली असते. अशा वेळी अशा शक्यता विचारात घेऊनच संबंधित चिकित्सकाने औषधाचे प्रमाण कमी जास्त करावयाचे असते. पण अशा प्रकारच्या क्रियांचे रूग्णाला सोडा पण डॉक्टरांना सुद्धा अपवादानेच ज्ञान असते. अशा अज्ञानाचे एकमेव कारण आयुर्वेदिक औषधे निरूपद्रवी असतात, हा सार्वत्रिक दृढ गैरसमज.

**कॅन्सर आणि आयुर्वेद**

कधीही बरे न होणारे रोग म्हणून ज्या रोगांचा वरती उल्लेख केला आहे, त्यात कॅन्सरच्या चिकित्सेसाठी आयुर्वेदाकडे वळलेल्या लोकांची संख्या लक्षणीय असते. कॅन्सर चिकित्सा कितीही सुधारलेली असली, तरी काही निवडक प्रकार वगळता इतर प्रकारचे कॅन्सर बरे होण्यातले नाहीत. त्यामुळे जवळपास प्रत्येक कॅन्सरचा रूग्ण चिकित्सेच्या कुठल्या ना कुठल्या टप्प्यावर कुठल्या ना कुठल्या आयुर्वेद डॉक्टरला भेट देतोच देतो. अशा रूग्णांना भ्रमित करण्यात कॅन्सर बरे करण्याची हमी देणाऱ्या बेकायदेशीर भडक जाहिराती, मित्रमंडळी आणि सग्यासोयऱ्यांचे अनाहूत सल्ले आणि समाज माध्यमावरून प्रसारित होणाऱ्या फुकट सल्ल्यांचा हमखास हातभार लागतो. अशा वेळी तो रूग्ण आयुर्वेदाबरोबरच ॲलोपॅथीचेही कॅन्सरचे सखोल ज्ञान बाळगणाऱ्या आयुर्वेद डॉक्टरकडे पोहोचला असेल, तर त्याचे नशीब. अन्यथा त्याच्या पदरी निराशा येणे ठरलेलेच आहे. अशा प्रकारचे ज्ञान बाळगणारे आयुर्वेद तज्ज्ञ संख्येने कमी असले, तरी नक्की उपलब्ध आहेत. वास्तविक कॅन्सरच्या चिकित्सेसाठी चिकित्सेच्या कोणत्याही टप्प्यावर आयुर्वेद डॉक्टरकडे जाताना रूग्णांनी व त्या रूग्णांची चिकित्सा करणाऱ्या आयुर्वेद डॉक्टरांनी अपवाद वगळता हा रोग कधीही बरा होणारा नाही, हे लक्षात ठेवलेच पाहिजे.

अशा वेळी आयुर्वेद डॉक्टरांची भूमिका अधिक महत्त्वाची आहे. आयुर्वेद डॉक्टरांनी कॅन्सर रूग्णाची चिकित्सा करताना तो बरा होणारा नाही, हे रूग्णाला स्पष्टपणे सांगणे आवश्यक असते. या बाबतीत ॲलोपॅथिक कॅन्सर तज्ज्ञांचा आदर्श आयुर्वेद डॉक्टरांनी समोर ठेवायला हवा. कोणताही ॲलोपॅथिक कॅन्सर तज्ज्ञ कॅन्सर रूग्णाला कॅन्सर त्याचे शरीर पूर्णपणे सोडून जाईल व तो खडखडीत बरा होईल, असे कधीच सांगत नाही. उलट विशिष्ट प्रकारची चिकित्सा घेतल्यास संबंधित रूग्ण अमुक इतके दिवस, महिने वा वर्ष जिवंत राहण्याची अमुक टक्के शक्यता आहे, असे तो सांगत असतो. त्याचबरोबर कोणत्या प्रकारची चिकित्सा घेतल्यास किती खर्च येईल याचीही स्पष्ट कल्पना रूग्णाला दिली जात असते. सामान्यतः कॅन्सरची चिकित्सा करताना रूग्णाचे उरलेले आयुष्य कमीत कमी वेदनादायी व शक्य तितके सुसह्य होईल, याचाच प्रयत्न कॅन्सर चिकित्सक तज्ज्ञ करीत असतात. कॅन्सर रूग्णाची चिकित्सा करणाऱ्या प्रत्येक आयुर्वेद डॉक्टरचीही हीच भूमिका असली पाहिजे. परंतु असे अभावानेच होताना आढळते. कॅन्सरग्रस्त रूग्णांना आयुर्वेदिक औषधांनी तो कॅन्सरमुक्त होईल, या भ्रमात ठेवण्याच्या घटनांचे प्रमाण चिंताजनक आहे. अनेकदा या भ्रमाच्या पडद्याखाली अत्यंत महागडी औषधे भरमसाट फी आकारून रूग्णांच्या गळ्यात

मारली जात असतात. अशा प्रकारच्या औषधांची परिणामकारकता वैज्ञानिकदृष्ट्या सिद्धही झालेली नसते. तसेच आयुर्वेद तज्ज्ञ ज्यांना प्रमाण मानतात, त्या संहिता ग्रंथातही तसा काही ठोस उल्लेख असत नाही. त्यातच सामान्यतः कॅन्सरमध्ये यकृताची कार्यक्षमता बऱ्याच प्रमाणात कमी झालेली असते.

अशा अवस्थेत कॅन्सरमध्ये यकृताच्या कार्यक्षमतेवर अवलंबित औषधांचा वापर शक्यतो टाळला वा कमी केला जात असतो. अशा अवस्थेत शरीरातील औषधी कार्यासाठी आणि त्यांच्या निष्कासनासाठी यकृतावलंबी औषधे कॅन्सर रूग्णाला धोकादायक ठरून त्याचे आयुष्य अपेक्षेपेक्षा लवकर संपवू शकतात. तरीही आयुर्वेदिक डॉक्टर अशा औषधांच्या कॅन्सर वरील उपयुक्ततेची खात्री देऊन त्याचे गुणगाण गात असलेले दिसून येतात. या गोष्टीचे भान ठेवून कॅन्सरची योग्य आयुर्वेद चिकित्सा करणारे आयुर्वेद तज्ज्ञांचे सन्माननीय अपवाद निश्चितच कार्यरत आहेत. कॅन्सर रूग्णांना आयुर्वेदिक औषधांनी कॅन्सरमुक्तीची फसवी स्वप्ने दाखवणाऱ्या पानभर पसरलेल्या जाहिराती नामांकित दैनिकातून हल्ली नियमितपणे पाहायला मिळत आहेत. वास्तविक अशा प्रकारच्या जाहिराती करणे वैद्यकीय आचार संहितेचा भंग करणारे आहे. या आचार संहिता भंगावर संबंधित वैद्यकीय परिषदा कायदेशीर कारवाई करू शकतात. पण या परिषदांकडून अशा प्रकारची कारवाई झाल्याचे कधी ऐकिवात येत नाही.

**आयुर्वेद व ॲलोपॅथिक तज्ज्ञांचा समन्वय आदर्श परिस्थिती**

कॅन्सर रूग्णाची चिकित्सा ॲलोपॅथिक व आयुर्वेद तज्ज्ञांनी एकत्र येऊन करणे ही आदर्श परिस्थिती आहे. पण अशी परिस्थिती निर्माण होण्यासाठी उभयतांमध्ये विश्वास निर्माण होणे आवश्यक आहे. आजच्या परिस्थितीमध्ये ॲलोपॅथिक तज्ज्ञाकडे आयुर्वेदाचे प्राथमिक ज्ञानही असण्याची अपेक्षा बाळगणे, हे स्वप्नवत आहे. त्यामुळे ॲलोपॅथी तज्ज्ञाने आयुर्वेदाचा टोकाचा विरोध वा द्वेष न करता त्याच्या रूग्णाची चिकित्सा करणाऱ्या आयुर्वेद चिकित्सकावर विश्वास ठेवावा एवढेही पुरेसे आहे. ॲलोपॅथी व आयुर्वेदाच्या सामंजस्यपूर्ण समन्वयी आदर्श परिस्थितीमध्ये सहभागी होणाऱ्या आयुर्वेद तज्ज्ञाची जबाबदारी मात्र खूपच वाढलेली असते. अशा वेळी त्याच्याकडे कॅन्सर या रोगाचे ॲलोपॅथीचे अद्ययावत ज्ञान असणे ही मूलभूत गरज आहे. तसेच जी आयुर्वेदिक औषधे देण्याचे योजले जात आहे, त्याची ॲलोपॅथी तज्ज्ञाला त्याला समजेल, त्या भाषेमध्ये योग्य ती माहिती आयुर्वेद तज्ज्ञाने करून देणेही आवश्यक असते. असे झाले की कॅन्सर रूग्णाला त्याचा निश्चितपणे फायदा मिळू लागतो. अशी परिस्थिती हल्ली काही रूग्णालयांत पाहायला मिळते आहे. तिचे अतिशय उत्साहवर्धक परिणामही पाहायला मिळू लागले आहेत.

कॅन्सर वा अन्य कोणत्याही व्याधीने पीडित रूग्ण जेव्हा ॲलोपॅथी औषधासोबतच आयुर्वेदिक औषध घेत असतात, तेव्हा अशा औषधांविषयीची त्यांच्या ॲलोपॅथी आणि आयुर्वेद चिकित्सकांची अनभिज्ञता आणि अज्ञान संबंधित रूग्णासाठी घातकच ठरत असते. ॲलोपॅथी व आयुर्वेद औषधे एकत्र घेणाऱ्या बहुसंख्य रूग्णाबाबतीत आज नेमके हेच दिसून येत आहे. त्यामुळे आयुर्वेद चिकित्सा घेऊ इच्छिणाऱ्या अशा रूग्णांनी त्यांच्या ॲलोपॅथी डॉक्टरला याबाबत अंधारात ठेवता कामा नये. त्याचप्रमाणे अशा रूग्णांची चिकित्सा करणाऱ्या आयुर्वेद डॉक्टरांनीही स्वतः पुढाकार घेऊन संबंधित रूग्णाची चिकित्सा करणाऱ्या ॲलोपॅथी तज्ज्ञाशी संपर्क साधून समन्वयाने चिकित्सा योजना करणे आवश्यक आहे. संबंधित ॲलोपॅथी तज्ज्ञानेही अहंकार बाजूला ठेऊन याबाबत सहकार्याची भावना ठेवणे, अंतिमतः रूग्णाच्या हिताचे ठरेल. अखेरीस रूग्णहित हेच वैद्यकीय व्यवसायाचे ध्येय असले पाहिजे, मग ते कुठल्या चिकित्सा पद्धतीने साधले जाते ही बाब गौण आहे.

**डॉ. श्रीराम सावरीकर हे एम. डी. (आयु), पीएच. डी. असून, आयुर्वेद प्राध्यापक तसेच गुजरात आयुर्वेद विद्यापीठाचे माजी कुलगुरू, भारत सरकारचे माजी आयुर्वेद सल्लागार आणि भारत सरकारच्या आयुर्वेद फार्माकोपिया समितीचे माजी अध्यक्ष राहिले आहेत. त्यांची रसचंडांशु – हिन्दी टीका, शारंगधर संहिता – इंग्रजी टीका – तीन खंड, अर्वाचीन आयुर्वेदायन, आयुर्वेद – फाउंडेशन ऑफ हेल्दी लाइफ, इंग्रजी, वैद्यकीय सांख्यिकी शास्त्र– हिंदी आदी साहित्य प्रकाशित झाले आहे.**

**संपर्क** : sssavrikar@gmail.com

UMANG
Charitable Trust





# UMANG
## special school
### For autistic and slow learners

## LOcations

**1 Kandivali**
umang intervention centre,
bandar pakhadi road,
kandivali west,
mumbai-400067.
contact: +91 89762 87060

**2 Bhayander**
bungalow number 8,
indralok phase III, gopal
patil road, bhayander
east, mumbai- 401105
contact: 7506002345

**3 Vasai**
samiranand, next to mary
vila, besides ribbons and
balloons cake shop, vasai
road, vasai
contact: 9921580294
7506048663

## Facilities

- Remedial education
- Functional and skills training
- NIOS & OBE board education
- Speech & Language therapy
- Occupational therapy
- Social skills training
- Psycho -Educational assessment
- Guidance & Counselling
- Sports training
- Pre - vocational & vocational training

umang-trust.org
umangtrust2000@gmail.com

Samatawadi MuktSanvad Patrika
Monthly Magazine- Publishing date- 1st of every month
RNI Regd No. MAHMAR/2023/86554

